म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५६०५

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

संग्रहालय/वाचनालय शाखा.

अनुक्रम | विभाग | क्रमांक

पुस्तकाचें नांव वैवाहिक जीवन

लेखक [redacted]

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0005697

॥ श्री ॥

# वैवाहिक जीवन

## भाग पहिला

विकारहेतौ सति विक्रियन्ते ।
येषां न चेतांसि त एव धीराः ॥


लेखक

लक्ष्मण केशव भावे,

बी. ए., एलएल्. बी.,

वकील, मु. पाली, सं. भोर

उपसंपादक, महाराष्ट्रीय ज्ञानकोश



REFBK-0005697



: मुख्य विक्रेते :

बापट आणि कंपनी,

झावबाची वाडी, मुंबई नं. २

प्रकाशक
एन्. टी. भिडे, बी.ए.,
मॉडर्न बुकडेपो, बुधवार पेठ,
आनंदाश्रमासमोर, पुणें २.

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

पुस्तकें मिळण्याचे पत्ते

१. प्रकाशकाकडे.
२. लेखक—श्री. लक्ष्मण केशव भावे,
मु. पो. पाली, जि. कुलाबा
किंवा C/o श्री. लक्ष्मण विनायक पाटील,
कान्हेरे बिल्डिंग, तिसरा मजला,
कोहिनूर सिनेमाजवळ, दादर, मुंबई.

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते,
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव, पुणें २.

# निवेदन

" In my first marriage I paid such a terrible price for sex-ignorance that I feel that knowledge gained at such a cost should be at the service of humanity."

—*Dr. Marie Stopes*

वरील इंग्रजी अवतरणांत दिल्याप्रमाणें सदरहू लेखकाचा विवाहांतला अनुभव दु:खमय व निराशाजनक आल्यामुळें गृहस्थाश्रम ऊर्फ वैवाहिक जीवन सुखी कसें होईल याबद्दल मराठी व इंग्रजी वाङ्मयाचें वाचन व मनन गेलीं वीस वर्षे चालू आहे. तसेंच स्वत:च्या प्रत्यक्ष अनुभवाबरोबर भोंवतालचे इष्टमित्र, स्नेही व शेजारी यांची परिस्थिति अवलोकन करून वाचन, मनन, अनुभव व अवलोकन यांवरून बनलेलीं या विषयावरील मतें प्रसिद्ध केल्यास उपयोग होईल अशी खात्री वाटल्यामुळें सदरहू विषयावर हें पुस्तक लिहिलें आहे.

लेखकानें आपल्या स्वत:चें मत जागोजाग स्पष्ट केलें आहे. पण सुभाषितें व थोर लोकांचीं वचनें हींहि जगाचें ज्ञान व अनुभव यांवर आधारलेलीं असल्यामुळें बोधप्रद निदान चिंत्य तरी असतात. म्हणून लेखकानें स्वमतानुकूल असे आधार जागोजाग दिले आहेत, इतकेंच नव्हे तर, मतभेदांचे बाबतींत दुसरी बाजूहि वाचकांपुढें येण्याकरितां प्रतिकूल वचनें व उतारेहि उद्धृत केले आहेत. कित्येक वादग्रस्त बाबींचें विवेचन मात्र जरूर तितकें सविस्तर झालेलें नाहीं; याचें कारण पुस्तकाची मर्यादा हें होय. पुस्तक अल्प किंमतींत सर्वांना उपलब्ध व्हावें म्हणून पृष्ठसंख्या मर्यादित करावी लागली आहे. पुस्तकांतील अनेक इंग्रजी व संस्कृत उतारे, सुभाषितें व वचनें यांचा मराठी अर्थ दिला नाहीं, याचें कारण मर्यादित पृष्ठसंख्या हेंच होय. इंग्रजी व संस्कृतचा हल्लीं बराच प्रसार झाला असल्यामुळें ही अडचण वाचकांना फारशी भासणार नाहीं.

या पुस्तकाचा उद्देश विवाहसौख्य कसें लाभेल हें दर्शविण्याचा असून तें लिहितांना भाषा फार जपून वापरली आहे; इतकी कीं, हें पुस्तक प्रौढ युवयुवतींना वाचण्याची शिफारस करण्याइतकें व विवाहमंगलसमयीं वधूवरांना देणगी म्हणून देण्याइतकें निरपवाद व्हावें, अशी कसोशीनें काळजी

घेतली आहे. तत्संबंधीं अधिकृत अभिप्राय माझे स्थानिक व्यवसायबंधु रा. रा. चिमणाजी माधव कुलकर्णी, वकील, व हरएक सार्वजनिक कामांतले सहकारी रा. रा. गोविंद रामचंद्र ऊर्फ बापूसाहेब लिमये यांचा मिळवून पुस्तकांत प्रसिद्ध केला आहे.

लैंगिक समाजस्वास्थ्याला विवाहबंधन आवश्यक आहे व कोणताहि विवाहबाह्य स्त्रीपुरुषसंबंध धार्मिक, सामाजिक व नैतिक दृष्ट्या दूषणीय व दंडणीय होय, हीं दोन प्रमेयें ग्राह्य मानून, व विवाह बंधनकारक असूनहि बंधनपर न भासावा, इतकेंच नव्हे तर, हें विवाहबंधन आमरण टिकवावें असेंच वाटावें, एवढ्याकरितां हें विवाहबंधन उभय पक्षीं जास्तींत जास्त सुखावह होण्याकरितां वैवाहिक जीवन कसें चालवावें, याचें विवेचन करण्याचे हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे. विवाहविषयक कायदा, लैंगिक विज्ञान, संततिनियमनाचीं साधनें, वगैरे विषयांची माहिती विवाहितांना मिळणें आवश्यक आहे, अशा अनेकांच्या सूचना आल्यामुळें " वैवाहिक जीवन, भाग दुसरा " हें पुस्तक लौकरच प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

स्वभावसाम्य, संस्कृतिसाम्य, शिक्षणसाम्य व ध्येयसाम्य हे वैवाहिक प्रेमाचे आधारस्तंभ असून त्यांपैकीं स्वभावसाम्य हा विषेश महत्त्वाचा आधार आहे. कारण स्वभावसाम्य नसेल तर बाकी तिन्ही साम्यें असूनहि खरें प्रेम उत्पन्न होणार नाहीं. मैत्रीलाहि हाच नियम लागू आहे. स्वभाव ही अत्यंत गूढ बाब आहे. पांचदहा वर्षें परिचित असलेले मित्रहि एकाद्या अनपेक्षित प्रसंगानें खऱ्या स्वभावाची कसोटी लागून एकमेकांचा तिरस्कार करण्यास प्रवृत्त होतात व मैत्री तुटल्याचीं उदाहरणें घडतात. उपवर व उपवधू अशा तरुणतरुणींना परस्परांच्या स्वभावाचें पूर्ण ज्ञान होणें अवघड आहे. ज्यांचा फलज्योतिषशास्त्रावर विश्वास आहे, त्यांना ग्रहमैत्रीवरून स्वभावसाम्य जाणण्याचा मार्ग सुचविलेला असून ज्योतिषशास्त्राप्रमाणें विचार केल्यास-एकाच लग्नाच्या किंवा एकाच राशीच्या माणसांत स्वभावसाम्य असलेंच पाहिजे; तसेंच इतरहि ग्रहमैत्रीवरून स्वभावसाम्य ठरवितां येतें. म्हणून ज्यांचे विवाह टिपणें पाहून झालेले आहेत व ज्यांना स्वभावसाम्याचा अनुभव ग्रहमानानुसार पटला आहे, त्यांनीं या लेखकाकडे पत्रद्वारें आपापले अनुभव कळवावे, ही विनंति आहे. या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत

'स्वभाव व ज्योतिषशास्त्र' असें एक प्रकरण लिहिण्याचा लेखकाचा विचार आहे. फलज्योतिष हें शास्त्रच नाहीं, असें अनेक विद्वानांचें मत असल्यामुळें वर सुचविल्याप्रमाणें अनुभव संग्रहित करतां आले, तर हें प्रकरण लिहिणें बरें.

## आभार

हें पुस्तक लिहिण्याचे कामीं माझे शाळा-कॉलेजपासूनचे (पुणें न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज) मित्र रा. रा. मुरलीधर विश्वनाथ गोरे, एलएल्.बी. वकील, कल्याण, प्रिन्सिपॉल गोपाळ रामचंद्र परांजपे, आय्.इ.एस्. रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, मुंबई, रा. रा. बळवंत महादेव बापट, बी. ए., एस्. टी. सी. हेडमास्तर वसई हायस्कूल यांची फार मदत झाली. तसेंच पुस्तक लिहून झाल्यावर तें सर्व बारकाईनें वाचून योग्य सूचना केल्याबद्दल व अभिप्राय दिल्याबद्दल सुपरिचित विद्वान् लेखक 'भारद्वाज' यांचा व माझे व्यवसायबंधु रा. रा. चिमणराव कुलकर्णी वकील, पाली यांचा मी फार आभारी आहें. तसेंच या पुस्तकाला बहुमोल व विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहिल्याबद्दल 'केसरी' वृत्तपत्राचे सहसंपादक वासुदेव कृष्ण भावे बी.ए., एल्एल्.बी. यांचे आणि हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचे कामीं माझे स्नेही रा. रा. गोपीनाथपंत सिदकर, एल्एल्. बी. वकील, ठाणें आणि दत्तात्रय महादेव ओक बी. ए., एल्एल्. बी. वकील, पुणें यांनीं उत्तेजन दिलें, याबद्दल या सर्वांचे आभार मानून, हें पुस्तक वाचकांचें वैवाहिक जीवन सुखी करण्यास मार्गदर्शक होवो, असें इच्छितों.

पाली
ता. १।१२।३८.

ल. के. भावे

# प्रस्तावना

## ले० वासुदेव कृष्ण भावे, 'केसरी' कचेरी, पुणें

पुस्तककर्ते रा. लक्ष्मण केशव भावे हे विद्वान् व अनुभविक गृहस्थ आहेत. वैवाहिक जीवन हा विषयच असा आहे कीं त्यावर अनुभव, अवलोकन व ज्ञान यांवाचून अधिकारपूर्वक लिहिणें धोक्याचें आहे. माझे मित्र रा. लक्ष्मणरावजी भावे वरील त्रिविध गुणांपैकीं अनुभव व ज्ञान या दोन गुणांनीं सुसंपन्न आहेत. पण अलीकडे बरींच वर्षें ते कुलाबा जिल्ह्यांत पाली या आडबाजूच्या खेड्यांत राहात असल्यामुळें समाजावलोकनाच्या विस्तीर्ण क्षेत्रास कांहींसे मुकले असावे. सांप्रत नागरजीवन हें ग्रामिक जीवनाहून पुष्कळच बदललें आहे. अविवाहित पण प्रौढ अशा तरुणतरुणींचे घोळके शहरांत सर्वत्र आढळतात व त्यांच्या छानछोकीच्या राहणीवरून नवख्या मनुष्याच्या मनाला मोहनी पडून हे घोळके किती सुखी आहेत अशा अर्थाचे विचार त्याच्या डोक्यांत उसळतात. ही स्थिति हिंदुस्थानांतील नागरजीवनाची झाली. मग जे हिंदी लोक युरोपांत जाऊन तेथील नयनमनोहर व अविवाहित तरुणींना पाहात असतील त्यांच्या मन:स्थितीचें चित्र किती तरी पटींनीं रम्य असेल हें सांगावयास नकोच.

हिंदुस्थानांत विशेषत: महाराष्ट्रांत अविवाहित नागर तरुणतरुणी दृष्टीसमोरून गेल्यावर जुन्या पिढींतील कित्येकांना त्यांच्या भावी वैवाहिक जीवनाविषयीं कदाचित् हेवा वाटावा व आपण जुन्या काळांत जन्मून खऱ्या वैवाहिक सुखाला आंचवलों या समजुतीनें त्यांच्या जिवाला चुटपुट लागावी यांत नवल नाहीं. पण या अविवाहित तरुण-तरुणींचे घोळके आतां कोठें उदय पावत आहेत. त्यांचे विवाह अजून व्हावयाचे आहेत व त्या विवाहांतील काल्पनिक स्वर्गीय सुखें अजून अनुभवास यावयाचीं आहेत. तीं जेव्हां येतील व त्या पद्धतींत चारदोन पिढ्या जातील तेव्हांच जुन्या वैवाहिक जीवनाशीं नव्या वैवाहिक जीवनाची सर्वांगांनीं तुलना करावयास सांपडून या दोन जीवनांतून अधिक सुखी जीवन ठरवितां येईल.

असो. तूर्त वैवाहिक जीवनाचा विचार करतांना विवाहपद्धति प्राचीन कालापासून जगांत कां रूढ झाली हें पाहिलें पाहिजे. याज्ञवल्क्य स्मृतीवर मिताक्षरानामक टीका लिहिणारा विज्ञानेश्वर 'धर्मप्रजासंपत्तिः प्रयोजनं दारसंग्रहस्य' असें विवाहाचें प्रयोजन सांगतो. त्याच्या मतें मनुष्याच्या हातून धर्म पाळला जाण्यास व प्रजा प्राप्त होण्यास विवाहाची आवश्यकता आहे. धर्म म्हणजे मनुष्याचें ऐहिक व पारलौकिक कर्तव्य; तें विवाहानें पार पडतें व मानववंश कायम राहण्यास अवश्य अशी संतति विवाहापासून लाभते. मनुष्याकडून धर्मपालन होण्यास स्त्री व पुरुष या उभयतांचें सांसारिक ध्येय एक पाहिजे. म्हणजे तीं उभयतां एकविचारानें राहिलीं पाहिजेत. त्यांजपासून उत्पन्न होणारी संतति बुद्धिमत्ता, रूप, नीतिमत्ता व आरोग्य यांनीं युक्त असावी. अशी संतति आईबाप त्या गुणांनीं संपन्न असतील तरच संभवेल. विवाह हा चैनीकरतां नसून वरील कार्यासाठीं आहे असें एकदां ठरलें म्हणजे विवाह केव्हां, कोणाशीं व कसा व्हावा याविषयीं एकवाक्यता होण्यास विलंब लागणार नाहीं.

शीलसंपन्न व आरोग्यसंपन्न संतति त्या गुणांनीं युक्त अशाच स्त्री-पुरुषांच्या ठिकाणीं संभवते. यासाठीं स्त्री व पुरुष यांचें शील व आरोग्य विवाहपूर्वकालीं सुरक्षित राहण्यास कांहीं तजवीज करावी लागेल. ऋतु-प्राप्तीनंतर कन्येनें तीन वर्षें लग्नाची वाट पाहावी व त्या काळांत पिता स्वकर्तव्यास न जागला तर तिनें आपला पति निवडावा असें मनूनें म्हटलें आहे. हल्लीं मुलींना साधारणपणें चौदाव्या पंधराव्या वर्षापर्यंत ऋतु प्राप्त होतो. तेव्हां त्यांचें लग्न किमान सतराव्या आठराव्या वर्षापर्यंत मनूच्या मताप्रमाणें झालेंच पाहिजे. अशानें ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षेंपर्यंत मुली कौमार्य संभाळून राहूं शकतील. त्यापुढें त्यांजवर अविवाहित स्थितींत राहण्याचा प्रसंग आला तर त्यांचें वांकडें पाऊल पडण्याचा फार संभव आहे. या दृष्टीनें सतराव्या आठराव्या वर्षापुढें धोका आहे असें समजावें व विवाहाची वयोमर्यादा यापुढें जितकी जाईल तितका सामाजिक शीलाचा व आरोग्याचाहि ऱ्हास झाल्याशिवाय राहणार नाहीं.

हें स्त्रियांविषयीं झालें. पुरुषांविषयीं बोलावयाचें तर पुरुषाचें वय विवाहसमयीं वीस बावीस वर्षांपुढें जातां कामा नये. तसें तें गेल्यास पुरुषा-

च्या शरीरप्रकृतीस अपाय होईल, त्याचें शील बिघडेल व त्याजपासून निपजणारी संतति आरोग्य, नीतिमत्ता व शरीरसामर्थ्य यांत हिणकस ठरेल. स्त्री व पुरुष यांची वैवाहिक वयोमर्यादा येणेप्रमाणें एकदां निश्चित झाल्यावर विवाहोत्तर त्यांचे परस्पर संबंध कसे राहिले असतां जीवित सुखी होईल हा प्रश्न शिल्लक राहतो. स्त्री व पुरुष या दोन व्यक्तींत पुरुष हा स्त्रीपेक्षां शरीरानें व मनानें अधिक कणखर आणि जगाचे आघात सोसण्यास अधिक समर्थ असल्यानें संसाराचा गाडा मुख्यतः त्याच्या तंत्रानें चालावा याविषयीं शंका उरत नाहीं. हें कार्य पुरुषाचें वर्चस्व स्त्रीवर राहिल्याशिवाय घडणारें नसल्यामुळें पुरुष शिक्षणानेंहि स्त्रीपेक्षां वरचढ असला पाहिजे हें ओघानेंच कबूल करावें लागेल.

शिक्षणांत व ज्ञानांत पुरुष स्त्रीपेक्षां बराच पुढें असल्यानंतर पुरुष बौद्धिक अगर सार्वजनिक जीं कार्यें करील त्यांचें कौतुक करण्याची पात्रता पत्नीच्या ठिकाणीं पूर्णांशानें राहीलच असा नियम नाहीं व तशी ती राहिली पाहिजे याविषयीं कोणीं आग्रहहि धरण्यांत अर्थ नाहीं. तिनें संसाराची एक बाजू संभाळली व भर्त्याचा आयुष्यक्रम निर्विघ्न केला म्हणजे तिचें कर्तव्य संपलें. पत्नी बौद्धिक उन्नतींत पतीच्या बरोबरीची पाहिजे व तिनें संसारहि संभाळला पाहिजे अशी दुहेरी जोखीम तिच्यावर टाकण्यांत तिला अन्याय होईलच, शिवाय एवढ्या ओझ्याखालीं ती वांकूनहि जाईल. म्हणून पतीनें आपल्या गुणाच्या कौतुकार्थ जनतेवरच मुख्यतः अवलंबून राहावें, पत्नीवर राहूं नये. मात्र पत्नीला पतीची जगांत होणारी वाहवा कळत असल्यामुळें पतीविषयीं जो अभिमान वाटावयास पाहिजे तो तिला वाटेलच. आपण हिंदी लोक गरीब आहों. स्त्रियांनीं आपल्या संसारांतील कष्ट केल्याशिवाय गत्यंतर नसतें. ते कष्टहि इतके असतात व त्यांत कालहि इतका जातो कीं त्यांतून बाहेर पडून पतीसारखें कांहीं सार्वजनिक व बौद्धिक जीवन आपण घालवूं अशी अपेक्षाहि स्त्रियांना करतां येणार नाहीं. या दृष्टीनें त्या जीवनाची ज्या स्त्रीला गोडी लागली आहे तिला तें संसारांत दुष्प्राप्य झाल्यानंतर तिचे मानसिक व शारीरिकहि हाल होण्यापेक्षां ती मनानें प्रथमपासूनच त्या विषयापासून दूर राहिलेलीच बरी.

आतां संसाराच्या अनुभवावरून विचार करतां पति व पत्नी यांनीं संसार हा तडजोडीनेंच चालवावयाचा असतो. पति व पत्नी हीं परस्परांशीं सर्वथैव अनुरूप आहेत असें मागील पिढींत प्रायः घडत नव्हतेंच; पण पुढील पिढ्यांतूनहि घडेल असें म्हणवत नाहीं. विवाहापूर्वी तरुण व तरुणी यांचा परस्परांशीं परिचय विशिष्ट मर्यादेपर्यंतच होऊं शकेल. तो परिचय इतका थोडा होईल कीं त्यावरून तरुण-तरुणींना परस्परांचे गुणावगुण व स्वभावधर्म आगाऊ तंतोतंत समजतील असा निर्वाळा मुळींच देववणार नाहीं. अशा स्थितींत होणारीं लग्नें जवळ जवळ सोडतीसारखींच असून विवाहानंतर तीं परस्परांस पूर्णपणें न आवडतील तर त्यांनाहि तड-जोडीनेंच एकत्र संसार करावा लागेल. पण तीं दोघें शिक्षणांत व ज्ञानांत बरोबरीचीं असल्यास तडजोडीची भाषा बरीचशी मागें पडून सुशिक्षित पत्नीचें आयुष्य अशिक्षित पत्नीच्या आयुष्यक्रमाहून फारच कष्टमय होईल अशी भीति वाटते. यावर कोणी प्रश्न करील कीं अशा पत्नीस कंटाळून पति जर तिला टाकील किंवा दुसरें लग्न करील तर पत्नीची वाट काय? याला उत्तर असें कीं, मानवाच्या आयुष्यक्रमात कधीं तरी असल्या आपत्ती यावयाच्या हें धरूनच चालावयास पाहिजे. त्यावरहि एक उपाय आहे. हल्ली ज्या प्रकारचें शिक्षण देशांत प्रचलित आहे त्या प्रकारच्या शिक्षणामुळेंच सांसारिक सुखावर मनुष्य वाजवीपेक्षां फाजील भर देऊन अनन्वित प्रकार, दुराचार व कठोरपणा करावयास प्रवृत्त होतो. ही मनु-ष्याची मनोवृत्ति हल्लींचा शिक्षणक्रम बदलून त्यांत धार्मिक वातावरण उत्पन्न केल्यानें बरीचशी टळणार आहे. ती जेवढी टाळतां येईल तेवढी टाळण्याचा प्रयत्न सरकारानें केला पाहिजे.

समाज जितका आत्मिक व मानसिक दृष्ट्या उच्च तितकीं त्याज-वरील बंधनें अधिक हा सिद्धांत समजून चालावा. पण हीं बंधनें ज्यास असह्य होतील व बंधनापलीकडे ज्यास जावयास पाहिजे त्याचा मार्ग हल्लींच्या काळांत कोण आडवूं शकणार आहे? अशांच्या दृष्टीनें पाहिल्यास रा. भावे यांनीं वैवाहिक जीवन सुखी होण्यासाठीं जे अनेक उपाय सुचविले आहेत ते योग्यच मानावे लागतील. तथापि ते सुचवितांना उच्च सामाजिक जीवनाची योग्यता त्यांनीं कबूल केली आहे हें विसरतां

कामा नये. त्यांनीं विषय अत्यंत चिकित्सापूर्वक चर्चिला असून कोणाहि तरुण-तरुणींस तो वाचीत असतां आपणांस कांहीं नवीन सूचना मिळाल्या असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांनीं विषयप्रतिपादन अनेक इंग्रजी व मराठी ग्रंथकारांच्या आधारें केलें आहे. या प्रकारचें हें मराठींतील पहिलेंच पुस्तक होय यांत शंका नाहीं. परिस्थिति जशी बदलेल तशा नवीन सामाजिक अडचणी उत्पन्न होतील व त्यांतून समाजास बाहेर पडण्याचा मार्ग सुचविणारे लेखकहि पुढें येतील. रा. लक्ष्मणराव भावे हे त्या धर्तींचे पहिले लेखक असल्यामुळें त्यांचें पुस्तक नव्या-जुन्यांना, सनातनी-सुधारकांना व वृद्ध-तरुण स्त्री-पुरुषांना सारखेच वाचनीय व मननीय वाटेल अशी उमेद आहे.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरण नांव | पृष्ठें |
|---|---|---|
| | निवेदन .... .... | ३ |
| | प्रस्तावना .... .... | ८ |
| | अर्पण ... .... | १३ |
| प्रकरण पहिलें : | विजोड जोडपीं .... .... | १– १२ |
| प्रकरण दुसरें : | विवाह कीं ब्रह्मचर्य ? .... | १३– २३ |
| प्रकरण तिसरें : | विवाहाचा हेतु .... .... | २४– ३१ |
| प्रकरण चौथें : | वैवाहिक निवड .... .... | ३२– ४१ |
| प्रकरण पांचवें : | प्रेम व मैत्री .... .... | ४२– ५६ |
| प्रकरण सहावें : | विवाह व हिंदुधर्मशास्त्र .... | ५७– ६० |
| प्रकरण सातवें : | नूतन विवाहितांस सूचना .... | ६१– ६६ |
| प्रकरण आठवें : | सुशिक्षितांची जबाबदारी .... | ६७– ८७ |
| प्रकरण नववें : | वैवाहिक सुखाचीं साधनें ... | ८८–१०९ |
| प्रकरण दहावें : | वैवाहिक जीवनांत क्रान्ति .... | ११०–११७ |
| प्रकरण अकरावें : | घटस्फोट (डायव्होर्स) .... | ११८–१३० |
| प्रकरण बारावें : | पुनर्विवाह—विधवाविवाह .... | १३१–१४० |
| प्रकरण तेरावें : | मिश्रविवाह .... .... | १४१–१४८ |
| प्रकरण चौदावें : | वैवाहिक जीवनाचा उत्तरार्ध .... | १४९–१५३ |
| प्रकरण पंधरावें : | समारोप .... .... | १५४–१६३ |
| | अभिप्राय .... .... | १६४ |

# अर्पण

ज्या भारतीय पुरुषांनीं श्री रामचंद्र प्रभू-
प्रमाणें खासगी व सार्वजनिक जीवन
सत्शीलतेनें व कर्तव्यनिष्ठेनें चालविलें,
ज्यांनीं एक पत्नी, पुत्र कन्यादि अपत्यें
मागें ठेवून मृत झाल्यावर सावत्र-
संबंध व गृहकलह टाळण्याकरितां
द्वितीय विवाह केला नाहीं व
नीतिमार्गहि सोडला नाहीं, ज्यांनीं
प्रथम पत्नी दुर्बल, रोगी निपु-
त्रिक किंवा निर्बुद्ध वगैरे कार-
णांस्तव द्वितीय विवाह न
करितां वैराग्य वृत्तीनें वैवा-
हिक जीवन कंठलें पण नीति-
मार्ग सोडला नाहीं, तसेंच
ज्यांनीं प्रथम पत्नी मृ
झाल्यावर अनीतीचा मार्ग
टाळण्याकरितां जरूर
त्या अडचणी सोसू-
नहि द्वितीय विवा-
हाचा वा पुनर्विवा-
हाचा मार्ग पत्क-
रला, अशा सन्मा-
र्गगामी भारतीय
पुरुषांना,
आणि

ज्या भारतीय
स्त्रियांनीं पति
नष्ट, मृत,
विरक्त किंवा
संन्यस्त झाला तरी
घटस्फोट, पुनर्विवाह
वगैरे मार्ग न पत्क-
रतां वैराग्यवृत्ति आच-
रली, ज्यांनीं पति दुष्ट,
क्रूर, जुगार, मद्यपी
किंवा व्यभिचारी झाला
असतां त्याला निष्ठेनें,
धैर्यानें व युक्तीनें सुधारून
ताळ्यावर आणिलें, ज्यांनीं
पुरुषाचे पत्निनिधनानंतरच्या
द्वितीय विवाहांत पत्नीपद स्वी-
कारून सावत्र अपत्यांचें स्वापत्या-
प्रमाणें पालन केलें, ज्यांनीं पति-
निधनाची आपत्ति ओढवल्यानंतर
संन्यासमार्ग आचरणें अशक्य झाल्या-
मुळें पुनर्विवाहाचा मार्ग पत्करण्याचें
नीतिधैर्य दाखवून अनैतिक जीवन
त्याज्य मानलें, अशा सर्व पूर्वकालीन व
विद्यमान स्त्रीपुरुषांचे स्मृतीस हें पुस्तक
सादर समर्पण असे.

—पुस्तककर्ता

५६७७

# वैवाहिक जीवन

## प्रकरण पहिलें

## विजोड जोडपीं

रोदन्तः शिशवः . . . । भार्या निष्ठुरभाषिणी प्रभुरपि क्रोधेन पूर्णः सदा ॥
. . . . . . . . . . . . । . . . . . धिग्धिग्गृहस्थाश्रमः ॥
न जाने संसारः किं अमृतमयः किं विषमयः ॥

विवाह आणि संसार या भवचक्रांत प्रत्येक स्त्रीपुरुष बहुधा सांपडतो, आणि याप्रमाणें दहावीस वर्षे संसार झाल्यावर कोणाहि स्त्रीपुरुषाला संसाराचा स्वतःचा अनुभव विचारल्यास, 'आमचा संसार सुखानें चालला आहे,' असें अगदीं मनापासून प्रामाणिकपणें सांगणारे स्त्रीपुरुष कितीसे निघतील? 'दुरून डोंगर साजरे' या न्यायानें प्रत्येकाला दुसऱ्याचा संसार सुखाचा आहे, असें वाटतें; पण तो स्वतः मात्र असंतुष्ट व दुःखी असतो. याप्रमाणें आपापल्यापरी दुःखी असणारेच संसारी स्त्रीपुरुष पुष्कळ आढळतात. पण या दुःखाचें नेमकें कारण काय, तें पुष्कळांना चटकन् सांगतां येत नाहीं. बहुधा नवरा सर्व दोष बायकोला देतो, तर उलट पक्षीं बायको मनांतून नवऱ्यावर असंतुष्ट असते व चरफडत असते! 'अंदरकी बात' अशी असली तरी बरेच स्त्रीपुरुष मोठ्या समंजसपणानें स्वतःचें हें गृहछिद्र दुसऱ्यांना कळूं नये म्हणून जपतात व संसार नीट चालला आहे, असें जगाला भासवितात. पण कोणी अचानक दुसऱ्याचे घरीं गेल्यास त्याला 'पोरे रडताहेत, बायको नवऱ्याला दुरुत्तरें बोलते आहे, नवरा रागानें लाल झाला आहे', असें दृश्य पुष्कळ घरीं आढळतें. कोणाकडे पाहुणे गेल्यास तीन दिवसांहून अधिक राहूं नये, अशी म्हण आहे; पण बहुधा एकदोन दिवसांतच घरांतील नवराबायकोमधील धुसफुस, आदळआपट आणि त्याचा वचपा मुलांना मार देऊन काढतांना

पाहुण्याचे नजरेस येतें आणि मुक्काम हलविण्याची बुद्धि पाहुण्याला साहजिक एकदोन दिवसांतच होते. अशा असंतुष्ट स्थितींत मनाला बोध व समाधान देण्याचें जुन्या वळणाच्या स्त्रीपुरुषांचें साधन म्हणून आपल्या हिंदु धर्मातील रामायण-महाभारतादि पुराणांतील राम-सीता, पांडव-द्रौपदी, कृष्ण-रुक्मिणी, सत्यवान्-सावित्री यांच्या गोष्टी ऐकण्याकरितां कथापुराणाला जाणें हें असतें. शाळा-कॉलेजांत शिकणाऱ्या नव्या तरुण पिढीला मराठी-इंग्रजी नाटक, कादंबऱ्या, लघुकथा वाचणें, आणि आपलें भावी संसारी जीवन सुखी कसें होईल याचा विचार करणें भाग पडतें.

## जुना जमाना

सन १९१० चे सुमारास अशाच मन:स्थितींत सदरहू लेखक होता. त्या वेळीं स्त्रीशिक्षण व पाश्चात्य सुधारणा यांचेविरुद्ध कै० विष्णुशास्त्री चिपळणकरांपासून वाहत असलेलें वारें कायम होतें; सेवासदन, कन्याशाळा, वगैरे स्त्रीशिक्षण संस्थांना प्रोत्साहन देणारी मनोवृत्ति त्या वेळीं महाराष्ट्रांत फारशी नव्हती. हल्लींप्रमाणें सकाळ-संध्याकाळ शाळा-कॉलेजांत जाणाऱ्या प्रौढ कुमारिकांचे घोळके रस्त्यांत दिसत नसत; फार काय पण पंधरासोळा वर्षांहून अधिक मोठ्या वयाच्या अविवाहित मुलीसुद्धां त्या वेळीं फार नसत. त्यामुळें वधूपरीक्षेसंबंधीं प्रत्यक्ष ज्ञान व अनुभव घेण्याला तो काळ तरुणांना अनुकूल नव्हता. वधूवरयोजना बहुधा वडील मंडळींच्याच पसंतीनें निश्चित होत असे.

मराठी वाङ्मयहि त्या काळांत वधूपरीक्षा, प्रीतिविवाह, वगैरे विषयांत अगदीं मागासलेलें होतें. लघुकथा, चित्रपट हीं प्रीतिविवाहाचीं विविध अंगें रंगवून त्याला उत्तेजन देणारीं प्रमुख साधनें त्या वेळीं उपलब्ध नव्हतीं. नाट्याचार्य खाडिलकर यांचें 'मानापमान' हें नाटक याच सुमारास रंगभूमीवर आलें, परंतु त्या नाटकांतहि सुशिक्षित समाजाचें तत्कालीन चित्र रंगविणारें कथानक न घेतां पौराणिक किंवा ऐतिहासिक काळाला शोभेल अशा व श्रीमंतीला व दागिन्यांना भुललेल्या 'भामिनी'चेंच चरित्र रेखाटलें आहे. तात्पर्य, कै० आगरकरांनंतर स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, प्रीतिविवाह, वगैरे सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रांत पुण्यांत किंवा महाराष्ट्रांत कोणीच वाग्वीर त्या वेळीं

वावरत नसल्यामुळें कॉलेजांतील तरुणहि या विषयांबद्दल आपापसांत चर्चा क्वचितच करीत.

याप्रमाणें भोंवतालीं पसरलेल्या अंधःकारामुळें तरुणांचीं मनें पाश्चात्य वाङ्मयांतील प्रीतिविवाहविषयक कथानकांनीं आकर्षून जात. कॉलेजांतील पहिल्या वर्षाला आंग्ल विदुषी जेन ऑस्टेन हिची जगप्रसिद्ध कादंबरी 'प्राईड अँड प्रेज्युडिस' ही अभ्यासक्रमांत नेमली जात असे. तिचें मराठींत रूपांतर 'आजपासून पन्नास वर्षांनीं' ही कादंबरी आहे. त्या कादंबरींतील नायक डार्सी व नायिका एलिझाबेथ यांच्या प्रीतिविवाहविषयक कथानकाची चातुर्यपूर्ण व हृदयंगम उभारणी पाहून त्या कादंबरींतील विवाहविषयानें मन आकर्षिलें जातें! त्या वर्णनाप्रमाणें आपल्या भोंवतालच्या परिस्थितीकडे पाहूं गेलें असतां हिंदु व आंग्ल समाजपरिस्थितींत त्या काळीं कांहीच साम्य नव्हतें, म्हणजे हिंदु समाजांत प्रौढ वधूवरांनीं परस्परांचे स्वभाव निरीक्षण करून विवाह ठरविल्याचें उदाहरण नसे; इतकेंच नव्हे तर त्या कादंबरींतील पात्रा-प्रमाणें सोळा ते तेवीस वर्षें वयाच्या तरुण अविवाहित मुली आपल्या समाजांत नसत. कारण त्या वेळीं पुण्यांतसुद्धां मुलींच्या प्रौढ विवाहाची वयोमर्यादा सुमारें पंधरासोळा वर्षापर्यंतच गेली होती. स्वभावपरीक्षणाला हें वय अयोग्य होय. शिवाय अनोळखी प्रौढ मुलांमुलींना परस्परांचे स्वभाव सम-जण्याची संधि देणाऱ्या चालीरीती व प्रसंग आपल्या समाजांत कोणतेहि नव्हते.

## नवा काळ

१९२० पासून वैवाहिक बाबतींत काळ व परिस्थिति छपाट्यानें बदलूं लागली. प्रो० अण्णासाहेब कर्वे यांच्या स्त्रीशिक्षण संस्था, पुण्यांतील सेवा-सदन आणि विशेषतः महात्मा गांधींनीं आपल्या चळवळींत स्त्रीपुरुषांना दिलेलें समान स्थान यामुळें स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, प्रीतिविवाह व स्त्रियांचे समान हक्क या विषयांसंबंधीं बहुतेक लघुकथा लिहिण्याकडे अलीकडे लेखक-लेखिकांची प्रवृत्ति दिसून येते. शिवाय विचित्र लीला, मायेचा पूत, सोन्याचा कळस, वंदे भारतम्, वगैरे नाटकांतल्याप्रमाणें अनेक नाटक-कादंबऱ्यांत मुख्य कथानकाला प्रीतिविवाहाचें एक उपकथानक मोठ्या कुशलतेनें जोडन दिलेलें

असतें. यामुळें पतिपत्निप्रेम आणि संसारसुख यांची चर्चा करणारें नाटक-कादंबरी-लघुकथादि ललितवाङमय आणि नाटक-सिनेमादि दृश्य काव्य यांचा भावनाप्रधान मनुष्य षोकी बनतो. या नवीन दृष्टीनें पाहूं लागल्यावर वय, विद्या, बुद्धि, स्वभाव, इत्यादींपैकीं एक किंवा अनेक कारणांस्तव पति व पत्नी परस्परांना अनुरूप नाहींत अशीं प्राचीन, अर्वाचीन व सद्य:कालीन किती तरी दांपत्यें आढळतात. प्राचीन काळांतलें वाल्मिकी रामायणांत वर्णिलेलें विजोड जोडप्याचें सुप्रसिद्ध उदाहरण दशरथ-कैकेयी हें होय. दशरथ-कैकेयीच्या वर्तनामुळें त्यांच्या एकंदर कुटुंबसौख्यावर जे भयंकर अनर्थ ओढवले त्यांचें प्राकृत रामायणांतील वर्णन येणेप्रमाणें :

### विशिष्ट नमुने : दशरथ-कैकेयी

"......कौसल्या पति। म्हणे राज्य द्यावें रामाप्रति। अैसें चित्तीं वाटतसे॥ अैकोनी दशरथाचें वचन।... विकल्प प्रवेशला तें अैकोनि। कैकयीच्या चित्त गृहीं॥ ... कैकेयी म्हणे नृप नष्टा। असत्या वादीया क्रिया भ्रष्टा। तुझे अंतरींचा भाव खोटा। सर्वही म्यां ओळखिला॥ अैकोनि तो राजा दशरथ। स्त्रीलोभें जाहला भ्रांत। कैकयीस म्हणे माग इच्छित। तें मी यथार्थ पुरविन॥ कैकयी म्हणे नृपनायका। वना धाडी रघुवीर। राज्य भरतासि सर्मापि॥ अैसे ऐकताची वचन। रायाचें हृदय जाहलें चूर्ण। भूमीवरी मूर्च्छा येऊन। निचेष्ठित पडियेला॥ जवळी आला अैकोनि रघुनाथ। कैकयी सांगे समाचार। म्हणे तूं वनासि करी गमन। चतुर्दश वर्षेपर्यंत॥ राज्य करील माझा भरत। सिताकांत अवश्य म्हणे॥ ... वनीं प्रवेशला रघुवीर। कर्णीं अैकताची ते भूपाल। म्हणे धाव बारे रघुनंदना। हाक फोडिली दशरथें॥ बोलोनी अैसें नयन वटारिले। सोडिला प्राण रामस्मरणें॥ मृत पावला दशरथ। नाहीं शोकाते अंत॥ दशरथाचें प्रेत देखोनी। भरत तेव्हां लोळे धरणी। अश्रु-धारा वाहती नयनीं। शोक गगनीं न समाये॥ श्रीराम गेला वनांतरीं। जरी मी येथें राज्य करी। तें मी भोगिताची ते क्षणी। महा चांडाल मी जाहलों॥ म्हणे तो कैकयीनंदन। कैकयीचें काळें वदन। माता नव्हे ते लाव पूर्ण। पतीचा प्राण घेतला॥ कैकयीनें येऊन सत्वर॥

भरतासी अेकांत विचार ।। म्हणे पुत्रा अैक वहिले । संकटीं म्यां राज्य साधिलें । रामासी वनवासा पाठविलें । नाना यत्नें करोनिया ।। भरते अैकताची तिची वाणी । म्हणे उठे येथोनी चांडाळणी । परम निर्दय तूं पापिणी । तूं सर्पीण होसी यथार्थ ।।.......''

याप्रमाणें कैकेयीच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळें राम, सीता व लक्ष्मण यांना बारा वर्षें वनवास व अनेक संकटें भोगावीं लागलीं, दशरथ राजा दुःखातिशयानें दिवंगत झाल्यामुळें त्याच्या राण्यांवर वैधव्य ओढवलें, आणि कैकेयीचा पुत्र भरत यानेंच खुद्द तिची पापिणी, चांडाळिणी, वगैरे शब्दांनीं निर्भर्त्सना केली. सत्प्रवृत्त दशरथाला तामसी, आसुरी प्रवृत्तीची स्त्री कैकेयी मिळाल्यामुळें केवढा घात झाला ! ! उलट पक्षीं सात्त्विक स्वभावाच्या पत्नीला राक्षसी प्रवृत्तीचा पति मिळाल्यास असाच अनर्थ ओढवतो. याचें उदाहरण याच वाल्मिकी रामायणांत रावण-मंदोदरी यांचें असून मंदोदरीचा सत्सल्ला न मानल्यामुळें रावणाचा व राक्षसकुळाचा अंत झाला त्याचें वर्णन :

## रावण-मंदोदरी

''.....मंदोदरी परम सज्ञान । पतिव्रता गुणसंपन्न । तीस तो दशवदन । बोलता जाहला ते वेळे ।। रावण म्हणे शुभ कल्याणी । तुवां जावोनी अशोकवनीं । बोधोनिया जनकनंदिनी । मज शयनी वश करी ।। सावध होऊन मंदोदरी । बोले तैं रावणाप्रती । सती सीता तुम्हांप्रती । वश नोहे कदाकाळें ।। सोडावी रामाची अंगना । शरण रिघावें रघुनंदना । काया वाचा मनें जाणा । तरी तुम्हां कल्याण ।। परदारेचा अभिलाष । जाणोनी प्राशन करणें विष । करितां परनिंदा द्वेष । मग अनर्थासी काय उणें ।। रावण प्रत्युत्तर जाहला देता । कदा माघारी नेदी सीता । मी आपुल्या पुरुषार्था । दावोनि राघवा जिंकीन ।। युद्धीं पुढें रावणाचें वक्षःस्थळ । लक्षोनिया तमाळनीळ । बाण सोडी तात्काळ । तो हृदयीं संचरला रावणाचे ।। कुपीसहित वक्षःस्थळ । बाण फोडोनी गेला तात्काळ । हृदयीं छिद्र पाडिलें विशाळ । रावणें प्राण सोडिला ।। मंदोदरी शोक करित । वक्षःस्थळ धबधबा पिटित !......।।''

अशा प्रकारच्या विजोड जोडप्यांचीं उदाहरणें महाभारतांतहि कौरव-कुळांत आहेत, व त्यामुळें असेच अनर्थ ओढवले आहेत ! ! आनंदीबाई आणि राघोबादादा पेशवे किंवा शेक्सपियरच्या नाटकांतील मॅकबेथ व लेडी मॅकबेथ हीं निराळ्या प्रकारचीं उदाहरणें होत, म्हणजे हीं दांपत्यें समानशील ऊर्फ सारख्या सारख्या स्वभावाचीं व एकविचारानें वागणारीं आणि पतिपत्नी दोघेंहि तामसी, आसुरी प्रवृत्तीचीं होतीं. म्हणून त्यांना विजोड जोडपीं म्हणतां येणार नाहीं आणि त्यांच्यावर ओढवलेल्या परिणामाबद्दल जगाला अनुकंपा वाटणार नाहीं, हें उघड आहे.

अशा प्रकारचीं पुराणेतिहासांतील उदाहरणें लक्षांत घेऊन आपल्या आजूबाजूची परिस्थिति निरीक्षण केल्यास अनेक प्रकारचीं विजोड जोडपीं आढळतात तीं अशीं :

## मिस्टर व मिसेस बेनेट

१. हुषार, सुशिक्षित व विशेषतः रसिक पुरुषाला मतिमंद, अरसिक व मूर्ख बायको मिळणें. अशा जोडप्याचें साधारण स्वरूप जेन ऑस्टिननें 'प्राईड अँड प्रेज्युडिस' या कादंबरींत मिसेस बेनेट व मिस्टर बेनेट या पात्रांच्या द्वारें रेखाटलें आहे. पण मिसेस बेनेटपेक्षांहि अधिक मूर्ख, अजागळ, गैदी, आळशी व अव्यवहारी, अर्धवट अशा बायकांचे नमुने प्रत्यक्ष पाहण्यांत येतात. अशा नादान, नालायक, तिरस्करणीय अतएव त्याज्य अशा स्त्रीचें स्वरूप नाटक-कादंबरींत यथातथ्य वर्णन केलेला नमुना अद्याप इंग्रजी-मराठी वाङ्मयांत आढळत नाहीं. पण आपल्या समाजांत सूक्ष्म निरीक्षण केल्यास वाचकांना असले नमने प्रत्यक्ष पाहावयास मिळतील. अशा विवाहसंबंधांचें पर्यवसान तीन प्रकारें होतें : (१) अशा पत्नीचे हयातींत दुसरा विवाह करणें; (२) प्राईड अँड प्रेज्युडिसमधील मिस्टर बेनेटप्रमाणें संसारांत राहून विरक्त संन्याशा-प्रमाणें आयुष्य कंठणें; किंवा (३) पहिल्या नालायक, नापसंत बायकोचा छळ करून देहत्यागानें स्वतःची सुटका करून घेणें. वरील तिन्ही प्रकारचे दैवदुर्विलास आज आपल्या समाजांत प्रत्यक्ष घडत असलेले दिसत आहेत. पण सामान्यतः सुखी संसार असलेल्या लोकांना 'दुरून डोंगर साजरे' दिसतात.

## ‘ इंदु काळे व सरला भोळे ’

२. दुसरा प्रकार म्हणजे बुद्धिप्रधान, ध्येयवादी किंवा तत्त्वनिष्ठ, सन्मार्गी व विशेषत: सुशिक्षित असून गरीब, मध्यम स्थितींतील इसमांना कपडेलत्ते, दागदागिन्यांना सुखसर्वस्व मानणाऱ्या अर्धशिक्षित, व साधारणपणें मोठ्या पगाराच्या व श्रीमंत आईबापांच्या लाडावलेल्या मुली बायका मिळणें. अशा जोडप्याचें साधारण चित्र ‘ मायेचा पूत ’ या नाटकांत नाटककार श्री० जोशी यांनीं त्या नाटकांतील वकील व त्याची बायको वकिलीणबाई या पात्रांच्या द्वारें चांगलें रंगविलें आहे. अशा बायका ध्येयवादी विद्वानाच्या संसारसुखांत माती कालवतात. इतकेंच नव्हे तर, असा नवरा पूर्ण तत्त्वनिष्ठ किंवा खंबीर मनाचा नसल्यास त्या अर्धवट व बाईलवेड्याला अन्याय्य किंवा असन्मार्गानें पैसा मिळविण्यास प्रवृत्त झाल्यामुळें वेळप्रसंगीं फौजदारी गुन्ह्याच्या कचाट्यांत सांपडण्याचा प्रसंग येतो. मोठाल्या श्रीमंत व राजघराण्यांतहि अशा केवळ विलासप्रिय किंवा राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या स्त्रिया आढळतात. प्राचीन रोमन इतिहासांत सुप्रसिद्ध क्लिओपाट्रा, आधुनिक ऑस्ट्रियाच्या इतिहासांतील राणी मेरी, आपल्या मराठेशाहींतील ताराबाई, वगैरे अनेक उदाहरणें आहेत. आपल्या हिंदु समाजांत भोंवतालीं बारकाईनें पाहतांना विशेषत: पुण्यामुंबईसारख्या शहरांत गल्लोगल्लीं व चाळीचाळींतून असले नमुने पाहावयास मिळतात. अशा स्त्रीपुरुषांचे तीनचार नमुने प्रो० वामन मल्हार जोशी यांनीं आपल्या ‘इंदु काळे व सरला भोळे’ या कादंबरींत चांगले रंगविले आहेत. प्रत्यक्ष व्यवहारांत कांहीं विद्वान् अविवाहित राहून आपला ध्येयात्मक जीवनक्रम चालवितांना दिसतात, याचें कारण वैवाहिक योगायोगासंबंधानें एक प्रकारची वाटत असलेली भीति हेंच असावें, असें वाटतें.

३. तिसरा प्रकार, शारीरिक दृष्ट्या विषम विवाहाचा म्हणजे ५॥ ते ६ फूट उंचीच्या सशक्त लठ्ठ १५० ते १७५ पौंड वजनाच्या इसमाला ठेंगू , अशक्त वरचेवर आजारी पडणारी, दोनतीन मुलें होतांच अस्थिपंजर बनून अकालीं वृद्धत्वामुळें अनेक शारीरिक व्यंगें उत्पन्न झालेल्या अशा पत्नीबरोबर वैवाहिक आयुष्य कंठण्याचा प्रसंग हा होय. अशी पत्नी बुद्धीनें हुषार व स्वभावानें

सद्गुणी असूनहि तिच्यापासून नवऱ्याला खरें संसारसुख मिळूं शकत नाहीं. सदोदित बायकोच्या आजारीपणाला औषधपाणी करण्यांत व डॉक्टरवैद्याचीं बिलें भरण्यांत, तसेंच अशा स्त्रीपासून झालेल्या अशक्त व दुर्बल मुलांची जोपासना करण्यांत त्याच्या स्वतःच्या सुखाचा उन्हाळा होतो; आणि त्यांतून नवरा साधारण गरीब असल्यास द्रव्यबळ व मनुष्यबळ कमी पडून त्याला ‘ नको तो संसार ’ असा पूर्ण वैताग येतो.

४. चौथा प्रकार असमंजसपणामुळें किंवा जाणून सवरून विशिष्ट हेतूनें वैवाहिक सुख ही बाब गौण समजून द्रव्यलाभाचा प्रधान हेतु ठेवून मोठ्या हुंड्याकरितां किंवा विवाहपूर्व वा विवाहोत्तर विद्यार्जनासाठीं किंवा उद्योग-धंद्यासाठीं श्वशुराकडून द्रव्यसाहाय्य मिळविण्याकरितां श्रीमंतांच्या काळ्या, कुरूप, बहिऱ्या, मुक्या, काण्या, चकण्या वगैरे शारीरिक व्यंगयुक्त मुलीशीं लग्न करणाऱ्या तरुणांचा. असले विवाह उभय पक्षीं बहुधा प्रथमपासून राजी-खुषीनें व अक्कलहुषारीनें झाले असले तरी, विवाहविधीच्या वेळीं ‘धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि ॥’ ही शपथ अशा परिस्थितींत पाळणारे सत्त्व-गुणी तरुण क्वचित् आढळतात. म्हणून असले विषम विवाह परिणामीं असंतोष, अविचार आणि दुराचार यांना कारण झाल्याशिवाय राहात नाहींत.

## ‘ माईसाहेब ’

५. आणखी एक बाब विवाहसौख्यांत अडथळा आणणारी आढळते. ती द्वितीय विवाह व सावत्र मुलें यासंबंधाची. हिंदु समाजांत आतांपर्यंत बाल किंवा तरुण विधवांची संख्या बरीच आढळत असे. परंतु तो काळ झपाट्यानें बदलत असून प्रौढ विवाहाची चाल उच्च जातींत सुरू झाली असल्यामुळें हल्लीं तरुण विधवांच्या संख्येपेक्षां एकदोन किंवा तीनचार मुलें होतांच तीसपसतीस वयाच्या दरम्यान विधुरत्व प्राप्त झालेल्या पुरुषांची संख्या वाढत आहे. साधा-रणपणें अशा विधुरांना नोकरीधंदा संभाळून मुलांची जोपासना करणें व उरलेलें पंचवीसतीस वर्षांचें आयुष्य विधुरावस्थेंत घालविणें अशक्यप्राय होऊन ते द्वितीय विवाह किंवा पुनर्विवाह करतात. मग अशा पत्नीमध्यें सावत्र मुलांबद्दल सापत्नभाव उत्पन्न होऊन तो पतिपत्नीमधील असंतोषाला व तंट्या-बखेड्यांना कारण होतो.

६. अलीकडील शिकलेल्या पतिपत्नींत एक तेढीची नवीन बाब उत्पन्न होऊं लागली आहे. ती विवाहोत्तर स्वतःचें शिक्षण चालू ठेवण्याची पत्नीची इच्छा ही होय. इंग्रजी पांचसात इयत्ता शिकून विवाह झालेल्या कांहीं तरुणींना आपलें शिक्षण पुढें चालवावें असें वाटतें. उलट पक्षीं अशा विवाहांतील पति नोकरीधंदा करणारा असल्यामुळें पत्नीनें चूल व मूल या व्यवसायांना लागावें असें त्याला वाटतें; व हा मतभेद विकोपाला जाऊन शिक्षण घेण्यासाठीं पतिगृह सोडून पत्नीनें माहेरीं राहण्यास जावें, इतका हा बखेडा वाढतो.

## ‘कुंकू’ बोलपट

७. आणखी एक विजोड जोडप्यांचा प्रकार केवळ वयविषमतेमुळें दिसणारा. ४० ते ५० वयाचे विधुर बहुधा द्वितीय विवाह करतात आणि त्यांना फार तर १५ ते २० वयाची द्वितीय पत्नी मिळते, म्हणजे उभयतांचे वयांत २५ ते ३० वर्षांचें अंतर असतें. हें वय-वैषम्य पतीच्या उतार वयांत विशेष जाणवतें. पुरुष ७० ते ७५ वयाचा गलितगात्र म्हातारा असून त्याची बायको ४० ते ४२ च्या ऐनउमेदींत असते, व ही विषमता तिला फार जाणवते.

विवाहसौख्यांत बिघाड करणारीं आणखीहि कारणें आहेत. हुषार किंवा साधारणपणें अनुरूप अशा पतिपत्नींमध्येंहि किरकोळ स्वभावभेद किंवा रोजच्या प्रत्यक्ष व्यवहारांत उत्पन्न होणारे मतभेद यांमुळें घरांत असंतोष उद्भवतो; पण तो चहाच्या पेल्यांतील वादळाप्रमाणें तात्कालिक असतो. म्हणून मुख्य कारणांचाच वर उल्लेख केला आहे. वरील कारणें पुष्कळ ठिकाणीं बलवत्तर होऊन विवाहसौख्याचा पूर्ण नाश करतात. म्हणून वरील प्रमुख कारणें दृष्टीसमोर ठेवून या विषयाचें विवेचन पुढील प्रकरणांत करण्याचें योजिलें आहे.

आतांपर्यंतचें सर्व पुरुषांच्या दृष्टीनें लिहिलें आहे. तथापि बायकांची बाजू घेऊन लिहिण्यासारखें पुष्कळ आढळतें. पतीची निवड करण्यांत किंवा वैवाहिक जीवनक्रमांत पत्नीला दोष देण्यास मुळींच जागा नसतांहि नादान, नालायक, अननुरूप पतीमुळें विवाहसौख्याला पारख्या झालेल्या स्त्रिया पुष्कळ आढळतात.

## दुर्दैवी स्त्रिया

(१) अशिक्षित किंवा अर्धशिक्षित असल्यामुळें उल्लू व उथळ बनलेले नवरे, (२) किंवा विद्वान् व पुस्तकी पंडित असून अव्यवहारज्ञ व अरसिक नवरे, (३) किंवा श्रीमंतीमुळें व्यसनासक्त, बाहेरख्याली बनलेले नवरे, (४) किंवा पूर्ण उंचीच्या व पूर्ण शारीरिक वाढ झालेल्या स्त्रियांचे अशक्त, कमकुवत, सदारोगी असलेले नवरे, (५) किंवा हुषार, चतुर स्त्रियांचे अजागळ मतिमंद नवरे, अशीं उदाहरणें पाहण्यांत येतात. सद्‌गुणी व सदाचारी स्त्रीची वरील प्रकारांपैकींच्या नवऱ्याशीं लग्नगांठ बांधलेली पाहून व विशेषतः उच्च हिंदु जातींत घटस्फोट नसल्यामुळें तिची होणारी अनुकंपनीय स्थिति पाहून सहृदय माणसाचें मन उद्विग्न होणारच. असले प्रकारहि दृष्टीसमोर ठेवून या पुस्तकांतील विवेचन करण्याचा विचार आहे.

## अनधिकारी लेखक

सदरहू विवेचन तात्त्विक म्हणजे पुस्तकी ज्ञान व व्यावहारिक म्हणजे प्रत्यक्षानुभव अशा दोन्ही साधनांनीं करावयाचें आहे. प्रत्यक्ष अनुभव विचारांत घ्यावयाचा म्हणजे अर्थात् वर उल्लेख केलेल्या आपत्ती ज्या स्त्रीपुरुषांवर आलेल्या आहेत व तरीहि जे सुविचारी व सन्मार्गप्रवृत्त राहिले आहेत, अशा इसमांच्या अनुभवांचा व मतांचाच फक्त उल्लेख केला पाहिजे. हल्लीं हिंदु समाजांतील सामाजिक दुःखांवर उपाय सुचविणारे व मतें देणारे बरेच इसम एका अर्थानें तिऱ्हाईतच असतात, म्हणजे त्यांना स्वतःला त्या दुःखांचा प्रत्यक्ष अनुभव मुळींच नसतो.

वंध्यानैव विजानाति गुर्वी प्रसववेदनां ।

या संस्कृत अथवा the bearer alone knows where the shoe pinches या इंग्रजी म्हणीप्रमाणें प्रत्यक्षानुभवी इसमांनाच खरा निर्णायक मताधिकार पाहिजे. इतरांनीं तात्त्विक मत प्रतिपादन करावें, पण त्याला फारशी किंमत नसते. अशा अनधिकारी मताचा एक नमुना येथें देतों :

## 'भाला'कारांची भालाफेक

"......हिंदु कायद्याप्रमाणें विवाह एक संस्कार असून तो एकदां दोन व्यक्तींत लागला म्हणजे तो जन्मभर मुदतीचा असतो. रतिसुख ही एक नैसर्गिक भूक असून तिची शांति विवाहाच्या राजरोस मार्गानें न झाल्यास विधुरांचें व विधवांचें वांकडें पाऊल पडण्याची भीति असते. तेव्हां प्रथम पत्नीच्या किंवा पतीच्या निधनानंतर अशा विधुरांना व विधवांना पुनर्विवाहाची वाट करून देणें हें न्याय्य तर आहे, पण आवश्यकहि आहे. हा पुनर्विवाहाचा मार्ग पहिली पत्नी जिवंत असतां कोणीं पत्करल्यास, तें त्याचें वर्तन निषेधनीय आहे. मला पहिल्या पत्नीपासून सुख होत नाहीं ही तक्रार कटिशूलाच्या फाजील लाडामुळें उत्पन्न होत असते. हीच तक्रार विरुद्ध बाजूकडून होऊन जर एकादी विवाहित स्त्री असें म्हणूं लागेल कीं,मी दुसरा नवरा करणार कारण मला पहिल्या नवऱ्यापासून पूर्ण समाधान होत नाहीं, तर मग अशा नवऱ्याच्या डोळ्यांपुढें चक्कर येऊं लागेल. म्हणून आम्ही असें लिहितों कीं,पहिली वेडीवांकडी बायको हयात असतांना दुसरी बायको करण्याचा हक्क हिंदु नवऱ्याला नसावा. आतां (हल्लीं) पहिल्या बायकोच्या हयातींत दुसरी बायको करण्याची साथ सुरू झाली असून तिचा प्रथमारंभींच प्रतिकार न केल्यास ती बळावत जाऊन पहिल्या बायकांच्या संसाराचें वाटोळें होऊन जाईल. अशा लंपट नवऱ्यांना ताळ्यावर आणण्यासाठीं इंडियन पीनल कोडाचे ४९४ कलमामध्यें दुरुस्ती करून तो 'बिगमी (Bigamy)'चा गुन्हा ठरविण्यांत यावा, नाहीं तर बेताल नवरे कोणत्या थरावर निर्लज्जपणें जातील त्याचा नेम नाहीं.

—'भाला', ता. २९ जुलै, १९३५

यांत पुढीलप्रमाणें विधानें आहेत :

(१) विवाह हा संस्कार असून तो जन्मभर मुदतीचा असतो.

(२) विधुर व विधवांचा पुनर्विवाह न्याय्य आहे.

(३) पहिला नवरा किंवा बायको जिवंत असतां कोणींहि द्वितीय विवाह करूं नये, कारण तो विवाह कटिशूलाच्या फाजील लाडाचें लक्षण आहे.

(४) पहिली वेडीवांकडी बायको हयात असतांना दुसरी बायको करण्याचा हक्क हिंदु नवऱ्यास नसावा. तसें करणें 'बिगमी'चा गुन्हा ठरविण्यांत यावें.

हीं सर्व विधानें टीकार्ह आहेत, कारण तीं सर्व हिंदु धर्मशास्त्राला धरून नाहींत, किंवा तर्कशास्त्राप्रमाणेंहि न्याय्य ठरण्यासारखीं नाहींत. त्याबद्दल विवेचन पुढें अनेक प्रकरणांत केलें आहे. तूर्त विजोड पत्नी मिळाल्यास रसिक पतीची काय अवस्था होते, तिचें एका कवीनें केलेलें वर्णन येथें देतों :

### असंतुष्ट पति

विद्या दावु कुणा, कुणा रसिकता दावूं कुणा चातुरी।
केलेली कविता कुणास शिकवूं दावूं कुणा माधुरी॥
अंगीं खेळुनि राहिला सुरस हा शृंगार दावुं कुणा।
ऐसा व्यर्थ कशास जन्म दिधला ! धात्या अरे दुर्जना ॥१॥

प्रेमें निंदिल कोण, कोण रसिका कोपेल माझ्यावरी।
ग्लानी हारिल कोण ? कोण मजला रंजील नानापरी॥
कोणाच्या वदना बघूनि रिझवूं उद्विग्न माझ्या मना। ऐसा व्यर्थ . . ॥२॥

कोणाचें सुख साधुनी सुख मनीं मानूं ? कुणा शांतवूं।
कोणाला विनवूं ? कुणावर रुसुं प्रेमा कुणा दाखवूं॥
वाटे जीव नको; असार सगळा संसार वाटे सुना। ऐसा व्यर्थ . . ॥३॥

वृद्धाला तरुणी, कुरूप पतिला पत्नी मिळे सुंदरी।
मूर्खा बुद्धिमति, मिळे अरसिका शृंगारभोक्त्री खरी।
ऐसी योजिशीं जोडपीं विषम तूं; ही कां तुझी योजना! । ऐसा व्यर्थ . . ॥४॥

त्यापेक्षां मज मूर्ख अंध करुनी देता बरी बायको।
होता तो उपकार ! हाय, परी ती आशाहि आतां नको।
संसारी मज गोवुनी, मज नको ऐसी दिली अंगना। ऐसा व्यर्थ . . ॥५॥

विवाहांतील जोडीदार विजोड असला तर मनाला भयंकर उद्वेग येतो, संसार असार वाटतो व जीव नकोसा वाटतो, हें वरील वर्णनावरून दिसून येईल. विवाह ही एकंदर संसारसुखांतील अत्यंत महत्त्वाची बाब असल्यामुळें या विषयाचा सांगोपांग विचार करून प्रत्येक स्त्रीपुरुषानें वागलें पाहिजे. म्हणून विवाहांगभूत प्रत्येक बाबीचा यथाक्रम विचार करूं.

# प्रकरण दुसरें

# विवाह कीं ब्रह्मचर्य ?

"Family is based on natural affection. Its chief objects are to provide adequate protection and care for the helplessness of childhood, and at the same time provide an adequate sphere for the highest forms of friendship and love. It is thought that as a rule the former object can be better secured by the affection of the parents than it could be by any state arrangements; and that the latter object is best fulfilled within a narrow circle."

A Manual of Ethics.
by *J. S. Mackenzie.*

Every heart desires a mate. Nature has so created us that neither man nor woman singly can know the joy of the performance of all the human functions.

Happy married pairs are the only stable units of society.

*—Dr. Marie Stopes.*

नाटचाचार्य श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं आपल्या एका नाटकांत

रम्य तें बालपण देई देवा फिरुनि ।

असें आपल्या त्या नाटकांतील नायिकेकडून वदविलें आहे, तें सत्य प्रत्येकाला पटण्यासारखेंच आहे. बालपण, प्रेमळ आईबापांच्या कृपाछत्राखालीं खाण्यापिण्याचे, कपडचालत्त्याचे लाड पुरविले जाणारें तें बालपण, संसार व त्यांतील दुःखें, जीवनार्थकलह द्रव्यार्जनाची चिंता, स्वतःच्या व कुटुंबीयांच्या आजारीपणांत मनावर विलक्षण ताण पाडणारी जबाबदारी यांची कल्पनाहि नसलेलें तें बालपण, खावें, प्यावें शेजारपाजारच्या सवंगडचाबरोबर मौजेनें खेळावें,

शाळेंत जावें व वर नंबर येण्याकरितां चढाओढीनें अभ्यास करावा हाच अहर्निश असणारा आनंदी कार्यक्रम असलेलें बालपण पुन्हा प्राप्त व्हावें, अशी इच्छा होण्याचे प्रसंग संसारी जीवावर प्रापंचिक यातना सोसतांना अनेक येतात. "बाळपणींचा काळ सुखाचा" प्रत्येकाला पुन्हा पुन्हा आठवतो व पुन्हा अनुभवावयास मिळावासें वाटतें.

बालपणचा रम्य काल ! पण यापेक्षां रम्यतर काल आयुष्यांत नाहींच काय ? बालपणापेक्षांहि रम्यतर काल आहे. तो अविवाहित स्थितींत कॉलेजांत उच्च शिक्षण घेण्यांत जाणारा व नंतर विवाहोत्सुक होऊन आयुष्यांतील सहचरी निवडण्यांत जाणारा काल होय, म्हणजे पंधरा ते पंचवीसतीस वर्षें वयापर्यंतच्या सुशिक्षित तरुणतरुणींच्या आयुष्याचा काल रम्यतर आहे. पंधरा ते पंचवीस-पर्यंतचें वय प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या शारीरिक व मानसिक उन्नतीचें आहे, आणि व्यायाम, खेळ व उच्च विद्यालयीन शिक्षण हीं या उन्नतीचीं साधनें आहेत, आणि अविवाहित स्थिति ही या उन्नतीची मुख्य अट आहे. या वयांत तरुणांच्या व विशेषत: तरुणींच्या शरीराची वाढ उत्तम प्रकारें चालू असेल तर

प्राप्ते तु षोडशे वर्षे. . . अप्सरा भवेत् ।

तरुणतरुणींना परस्परांबद्दल वाटणाऱ्या आकर्षणाचा हा अनुभवावयास मिळणारा काल अधिक रम्य खास आहे. पण ही स्थिति व हें दृश्य अद्याप हिंदु समाजांत फार मर्यादित आहे. शेंकडा ७०।८० अशिक्षित असलेल्या व बालविवाहाच्या रूढींत रुतलेल्या बहुजन समाजाला ह्या रम्यतर कालाची स्वप्नांतसुद्धां कल्पना येणें शक्य नाहीं. खेड्यापाड्यांत राहणाऱ्या व उच्च शिक्षणाला व तदंगभूत प्रौढ विवाहाला पारखे असलेल्या अर्धशिक्षित उच्च हिंदुवर्णीयांनाहि या रम्यतर कालाचा रसास्वाद अप्राप्य आहे. पण त्यांनीं थोडी कल्पनाशक्ति चालविल्यास व विशेषत: स्वत:च्या मुलामुलींना पुढील उच्च शिक्षणाकरितां शहरांत ठेवण्याचा व त्यांचा प्रौढ विवाह करण्याचा त्यांनीं बेत केल्यास खेडेगांवी आईबापांनाहि आपले प्रौढ मुलगे मुली अनुभवित असलेल्या या रम्यतर कालांत अंशत: सहभागीदार होतां येईल. या रम्यतर कालाच्या अनुभवाला प्रत्यक्ष क्षेत्र, हल्लीं पुणे-मुंबई-सारखीं कॉलेजें असलेलीं शहरें व थोड्या प्रमाणांत जेथें हायस्कुलांत मुलां-

मुलींना एकत्र शिक्षण घ्यावें लागत आहे अशीं जिल्हा-तालुक्यांचीं ठिकाणें, हें आहे. या कालांत सुखसंवेदना होत असतात, याचा अनुभव प्रत्यक्ष ज्यांना आहे त्यांचें प्रौढपण किती तरी रम्यतर असतें. हा रम्यतर काल हिंदुसमाजाच्या मध्ययुगीन इतिहासाला अवगत नाहीं. शिक्षणाचा अभाव व बालविवाह यामुळें अकालीं मातृपितृपद प्राप्त होऊन

रोदन्तः शिशवः सवारिसदनं कांता च दुर्भाषिणी ।

अशा संसारचक्रांत सांपडल्यामुळें दुःखाचे हुंदके ऐन उमेदीच्या प्रौढ वयांत देणाऱ्याच पिढ्या गेलीं दोनअडीच हजार वर्षें चालू आहेत. रामायण-महाभारत-कालांत स्वयंवर, गांधर्वविवाह, वगैरे गोष्टींचीं रम्य वर्णनें आहेत, पण बुद्धोत्तर कालांत बालविवाहच रूढ असावा. कारण सुशिक्षित ब्राह्मण तरुणानेंहि आठ वर्षांच्या कन्येशीं विवाह करावा, असें मनुस्मृतींत सांगितलें आहे, त्यावरून इतर समाजांतील विवाहवयोमर्यादेची सहज कल्पना करतां येते.

## पाश्चात्य समाज

पाश्चात्य देशांत प्राचीन ग्रीक रोमन कालांत व विशेषतः स्पार्टन राष्ट्रांत प्रौढ विवाहाची उज्ज्वल परंपरा आढळते. स्पार्टा संस्थानचा सुप्रसिद्ध मुत्सद्दी लायकर्गस यानें स्त्रीपुरुषांचें शिक्षण, विवाह व अपत्यसंगोपन याबाबत कायदे करून त्या कालांत स्पार्टाला अद्वितीय राष्ट्र बनविलें. त्या कायद्याचें सार येणेंप्रमाणें :

## Discipline and Education of the Spartans

( History of Greece by *W. Smith* )

The Spartan Government was close oligarchy. The most important part of the legislation of Lycurgus did not relate to the political constitution of Sparta, but to the discipline and education of the citizens. In modern times the state exists for the citizens. In Sparta the citizen existed for the state, and was bound to devote to its honour and glory, not only all his time, affections and energies, but to sacrifice to its interests his property and his life.

*Men:* Every child after birth was exhibited to public view, and if deemed deformed and weakly, and unfit for a future life of labour and fatigue, was exposed to perish on Mount Taygetas. At the age of seven he was taken from his mother's care, and handed over to the public classes. He was taught all gymnastic games and military exercises, and was subjected to hardships and suffering. One of the tests was a cruel scourging at the alter of Artemis Orthia. Their food was just enough to support life, but boys were encouraged to add to it even by theft, and if caught in the theft, were punished for their want of dexterity. His literary education was not beyond learning to read and write.

At the age of thirty he reached the full age of manhood, was then allowed to marry, but was not permitted to reside and take his meals with his wife. He took his meals with his comrades at the public mess, and slept at night in public barracks.

*Sparten Women:* Their great duty was to give Sparta a vigorous race of citizens, and not to discharge domestic and house-hold duties. In their earlier years their course of training was as rigorous as that of the men, were trained in gymnastic exercises, and contested with each other in running, wrestling and boxing.

At the age of twenty a Spartan woman usually married. She enjoyed little of her husband's society, but was treated by him with respect, and was allowed a greater degree of liberty than was tolerated in other Greek states. Hence she took a lively interest in the welfare and glory of her native land, and was animated by an earnest and lofty spirit of patriotism. They encouraged their husbands and sons to deeds of heroism.

"The Spartan women alone rule the men. The Spartan women alone bring forth men."

प्रौढ विवाहाची परंपरा मध्ययुगीन व आधुनिक कालांत चालू होती, हें सर वॉल्टर स्कॉट, जेन ऑस्टिन, वगैरेंच्या कादंबऱ्यांवरून व पाश्चात्य लोकांतील बॉलनृत्याच्या चालीवरून स्पष्ट दिसतें. एकोणिसाव्या शतकांत सार्वत्रिक मोफत व सक्तीचें शिक्षण पाश्चात्य राष्ट्रांत सुरू होऊन समाजांत शेंकडा ९०–९५ इतकें शिक्षितांचें प्रमाण वाढलें, त्यामुळें स्त्रीपुरुषांच्या समान हक्कांची वाढ व संततिनियमनाच्या कल्पनेचा प्रसार होऊन विसाव्या शतकाच्या आरंभींच पाश्चात्य समाजांत इतकी क्रांति घडून आली आणि महायुद्धकालीन स्त्रियांच्या कामगिरीमुळें त्यांत इतकी भर पडली कीं, स्त्रियांचे प्रश्न स्त्रियांनींच सोडवावेत व त्यांत पुरुषांनीं लुडबुड करूं नये, इतका समान दर्जा, समान हक्क, व स्वयंनिर्णय पाश्चात्य स्त्रियांनीं प्राप्त करून घेतला आहे. आणि एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत 'चूल आणि मूल' हें पाश्चात्य स्त्रियांतहि रूढ असलेलें ध्येय आतां साफ बदलून गेलें आहे, तें इतकें कीं इटालींत मुसोलिनी आणि जर्मनींत हिटलर यांना मोठ्या मिनतवारीनें, बक्षिसांच्या लालचीनें व प्रसंगविशेषीं कायद्याच्या सक्तीनें 'चूल व मूल' या जुन्या व्यवसायाकडे स्त्रीसमाजाला वळविण्याचा प्रयत्न करावा लागत आहे.

## आजचा हिंदु समाज

हिंदुस्थानांत पाश्चात्य पद्धतीचें शिक्षण एकोणिसाव्या शतकांत सुरू झालें. त्याचे आद्य पुरस्कर्ते ख्रिस्ती मिशनरी असून हिंदु पुढारी बंगाल्यांत राजा राममोहन राय, पंजाबांत स्वामी दयानंद सरस्वती व महाराष्ट्रांत आगरकर होऊन गेले. तथापि स्त्रीशिक्षणाचा प्रसार एकोणिसाव्या शतकांत फार अल्प झाला होता. विसाव्या शतकांत आरंभींच गुरुवर्य आण्णासाहेब कर्वे यांनीं स्त्रीशिक्षणाचे प्रश्नास हिंगण्यास महिलाश्रम स्थापून जोराची चालना दिली, आणि हळूहळू अनेक ठिकाणीं कन्याशाळा (हायस्कुलें) व पुण्यास महिला कॉलेज व महिला युनिव्हर्सिटी स्थापली. महायुद्धानंतर महात्मा गांधींनीं राजकीय क्षेत्रांतहि स्त्रियांच्या कर्तबगारीला उत्तेजन दिल्यामुळें स्त्रीशिक्षणास

व सुशिक्षित स्त्रियांच्या सार्वजनिक कार्याला सनातन बहुजन समाजाचीहि मान्यता मिळेल इतकी उज्ज्वल कामगिरी असहकारिता युगांत देशसेविकांनीं करून दाखविली. १९३० सालापासून हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांत स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, समान हक्क यांचा पुरस्कार करणाऱ्या विदुषी चमकूं लागल्या असून स्त्रियांच्या कर्तबगारीचें कौतुक करणारा आणि स्त्रियांच्या भाषणांची तरफदारी करणारा काव्य, नाटक, लघुकथा व कादंबरी लिहिणारा लेखकवर्ग झपाट्यानें वाढत आहे.

स्त्रियांच्या प्रश्नांपैकीं विवाह हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. प्राचीन काळापासून हिंदु, ख्रिस्ती व विशेषत: बौद्ध धर्मांत स्त्री ही पुरुषाच्या मोक्षमार्गांतील धोंड असल्यामुळें आजन्म ब्रह्मचारी राहण्याचें ध्येय उपदेशिणारा धर्मोपदेशकवर्ग दिसून येतो. त्याची प्रतिक्रिया म्हणून हल्लीं विसाव्या शतकांत, पुरुष हा स्त्रियांच्या स्वातंत्र्यमार्गांतील धोंड आहे, असें प्रतिपादून स्वतंत्र उद्योगधंदा व अविवाहित राहून सार्वजनिक कार्य करण्याऱ्या विदुषी पाश्चात्य देशांत व हिंदुस्थानांतहि दिसूं लागल्या आहेत. परंतु ही आजन्म अविवाहित राहण्याची आत्मघातकी विचारसरणी आजपर्यंत पुरुष वर्गाला पटलेली दिसत नाहीं, त्याप्रमाणें यापुढें ती स्त्रीसमाजाला पटेल असेंहि वाटत नाहीं.

### इंग्रज विदुषींचें मत

पाश्चात्य देशांत प्रत्यक्ष अनुभवानें आतां या बाबतींतील बहुमत स्थिर झालें असून तेंच मत हिंदुस्थानांतहि सर्वमान्य होईलसें वाटतें. पाश्चात्य स्त्रियांची या बाबतींतील विचारसरणी कोठें स्थिर होऊं पाहात आहे, हें लेडी बाल्फोर यांच्या नुकत्याच टाईम्स ऑफ इंडियांत प्रसिद्ध झालेल्या लेखावरून दिसून येईल.

### Lady Balfour Speaks Out
( *Times of India* 22–5–35 )

A plea for a better understanding of marriage as the greatest and most difficult profession has been made this week by the Countess of Balfour.

After urging the girls to make marriage their career, she said: "I was afraid when I came here that you might think I was early Victorian and be shocked at me when I hoped that the great majority of you would adopt the profession of marriage.

"Unfortunately marriage is not a profession that we can be assured of attaining by passing any form of examination.

"I can assure you that there is no profession which needs a wider, fuller, deeper education than that of marriage.

"You have to be a leader. You have to have imagination and sympathy and understanding.

"You have to be a companion in mind and heart and soul for your life's chosen partner, and you have to be a stimulating, loving, understanding example to your children."

The Countess of Balfour is the mother of six children one son and five daughters.

## A SUPPORTER

One of the staunchest supporters of her appeal for marriage as a career is Lady Stamp, wife of Sir Josiah Stamp, the famous economist and president of the London Midland and Scottish Railway—one of England's four main railways.

"I thoroughly agree with Lady Balfour", Lady Stamp told me today.

"I still think that, *while most other professions should*

*be open to women, there is no greater privilege that can come to any woman than that of wife and mother*—a real *home-maker.*

"I do not wish to be dogmatic on the thorny subject as to whether *a woman should attempt two professions simultaneously.*

"From my own experience as a wife and mother of four boys, I have found it a very full-time job until quite recently, when with my freer time I have been privileged to help in social work outside my home.

• "Even if a woman is not obliged to do her own work, and take full charge of her babies, it is necessary to know all about these things to be a real home-maker. This is where the education of which Lady Balfour speaks comes in.

"How can a wife be a companion to a man of any mind at all unless she has paid attention to that side of her life?

"It has been said that no nation is geather than her women. Most men are content to let their wives set the standard.

"The responsibility viewed from this standpoint is tremendous for the profession of marriage, and calls for preparation of body, mind and spirit to the highest possible extent."

वरील उतार्‍यावरून इंग्लंडांतलें सांप्रतचें लोकमत स्पष्ट दिसतें. स्त्री व पुरुष या दोघांनाहि विवाहबंधन हीच नैसर्गिक स्थिति आहे. स्त्रीला तर विवाह व गृहिणीपण हाच एक आयुष्यभर भरपूर पुरेसा धंदा आहे. कांहीं पुरुष ज्याप्रमाणें एक मुख्य धंदा करून इतरहि एक किंवा अनेक जोडधंदे

करतात, त्याप्रमाणें स्त्रियांनींहि ज्यांना साधेल त्यांनीं गृहिणीपणाचा मुख्य धंदा संभाळून इतर दुय्यम व्यवसाय करावे. पण सर्वसाधारण बुद्धिमत्तेच्या पुरुषाप्रमाणें सर्वसाधारण स्त्रीलाहि गृहकृत्यें संभाळून इतर द्रव्यार्जन किंवा सार्वजनिक काम करण्याइतकें शरीरसामर्थ्य असत नाहीं. म्हणून सामान्यतः स्त्रियांना विवाह हेंच ध्येय असावें. गृहिणीपद यापेक्षां अधिक महत्त्वाचा हक्क स्त्रियांना कोणताहि नसावा.

याप्रमाणें विवाह कीं ब्रह्मचर्य या प्रश्नाचीं आंदोलनें प्राचीन काळापासून चालू असून (१) मोक्षसाधनाकरितां ब्रह्मचर्य, (२) सार्वजनिक कार्याकरितां ब्रह्मचर्य, (३) आर्थिक स्वावलंबनाकरितां ब्रह्मचर्य, असे ब्रह्मचर्याचे ऊर्फ अविवाहित एकाकी जीवनाचे समर्थनार्थ मुद्दे किंवा कारणें पुढें आलीं व तीं फोल ठरून विद्वान् विचारवंतांचें मत आणि सर्वसामान्य लोकमत वैवाहिक जीवनाभोंवतीं स्थिर झालेलें दिसतें. याशिवाय पुरुषाचें वैयक्तिक दारिद्र्य, जबर हुंडा घेण्याची चाल, हींहि दोन कारणें कांहीं प्रतिष्ठित समाजांत अविवाहित जीवन कंठण्यास कांहीं स्त्रीपुरुषांना भाग पाडतात. पण या गौण अडचणी दूर करण्याचे प्रयत्न व्यक्तिशः व जातिशः चालू असतात. तात्पर्य, ब्रह्मचर्य किंवा एकाकी अविवाहित स्थिति ही आतां अपवादात्मक असून विवाह हेंच प्रत्येक पुरुषाचें व स्त्रीचें ध्येय असल्याचें सर्वत्र मान्य झालें आहे.

## अविवाहितांचें मातृपद

वरील विचारसरणी ही आजतागायतची व सर्व पौरस्त्य व पाश्चात्य देशांतील सुशिक्षित स्त्रीपुरुषांना मान्य असलेली दिली आहे. पण 'नवनीतिवाद' म्हणून जी विचारसरणी बॅर्ट्रंड रसेल या विद्वानानें मांडली व महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कादंबरीकार प्रो० फडके यांनीं एका कादंबरींत नमूद केली ती पुढीलप्रमाणें आहे :

> "......स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र झाल्या कीं त्यांची गुलामगिरी संपेल, ही कल्पना व्यर्थ असल्याचें तिला उत्तरोत्तर पटत गेलें होतें. स्त्रियांना गुलामगिरींतून सुटावयाचें असेल तर मातृपदाविषयींच्या परंपरागत कल्पना त्यांनीं बदलून टाकल्या पाहिजेत. मातृपदावाचून

स्त्रीच्या जीविताचें साफल्य अशक्य, लग्नावाचून मातृपद अशक्य, आणि कोणा तरी पुरुषाच्या ताब्यांत गेल्यावाचून लग्न अशक्य, अशा तीन पदरी फासांत स्त्री आज अडकलेली होती. आकर्षण, प्रेम, भोग आणि संतति हा निसर्गाचा क्रम होता. या क्रमांतील अखेरच्या गोष्टीवर माणसानें वेडेपणानें नीतिअनीतीचीं वेष्टणें गुंडाळलेलीं होतीं, आणि तीं तत्त्वशून्य कृत्रिम वेष्टणें जोंपर्यंत कायम राहतील तोंपर्यंत स्त्रियांच्या दिखाऊ सुधारणा कितीहि झाल्या तरी त्यांचा खरा उद्धार होणें शक्य नाहीं. मातृपद म्हणजे एका निसर्गक्रमाची अखेरची परिणति होय. तिचा नीतिअनीतीशीं तत्त्वतः कांहीं संबंध नाहीं."

—प्रो० फडकेकृत 'उद्धार' कादंबरी, प्रकरण २९ वें.

वरील विचारसरणी आजपर्यंतच्या वैचारिक इतिहासांत अगदीं अभिनव आहे. कारण संसार व मुलाबाळांचा व्याप नसावा, म्हणून आतांपर्यंत ब्रह्मचर्याची तरफदारी करणारी विचारसरणी रूढ झालेली आढळते; तर नवनीतिवादांत मातृपद, अपत्यसंगोपन, वगैरे गोष्टी निसर्ग नियमानुसार चालू राहूनहि अविवाहित स्थितीचा पुरस्कार आढळतो; कारण लग्नाची बेडी म्हणजे स्त्रीस्वातंत्र्याचा अपहार हीच मूलभूत कल्पना या नवमतवादांत पुरस्कृत केली आहे.

प्रो० फडके यांच्यासारख्या प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ व कुशल लेखकाच्या कादंबरींत ही विचारसरणी आल्यामुळें तरुण स्त्रीवाचकांना ती आकर्षक होण्याचा संभव आहे. 'स्वैराचाराची छाननी' या नांवाचा लेख 'किर्लोस्कर' मासिकांत (ऑगस्ट १९३८) प्रसिद्ध झाला आहे. या प्रकारच्या जीवनाचा कित्येक नवमतवादी स्त्रियांनीं प्रत्यक्ष अनुभव घेऊन प्रयोग करणेंहि शक्य आहे. परंतु ही विचारसरणी प्रस्थापित व समाजमान्य होईलसें वाटत नाहीं. कारण लैंगिकबंधनहीन म्हणजे एकाकी स्त्री-पुरुष जीवनाचा त्यांत पुरस्कार केला आहे, आणि असें एकाकी जीवन स्त्रियांना किंवा पुरुषांना मानवत नाहीं असा आजपर्यंतचा मानव समाजाचा अनुभव आहे. मनुष्यप्राणि हा साहचर्यप्रिय व समाजप्रिय प्राणि आहे, व लैंगिक बंधन हें असें आहे कीं, तें बंधन असूनहि भासमान होणारें नाहीं. कोणीहि दोन व्यक्ती मित्रस्नेही म्हणून दीर्घकाल

एकत्र राहिले तर प्रत्येकाच्या स्वातंत्र्यावर जोडीदाराचें थोडेंबहुत दडपण पडणारच, व तें पुष्कळदां आवश्यक व सुखावहच वाटतें. प्रत्यक्ष विवाहांतहि वरिष्ठ दर्जाच्या कर्तृत्ववान् पत्नीचेंच वर्चस्व तिच्या पतीवर असतें, म्हणजे पुरुषाच्या स्वातंत्र्याचाच खरोखर अपहार होतो, पण ही परतंत्र स्थिति उभयतांच्या अंतिम सुखाला साध्य होते, म्हणून विवाहच करणें योग्य होय.

" 'स्वैराचाराची छाननी' दुसरी बाजू " यांत श्री० देसाई यांनीं स्वैराचाराचें जें समर्थन केलें आहे, तेंहि हेत्वाभासपूर्ण आहे. स्त्रीपुरुषसंबंध खरा आनंददायक होण्यास तो परस्परप्रेमी स्त्रीपुरुषांत व्हावा, असें त्यांचें मुख्य प्रतिपादन आहे, व तें तत्त्वतः मान्यच आहे. पण हें खरें प्रेम स्वैराचारानें म्हणजे वरचेवर स्त्रीपुरुष पालट केल्यानें लाभेल, किंवा परस्परांस अनुरूप स्त्रीपुरुषांचा विवाह होण्यानेंच साध्य होईल हाच विचाराचा व अनुभवाचा प्रश्न आहे. 'प्रेम व मैत्री' या पांचव्या प्रकरणांत याचा पूर्ण ऊहापोह केला आहे. श्री० देसाई ज्याला प्रेम म्हणतात, तें बहुधा शारीरिक आकर्षण असतें. प्रेमाला पाया स्वभावसाम्य, संस्कृतिसाम्य, वगैरे असतो; व अशा भक्कम पायावर आधारलेलें प्रेम आमरण टिकतें, कारण स्वभाव व संस्कृति या वरचेवर बदलणाऱ्या गोष्टी नाहींत, अर्थात् अशा स्थिर पायावर उभारलेलें प्रेमहि बदलणें शक्य नाहीं.

शिवाय स्वैराचार व अविवाहितांचें मातृपद यापेक्षां विवाहितांचें मातृपितृपद यांत अपत्यांच्या दृष्टीनें त्यांना संरक्षण अधिक आहे. मरणं प्रकृतिः शरीरिणां। या न्यायानें मरणाची आपत्ति केव्हां येईल हा भरंवसा नसल्यामुळें अविवाहितांच्या मातृपदांत अपत्यांच्या संगोपनाला एकटी आई जबाबदार असते. उलट पक्षीं विवाहितांचे अपत्यांना आई व बाप दोन व्यक्ती जबाबदार राहतात, अर्थात् दुर्दैवानें एक मयत झाल्यास दुसरा आधार अपत्यांस असतो. अशा अनेक कारणांस्तव स्वैराचार व अविवाहितांचें मातृपद हे मार्ग त्याज्य असून विवाह हाच स्त्रीपुरुषांच्या व अपत्यांच्या दृष्टीनें खऱ्या सुखाचा मार्ग आहे.

# प्रकरण तिसरें

# विवाहाचा हेतु

अपत्यं धर्मकार्याणि शुश्रूषा रतिरुत्तमा ।
दाराधीनस्तथा स्वर्गः पितृणामात्मनश्च ह ॥ —मनु० ९।२८

"......जीवनाचा आधार प्रेम आहे. पण प्रेमात्मक जीवनाची परिणति यशांत, कीर्तींत व आत्मविकासांत झाली पाहिजे......"

प्रेमाची परिणति—लघुकथा 'सह्याद्रि' ऑक्टोबर १९३५.

More than ever to-day are happy homes needed. The only secure basis for a present day state is the welding of its units in marriage; but there is rottenness and danger at the foundations of the state if many of the marriages are unhappy.

अखिल प्राणिमात्रांत नरमादी एकत्र येण्याचा हेतु संयोगसुख हाच दिसतो. मनुष्यप्राण्यांतहि स्त्रीपुरुष वयांत येतांच ही कामवासना प्रादुर्भूत होते. ती वासना तृप्त करण्याचें निरंतरचें व हक्काचें व प्रतिष्ठित साधन म्हणून विवाहबंधनाची योजना अस्तित्वांत आली आहे. सबब वासनापूर्ती हाच विवाहाचा आद्य व नैसर्गिक हेतु होय. पण ह्या स्त्री-पुरुषसंबंधाचें पर्यवसान अपत्योत्पादनांत होत असून अपत्यप्राप्ति हेंहि एक चिरकाल सुखाचें साधन मनुष्यमात्राला असतें. यामुळें मानवी उत्क्रांतीच्या अगदीं आरंभापासून सुखोत्पत्तिः संतानोत्पत्तिश्च । हे दोन विवाहाचे हेतू निश्चित झाले आहेत. पुढें धार्मिक कल्पनांमध्यें ब्रह्मचर्य व मोक्ष या ध्येयांचें श्रेष्ठत्व इतक्या पराकोटीला गेलें कीं, बौद्ध व ख्रिस्ती धर्मांनीं विवाह व संसार हे दोन्ही हेतू कमी दर्जाचे किंबहुना त्याज्य ठरविले! तथापि मानवाची नैसर्गिक प्रवृत्ति बदलणें अशक्य होऊन ख्रिस्ती व बौद्ध धर्माला विवाह व संसार यांना मान्यता देणें भाग पडलें! हिंदु धर्मानें मानवी प्रवृत्तींचा अधिक खोल विचार करून गृहस्थाश्रमाला धर्मशास्त्रांत सुप्रतिष्ठित केलें तें इतकें कीं,

यथा वायुं समाश्रित्य वर्तन्ते सर्वजन्तवः।
तथा गृहस्थमाश्रित्य वर्तन्ते सर्वं आश्रमाः॥
यस्मात्त्रयोऽप्याश्रमिणो ज्ञानेनान्नेन चान्वहम्।
गृहस्थेनैव धार्यन्ते तस्मात्ज्येष्ठाश्रमो गृही॥ —मनु० ३।७७–७८

यथा मातरमाश्रित्य सर्वे जीवन्ति जन्तवः।
एवं गार्हस्थ्यमाश्रित्य वर्तन्त इतराश्रमाः॥ —महाभारत १२।२६९।६

भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्यामूलं तरिष्यतः। —महाभारत १।७४।४१

हिंदु धर्मांतल्या ब्रह्मचर्य, वानप्रस्थ व संन्यास या तिन्ही आश्रमीयांना अन्नपानादि जीवन पुरविणारा गृहस्थाश्रमीच असल्यामुळें जीवमात्राला जगण्याला हवेची जितकी आवश्यकता किंवा प्राणिमात्राच्या संवर्धनाला मातेचें जितकें महत्त्व तितकें गृहस्थाश्रमाला महत्त्व हिंदु धर्मशास्त्रांनीं व महाभारतादि पुराणग्रंथांनीं दिलें आहे. आणि धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांत पत्नीला सहधर्मचारिणी म्हणून अत्यंत महत्त्वाचें स्थान देऊन विवाहाचा हेतु अत्यंत उच्च व अतिशय व्यापक असल्याबद्दल अनुल्लंघनीय अशा धर्माज्ञा घालून दिल्या आहेत.

## विवाहहेतूची प्राचीन प्रगति

या धर्माज्ञांचा व्यावहारिक अर्थ मात्र हिंदु माणसांच्या निरनिराळ्या परिस्थितीप्रमाणें अत्यंत संकुचित किंवा अत्यंत व्यापक करण्यांत आला आहे, त्यांत विचारांच्या प्राथमिक अवस्थेपासून अत्यंत उत्क्रांत अवस्था दिसून येते. ती येणेंप्रमाणें :

(अ) प्रजायै गृहमेधिनां। म्हणजे संतानोत्पत्तीकरितां गृहस्थाश्रम करावा, कारण पुन्नाम नरकात्त्रायते इति पुत्रः। पुन्नाम नरकापासून मनुष्याचा बचाव करण्याकरितां मनुष्याला पुत्र असणें जरूर आहे, म्हणून विवाह करावा. हा फार संकुचित हेतु होय.

(ब) याच्या पुढची पायरी म्हणजे आजकाल रूढ झालेलें 'चूल व मूल' या शब्दांत व्यक्त होणारा हेतु होय. यांत भोजन व अपत्योत्पादन या

दोन हेतूंचा अंतर्भाव केला असून सामान्यतः अशिक्षित व सुशिक्षित तसेंच रानटी व सुसंस्कृत या सर्व प्रकारच्या समाजांत हेच विवाहाचे दोन हेतू सर्वत्र मान्य झालेले दिसतात. परंतु हीहि मानवी मनाची प्राथमिक अवस्थाच होय, कारण यांत मानवी प्राण्याच्या रोजच्या प्राथमिक व आवश्यक गरजांचाच विचार केलेला दिसतो, विचारांची उन्नति व उत्क्रांति दिसत नाहीं.

(क) यानंतरची विचारांची उन्नति पुढील हेतूंत दिसते ती :

अपत्यं धर्मकार्याणि शुश्रूषा रतिरुत्तमा।
दाराधीनः तथा स्वर्गः पितृणामात्मनश्च ह ॥ —मनु० ९।२८

यामध्यें अपत्यप्राप्ति, धर्मकृत्यें, भोजनादि गृहकृत्यें, संभोगसौख्य व स्वर्ग-प्राप्ति या व्यावहारिक व धार्मिक दोन्ही हेतूंचा समावेश केला आहे. ही मानवी विचारजागृतीची बरीच पुढील पायरी आहे. पण यांत आजच्या साहचर्य कल्पनेचा उदय झालेला नाहीं.

(ड) याच्या पुढील प्रगति पुढील श्लोकांत दिसते.

गृहिणी सचिवः सखीमिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ। —रघुवंश

हे अजराजानें आपल्या इंदुमति भार्येबद्दलच्या वर्णनांत ग्रथित केलेले गुण विवाहविषयक हेतूंची बरीच परिणत अवस्था दर्शवितात. कारण यांत भार्येला 'चूल आणि मूल' यांची स्वामिनी बनवून न थांवतां पतीला हरएक कार्यांत सचिवाप्रमाणें सल्लामसलत देणारा मंत्री व मनोरंजनार्थ गायन-वादन-चित्रकलादि ललितकलांचें ज्ञान घेणारी शिष्या असें संबोधिलें आहे. त्यामुळें आजच्या सुशिक्षित तरुणांच्या आकांक्षा यांत बहुतांशीं अन्तर्भूत झाल्या आहेत. फरक एवढाच कीं, अजराजानें आपल्या राणीच्या गुणांचें हें वर्णन केलेलें आहे, म्हणजे श्रीमंत राजेरजवाडे यांचें वैवाहिक ध्येय यांत प्रतिबिंबित झालेलें आहे. सामान्यतः मध्यम व गरीब वर्गाचें हें ध्येय नव्हतें, हें उघड आहे. म्हणून सामाजिक सुधारणेची पूर्ण उत्क्रान्ति या ध्येयांतहि नाहीं. अगदीं प्राचीन काळापासून विसाव्या शतकापर्यंत सुसंस्कृत हिंदु समाजांतहि विचारांची प्रगति येवढीच झालेली दिसते.

सांप्रत स्त्रियांचा समान दर्जा व समान हक्क म्हणून जो पुरस्कार होत आहे तो तर पूर्वी पाश्चात्य व पौरस्त्य कोणत्याहि धर्मांत किंवा समाजांत आढळत नाहीं. हिंदु धर्मांत पत्नीला पतीची अर्धांगी मानून धर्मकृत्यांतहि स्त्रीला समान दर्जा दिल्याचें दृश्य दिसतें, पण वास्तविक विचारसरणी मनु-स्मृतींत स्पष्ट केली आहे. ती :

बालया वा युवत्या वा वृद्धया वापि योषिता ।
न स्वातंत्र्येण कर्तव्यं किंचित्कार्यं गृहेष्वपि ।।
बाल्ये पितुर्वशे तिष्ठेत्पाणिग्राहस्य यौवने ।
पुत्राणां भर्तरि प्रेते न भजेत्स्त्री स्वतंत्रताम् ।। —मनु० ५।१४७।१४८

ही स्त्रियांच्या हक्कांची सनद वाचून विसाव्या शतकांतली सुशिक्षित स्त्री सक्रोधाश्चर्यं करील ! तथापि सर्व धर्मांत व संस्कृतींत हीच विचार-सरणी आढळते व त्याचें कारण तत्कालीन परिस्थिति हेंच होय.

## समान हक्क व समान जबाबदारी

सामाजिक क्षेत्रांत काय आणि राजकीय क्षेत्रांत काय हक्कांची मागणी करणारांनीं first deserve and then desire हें सूत्र लक्षांत ठेवलें पाहिजे. आणि जेथें नवऱ्यापेक्षां बायको जास्त हुषार व कर्तृत्ववान् असते तेथ संसारांत तीच सर्व कारभार चालविते व नवऱ्याला पदोपदीं तिच्याच सल्ल्याप्रमाणें वागावें लागतें, अशीं उदाहरणें प्रत्यक्ष व्यवहारांत नेहमीं आढळतात. पुराणकाळांतील महाभारतांत द्रौपदीनें स्वपतिसमान दर्जा कौरवपांडव राजकारणांत प्राप्त करून घेतला होता तो तिच्या हुषारीमुळें व ज्ञानामुळें. ऐतिहासिक काळांत अगदीं अलीकडे पेशवा राघोबादादा याचें सर्व राजकारण आनंदीबाईनेंच हातीं घेऊन वल्हविलें ! ! हाच न्याय सर्वत्र लागू आहे. सांप्रत नव्या पिढींतील तरुण मुलगे व मुली उच्च शिक्षण घेऊन तयार झाल्यावर, त्यांचे आईबाप अशिक्षित किंवा अर्धशिक्षित असल्यास, कुटुंबाचा सर्व कारभार स्वहस्तगत करून घेऊन आईबापांनाहि मार्गदर्शक होतात. याप्रमाणें स्त्रियांची शैक्षणिक लायकी पुरुषांच्या बरोबरीनें असल्यास समान दर्जा व समान हक्क आपोआपच प्राप्त होतो. स्त्रियांना लायकी

वाढविण्यास आतां हिंदुस्थानांत विसावें शतक हा अत्यंत अनुकूल काल आहे. स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रियांचा समान दर्जा व समान हक्क या मतांनीं सुशिक्षित समाजाचें वातावरण दुमदुमून गेलें असून त्याकरितां कायदेमंडळांत नवीं नवीं बिलें येत आहेत, व त्यांचा पुरस्कार सुशिक्षित पुरुष पुढारीच करीत आहेत. याचें कारण हेंच कीं, सुशिक्षित पुरुषांमध्यें सुशिक्षित व समान दर्जाची पत्नी मिळावी ही आतुरता वाढत आहे. मास्तर नवऱ्याला मास्तरीण, डॉक्टरला डॉक्टरीण, कवीला कवयित्री, याप्रमाणें सहधर्मचारिणी लाभल्यास त्यांचा संसार अधिक सुखाचा होतो, हें प्रत्यक्ष उदाहरणांनीं सुशिक्षित समाजाला पटत चाललें असल्यामुळें समान दर्जाची व लायकीची सहचरी मिळावी म्हणून पहिली अशिक्षित पण पतिधर्मपरायण बायको जिवंत असूनहि द्वितीय विवाह होत आहेत. बहुजनसमाजाचा व विशेषतः भालाकार भोपटकरासारख्या सनातन धर्माभिमान्यांचा रोष पत्करूनहि असे विवाह वाढत्या प्रमाणांत होऊं लागले आहेत याचा अर्थ स्पष्ट असाच आहे कीं, सुशिक्षित स्त्री व पुरुष या दोघांचाहि ओढा पतिपत्नि समान लायकीची व दर्जाची असावी याच गोष्टीकडे आहे.

## द्रव्यार्जन व स्वसंरक्षण

भूतकाल व भविष्यकाल यांमध्यें विवाहहेतूचे बाबतींत एक अत्यंत महत्त्वाचा फरक पडणार हें उघड दिसत आहे. सांप्रत सर्व जागतिक घडामोडी आर्थिक तत्त्वानुसार होत असून जुन्या धर्मकल्पना व नीतिकल्पना तदनुसार बदलत आहेत. आर्थिक परिस्थितीचा ताण प्रत्येक कुटुंबीयाला जाणवत आहे. शिक्षणसंस्था, नाटक-सिनेमादि करमणुकीचीं साधनें आणि आगगाडी-मोटारादि प्रवासाचीं साधनें वाढल्यामुळें प्रपंचाचा खर्च पूर्वीपेक्षां फार वाढत आहे. पूर्वी प्रपंचांत भोजन व कपडालत्ता ह्याच खर्चाच्या दोन मुख्य बाबी असत; पण आतां अन्नवस्त्रापेक्षां वरील तीन गोष्टींकडे वार्षिक खर्च अधिक होऊं लागला आहे. त्यामुळें गृहस्थाश्रमांत पदार्पण करणाऱ्या तरुणाला आर्थिक तोंडमिळवणीचा मोठा प्रश्न उपस्थित होतो. म्हणून जरूर तर पत्नीनें प्रपंचाचा आर्थिक भार उचलण्यास लायक असावें, अशी

सुशिक्षित तरुण पुरुषवर्गाची अपेक्षा आहे. द्रव्यार्जनाकरितां घराबाहेर पडून बाह्य जगांत वावरतांना स्वशरीरसंरक्षणक्षमताहि अंगीं असावयास पाहिजे. म्हणून पत्नीची निवड करतांना सुगृहिणी व सुमाता हें परंपरागत ध्येय संकुचित वाटत असून द्रव्यार्जनक्षमता व स्वसंरक्षणक्षमता हे दोन अधिक गुण असण्याची आवश्यकता वाटूं लागली आहे. यामुळें अर्थात् विवाहाचा आद्य व पुरातन हेतु जो सुखोत्पत्ति त्यांत अधिकच भर पडेल हें निःसंशय आहे. (१) आहार, (२) वासनापूर्ती, व (३) अपत्यसंगोपन. ह्या बाबतींत पत्नी लायक असावी ही सर्व धर्मांत व सर्व समाजांत रूढ असलेली विचार-सरणी विसाव्या शतकांतल्याहि सुशिक्षित तरुणाला मान्य असून शिवाय (४) द्रव्यार्जनक्षमता, (५) स्वसंरक्षणक्षमता आणि (६) नाटक-सिनेमादि करमणुकीच्या साधनांचा व काठी-लाठी-टेनीस वगैरे शरीरसामर्थ्यसंवर्धनाच्या साधनांचा उपयोग करून घेण्याइतकी रसिकता व पात्रता असावी अशीहि अपेक्षा आहे; आधुनिक विवाहाचा हा हेतु आहे, हें ध्येय आहे आणि व्यक्ति-सुखाच्या दृष्टीनें आजपर्यंत कोणत्याहि धर्मानें व कोणत्याहि समाजानें न गांठलेलें असें परमोच्च ध्येय हें आहे. आणि खरे विचारी व प्रामाणिक नव-मतवादी आणि सनातनी सुधारक यांना हेंच ध्येय मान्य होऊन नवमतवादी व पुराणमतवादी यांच्यामध्यें विवाहविषयक जो वादविवाद चालू आहे त्यामधून अखेर हाच सुवर्णमध्य गांठला जाईल असें वाटतें.

## शारीरिक श्रमाचें महत्त्व

नुसतें ‘चूल व मूल’ संभाळून अष्टौप्रहर घरांत—तेंहि कांहीं समाजां-तील रूढीप्रमाणें गोषांत राहिल्यानें स्त्रीचें हें मुख्य मानलेलें कर्तव्य करण्यास ती कमी लायक होते. दररोज शेतांत काबाडकष्ट करणाऱ्या किंवा इतर मोलमजुरी करणाऱ्या शेतकरी व कामकरी वर्गांच्या स्त्रियांची शरीरप्रकृति जितकी निकोप असते, तसेंच त्यांची प्रसूति जितकी सुलभ आणि मुलें जितकीं निरोगी व धट्टीकट्टी असतात, तितकी श्रीमंत सुखवस्तु व विशेषतः शहरी स्त्रियांची असत नाहींत. पाश्चात्य विदुषींनीं अलीकडील सामाजिक परि-स्थितीचा सूक्ष्म अभ्यास करून हाच निष्कर्ष काढला आहे. मिसेस स्टेटसन-बाई आपल्या ‘Women and Economics’ या पुस्तकांत म्हणतात,

"The more absolutely the woman is segregated to sex-functions only, the more pathological does her mother-hood become. The over-development of sex caused by her economic dependence on the male reacts unfavourably on her essential duties. She is too female for the perfect mother-hood!

"The more freely the human mother mingles in the natural industries of a human creature, as in the case of the savage woman, the peasant woman, the working woman everywhere who is not overworked, the more rightly, she fulfills these functions."

## एका महाराष्ट्रीय विदुषीचें मत

विवाहाचा हेतु व विशेषत: पतीच्या पत्निविषयक अपेक्षा वर नमूद केल्या आहेत. त्या सर्व एकदेशी म्हणजे पुरुषवर्गानें वर्णिलेल्या आहेत. स्त्री समाजाचें याविषयीं मत पूर्वकालीन ग्रंथांत आढळत नाहीं. विसाव्या शतकांत स्त्रीशिक्षणाचा प्रसार हिंदु समाजांत झाल्यामुळें सुशिक्षित स्त्रियांचीं मतें जाहीर होऊं लागलीं आहेत. अशा एका विदुषीचे विचार येथें नमूद करतों:

"...... सुशिक्षित स्त्रियांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, आयुष्यांत कष्ट कोणालाहि झाले तरी केले पाहिजेत. बुद्धिप्राधान्यामुळें त्यांना घरगुती शारीरिक कष्टाचीं कामें करणें जरी शक्य झालें नाहीं तरी त्यांनीं एवढें तरी धोरण ठेवलें पाहिजे कीं स्वयंपाकी ठेवल्यामुळें जो आपला २० रुपये खर्च वाढला तो कोणता तरी बौद्धिक व्यवसाय करून तिनें भरून काढला पाहिजे. प्रत्येक सुशिक्षित स्त्रीनें आपल्या नवऱ्याच्या धंद्यांत लक्ष घातलें पाहिजे व त्याचें सर्व (secretariat) चिटणिशी काम करण्याची, त्याला योग्य तो सल्ला वेळोवेळीं देण्याची तिची तयारी असली पाहिजे. नवऱ्याला आपली बायको लोढणें न वाटतां उलट आपल्या हितसंबंधांचें वेळोवेळीं संरक्षण करणारी संरक्षक देवता (guardian angel) आहे असें वाटलें पाहिजे. नवऱ्याची आर्थिक परिस्थिति चांगली असल्यास स्त्रीनें नोकरी न करावी हेंच

योग्य. कारण विवाहित स्त्रीचें नोकरीचें क्षेत्र फार मर्यादित होतें. एक तर नवरा असेल त्याच गांवीं नौकरी मिळाली पाहिजे व दुसरें म्हणजे कामाचे तास नवऱ्याचे कामापेक्षां कमी असावयास पाहिजेत. नवरा कामावरून परत येण्याचे सुमारास तिनें घरीं हजर असलें पाहिजे. शिवाय नोकरी केल्यास मुलांची आबाळ होते ती निराळीच ! म्हणून नवऱ्याची मिळकत संसारांत पुरेशी असल्यास घरगुती उद्योग-धंदे व बौद्धिक व्यवसाय यांमध्येंहि सुशिक्षित स्त्रीला अपरोक्षरीत्या नवऱ्याला पुष्कळ मदत करण्यासारखी आहे. सुशिक्षित स्त्री ही अशिक्षित स्त्रीप्रमाणें नवऱ्याला केव्हांहि लोढणें होणार नाहीं.

"सुशिक्षित स्त्रीवर संसाराची जबाबदारी विविध प्रकारची आहे. मुलांचें शिक्षण, नवऱ्याला मदत, त्यानंतर समाजकार्य व पर्यायानें राष्ट्र-कार्य. मात्र शेवटचीं दोन कार्यें तिनें जर करावयाचीं तर नवऱ्यानेंहि कांहीं गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. आपल्या स्त्रीचें त्यानें व्यक्ति-स्वातंत्र्य मान्य केलें पाहिजे व मतभेद झाल्यास मतभेद असलेल्या एखाद्या जिवलग मित्राशीं जें आपण वर्तन ठेवूं तसें तिच्याशीं ठेविलें पाहिजे. सामाजिक कार्य करतांना बायकोचा निरनिराळ्या संस्थांशीं व पुरुषांशीं भेटी, पत्रव्यवहार, इत्यादि प्रकारचा संबंध येईल तर नवऱ्यानें भलता मत्सर बाळगूं नये. मत्सर हें प्रेमाचें लक्षण असलें तरी त्याचा अतिरेक झाल्यास कार्यांत विघ्नें उत्पन्न होतील.

"पतिपत्नींच्या परस्पर विश्वासावरच लग्नसंस्था उभारली आहे. अतिसंशय बाळगल्यास सुशिक्षित स्त्रीला कांहींच करतां येणें शक्य नाहीं. असो. सरतेशेवटीं मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं नवरा-बायकोंनीं जर सलोख्यानें नांदावयाचें ठरविलें तर सुशिक्षित स्त्रीचा संसार हाच आदर्शभूत झाल्याशिवाय राहणार नाहीं."

या उताऱ्यावरून सुशिक्षित स्त्री व सुशिक्षित पुरुष या दोघांचे विचार सारखेच असल्याचें दिसून येईल व म्हणून विवाहाचा हेतु हाच यापुढें स्थिर राहील असें मानण्यास हरकत नाहीं. वैवाहिक निवडीबद्दल सविस्तर विचार पुढील प्रकरणांत करूं.

# प्रकरण चौथें

# वैवाहिक निवड

कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता श्रुतं ।
बांधवा: कुलमिच्छंति .... .... ....॥

विवाहाचे मुख्य घटक वर व वधू यांची परस्परांबद्दल निवडीचे बाबतींत काय दृष्टि असते, तें 'कन्या वरयते रूपं....' म्हणजे वधू मुख्यत: वराचें रूप विचारांत घेऊन निवड करते, हें म्हणणें सामान्यत: वधू व वर या दोघांचेहि बाबतींत खरें आहे. वर सुद्धां मुख्यत: वधूच्या रूपाचाच विचार करतो. पण हें म्हणणें बालविवाहाला म्हणजे अप्रौढ वीस वर्षांचे आंतील वधूवरांचे बाबतींतच विशेषत: खरें आहे. कारण अशा अप्रौढ मुलांमुलींना वैवाहिक जीवनांतील अधिक जबाबदारीची जाणीव फारशी नसते. म्हणून त्यांचे आईबाप, आप्तइष्ट इतर गोष्टींचा उभय पक्षांच्या सांपत्तिक स्थितीचा, शिक्षणाचा, कुलशीलाचा विचार व चौकशी करतात. तसेंच हिंदु समाजाच्या परंपरागत रूढीप्रमाणें वधूवरांचे ग्रहयोग जन्मपत्रिका जमवून पाहतात. त्यायोगें वधूवरांचे स्वभाव, आयुर्मान, संततियोग, वगैरे भावी सुखाच्या सर्व बाबींचा विचार करून विवाह जमवितात. कालमानाप्रमाणें किंवा शिक्षण-प्रसारामुळें वधू व वर दोघांचेहि विवाहाचें वय वाढत असून प्रौढविवाह झपाट्यानें रूढ होत आहे. त्यामुळें वैवाहिक निवडींतील रूप, वय, विद्या, वित्त, वगैरे सर्व बाजूंचा विचार वधू व वर स्वत:च करूं लागले आहेत. त्यांत रूपाला प्राधान्य आहेच. आणि प्रौढ विवाह किंवा प्रीतिविवाहांतहि तें राहणारच. रूपाचा म्हणजे शरीरसौंदर्याचा विचार मुख्यत: वय, वर्ण, शरीरवाढ, अव्यंगपणा, आरोग्य, निरोगिता, वगैरे गोष्टींवर अवलंबून असणार, हें उघड आहे.

## शरीरसाम्य

उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्वितां . . . . . ॥

नोद्वहेत्कपिलां कन्यां नाधिकांगीं न रोगिणीं ।
नालोमिकां नातिलोमां न वाचाटां न पिंगलां ॥
अव्यगांगीं सौम्यनाम्नीं हंसवारणगामिनीं ।
तनुलोमकेशदशनां मृद्वंगीं उद्वहेत्स्त्रियं ॥

विवाहांत पतिपत्नीचें शरीर, वय, संस्कृति, स्वभाव, शिक्षण व ध्येय या सर्व बाबतींत साम्य पाहिजे. हें साम्य पुष्कळ दांपत्यांत नसल्यामुळें आज स्थिति कशी आहे ती पाहा. वास्तविक पत्नीला अर्धांगी म्हटलें असून अनेक धार्मिक विधी पतिपत्नींनीं एकत्र बसून करावयाचे असतात. आप्तइष्टांत व इतर समाजांतहि पतिपत्नीनीं बरोबर जाण्यायेण्याचे पुष्कळ प्रसंग असतात. पण पुष्कळ पुरुषांना आपली पत्नी बरोबर घेऊन हिंडण्याफिरण्यास एक प्रकारचा संकोच वाटतो, याचें कारण विजोडपणा व पत्नीचें अज्ञान व वागण्यांतील हास्यास्पद प्रकार यांची लाज पुरुषांना वाटत असते. स्वतःचे मुलगेमुली गुणांनीं, स्वभावांनीं विपरीत असल्यास त्यांनाहि बरोबर नेण्याचा संकोच बापाला वाटतो; कारण कोठें कांहीं हास्यास्पद प्रकार असलीं मुलें करतील व लोकांनीं नांवें ठेवल्यामुळें आपल्याला कमीपणा येईल, अशी त्याला भीति वाटते. म्हणून पत्नी सर्व बाबतींत पतीच्या बरोबरीची असली पाहिजे, म्हणजे पतिपत्नी हल्लींपेक्षां आपल्या समाजांत किती तरी अधिक प्रमाणांत बरोबर हिंडतील फिरतील. आपल्या बरोबर आपला समवयस्क हुषार मित्र असला तर आपल्याला त्याचा मोठेपणा वाटतो, मित्राचा उपयोग होतो. अडीअडचणींत मित्र आपली बाजू सावरूनहि धरतो. त्याप्रमाणें पतिपत्नी एकमेकांना अनुरूप असलीं तरच परस्परांना मित्रांप्रमाणें उपयोग होऊन एकमेकांबद्दल त्यांना अभिमान वाटेल.

त्याकरितां प्रथमदर्शनीं परस्परांत शरीरसाम्य पाहिजे. गोरेपणा किंवा काळेपणा समसमान असावा. गोऱ्या बायकोला काळाकभिन्न नवरा किंवा उलट गोऱ्या नवऱ्याला काळी शिद्दीण बायको असा जोडा दर्शनींच विपरीत हास्यास्पद होतो. तसेंच शरीराची उंची व जाडीबद्दल आहे. उंच नवऱ्याला ठेंगणी खुजी बायको किंवा किरकोळ सडपातळ नवऱ्याला वाटोळी लठ्ठ बायको हें दृश्य हिडीस दिसतें. 'प्रेमध्वज' नाटकांत नाटयाचार्य खाडिल-

करांनीं क्षय व वृद्धि अशी नवरा-बायकोची जोडी अगदीं यथार्थनाम रंगवून हास्यविनोद केला आहे; तोच प्रकार व्यवहारांत प्रत्यक्ष घडतो. हा हास्यास्पद प्रकार टाळण्याकडे वधूवरांनीं निवड करतांनाच अवश्य लक्ष दिलें पाहिजे. उत्तम वधू कशी असावी, याचें वर्णन मागें मनुस्मृतींतील श्लोकांत सविस्तर दिलेलें आहे. त्याप्रमाणें समानवर्ण म्हणजे जातीला महत्त्व फार आहे. सजातीय विवाह असावा, पोटजातींत नसावा, असें, पोटजातींतील काळा गोरा वर्ण व चालीरीतींतील भिन्नत्व, तसेंच पंचगौड व पंचसारस्वतांतील प्रांतपरत्वें आहारभेद पाहिले म्हणजे कोणीहि म्हणेल. सूक्ष्म व्यावहारिक व रसिक दृष्टीला या गोष्टी सहज पटणाऱ्या आहेत.

शरीरसाम्यांत बौद्धिक व भावनात्मक साम्याचा व स्वभावसाम्याचाहि अन्तर्भाव होतो. या बाबतीत स्त्री व पुरुष यांच्यामध्यें निसर्गतःच कोणते फरक अलीकडील भौतिक शास्त्रज्ञांनीं निश्चित केले, त्याची माहिती निवड करतांना उपयुक्त होईल म्हणन 'वैवाहिक जीवन' भाग दुसरा यांत दिली आहे.

## वयसाम्य

वर वर्णन केल्याप्रमाणें शरीरसाम्य असणें आवश्यक असल्यामुळें वधूवरांच्या वयाचा प्रश्नहि अत्यंत महत्त्वाचा आहे. लग्न होतांच लगेच पतिपत्नींना बरोबर हिंडण्याफिरण्यास मुळींच संकोच वाटतां कामा नये, ही एक ध्येयदृष्टि ठेवली तर वय, स्वभाव, शरीर, व शिक्षण यांत समानता पाहिजे ही गोष्ट तेव्हांच पटते. कारण बालविवाहपद्धतींत शरीरसाम्याबद्दलची हमी मुळींच देतां येणार नाहीं. स्त्रीपुरुषांच्या उंचीची वाढ अठरावीस वर्षांपर्यंत होत असते, व सडपातळपणा व लठ्ठपणा याबद्दलहि अजमास वयाचे वीसपंचवीस वर्षांपूर्वीं नक्की सांगतां येणार नाहीं, इतकेंच नव्हे तर पुढेंहि पस्तीसचाळीस वर्षें वयापर्यंत स्त्रीपुरुषाच्या लठ्ठपणांत कांहीं वेळां कल्पनातीत फरक होतो. अंगांत वात शिरून वाटोळ्या गोळ्यासारखी किंवा वाकडीतिकडी ओबडधोबड शरीराकृति बनते, व सडपातळ जोडीदाराला हा प्रकार समाजाकडन होणाऱ्या हास्यविनोदामुळें मोठा लज्जास्पद वाटतो.

शरीराची पूर्ण वाढ झालेल्यांनींच पतिपत्निसंबंध सुरू करावा ही गोष्ट

उभयतांच्या व भावी मुलांच्या शरीरस्वास्थ्यास अत्यंत आवश्यक आहे. शारीरशास्त्राप्रमाणें पुरुषाची पूर्ण वाढ वयाचे चोवीसपंचवीस वर्षाला होते व स्त्रीची अठरावीस वर्षे वयांत होते. त्यापूर्वी परस्परांचा संबंध होऊन गर्भधारणा होणें शारीरिकदृष्टचा हानिकारक आहे हें शास्त्रसिद्ध आहे. या बाबतींत चालू रूढी किंवा ऐतिहासिक दाखले निरुपयोगी होत. आपल्या आर्यवैद्यक शास्त्रांतहि

पंचविंशे ततो वर्षे पुमान् नारी तु षोडशे। —सुश्रुत
पूर्ण षोडश वर्षा स्त्री पूर्णविंशेन संगता। —वाग्भट

याप्रमाणें शरीरवाढीची वयोमर्यादा सांगितलेली असल्यामुळें शिवाजी-बाजीरावाच्या वेळच्या बालविवाहित पिढीच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन बालविवाहाचा मुद्दा बुद्धीस पटणें शक्य नाहीं.

शरीरवाढीप्रमाणें मनाचे म्हणजे मानसिक विचार, भावना, कल्पना यांच्या वाढीचा मुद्दाहि फार महत्त्वाचा आहे. वरील ध्येयात्मक दृष्टि म्हणजे पतिपत्नीचे मित्रामित्रांतील साम्याची दृष्टि पटली म्हणजे वधूवराची मानसिक उन्नति समसमान असली पाहिजे, ही गोष्ट नाकबूल करणें अशक्य आहे. मनाची भरपूर वाढ होण्यास जगांतील व्यवहाराचा अनुभव व पुस्तकी शिक्षण दोन्ही अवश्य आहेत. जगांतील अनुभव पाहून आपल्या मनाची उन्नति करणें, हें बालवधूला अशक्य आहे. मुलाच्या किंवा मुलीच्या पंधरासोळावे वर्षी ही दृष्टि उत्पन्न होते व पुढें चारपांच वर्षांनीं हें व्यावहारिक शहाणपण अंगीं येतें. व्यावहारिक ज्ञानाची परीक्षा करण्याकरितां माणसाचें वय वीसबावीस वर्षांचें तरी असावयास पाहिजे. इतक्या वयाला मुलीचा मानसिक विकास बराच होऊन तिच्या स्वभावाला जें वळण लागतें तें चिरस्थायी असतें. म्हणून स्वभावसाम्य पारखून घेण्याकरितां वधूचें वय अठरावीसपर्यंत असणें अत्यंत आवश्यक आहे.

### मनुस्मृतींत सुचविलेली वयोमर्यादा

या दृष्टीनें विचार केल्यावर वधूवरांची मनुस्मृतींतील दर्शविलेली—

त्रिंशद्वर्षोद्वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीं।
त्र्यष्टवर्षोऽष्टवर्षां वा धर्मे सीदति सत्वरः॥ —मनु० ९।९४

तीस वर्षांचे पुरुषानें बारा वर्षांच्या मनोहर कन्येशीं किंवा चोविसावे वर्षी आठ वर्षांच्या वधूशीं विवाह करावा—ही वयोमर्यादा अत्यंत अस्वाभाविक व अग्राह्य वाटते. आठ किंवा बारा वर्षांच्या मुलीची शारीरिक व मानसिक वाढ कितीशी झालेली असणार? उलट पक्षीं चोवीस किंवा तीस वर्षांचा पूर्ण शारीरिक व मानसिक वाढ झालेला तरुण विवाह होतांच तिच्याशीं बरोबरीच्या नात्यानें कसा वागणार व अशी मुलगी अठरावीस वर्षांची होऊन वैद्यकशास्त्रदृष्ट्या तिची पूर्ण शारीरिक वाढ होईपर्यंत म्हणजे विवाहोत्तर सुमारें आठदहा वर्षें संभोगसुखविन्मुख राहून आयुष्यांत अत्यंत तारुण्याच्या उमेदीचा व उत्साहाचा काल असा तरुण कसा कंठणार? तात्पर्य, शारीरिक व मानसिक वाढ व शिक्षण, वगैरे सर्व दृष्टींनीं मनुस्मृतींतील वयोमर्यादा अव्यवहार्य वाटते. त्यापेक्षां प्रत्यक्ष बालविवाह म्हणजे ज्यांत वधू व वर दोघेहि अल्पवयी आणि वयानें दोनचार वर्षांचें अंतर असणारीं असतात तो बालविवाहहि एका अर्थानें बरा; कारण त्यांत वधूवरांची शारीरिक व मानसिक वाढ तरी समप्रमाणांत असते! खेडेगांवांत व ज्या जातींत शिक्षणाची प्रवृत्ति नाहीं व शिक्षणाचीं साधनें नाहींत तेथें असले विवाह होणेंच नैतिकदृष्ट्या बरें, व त्याप्रमाणें बालविवाह होतातहि. पण वास्तविक मनुस्मृतिप्रणीत विवाहवयोमर्यादा व बालविवाह दोन्हीहि अग्राह्य असून सार्वत्रिक शिक्षण-प्रसाराबरोबर स्त्रीपुरुषांचे प्रौढ विवाहच रूढ होणार, याबद्दल शंका वाटत नाहीं. मात्र विवाहोन्मुख स्त्री-पुरुषांना योग्य वेळीं विवाहविषयावरील आवश्यक वाङ्मय वाचावयास व अभ्यासावयास मिळालें पाहिजे. याची यादी 'वैवाहिक जीवन' भाग दुसरा यांत दिली आहे. कारण marry in haste and repent at leisure असा दुर्दैवाचा किंवा मूर्खपणाचा प्रसंग त्यांचेवर येतां कामा नये.

## प्रो० घुर्ये यांचें संशोधन

विवाहाचे वयोमर्यादेबाबत मुंबईसारख्या पुढारलेल्या शहरांत राहणाऱ्या मध्यम वर्गांतल्या म्हणजे साधारण सुशिक्षित समाजाची दृष्टिसुद्धां अशास्त्रीय व अरसिक आहे. त्याची आकडेवारीनें माहिती नुकतीच उपलब्ध झाली आहे. प्रोफेसर जी. एस्. घुर्ये, पीएच्. डी., यांनीं *Sex Habits of*

*a Sample of Middle Class People of Bombay* या नांवाचें चोपडें प्रसिद्ध केलें असून त्यांत त्यांनीं मुंबई शहरांत राहणाऱ्या सुमारें ३१० हिंदु पुरुषांनीं (१) स्वतःच्या लग्नाच्या वेळचें स्वतःचें व बायकोचें वय, (२) लग्नाचे वेळचें स्वतःचें शिक्षण व बायकोचें शिक्षण, (३) उभयतांचा धंदा ऊर्फ द्रव्यार्जनाचें साधन, (४) संततिनियमनाचे साधनांचा अवलंब, (५) अपत्यांची संख्या, वगैरे बाबतींत खासगी माहिती पुरविली ती नांवनिशी गाळून दिली आहे. त्या माहितीवरून सदरहू इसमांच्या बायकांचें लग्नाच्या वेळीं वय काय होतें याबद्दलचें कोष्टक खालीं दिलें आहे. त्यावरून दिसून येतें कीं, त्या इसमांपैकीं ५१ इसमांचे बायकांचें लग्नांतलें वय ६ ते १३ वर्षांचें होतें, म्हणजे इतक्या इसमांचे बालविवाहच झाले. १४ ते १५ वर्षांचें वय ७२ इसमांच्या बायकांचें, १६ ते १७ वर्षें वय ७५ इसमांच्या बायकांचें, १८ ते १९ वर्षें वय ७३ इसमांच्या बायकांचें आणि २० ते २१ वर्षें वय २४ इसमांच्या बायकांचें होतें. या माहितीवरून प्रौढ विवाहाकडे लोकमत झपाट्यानें वाढत आहे, हें निश्चित आहे.

**स्त्रीचें लग्नाच्या वेळचें वय**

| वयोमर्यादा | संख्या |
|---|---|
| ६–१३ | ५१ |
| १४–१५ | ७२ |
| १६–१७ | ७५ |
| १८–१९ | ६३ |
| २०–२१ | २४ |
| २२–२६ | १२ |
| ३१... | १ |
| एकूण | २९८ |

स्त्रीचें लग्नाचे वेळचें सरासरी वय : १६ ते २० वर्षें.

### शिक्षणसाम्य

ययोरेव समं श्रुतं । तयोर्विवाहः ॥ असें सुभाषित आहे. त्यावरून सुशिक्षित पुरुषाला तदनुरूपच सुशिक्षित बायको असावी, असेंच प्राचीन मत स्पष्ट

दिसतें. हल्लीं शहरांत हें साम्य कितपत आढळतें याबद्दल प्रो० घुर्ये यांना मिळालेली माहिती येणेप्रमाणें :

"As for the educational attainments of the wives of these persons, it may be mentioned that the largest bulk of them have only Vernacular education, 150 being returned as having no education higher than that of the Vernacular fourth standard, 30 as having passed the Vernacular final examination and 1 the second year training examination. 90 ladies have some English education. Of these 64 are non-matriculates, 1 holding a deploma in art; 13 are matriculates; 7 are undergraduates, of whom 2 hail from the S. N. D. T. I. W. University; 4 are graduates of the Statutory Universities and 1 of the S. N. D. T. I. W. University. There is only one lady among these, who holds the M. A. degree. 23 wives have no education whatsoever and about 10 there is no information."

मुंबईसारख्या शहरांत पुढारलेल्या समाजांतील जोडप्यांतील स्त्रीपुरुष-शिक्षणसाम्यांत अद्याप मोठ्या प्रमाणांत् विषमता आहे. अद्यापहि सुशिक्षित म्हणजे पदवीधर पुरुषांत सुशिक्षित. पदवीधर स्त्रियांस वरण्याची प्रवृत्ति दिसत नाहीं. याला कारणें उभय पक्षीं आहेत. पहिलें जबरदस्त कारण खुद्द सुशिक्षित स्त्रियांची मोठें श्रीमंत व सुशिक्षित स्थळ मिळविण्याची महत्त्वाकांक्षा होय. कोणाहि पदवीधर स्त्रीला किमानपक्ष मोटार बाळगण्याइतका तरी श्रीमंत पति मिळावा, ही गुप्त आकांक्षा असते. पण अद्यापहि महाराष्ट्रीय समाजांत लक्ष्मी व सरस्वती यांचें साहचर्य क्वचितक्वचितच दिसतें. निदान विद्वान् पदवीधर तरुण आरंभीं कफल्लकच असतात. पण त्यांच्या भावी कर्तृत्वावर भरंवसा ठेवून त्यांना पदवीधर स्त्रियांनीं वरण्यांत धाडस किंवहुना रसिकता व कर्तव्य दाखविलें पाहिजे. कारण वैवाहिक जीवन सुखी होण्यास शिक्षणसाम्य फार आवश्यक आहे. या बाबतींत सुशिक्षित स्त्रियांचा दृष्टिकोण यथायोग्य बदलत आहे, ही गोष्ट पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

"......आतां एखादा लग्नाची इच्छा असलेला तरुण अशिक्षित स्त्री पतकरेल कीं सुशिक्षित स्त्री पत्करेल याचा विचार करूं. अर्थात् मी येथें प्रेमाबिमाचा विचार करीत नाहीं. प्रेम हें आंधळें असल्याकारणानें एकाद्या मुलीवर प्रेम बसलेला तरुण मुलगी अशिक्षित आहे कीं सुशिक्षित आहे याची पर्वाच करणार नाहीं. तेव्हां व्यावहारिक दृष्टि ठेवून एखादा तरुण काय करील हें पाहिल्यास आपल्याला असें दिसून येईल कीं, अलीकडचे तरुण सुशिक्षित मुलीशीं लग्न करावयास थोडे कचरतात, कारण अशिक्षित बायको केल्यास तिच्या अपेक्षा गरीबीनें संसार करण्याची तयारी, चूलमूल यांत आनंद मानून घेण्याची वृत्ति, ही तरुणांना सोयीची वाटते. उलट पक्षीं सुशिक्षित बायको म्हणजे तिनें स्वतःच्या दर्जाच्या कांहीं कल्पना ठरवून ठेवलेल्या असतात. घरगुती कामें तिला कंटाळवाणीं वाटतात. तेव्हां अशी बायको गरीबीच्या संसाराला जमेल किंवा नाहीं असें त्यांना वाटतें. परंतु मला हेंच सिद्ध करून दाखवावयाचें आहे कीं, हा केवळ आभास आहे व दूरवर दृष्टीनें विचार केल्यास सरतेशेवटीं गरीब किंवा श्रीमंत कोणाही नवऱ्याला सुशिक्षित स्त्रीच संसाराला अधिक कार्यक्षम आहे असें दिसून येईल; किंवा अधिक स्पष्ट बोलावयाचें म्हणजे एखादी मुलगी अशिक्षित राहिली असतांना तिनें ज्या प्रकारचा संसार केला असतां त्यापेक्षां ती शिकली तर ती अधिक चांगल्या रीतीनें संसार चालवील."

—'ज्ञानप्रकाश', सप्टेंबर २५, १९३८.

## प्रो० माटे यांचे विचार

वधूवरांचें वय, शिक्षण, संस्कृति, वगैरे अनेक बाबतींत प्रो० माटे यांचे विचार मार्गदर्शक होतील, म्हणून त्यांचे व्याख्यानांतील महत्त्वाचा भाग येथें उद्धृत करतों. (ता. १ जुलै १९३८ चा ज्ञानप्रकाश)

"......आपण प्रीतिविवाहाचीं दुःखें व अडचणी समाजापुढें मांडतों परंतु बालविवाहाची दुःखप्रणाली कांहीं कमी आहे काय? नाहीं. तींतही दुःखें व अडचणी आहेतच. पण समाज एका दुःखप्रणालींतून दुसऱ्या दुःख-

प्रणालींत जात आहे येवढेंच. पण बालविवाहाचीं दुःखें व प्रीतिविवाहाचीं दुःखें यांत एक सूक्ष्म फरक आहे आणि तो इतकाच कीं बालविवाहाचीं दुःखें दुसऱ्यांनीं आपणांवर लादलेलीं असतात आणि प्रीतिविवाहाचीं दुःखें आपलीं आपणच पत्करलेलीं असतात. राजाचा एकछत्री अंमल व लोकमतानुर्वाति लोकशाही राज्यपद्धति यांमध्यें जें सुखदुःखांचें अंतर, तेंच बालविवाह व प्रीतीविवाह यांतील सुखदुःखांचें अंतर होय.

"बालविवाह आतां मागें पडत चालल्यामुळें बालविवाहाचीं दुःखें समाज विसरत चालला आहे. पण अद्यापहि जुन्या वळणाच्या घरांतील वृद्ध स्त्रियांना व आजही समाजांत वावरणाऱ्या कित्येक बालविधवांना विचारा म्हणजे त्या टाहो फोडन सांगतील कीं बाल-विवाह नको! नको! त्रिवार नको!!!

## संस्कृतिसंकर

"या चित्पावन ब्राह्मण समाजाच्या लवकरच पुढें आणखी दोन जाती होण्याचा संभव आहे असें राजवाडे यांनीं एकदां लिहून ठेवलें आहे. ती वेळ आतां जास्त जवळ येत चालली असें वाटतें. ब्राह्मण वर्गांत अपेयपान व अभक्ष्य भक्षण अलीकडे जास्त फैलावत आहे. डॉक्टर लोकांनीं प्रथम हें खूळ आणलें. स्वतः ते खाऊंपिऊं लागले व प्रकृतीस आवश्यक म्हणून इतरांस सांगूं लागले. आर्यवैद्यकाच्या एका अभिमानी वैद्यानें मला प्रकृतिस्वास्थ्यासाठीं जेव्हां अंडीं खाण्याचा सल्ला दिला तेव्हां तर मी सर्दच झालों, आणि त्यांना म्हटलें कीं, वैद्यबोवा, अहो तुम्ही तरी नका असें सांगूं! डॉक्टर आहेतच या कामाकरितां (हंशा)! आगरकरांचा वेळीं अवेळीं आधार घेणाऱ्या सुधारकांना याबाबत आगरकर उपयोगी पडणार नाहींत, त्यांनीं तर या अभक्ष्य भक्षणाचा तीव्र निषेध केला आहे. अशा या संस्कृतिसंघर्षाच्या कालांत आपणांस संस्कृतीच्या कोणत्या कोशांत वागावयाचें आहे हें पाहिलें पाहिजे. आपला हा ब्राह्मण समाज निवृत्तमांस करण्यास आपल्या पूर्वजांना फार श्रम पडले आहेत आणि ही मांसनिवृत्ति शतकानुशतकें

ज़तन करण्यासहि त्यांना कांहीं कमी श्रम पडले नाहींत. निवृत्तमांस असणें ही संस्कृतीची अत्युच्च पायरी आहे. या दर्जाला ब्राह्मण समाज पिढयान् पिढयाच्या एका शिस्तीच्या वागणुकीमुळें आलेला आहे ही गोष्ट आपण विसरूं नये.

"केवळ एखादे वेळीं अंडें खाल्लें म्हणून काय होतें? असें लोक विचारतात. पण जो आज अंडें खातो तो उद्यां कोंबडें खातो (हंशा)! कोंबडें खाल्ल्यानंतर बोकड खाण्यास त्यास कांहींच वाटत नाहीं; आणि एकदां बोकड खाण्यास चटावलेली जीभ दुसरें काय खाणार नाहीं? पण मांसाहाराच्या पाठोपाठ दुसरें संकट चालून येत असतें. तें म्हणजे मदिरापान! या मदिरापानानें घराणींच्या घराणीं रसातळास जाऊन चांगल्या कुटुंबाची बघतां बघतां राळ उडाली आहे. तें होऊं नये म्हणून आपल्या पूर्वजांनीं दूरदृष्टि ठेवून आपल्या ब्राह्मण समाजास ज्या मांसनिवृत्तीमुळें ही उच्चतम पायरी मिळवन दिली तीवरून आपण आपले पाय घसरूं देऊं नये! तरुण पिढीवर लक्ष ठेवून त्यांच्याकडून या गोष्टींचें पालन करविलें पाहिजे."

वैवाहिक निवडीबद्दल अधिक विचार पुढील प्रकरणांत करूं.

# प्रकरण पांचवें

# प्रेम व मैत्री

“. . . . . दोन अपूर्ण जीवांना पूर्णता देणाऱ्या प्रेमाचें चिरंतनत्व विकार-साम्यांत नसून विचारसाम्यांत आहे. तसें असेल तरच तें प्रेम आयुष्याच्या अंतापर्यंत टिकेल.”—विभावरी शिरूरकरकृत ‘विरलेलें स्वप्न’

विवाहासंबंधाची चर्चा करतांना प्रेम म्हणजे काय याची चर्चा करण्याची आवश्यकता भासते; कारण विवाहसंबंध सुखकारक होण्यास व आमरण टिकण्यास पतिपत्नींमध्यें प्रेमभावना दृढ राहिली पाहिजे. ‘प्रेम’ म्हणजे काय असें विचारल्यास ब्रह्माच्या व्याख्येप्रमाणें ‘नेति नेति’ अशी पुष्कळांची स्थिति होते. विवाहाचे दोन प्रकार आहेत.—(१) संस्काराधिष्ठित विवाह म्हणजे जो विवाहसंबंध आमरणान्त पाळावयाचा व घटस्फोट व पुनर्विवाह करण्याची ज्यांत परवानगी नाहीं असा विवाहसंबंध; (२) दुसरा कराराधिष्ठित विवाह म्हणजे जो विवाहसंबंध केव्हांहि योग्य कारणास्तव किंवा केवळ परस्परांच्या मर्जीस्तव मोडतां येतो तो विवाहसंबंध. बौद्ध, ख्रिस्ती, मुसलमानी, पारशी, वगैरे सर्व धर्मांत घटस्फोट (डायव्होर्स) मान्य आहे. हिंदु धर्मांतहि कांहीं जातींत तो मान्य आहे. वास्तविक विवाह हा करार म्हणून पाहिजे तेव्हां मोडतां येण्याची सवलत जेथें आहे, तेथें प्रेमाची व्याख्या व चिकित्सा करण्याचें प्रयोजन नाहीं. मालक-मजूर, धनी-नोकर हा जसा संबंध किंवा स्नेहा-मैत्रीचा जसा संबंध उपयुक्ततेवर अवलंबून असतो, व एक-मेकांना एकमेकांचा उपयोग होत नाहीं असें दिसल्यावर ज्याप्रमाणें धनी चाकराला रजा देतो किंवा स्नेहास्नेहामधील संबंध सुटतो त्याप्रमाणेंच विवाहित पतिपत्नींनीं घटस्फोट करून आपापला स्वतंत्र मार्ग आक्रमावा, हा सरळ मार्ग होय. तसेंच संस्कारवादी लोकांना घटस्फोटाचा दुसरा वैकल्पिक मार्ग मोकळा नसल्यामुळें प्रेमाची चिकित्सा करीत न बसतां विवाह-बंधन आमरणान्त पाळणें भाग पडतें. आपल्या हिंदु समाजांत विवाहप्रेमाची

वाटाघाट न करणारे लोकच बहुतेक आहेत. आधुनिक सुशिक्षित स्त्री-पुरुषांतच ही चर्चा अलीकडे फार होऊं लागली आहे.

घटस्फोटाची परवानगी असली तरी विवाहसंबंधामुळें उत्पन्न झालेला परिचय, स्नेह, लोभ या भावनांमुळें आणि अपत्यबंधनामुळें विवाहसंबंध कायम टिकावा असा स्त्रीपुरुषांच्या मनाचा कल साहजिक असतो. व्यवहारी व विचारी दृष्टीला हेंच पटतें. म्हणून विवाहसंबंध आजन्म अबाधित टिकण्याकरितां पतिपत्नीमध्यें कोणती मानसिक भावना व व्यावहारिक वर्तणूक कायम राहिली पाहिजे याचा ऊहापोह विचारवंत विद्वान करूं लागतात. सर्वसाधारण स्त्रीपुरुषसुद्धां नवराबायको असा संबंध जडल्यावर आपल्या संसारसुखांत बिघाड उत्पन्न होऊं नये म्हणून व्यावहारिक दृष्टीनें धोरण ठेवून वागतात. अशा सौजन्यानेंहि संसाराचा गाडा नीट चालतो. पण केवळ सौजन्य व प्रेम यांत अंतर आहे व प्रेमाची खरी कसोटी अडचणीच्या व आणीबाणीच्या प्रसंगीं लागते. उदाहरणार्थ,

आत्मानं सततं रक्षेत् दारैरपि धनैरपि ।

म्हणजे स्वतःचा घात होण्याची वेळ असेल तर बायकोची व धनाचीहि पर्वा न करतां म्हणजे बायकोचा व धनाचा त्याग करूनहि आपलें स्वतःचें रक्षण करावें, असें एक नीतिकार म्हणतो, पण प्रेमनीतिपंडितांना ही स्वार्थी नीति मान्य नाहीं. तात्पर्य, प्रेम ही भावना सर्वोच्च मानण्याची प्रेमशास्त्रांत प्रवृत्ति आहे. अशा या प्रेमाचें कोडें उलगडण्याची खटपट करणें, यांतहि करमणूक व आनंद आहे. म्हणून प्रत्येक विवाहेच्छु स्त्रीपुरुषानें प्रेमविषयक वाङमय वाचावें, नाटक-सिनेमाचे प्रयोग पाहावे, व भोंवतालचा संसारी समाजहि नीट निरीक्षण करावा. तसेंच कर्तव्यनिष्ठा, आदर, कृतज्ञता, शारीरिक आकर्षण व प्रेम या निरनिराळ्या भावना आहेत. प्रेमामध्यें त्या सर्वांचा अन्तर्भाव होतो, त्यामुळें प्रेमाचें खरें स्वरूप कळणें कठिण जातें. उदाहरणार्थ,

**स्वदेशप्रेम :** देशाकरितां म्हणजे स्वदेशाचे स्वातंत्र्याकरतां किंवा उन्नती-करितां प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य प्राणार्पणासुद्धां सर्व प्रकारचा स्वार्थत्याग करणें हें आहे. वास्तविक नीतिशास्त्रांतील greatest good of greatest

number या तत्त्वाप्रमाणें भावी पिढ्यांच्या कल्याणाकरितां करावयाचें हें कर्तव्य आहे. कर्तव्य म्हणून असाच स्वार्थत्याग आपल्या कुलरक्षणाकरितां, जातिरक्षणाकरितां, धर्मरक्षणाकरितां अनेकांनीं केला आहे. बाबरनें हुमायुनाकरितां प्राणार्पण केलें; रजपुत स्त्रियांनीं जोहार केले; सॉक्रेटीस, गॅलिलीयो, लॅटिमर, लूथर, वगैरे लोकांनीं आपले बळी कर्तव्यनिष्ठेनें दिले. त्यास प्रेम ही शब्दयोजना बरोबर नाहीं.

**आदर:** गुणा: पूजास्थानं गुणिषु म्हणजे गुणवान् लोकांमधील गुण हें आदराचें कारण असतें. शिवाजी, टिळक, गांधी, वगैरे गुणवान् लोकांबद्दल आपणांस आदर वाटतो तें प्रेम नव्हे.

आदर व प्रेम यांमध्यें विचाराचा घोटाळा नाट्याचार्य खाडिलकर यांच्या 'मानापमान' नाटकांतील भामिनीच्या पुढील पद्यांत आहे.

दर्शन गुणवंताचे नाचवी प्रेमलहरी।
गुणरसपान हेंचि सुख। प्रेम तया नांव जनीं॥

येथें धैर्यधराच्या अंगच्या शौर्यगुणाबद्दल भामिनीच्या मनांत आदर उत्पन्न झाला, तें प्रेम नव्हे. कारण धैर्यधराला गरीबींत वाढल्यामुळें श्रीमंती चोचले मुळींच आवडत नव्हते म्हणून त्यानें 'चढवीन विभवा अधनाचि ललना' असें स्पष्ट सांगून भामिनीच्या मागणीचा धि:कार केला. तेव्हां डोळ्यांत अंजन पडून खऱ्या प्रेमाचे शोधास ती लागली व 'आजी टाकूं गडे धनवेषा' असें ठरवून गरीबी पत्करून रानांतील झोपडींत राहिली. त्या वेळीं धैर्यधर-भामिनीची मनोभूमिका एक झाली आणि खरें प्रेम परस्परांत उद्‌भवलें. साधारणत: शौर्य, धैर्य, परोपकार, दयादातृत्व, स्वार्थत्याग, वगैरे उज्ज्वल गुणांबद्दल प्रत्येकाला आदर वाटतो पण तें प्रेम नव्हे.

**कृतज्ञता:** दुसऱ्यानें आपल्यावर उपकार केले म्हणजे त्याच्यापुढें आपण साहजिक नम्र होतों. त्या उपकाराची फेड करण्याची तयारी आपण दाखवितों. उपकाराची जाणीव ठेवणें हा मनुष्यस्वभाव आहे. सर्वसाधारण लग्नसंबंधांत हीच भावना प्रभावी ठरते. विशेषत: ज्या उच्च राहणींत स्त्रिया सर्वस्वीं परावलंबी असतात, तेथें खाणेंपिणें, कपडेलत्ते, दागदागिने

जो नवरा पुरवितो त्याच्याकरितां कृतज्ञताबुद्धीनें त्या संसारकामाचे कष्ट सोसतात, त्याची सेवाचाकरी करितात, एकनिष्ठ राहतात. इतर बाबतींत नवरा बायकोच्या कितीहि मनाविरुद्ध वागला, व्यसनी, बाहेरख्याली निघाला तरी भांडणतंटा करून विरुद्ध वर्तन करण्यास स्त्रिया धजावत नाहींत. कृतज्ञताबुद्धीनें व घटस्फोट नसल्यामुळें अनन्यगतिक होऊन त्या असल्या पती-बरोबर जन्मभर त्याची सेवा करून राहतात. त्यांत प्रेम नसतें. आपल्या ब्राह्मण जातींत व इतर हिंदू उच्च जातींत केवळ या कृतज्ञताबुद्धीनें बहुतेक संसार चालतात, प्रेमानें नव्हे.

**प्रेम व त्याचे प्रकार :** प्रेम हा शब्द पतिपत्निप्रेमाखेरीज मातृपितृप्रेम, अपत्यप्रेम, बंधुभगिनीप्रेम यासंबंधांतहि वापरतात; व या प्रेम प्रकारांत परस्पर बरेंच साम्य आहे. पण या सर्वांमध्यें आत्मप्रेम हें सर्वश्रेष्ठ आहे. म्हणजे मनुष्य किंवा जीवमात्र स्वतःवर इतर सर्वांहून अधिक अत्यंत प्रेम करतो, ही गोष्ट उघड आहे. याचें कारणहि उघड आहे. स्वतःची प्रत्येक गोष्ट स्वतःला चांगलीच वाटते. "सर्वः कांतं आत्मानं पश्यति।" मीच इतरासर्वांहून अधिक सुंदर, देखणा, हुषार, शहाणा असला अहंभाव अभिमान प्रत्येक माणसांत असतो. शिवाय जगांत सर्व उपभोग्य वस्तूंचा उपयोग घेणारा जो स्वतः देह व जीव तो प्रत्येकाला प्यार वाटतो यांत नवल तें काय ? आणखी असें कीं, स्वतःमध्यें जो दोष व कमीपणा असेल तो दूर करून इतराहून श्रेष्ठ होण्याची महत्त्वाकांक्षा धरून प्रयत्न करणें प्रत्येकास शक्य असल्यामुळें मनुष्य सहसा आपला कमीपणा कबूल करण्यास व स्वतःस तुच्छ लेखण्यास तयार नसतो. याप्रमाणें स्वतःवर प्रेम करण्याची उपजत बुद्धि असलेला मनुष्य मात्र स्वतःशीं समान स्वभाव-गुणधर्म असलेल्या इतर माणसांवर साहजिकच प्रेम करूं लागतो. अशीं माणसें म्हणजे मुख्यत आईबाप, भाऊ-बहीण व स्वतःचीं मुलगेमुली हीं होत. कारण अनुवंशिकता शास्त्राप्रमाणें या नजीकच्या नातेवाईकांचे स्वभावगुणधर्म समान असतात. तात्पर्य, मातृ-पितृप्रेम, बंधुभगिनीप्रेम, व अपत्यप्रेम हें सर्व प्रेम नैसर्गिक व आधुनिक भौतिक शास्त्रसिद्ध असेंच असून त्या सर्वांची तात्त्विक उपपत्ति एकच आहे, म्हणजे हें प्रेम स्वभावगुणधर्मसमानता या पायावर आधारलेलें असतें. शिवाय

ही समानता निसर्गत: प्राप्त होणारी असल्यामुळें आधीं स्वभाव-परीक्षा-परिचय व मग प्रेम किंवा परिचयोत्तर प्रेम हा आधुनिक प्रेमशास्त्रांतला सिद्धांत येथें लागू करण्याचें कारणच पडत नाहीं.

## मित्रप्रेम व पतिपत्निप्रेम

या दोन्ही प्रकारच्या प्रेमाचा सुद्धां शास्त्रशुद्ध पाया म्हटला म्हणजे स्वभावगुणधर्मसमानता हाच होय. मैत्रीबद्दलचें सुप्रसिद्ध सुभाषित

समानशीले व्यसनेषु सख्यं ।

यामध्यें शील ऊर्फ स्वभाव यालाच आद्यस्थान दिलें आहे. मित्र व मैत्री याचा अनुभव प्रत्येक प्रौढ स्त्रीपुरुषाला बारकाईनें निरीक्षण करण्यासारखा आहे. ज्यांचा स्वभाव जमतो अशाच दोन स्त्रियांमध्यें वा पुरुषांमध्यें स्नेहमैत्री वाढते व चिरकाल टिकते.

मातृप्रेम, पितृप्रेम, बंधुप्रेम, अपत्यप्रेम, मित्रप्रेम, अनेकविध प्रेमांचा राजा 'पतिपत्निप्रेम' हें आहे. 'खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनीं' किंवा 'दे आपणास असता, व्यसनीं त्यजीना' ही सर्वसामान्य प्रेमाची कसोटी आहे. पतिपत्निप्रेम हा विषय फारच गहन आहे. दोन अपरिचित विजातीय जीवांचें प्रेम तें! हजारो हजार कोटयवधि जीवांनीं विवाहसंबंधाचा अनुभव आजवर घेतला आहे; अमर्याद वाङमय या पतिपत्निप्रेम विषयावर झालें आहे, अद्यापहि होत आहे. प्रत्येक लेखकाला—अगदीं प्रथितयश लेखकालाहि ही प्रेमाची नवलकथा गुंगवीत आहे. या प्रेमाची फार अवघड चिकित्सा आहे; बहात्तर रोगांहून अवघडांतली अवघड अशी ही व्याधि आहे. अवघड असाध्य रोगाचा प्रत्येकाला अनुभव येतोच, असें नाहीं. पतिपत्निप्रेम या व्याधीचाहि पुष्कळांना अनुभव येत नाहीं. शेंकडा पन्नास टक्के स्त्री-पुरुष सामान्य समाजचालीरीतीप्रमाणें विवाहबद्ध होतात, मुलेंबाळें होऊन संसार करतात, मरून जातात; प्रेमविषयाला ते अज्ञातच असतात.

## प्रेम म्हणजे काय?

प्रेम हा शब्द फार व्यापक अर्थानें आपण वापरतों. आईबापांचें

अपत्यावरील प्रेम, भाऊ-भाऊ, भाऊ-बहीण, मित्रमित्र, वगैरे अनेकांचें परस्परांवर प्रेम आहे असें आपण म्हणतों. पण वास्तविक पतिपत्नीमधील प्रेमभावना—तिचें कारण, कार्य व व्याप्ति या अनेक कारणांस्तव—ही इतर वरील प्रेमभावनेहून भिन्न असते व म्हणून या विशिष्ट भावनेला विशिष्ट शब्द भाषेंत असावा, हें उचित व आवश्यक आहे. माया, ममता, लोभ, स्नेह, आदर, भक्ति, पूज्यभाव, वगैरे अनेक शब्द विविध पण प्रेमसदृश भावनांना समर्पक असून तेहि विशिष्ट अर्थानें रूढ आहेत, तसें वापरणें योग्य होय. मातेच्या अपत्यविषयक आकर्षणाला प्रेमापेक्षां 'ममता' शब्द वापरावा, व त्याचप्रमाणें इतर शब्दयोजना व्हावी; आणि 'प्रेम' शब्द केवळ पतिपत्निविषयक भावनेलाच लावावा. या पतिपत्निप्रेमभावनेचें (१) कारण, (२) कार्य, व (३) व्याप्ति या तिन्ही दृष्टींनीं महत्त्व वरील इतर सर्व भावनांपेक्षां अधिक आहे. या प्रेमाची व्याख्या अशी केली पाहिजे :

प्रेम म्हणजे पति व पत्नी यांनीं परस्परांना कायावाचामनें अर्पण करण्याचा बुद्धिद्वारें व भावनाद्वारें केलेला संकल्प किंवा निश्चय.

या व्याख्येंत, काया, वाचा व मन या तिहींचें समर्पण, हे शब्द अत्यंत महत्त्वाचे आहेत. या प्रकारचें सर्वस्व समर्पण पतिपत्निव्यतिरिक्त इतर कोणत्याहि संबंधांत असूं शकत नाहीं. मात्र पतिपत्निसंबंधांत असें सर्वस्व व सर्वव्यापी समर्पण करावयाचें असतें याची जाणीव फारच थोड्यांना असते. कारण पूर्ण पतिपत्निप्रेम—शंभर टक्के पतिपत्निप्रेम—हें प्रत्यक्ष जगांत फार क्वचित् पाहावयास मिळतें.

**कायिक समर्पण:** कायेचें पूर्णपणें समर्पण हें पतिपत्निसंबंधांतच असतें, ही गोष्ट स्पष्टच आहे. आईबाप व मुलें, भाऊबहीण, मित्रमित्र वगैरे कोणत्याहि संबंधांत एकाच्या शरीराचा दुसऱ्याला फक्त मर्यादितच उपयोग होतो. यापेक्षां या बाबतींत अधिक विवेचनाची जरूरी नाहीं. या लिहिण्यांतला मुद्दा अगदीं उघड आहे.

**वाचिक समर्पण:** हा मुद्दा समजणें अधिक अवघड आहे. वाचिक समर्पण म्हणजे भाषणस्वातंत्र्य, अनिर्बंध भाषणव्यवहार. पतीला किंवा

पत्नीला कोणताहि असा विषय नसतो कीं जो आपल्या जोडीदाराजवळ बोलतां येणार नाहीं. संसारांत पतिपत्निनात्यानें बद्ध झालेल्या दोन व्यक्ती इतक्या समरस व्हावयास पाहिजेत कीं, एकानें दुसऱ्याजवळून कांहीं चोरून लपवून ठेवावें, असा भाग कांहींच असतां कामा नये. मात्र प्रत्यक्ष व्यवहारांत शेंकडा ९० पतिपत्नी परस्परांशीं पूर्ण खुल्या दिल्यानें वागत नाहींत, असा अनुभव आहे; याचें कारणच पूर्ण प्रेमाचा अभाव म्हणजे स्वभावसाम्य, संस्कृतिसाम्य व शिक्षणसाम्य व ध्येयसाम्य हीं अंगें पूर्ण साधून पूर्ण पतिपत्निप्रेम असलेलें दांपत्य फार विरळा. पतिपत्निप्रेमाची व्याख्या करतांना कायेपेक्षां वाचेचें महत्त्व अधिक आहे, कारण एका पातळीवर असलेली, पूर्ण श्रद्धा व निष्ठा असलेली, आणि संसारांतील सुखदुःख व हिताहित या बाबतींत पूर्ण तादात्म्य पावलेली पति व पत्नीच फक्त एकमेकांशीं कोणताहि आडपडदा न ठेवतां नित्य व नैमित्तिक अशा सर्व बाबतींत एकमेकांचें अन्तःकरण उघडें करून बोलतील. असें पूर्ण तादात्म्य फार क्वचित् आढळतें.

असें तादात्म्य नसेल तेथें परस्परांच्या संभाषणाला पुष्कळदां साहजिकच खीळ पडते. विवाहसंबंधानंतर प्रथम प्रथम पत्नीचा माहेराकडे ओढा फार आणि पतीबद्दल व सासरच्या माणसांबद्दल नवखेपणा, गैरसमज, दुर्ग्रह, वगैरे कारणांमुळें संभाषणांत लपवालपवी करावी लागते. शिक्षणसाम्य नसल्यास पति उच्चविद्याविभूषित आणि पत्नी निरक्षर फार तर साक्षर पतीचा वाङमयविषयक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, वगैरे हरएक बाबतींतला संभाषणयोग मित्रांबरोबरच येणार. पत्नीजवळ या बाबतींत तोंड उघडण्याची सोयच नाहीं. त्यामुळें संभाषणविषयक आनंदाला कमीपणा येऊन तितक्या मानानें पतिपत्निप्रेमांतहि उणीव राहणारच. वास्तविक पतिपत्नीमधील वाचिक समर्पणांत व्यंग बिलकूल असतां कामा नये. तें समर्पण संपूर्ण असलें पाहिजे. पतिपत्निप्रेमाचा आदर्श, ध्येय व व्याख्या अशीच असली पाहिजे.

एक संस्कृत सुभाषित असें आहे कीं, "दारेषु किंचित् स्वजनेषु किंचित्" म्हणजे आपल्या मनांतलें सर्व पत्नीजवळ बोलूं नये, युक्तायुक्ताचा विचार करून जरूर व योग्य तितकेंच बोलावें! हा सुभाषितकार आजूबाजूचें जग

पाहून पतींना इषारा देत आहे, तो योग्यच आहे. कारण कोठल्याहि समाजांत पूर्ण प्रेमी, पूर्ण समरस, पूर्ण तादात्म्य पावलेलीं पतिपत्नींचीं उदाहरणें थोडींच आढळतात. पुष्कळ जोडप्यांत स्वभाव, शिक्षण व अनुभव या तिन्ही बाबतींत पति व पत्नी यांच्यामध्यें फरक असल्यामुळें वरील सल्ल्याप्रमाणें वागणेंच पतीला भाग पडतें. या सुभाषितावरूनच पतिपत्निप्रेमाच्या व्याख्येंत वाचिक समर्पण ऊर्फ भाषण-स्वातंत्र्य या शब्दयोजनेचें किती महत्त्व आहे हें दिसून येईल.

**मानसिक समर्पण** ऊर्फ बुद्धि-भावनांचें तादात्म्य : हा मुद्दा समजण्यास फारच गहन आहे. पतीचे जे विचार व ज्या भावना असतील त्याच पत्नीच्या असणें, पति जें जें बोलेल व जें जें करील तें तें पत्नीला मान्य, आणि उलट पत्नी बोलेल व करील तें पतीला मान्य असणें, इतका व्यापक अर्थ तर यांत आहे; पण यापेक्षांहि या समर्पणाची चिकित्सा निराळी आहे. अगदीं अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पतिनिष्ठा व पत्निनिष्ठा——म्हणजे पतीला पत्नीखेरीज इतर कोणतीहि अन्य स्त्री पत्निभावानें, आणि उलट पत्नीला पतीखेरीज इतर कोणीहि पुरुष पतिभावनेनें किंचित्कालहि ग्राह्य (प्रिफरेबल) वाटतां कामा नये; आणि ही एकनिष्ठा उभयतांची आमरण टिकली पाहिजे, तरच तें खरें पतिपत्निप्रेम होय. एकमेव अद्वितीयं। नान्यः पंथाः ।। याप्रमाणें एकमेकांची आवड एकनिष्ठ पाहिजे. पौराणिक वाङमयांत श्रीराम व सीता यांचें सदरहू मानसिक एकनिष्ठेचें सुप्रसिद्ध उदाहरण आहे. पांडवांची द्रौपदीहि या कसोटीला टिकली नाहीं, तिनें मनानें कर्णाला किंचित् काल वांछिलें होतें, व त्या प्रकारच्या पापाकरितांहि तिला अंतकालीं शिक्षा भोगावी लागली, असें महाभारतांत सांगितलें आहे. प्रेमाची व्याख्या व व वैवाहिक प्रेमाचा आदर्श हिंदु आर्य संस्कृतींत इतक्या प्राचीन काळापासून निश्चित व सुस्पष्ट झालेला आहे. याच बाबतींत सामान्य स्थिति कशी विपरीत असते, तें भर्तृहरीनें एका श्लोकांत अत्यंत मार्मिक पण अनुकंपनीय रीतीनें स्वतःविषयींच लिहिलें आहे. तो म्हणतो :

यां चिंतयामि सततं मयि सा विरक्ता। साप्यन्यमिच्छति . . . . . .
अस्मत्कृतेऽपि परितुष्यति काचित् अन्या। . . . . . .।।

याचा अर्थ स्पष्टच आहे. तो असा कीं, "भर्तृहरीला स्वपत्नी पसंत आहे पण तिला भर्तृहरि नापसंत असून ती मनानें निराळ्याच पुरुषावर आसक्त आहे; तर उलट पक्षीं भर्तृहरीवर खरें प्रेम करणारीहि अन्य स्त्री आहे." हें त्रांगडें फारच विचित्र दिसतें आणि प्रत्यक्ष जगांत असलीं नाममात्र दांपत्येंच पुष्कळ! याचा अर्थच हा कीं, पतिपत्निप्रेम व वैवाहिक निवड या बाबी अत्यंत अवघड आहेत. कालिदासानें,

समानयं तुल्यगुणं वधूवरं। चिरस्य वाच्यं न गतः प्रजापतिः ॥

असें वाक्य दुष्यंत-शकुंतला विवाहयोगाला अनुसरून लिहिलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. या पतिपत्निनिष्ठेच्या भावनेपेक्षांहि या मानसिक तादात्म्याची व्याप्ति अर्थातच पुष्कळ अधिक आहे.

पतिपत्नीला एकमेकांची प्रत्येक कृति व प्रत्येक उक्ति पसंत व मान्य व्हावयास पाहिजे. असलें तादात्म्य अशक्य आहे, असें कोणी म्हणेल; पण व्याख्या व आदर्श म्हणूनच केवळ हा मुद्दा मांडला आहे, असें मात्र नाहीं. अशा पतिपत्नीचें उदाहरण जगांत अशक्य खास नाहीं. आणि ध्येय व आदर्श डोळ्यांपुढें ठेवूनच वर्तन करावें म्हणजे इष्टसिद्धि थोडीबहुत तरी लाभते. आणि विवाह जमवतांना पुढील गोष्टी लक्षांत ठेवल्या तर हें प्रेम खात्रीनें लाभेल व अढळ टिकेलहि,

(१) स्वभावसाम्य, (२) संस्कृतिसाम्य, (३) शिक्षणसाम्य, व (४) ध्येयसाम्य. वैवाहिक प्रेमाचा अत्यंत पवित्र अमृतमय ठेवा असा संगम घडेल तेथें सांपडेल.

**स्वभावसाम्य:** स्वभाव हा (१) उपजत अनुवंशिक गुण, (२) शिक्षण, (३) परिस्थिति या त्रयीनें बनतो. विकासवाद त्याला पूर्णपणें लागू आहे. सामान्य सुखदुःखाचे नव्हे, तर सुखदुःखातिशयाचे, भयंकर संकटांचे, तसेंच परमोच्च सुखाचे अनुभवानें स्वभावाला मुरड बसते. शिक्षण, ज्ञानार्जन आमरण चालू राहिल्यास स्वभावाची जी घडण घडते, तिनें नराचा नारायण देखील होऊं शकतो. केवढें विलक्षण स्थित्यंतर, केवढी घडामोड, केवढा विकास!! आजपर्यंतच्या जागतिक समाजरचनेंत फक्त पुरुषांना

अनुभवजन्य व ज्ञानजन्य स्वभावविकासाची संधि मिळत असे, स्त्रियांना नसे; त्यामुळें खरें पतिपत्निप्रेम ही चीज दुर्मिळ होती. चालू जगांत व विशेषत: भावी जगांत पुरुषाबरोबरीनें स्त्रियांना शिक्षणाचा व द्रव्यार्जनविषयक उद्योगधंद्यांतील अनुभवांचा लाभ मिळून स्त्रीपुरुषांतील स्वभावसाम्य अधिकाधिक प्रमाणावर आढळणार आहे. प्रेमोद्भव पन्नास टक्के स्वभावसाम्यावर अवलंबून असतो, पंचवीसतीस टक्के संस्कृतिसाम्यावर आणि बाकी शिक्षणसाम्यानें परिपूर्ण होतो. म्हणून स्वभावसाम्य हें पतिपत्निप्रेमाचें वरीलपैकीं अत्यंत महत्त्वाचें अंग होय.

**शिक्षणसाम्य :** सक्तीचें प्राथमिक शिक्षण, धंदेशिक्षण, उच्च शिक्षण, वगैरे शिक्षणसोयी पुरुषाप्रमाणें स्त्रियांना लाभणार असलेमुळें पतिपत्निप्रेमाचा एक आधार शिक्षणसाम्य हा उत्तरोत्तर अधिक सुलभसाध्य होणार आहे. विवाहबद्ध होतांना मात्र डोळे उघडे ठेवून हें शिक्षणसाम्य आहे किंवा नाहीं हें पाहून विवाह झाले पाहिजेत.

**संस्कृतिसाम्य :** माणसाची संस्कृति देश, धर्म, जाति, सांपत्तिक स्थिति, ग्रामवास किंवा नगरवास, आणि शिक्षण अशा विविध साधनांवर अवलंबून असते. खेड्यांतला व्ही. एफ्. किंवा मॅट्रिक किंवा बी. ए. आणि शहरांतला व्ही. एफ., मॅट्रिक किंवा बी. ए. यांच्या चालीरीती ऊर्फ संस्कृति भिन्न असते. तसेंच दरिद्री मॅट्रिक आणि गर्भश्रीमंतींतला मॅट्रिक यांची संस्कृति व चालीरीती भिन्न असतात. फार काय पण हिंदुस्थानवासी बी. ए. हिंदु व इंग्लंडनिवासी वा अमेरिकानिवासी वा जर्मननिवासी बी. ए. हिंदु यांची संस्कृति भिन्न आढळते. संस्कृति अनेक कारणांनीं बदलते. नैसर्गिक किंवा कृत्रिम रंगांच्या जितक्या विविध छटा असूं शकतात, तितक्या संस्कृतिभिन्नत्वाच्या छटा माणसामाणसांत आढळतात. विवाहसंबंध कोणामध्यें व्हावा याबद्दल ययोरेव समं श्रुतं। यांतील इषारा फारच मार्मिक आहे. तात्पर्य, स्वभावसाम्य, कृतिसाम्य, शिक्षणसाम्य व ध्येयसाम्य, हें चतुर्विधसाम्य वधूवरांनीं साधलें पाहिजे, तरच अढळ पतिपत्निप्रेम लाभेल.

**ध्येयसाम्य :** या बाबतींत भर्तृहरीनें पुढील श्लोकांत केलेलें वर्गीकरण

हे तो सत्पुरुष स्वकार्य त्यजिती अन्यार्थ ही साधिती
हे तो मध्यम जे स्वकार्य करुनी अन्यार्थ संपादिती
हे तो राक्षस जे स्वकार्यविषयीं अन्यार्थ विध्वंसिती
जे का व्यर्थ परार्थ हानि करिती ते कोण कीं दुर्मती

फार मार्मिक आहे. मनुष्य वरील चारांपैकीं कोणत्या तरी एका हेतूनें प्रेरित होऊन आयुष्यभर वागत असतो, म्हणून वधूवरानें निवड करतांना स्वतःच्या ध्येयास अनुरूप असाच जोडीदार पाहावा, व ध्येयसाम्य साधावें.

**शिक्षणाची प्रगति :** ही वयाच्या अठरा वर्षेपर्यंत स्त्रीची आणि पंचवीस वर्षेपर्यंत पुरुषाची चालणार असा काल येत आहे; आणि स्वभावपुष्प विकसित होण्यास निदान आठरा वर्षें स्त्रीची व पंचवीस वर्षें पुरुषाची वयोमर्यादा झाली पाहिजे. म्हणून स्त्रीचें आठरा आणि पुरुषाचें पंचवीस वय होण्यापूर्वी विवाह उरकून घेणाऱ्या वधूवरांना परस्परांचें स्वभावज्ञान होणार तरी कसें! कारण स्वभावाला ठामपणा आलेलाच नसतो, व स्वभावपरीक्षण करण्याइतकी बुद्धीची प्रगल्भता झालेली नसते. तात्पर्य, शिक्षणाची समाप्ति होण्यापूर्वी व स्वभावाची प्रगल्भता होण्यापूर्वीं विवाहबद्ध होणाऱ्या तरुणतरुणींनीं आपल्या वैवाहिक प्रेमाचा पायाच कच्चा आहे, भुसभुशीत आहे व त्यामुळें अशा पोकळ पायावरील पतिपत्निप्रेमाची इमारत केव्हां ढासळेल याचा कांहीं नेम नाहीं, असें खुशाल समजावें. असले विवाह म्हणजे लॉटरींतलीं तिकिटेंच होत ! दहापांच जणांनाच सुदैवानें पतिपत्निप्रेमाचें बक्षीस मिळणार; बाकीचे हजारो हजार तिकिटवाले निराशेनें नशीबाला हात लावणार ! म्हणून मातापितरांनीं व पालकांनीं, आपल्या मुलामुलींच्या लग्नाची अशी सोडत करूं नये. त्यांना शिक्षण द्यावें, प्रौढ होऊं द्यावें, आणि वधूवरांचें स्वभाव-शिक्षण-संस्कृति-ध्येयसाम्य नीट पारखून त्यांना विवाहबद्ध करावें.

**सजातीय विवाह :** तथापि हा उपदेश व्यवहारांत आणणें कठिण आहे. पुरुष जन्मभर ज्या धंद्यांत पडणार असेल आणि श्रीमंती, मध्यम स्थिति किंवा गरिबी यांपैकीं ज्या स्थितींत त्याला राहावें लागणार असेल, त्या धंद्याशीं व त्या आर्थिक परिस्थितीशीं परिचित असलेली वधू त्यानें पसंत करावी; म्हणजे वधूवरांत साम्य राहून स्थिरस्थायी प्रेम

नांदूं शकेल, हें उघड आहे. म्हणून धंद्यानुरूप जातिभेद व जात्यंतर्गत विवाह आणि वंशपरंपरागत चालत आलेला धंदा मुलानें पत्करण्याची रूढि या हिंदु धर्मांतल्या तिन्ही गोष्टी विवाहसंस्थेस फार उपकारक आहेत. इतर बौद्ध, ख्रिस्ती, इस्लामी धर्मांत अशी जातवारी नसल्यामुळें वैवाहिक निवड करणें फार अवघड होत असलें पाहिजे. त्यांमुळेंच घटस्फोटाच्या कायद्याची आवश्यकता अशा सबगोलंकारी समाजांना अधिक भासते, आणि या घटस्फोटाच्या कायद्याचा अवलंब करणारीं दांपत्यें फार आढळतात. गेलीं तीनचार हजार वर्षें हिंदुसमाज घटस्फोटाच्या कायद्यावाचून तगला आहे; व त्याचें कारण जात्यंतर्गत विवाहसंबंध हें आहे, असें वाटतें. कारण हिंदुधर्मांतर्गत कोणत्याहि एका विशिष्ट जातींतील स्त्रीपुरुषांची संस्कृति समान असते; व त्यामुळें स्वभावसाम्य नसलें तरी सर्वसाधारण जनतेला आपापलें वैवाहिक जीवन नुसत्या संस्कृतिसाम्यामुळें सुद्धां बरें घालवितां येतें.

## प्रेमासंबंधीं कांहीं गैरसमज

प्रेमाची उत्पत्ति व स्थैर्य यांचें मुख्य कारण स्वभावसाम्य हें असेल तर प्रेमाविषयींचे दोन प्रचलित ग्रह चुकीचे ठरतात. पहिला समज किंवा ग्रह (love at first sight) **प्रथमदर्शनीं जडणारें प्रेम.**—स्त्रीपुरुषाची प्रथम दृष्टादृष्ट होतांच जें प्रेम उत्पन्न होतें, त्या प्रेमाला मोठें महत्त्व व उच्च स्थान कवीच्या राज्यांत दिलेलें आहे. दिव्य स्वर्गीय प्रेम याला म्हणतात! वास्तविक मनुष्यस्वभाव ही इतकी अवघड व गुंतागुंतीची बाब आहे कीं पहिली दृष्टिभेट होतांच पूर्ण स्वभावज्ञान होणें ही गोष्ट असंभाव्य, अशक्य आहे. म्हणून love at first sight हें प्रेम नसून केवळ प्रेमाभास किंवा बाह्य शरीरसौंदर्यादि गुणानुसार होणारें आकर्षण इतकाच त्याचा अर्थ आहे. असे प्रीतिविवाह पुढें परिचयवाढीनें चुकीचे ठरून स्वभावभेद लक्षांत आल्यावर घटस्फोटास कारण होतात. Love at first sight अशा प्रथमदर्शनीं प्रेमांत काकतालीय न्यायानें एकादें स्वभावसाम्याचें उदाहरण घडूं शकेल, म्हणजे प्रथमदर्शनीं प्रेमानें विवाहबद्ध झालेल्या जोडप्यांत स्वभावसाम्य असल्याचें नंतर आढळून येईल. पण हा अकल्पित योगायोग

म्हटला पाहिजे, तो खरा नियम नव्हे, म्हणून प्रथमदर्शनीं प्रेमाला ऊर्फ आकर्षणाला खरें प्रेम मानण्याची चूक कोणीं करूं नये.

दुसरा गैरसमज : **प्रेमभंग.**—प्रथमदर्शनीं प्रेम किंवा परिचयोत्तर प्रेम उत्पन्न झाल्यावर पुढें इतर कांहीं कारणानें विवाह अशक्य झाल्यास मनाला मोठा धक्का बसणें साहजिक आहे. पण अशा प्रेमभंगामुळें पूर्ण निराश हताश होऊन आत्महत्या केल्याचीं उदाहरणें घडतात, ही शोचनीय गोष्ट होय. वास्तविक मनुष्यस्वभावाचे सारखे सारखे नमुने पुष्कळ असतात, म्हणजे सारख्या सारख्या स्वभावाचे पुरुष व स्त्रिया अनेक असूं शकतात. म्हणून एके जागीं प्रेमभंग झाल्यास आत्महत्या न करतां प्रेम करण्यास योग्य म्हणजे स्वभावसाम्य असलेल्या दुसऱ्या स्त्रीची किंवा पुरुषाची निवड करणें शक्य आहे. म्हणून प्रेमभंगाला आजन्म अविवाहित राहणें किंवा आत्महत्या करणें हा मार्ग अत्यंत चुकीचा आहे, ही गोष्ट समजणें तरुण पिढीला फार हिताचें आहे.

**प्रेमाची स्थिरता:** प्रेमोत्तर विवाहवादी लोकांचा तिसरा एक रूढ समज असा आहे कीं, एकदां प्रेम जमलें म्हणजे तें चिरस्थायी असणारच, म्हणून विवाहबद्ध होणें निर्धोक आहे. पण ह्या प्रीतिविवाहपुरस्कर्त्यां देशांतच घटस्फोटांचें शेंकडा प्रमाण फार वाढत आहे, व त्यामुळें मोठमोठे प्रीतिविवाहाचे पुरस्कर्ते आश्चर्यचकित व भयचकित होत आहेत. पण खरी स्वभावपरीक्षा परस्परांना न होतांच बाह्य आकर्षणालाच प्रेम समजून विवाह होतात, म्हणून पुढें स्वभावभिन्नत्व आढळून आल्यावर घटस्फोटाचा आश्रय करावा लागतो. शिवाय प्रेमाला स्वभावसाम्य, संस्कृतिसाम्य, शिक्षण-साम्य, व ध्येयसाम्य असे चार आधार असल्यामुळें विवाहोत्तर पतिपत्निप्रेमांत पुष्कळ फेरबदल होण्याचा संभव असतो. कारण पंचविशीचे सुमारास विवाह करणाऱ्या तरुणाचें पुढें अधिक शिक्षण होतें, शिक्षणाबरोबर आचार-विचारादि संस्कृति बदलते, आणि विशेषतः नोकरीधंदा करावयास लागल्या-नंतर केवळ द्रव्यप्राप्तीखेरीज सार्वजनिक कार्य देशभक्ति, स्वार्थत्याग, वगैरे ध्येयहि बदलत जातें. उलट पक्षीं त्याची पत्नी तिचा शिक्षणक्रम बंद पडून आचारविचार व जीवित कार्य या बाबतींत मागसलेल्या स्थितींत राहते.

तिच्या शिक्षणांत, मतांत किंवा ध्येयांत फरक कांहींच होत नाहीं. या सर्वांचा परिणाम प्रेमाकर्षणांत सहजच होतो. विवाहाचे वेळीं शिक्षण, संस्कृति व ध्येय यांत साम्य असलेलीं वधूवरेंहि पुढें कालक्रमानें पतीची अनेक रीतींनीं प्रगति झाल्यामुळें प्रेमसंबंधांत दुरावूं लागतात. यावरून प्रेम ही चिरस्थायी भावना नसते व ती कां नसते, या दोन्ही गोष्टी समजून येतील. म्हणून प्रेमाचे चिरस्थायीत्वाबद्दल भलताच गैरसमज करून न घेतां आरंभीच्या प्रेमी पतिपत्नींनीं उभयतांमधील वर उल्लेखिलेलें चतुर्विध साम्य आमरण कायम राहील, असा प्रयत्न केला पाहिजे, तरच त्यांना चिरस्थायी प्रेमाची देणगी लाभेल. स्त्रीशिक्षणवाढीच्या या काळांत पुरुषांवरहि ही जबाबदारी पडणार आहे, कारण कॉलेजशिक्षण घेतलेल्या स्त्रियाहि विवाहोत्तर स्वतःचें शिक्षण, संस्कृति व ध्येयविषयक लायकी वाढवून स्वतःचे पतीला मागें टाकतील, पूर्वप्रेमांत बिघाड करतील व घटस्फोट, पुनर्विवाहादि मार्गांचा अवलंब करतील. हा धोका आतां यापुढें उभय पक्षीं आहे. तात्पर्य, प्रत्येक दांपत्यानें प्रेमभावना आमरण टिकविण्याची अत्यंत खबरदारी घेतली पाहिजे.

## इंग्रजी वचनें

"Love is really not one emotion but a complex of innumerable feelings, which projected by one individual on to another, lead to the desire for spiritual or (and) emotional union."

"Don't let us part again, never. It is I who am asking you. Let us live together, I cannot say anything else. It is everything to live together. Is it love ? I don't know, but I know we must live together."

"Love is the most powerful factor in human life. It often makes fools of wise men and even arouses sleeping talents in those of inferior mentality. Mediocre men have become great personalities through the influence of love of a woman."

—*Macfadden*

"Much will depend upon how he comes to know what love really is; I mean on the sort of woman who will teach it to him. If he learns it from a good woman, then it will be all right. But suppose he learns it from a bad woman, as so many men do, especially poetic men who imagine all women are angels !! Suppose he only discovers the value of love when he has thrown it away and degraded himself in his ignorance. Will he forgive ?"

—*Bernard Shaw*

"There is no love without lust."

"Love comforteth like sunshine after rain,
But lust's effect is tempest after sun;
Love's gentle spring doth always fresh remain,
Lust's winter comes ere summer half be done."

—*Shakespeare*

"Love is a spiritual coupling of two souls. So much more excellent, as it least relates unto the body."

—*Bain Johnson*

## प्रकरण सहावें

# विवाह व हिंदुधर्मशास्त्र

"......पत्नी म्हणजे मानवजातीच्या संगोपनासाठीं मातृत्वाच्या दिव्यांत, आपल्या तारुण्याची व सौंदर्याची आहुती टाकण्यास सदैव सिद्ध असलेली तपस्विनी."
—प्रि० अत्रेकृत 'लग्नाची बेडी'

**विवाह:** मानवी समाजाच्या धारणेला ज्या आवश्यक संस्था आहेत त्यांमध्यें विवाह ही सर्वांत प्रमुख संस्था होय. स्त्रीपुरुषांमध्यें कायदेशीर प्रकारानें पतिपत्नीचें नातें निर्माण करून त्यांच्यामधील शारीरिक, धार्मिक व नैतिक संबंध निश्चित करणारी पद्धति म्हणजे विवाह होय, अशी विवाहाची स्थूलपणें व्याख्या करितां येईल. विवाहाचे प्रधान उद्देश म्हणजे (१) स्त्री-पुरुषांमधील शारीरिक संबंध नियमित करणें, व (२) प्रजोत्पादन हे होत. पहिल्या उद्देशानें समाजामध्यें घोटाळा माजत नाहीं, तर दुसऱ्यामुळें समाजाचा प्रवाह अखंड रीतीनें वाहतो. हे दोन्ही उद्देश सारखेच महत्त्वाचे आहेत. विवाहाचा कुटुंबपद्धतीशीं अत्यंत निकट संबंध आहे. किंबहुना विवाह हा कुटुंब संस्थेचा पाया होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. याहि पुढें जाऊन व्यापक दृष्टीनें विचार केल्यास संघ, जात, अगर अशाच प्रकारचे लोकसमूह यांच्याहि बुडाशीं विवाहसंस्थाच असल्याचें आढळून येतें.

विवाहसंस्थेच्या इतिहासाच्या स्थूल मानानें तीन अवस्था दृष्टीस पडतात. पहिल्या अवस्थेंत स्त्री-पुरुषसंबंध हा केवळ शारीरिक असून तो नियमबद्ध नव्हता. यासंबंधीं समाजशास्त्रज्ञांमध्यें बराच मतभेद दृष्टीस पडतो. दुसऱ्या अवस्थेमध्यें विवाह नियमबद्ध होऊन पुरुषाचा बायकोवर पूर्ण ताबा प्रस्थापित झाला. तिसऱ्या शेवटच्या अवस्थेमध्यें पतिपत्नीचा सामाजिक दर्जा समान मानण्यांत येऊं लागला.

प्राचीन काळीं म्हणजे विवाहसंस्थेच्या पहिल्या अवस्थेंत स्त्री-पुरुषांमधील शरीरसंबंध हा अनिर्बंध होता, असें मॅकलेनन, मॉर्गन, बाचोफेन, लबॉक,

इत्यादिकांचें म्हणणें आहे. या अनिर्बंध शरीरासंबंधापासून, समाजाच्या सुधारणेबरोबर हल्लींच्या एकपत्नित्वाची अगर निश्चित शरीरसंबंधाची कल्पना विकास पावली आहे, असें यांचें म्हणणें आहे. यांच्या मतें कुटुंबसंस्था बरीच मागाहूनची आहे. या मॉर्गनप्रभृति समाजशास्त्रज्ञांचें हें मत अलीकडील शास्त्रज्ञांनीं सप्रमाण रीतीनें खोडून काढलें आहे. शास्त्रज्ञांमध्यें मेन, स्पेन्सर, डार्विन, पिशले, स्टार्के, लेनोनो, व वेस्टमार्क हे प्रमुख होत. मेनच्या मतें प्राचीन काळीं प्रत्येक पुरुषाला जरी अनेक बायका असत तरी वाटेल तो पुरुष वाटेल त्या बाईशीं शरीरसंबंध ठेवीत असे, हें म्हणणें निर्मूलक आहे. याउलट पुरुष हा आपल्या बायकांचा परपुरुषाशीं संबंध होऊं नये, यासाठीं फार काळजी घेत असे. वेस्टमार्कनें यासंबंधीं खोल विचार करून आपलें मत प्रतिपादन केलें आहे. त्याचें म्हणणें असें कीं, अगदीं प्राचीन काळींदेखील कुटुंबपद्धति अस्तित्वांत होती. वरिष्ठ प्राण्यामध्येंहि अशाच प्रकारची कुटुंबपद्धति आढळते.

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें विवाह हा संस्कार आहे. तो यथाविधि झाला पाहिजे. कन्यादान, लाजाहोम व सप्तपदी हे विधी मुख्य आहेत. हे झाले कीं, वधूवराचें पतिपत्नीचें नातें सुरू होतें व तें आमरण कायम राहतें. केवळ विषयोपभोग हाच लग्नाचा प्रधान हेतु मानला नाहीं. धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि । अशी पति पत्नीबरोबर शपथ क्रिया करतो.

भारतीयांच्या विवाहाचे अनेक प्रकार असत. त्यांपैकीं दैव, आर्ष, प्राजापत्य, गांधर्व, राक्षस व पैशाच हे बंद होऊन फक्त ब्राह्म व असूर हे दोनच प्रकार प्रचारांत राहिले आहेत.

पिता पितामहा भ्राता सकुल्यो जननी तथा ।
कन्याप्रदः पूर्वनाशे प्रकृतिस्थः परःपरः ॥

मुलीचें वराशीं लग्न करून देणें हें पिता, पितामह, भ्राता, पित्याच्या कुळांतील सकुल्य व माता यांचें कर्तव्य आहे. मुलीचें कन्यादान करण्याचा यांना अधिकार आहे परंतु यांच्या संमतीशिवाय लग्न योग्य प्रकारें होऊन तें योग्य असलें तर त्यांस वर लिहिलेल्या माणसांची संमति नाहीं किंवा पालकाची नाहीं, या कारणानें तें रद्द होत नाहीं; अशा प्रकारच्या आज्ञा व अधिकार

हे शिफारशीच्या स्वरूपाचे असतात, असें ठरविलें आहे. व त्यास 'फॅक्टम व्हॅलेट' चें तत्त्व लावतात. म्हणजे जें झालें तें बरेंच झालें, असें मानून तें तें सशास्त्र मानतात.

वधूवरें हीं एकाच जातीचीं जातीच्या आंत व कुटुंबाच्या बाहेर असलीं पाहिजेत. पोटजाति म्हणजे देशस्थ व कोंकणस्थ यांचीं लग्नें सशास्त्र आहेत. दोन्ही ब्राह्मणच आहेत. एकाच गोत्रांतील व प्रवरांतील वधूवरांचीं लग्नें सशास्त्र मानलीं जात नाहींत. हा नियम शूद्रास लागू नाहीं. हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें नवराबायकोस सोडचिठी देतां येत नाहीं. परंतु कांहीं जातींत योग्य कारणाकरितां नवऱ्यानें बायकोस फारकत देण्याची चाल आहे. फारकत दिल्यावर त्या स्त्रीस पहिल्या नवऱ्याच्या हयातींत पुर्नविवाह करतां येतो, व तो सशास्त्र मानतात. विवाह झाल्यापासून स्त्रीनें नवऱ्याजवळ राहिलें पाहिजे. परंतु वयांत येईपर्यंत तिनें माहेरींच राहावें अशी जातीची चाल असल्यास तोंपर्यंत मुलगी माहेरीं राहाते. मुंबई इलाख्यांत निदान खालच्या जातींत विधवा स्त्रीनें दुसरें लग्न करण्याची चाल असल्याचें दिसून येतें.

नवरा नपुंसक असला, पति-पत्नीचा निरंतर कलह होत असला, लग्न सशास्त्र रीतीनें झालेलें नसलें, नवऱ्यानें बायकोच्या संमतीनें तिचें मंगलसूत्र तोडून टाकलें, व तिला लेखी सोडचिठी दिली, किंवा नवरा देशांतरास गेला, व तो बारा वर्षांत परत आला नाहीं, किंवा त्यानें बायकोस खबर दिली नाहीं तर त्या स्त्रीनें तिचा नवरा जिवंत असतां वाटेल तर दुसरा नवरा करावा, अशाबद्दल पुढील स्मृतिवचनें आहेत :

उन्मत्तः पतितः कुष्टी षंढश्च सगोत्रजः ।
चक्षुःश्रोत्रविहीनश्च तथाऽपस्मारदूषितः ।
सतु यदन्यजातीयः पतितः क्लीब एव वा ।
ऊढापि देयाऽन्यस्मै सा सप्रावरणभूषणा ।।

"......विवाहाचे अनेक निंद मानलेले प्रकार बंद झाले आहेत. एकपति व एकपत्निव्रत हेंच वंद्य मानलें जात आहे. एका पुरुषानें अनेक बायका करणें हें निंद्य समजलें जातें. बालविवाह कमी कमी होत आहेत. तरुणी जरठ विवाहाची थट्टा होत आहे. हुंडा घेण्याची चाल, व

लग्न जमवून देण्याकरतां दलाली या सर्व गोष्टी आतां गर्हणीय मानल्या जात असून विधवा पुनर्विवाह जास्त जास्त होत आहेत. व 'वुइडो मॅरेज अॅक्ट' करून सरकारनें विधवांचा पुनर्विवाह कायद्यानें ठरविला आहे. भिन्न वर्णांच्या वधूवरांचीं लग्नें सशास्त्र करण्याची खटपट चालू आहे. याप्रमाणें ऋषींचीं वचनें व पाश्चात्य विवाहसंबंधीं कल्पना यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न चालू आहे. स्त्रियांचें पातिव्रत्य व पुरुषांचें एकपत्निव्रत हाच पवित्र विवाह धर्म हिंदु समाजांत संमत आहे. याविरुद्ध वर्तन करणें हें धर्माविरुद्ध आहे, असा हल्लींच्या काळीं समज आहे. परस्त्रीगमन व परपुरुषसंग यांची महापापांत गणना केली आहे. पूर्वी एकवर्णाच्या किंवा समानवर्णाच्या स्त्रीपुरुषांचा विवाह हा श्रेष्ठ प्रकार समजला जात असे. परंतु उच्च वर्णाच्या पुरुषास क्रमानें खालच्या वर्णाच्या स्त्रीशीं विवाह करण्यास शास्त्राची परवानगी असे. हल्लीं वधूवरें एका जातीचीं असलीं पाहिजेत, असा निर्बंध झाला आहे. व तोच कायदा समजला जातो......"

(एकवर्ण म्हणजे एक जात नव्हे.)—महाराष्ट्रीय ज्ञानकोश

# प्रकरण सातवें
# नूतन विवाहितांस सूचना

It is never easy to *make marriage a lovely thing*; and it is an achievement beyond the powers of the selfish, or the mentally cowardly.

मागील एकंदर प्रकरणांत केलेल्या विवेचनानुसार ज्यांचा विवाह झाला, असा पति सव्वीससत्तावीस वर्षांचा व सुशिक्षित, आणि पत्नी एकूणवीसवीस वर्षांची व निदान व्ह. फा. व इंग्रजी तीनचार इयत्तांपर्यंत शिकलेली असल्यास तो सामान्यतः योग्य विवाह होय, कारण विवाहोत्तर उभयतां पतिपत्नीला जें सुख लाभावें अशी अपेक्षा असते, त्याला जरूर ती परिस्थिति अशा विवाहांत आहे, हें या प्रकरणावरून दिसून येईल.

गृहस्थाश्रमांत पदार्पण करतांच नूतन पतिपत्नीला, (१) साहचर्य ऊर्फ मैत्रीसुख, (२) आहारसुख, (३) विहार ऊर्फ संभोगसुख, (४) अपत्यसुख हीं चार सुखें प्राप्त व्हावयास पाहिजेत, व त्याकरितां विवाहोत्तर आचरणांत आणावयाच्या सूचनांचा विचार या प्रकरणांत करणें आहे. हिंदु पद्धतीप्रमाणें विवाहसमारंभ साधारण मध्यम वर्गांतहि तीनचार दिवस मोठ्या गडबडीचा व लग्नाकरतां जमलेल्या मंडळीमुळें घरांत मोठ्या गर्दीचा असतो. अशा गर्दींत व गडबडींतहि वर दिल्याप्रमाणें असलेली सुशिक्षित पतिपत्नी एकमेकां-बरोबर न लाजतां पण मर्यादशीलपणानें इतरांच्या देखतहि बोलूं लागतात व तसें बोलावें, यांत कांहींच वावगें नाहीं. साहचर्य ऊर्फ मैत्रीसुखाला येथूनच आरंभ व्हावयास पाहिजे. अशा वेळीं बोलण्याला विषय चालूं असलेल्या विवाहसमारंभांतील बहुविध विधी व चालीरीती यांमध्यें पुष्कळच असतात, व थट्टाविनोदहि शिष्टसंमत पुष्कळ करतां येण्याजोगा असतो. पुढें समारंभ आटोपल्यावर लगेच परत माहेरीं आईबापांकडे जाण्याचा रिवाज हिंदु समा-जांत आहे, व तत्काल होणारा हा वियोग पुनर्मीलनाचें औत्सुक्य वाढविण्यास फार उपयोगीं पडतो. हल्लीं प्रौढविवाहांत विवाहविधि व गर्भाधानविधि एकांत

एक करण्यांत येतात; पण हे दोन विधी एकदोन महिन्यांच्या अंतरानें व पृथक् व्हावे, हेंच नूतन वधूवरांच्या मनःस्वास्थ्याच्या व परिचयाच्या दृष्टीनें योग्य होय. परिचय वाढण्यास पहिल्या वियोगाचे वेळीं वधूवरामध्यें होणारा पत्रव्यवहार हेंहि उत्तम साधन होय. आणि असा पत्रव्यवहार खुद्द पत्नीबरोबर सुरू होतोच. या बाबतींत अलीकडील प्रौढ विवाहांतल्या तरुणतरुणींत कशी विचारक्रांति होत आहे तें प्रो. घुर्ये यांनीं मिळविलेल्या माहितीवरून दिसून येईल. त्यांना मिळालेली माहिती येणेंप्रमाणें :

## Honeymoon

"Going on a honeymoon trip after marriage is not a Hindu practice but an idea that is latterly presented to us through the medium of English literature. It is interesting to observe that in married people, normally resident in Bombay, there is some tendency to go on a honeymoon trip. 119 persons supplied information regarding honeymoon out of whom 34 went on a honeymoon trip and the rest did not. That this small number of honeymoon goers does indicate a tendency is made clear by the fact that the educational status of the couple is more or less similar to that of the whole sample. Three husbands have not given their educational attainments, 7 are non-matric, 10 are matriculates, 4 undergraduates and the rest graduates or holders of post graduate degrees. Details about education are not available about 2 wives. Of the remaining 32, one has no education, 11 only upto vernacular fourth standard, 4 vernacular final, 6 some English education below matriculation standard, 2 matriculates, 4 undergraduates, 3 graduates and 1 M. A."

वरील माहितीवरून शहरांत राहणाऱ्या सुशिक्षित पतिपत्नींत विवाहोत्तर 'हनीमून' सफरीस जाण्याची प्रवृत्ति वाढत आहे, असें दिसतें. पण याचें कारण, इतरत्र दर्शविल्याप्रमाणें बिऱ्हाडाच्या अपुऱ्या जागेमुळें आणि कुटुंबांत

असणाऱ्या इतर वडीलधाऱ्या माणसांमुळें उत्पन्न होणारा संकोच, आणि सुशिक्षित प्रौढ नूतन विवाहित पतिपत्नींना आवश्यक वाटणारा सहवास मिळण्यास होणारी जागेची अडचण हेंच असावें, असें वाटतें.

नूतन विवाहितांच्या परिचयाच्या दृष्टीनें शहरांतील भाडोत्री जागा किंवा खेडेगांवांतील गृहरचना अगदीं गैरसोयीची असते. कारण घरांत बहुधा चारदोन वडीलधारीं माणसें असतात, आणि अशा कुटुंबांत नूतन पति-पत्नीस निःसंकोचपणें बोलण्यासवरण्यास स्वतंत्र सोय नसते; त्यामुळें दिवसाचे बारा तासांत नूतन विवाहितांना एकत्र भेटण्याबोलण्यास संधि मिळत नाहीं, ही मोठी गैरसोय होय. म्हणून शहरांत निदान तीन खोल्यांचे ब्लॉक्स, व खेड्यांत दुमजली घरें असावींत म्हणजे स्वतंत्र सोय होते. पुढील सुभाषितांतहि हीच सूचना अत्यंत मार्मिकपणें गोविली आहे.

जये धरित्र्याः पुरमेव सारं। पुरे गृहं सद्मनि चैकदेशः ॥
तत्रापि शय्या शयने वरास्त्री। रत्नोज्वला राज्यसुखस्य सारं ॥

## आहारसौख्य

दैनंदिन कार्यक्रमांत तीनचार वेळा खाण्यापिण्याच्या असतात. नूतन पत्नीनें पाकशास्त्रांत प्रावीण्य दाखवून "भोज्येषु माता" म्हणजे खाण्या-पिण्याचे बाबतींत पतीबद्दल दररोज अगदीं मातेसमान आस्था व काळजी घेतली पाहिजे; ती इतकी कीं, बाहेर व्यवसायांत मग्न असल्यास पतीला खाण्यापिण्याची वेळ होतांच घराकडील ओढ लागली पाहिजे, आणि हल्लींच्या हॉटेले-रेस्टॉरंटांच्या समृद्धीच्या काळांतहि हॉटेलापेक्षां स्वगृहीं स्वस्त्रीच्या हातचें व स्वस्त्रीसह खाण्यापिण्यांतच पतीला अधिक सौख्य वाटलें पाहिजे. या बाबतींत इतकें लिहिण्याचें कारण हेंच कीं, हल्लीं हॉटेलांची संख्या शहरांत व खेड्यांतहि इतकी बेसुमार वाढत आहे कीं, त्यावरून हें आहारसौख्य शेंकडा ७०।८० पुरुषांना घरीं लाभत नाहीं, आणि म्हणून ते सकाळच्या चहापासून दररोज दोनतीन वेळां हॉटेलांतील पदार्थांकडे आकर्षित होऊन घराबाहेर आपली क्षुधा शांत करतात. याचा पुष्कळसा दोष अडाणी म्हणजे पाकशास्त्रांत अनभिज्ञ बायकांकडे आहे, असें वाटतें. वास्तविक घरीं स्वस्त्री

रुचकर पदार्थ हवे तसे करणारी व न त्रासतां हंसत मुखानें करून वाढणारी असेल तर हॉटेलच्या पुरुषी, भाडोत्री, व बहुधा सबगोलंकारी वातावरणांत बसून खाणेपिणें कोणाहि सदभिरुचीच्या गृहस्थाला आवडणार नाहीं. हॉटेलांची संख्या कमी होणें हेंच अधिकाधिक गृहसौख्याचें निदर्शक मानण्यास हरकत नाहीं. पतीला हॉटेलांत जाण्याची कधींच आवड वाटत नसेल तर विवाहित स्त्रीला पाकशास्त्रनैपुण्याचें तें एक उत्तम सर्टिफिकीटच होय.

## विहारसौख्य

स्त्री-पुरुषसंबंधापासून होणारे सुखाचा व तदनुषंगिक सुखाचा यांत अन्तर्भाव होतो. या विषयाची विशेष माहिती विवाहोन्मुख व विवाहित स्त्री-पुरुषांना असणें जरूर आहे. विद्यार्थिदशेंत या माहितीची जरूरी अर्थातच नाहीं. पण या मताविरुद्ध कित्येक तज्ज्ञ, पाश्चात्य शास्त्रज्ञ ही माहिती हळूहळू मुलांमुलींची जिज्ञासा वाढूं लागतांच द्यावी असें म्हणतात. हाहि मोठा मतभेदाचा मुद्दा आहे. शिवाय हा विषय विशेष सविस्तर लिहिण्यासारखा नसून एका सुभाषितांत म्हटल्याप्रमाणें, "लीलावतीनां सहजा विलासाः॥" हेंच खरें आहे. तथापि याबद्दल अधिक विवेचन दुसऱ्या भागांत येईल.

## अपत्यसौख्य

विवाहाचे (१) स्त्रीसौख्य, व (२) अपत्यसौख्य हे दोन हेतू असून हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" या आशीर्वादामध्यें हीं दोन्ही सुखें अभिप्रेत असतात, म्हणजे प्रत्येक स्त्रीला आठ पुत्र व्हावे आणि अर्थात् ती दीर्घायुषी व्हावी व त्या दीर्घायुष्यांत तिला भरपूर संभोगसुख व तन्मूलक अपत्यधारणा निदान आठ वेळां व्हावी असा आशीर्वाद देण्याचा प्रघात आहे व वस्तुस्थिति जुन्या जमान्यांत अशी बहुतेक आढळतेहि. शेंकडा ७५।८० स्त्रियाना आठ किंवा त्यांहूनहि अधिक अपत्यें होतात व त्या स्त्रिया पन्नाशी साठी उलटेपर्यंत जगतातहि. अर्थात् असें दांपत्य व्यावहारिक दृष्ट्या सुखी आहे, असें आपण म्हणतों. पण जरा सूक्ष्म विचार केल्यास खरोखर सुखप्राप्ति अशा पतिपत्नीला कितपत होत असेल हा प्रश्नच आहे ! कारण अपत्यो-

त्पादनाला सुरुवात जुन्या विवाहपद्धतींत स्त्रीच्या पंधरासोळाव्या वर्षींच होते, गर्भाधानसंस्कारानंतर वर्षसहा महिन्यांत गर्भारपण येतें, आणि तेव्हांपासून त्या स्त्रीच्या चाळीसपंचेचाळीस वर्षें वयापर्यंत गर्भारपण आणि बाळंतपण या दोन अवस्था दीडदोन वर्षांच्या अंतरानें लागोपाठ सुरू होतात; आणि गर्भाधानविधीनंतर चारपांच वर्षांतच दोनतीन लहान मुलांचें लटांबर स्त्रीच्या गळ्यांत पडतें. या अपत्यसंगोपनाच्या भाराखालीं स्त्री शारीरिक दृष्ट्या व मानसिक दृष्ट्या इतकी खालावून जाते कीं, तिचें शरीर अस्थिचर्मवत् बनून स्वभाव त्रासिक, रागीट व चिडका बनतो; किरकोळ आजारीपण तर वरचेवर येतेंच, पण मोठालीं दुखणींहि काढावीं लागतात. अशा स्त्रीच्या पतीलाहि स्वस्त्रीच्या व अपत्यांच्या दुखण्याची उस्तवारी करतांना व औषधांचीं व डॉक्टर-वैद्यांचीं बिलें भरतांना आर्थिक व मानसिक यातना सोसाव्या लागतात. गर्भारपणांतले, बाळंतपणांतले आणि आजारपणांतले दिवस जमेस धरल्यास, किंवा स्त्रीला प्रत्यक्ष आजारीपण फारसें आलें नाहीं तरी गर्भारपण व बाळंतपण, पुन:पुन्हा गर्भारपण बाळंतपण यांत स्त्रीसुखाव्यतिरिक्त व्यतीत करावा लागणारा दीर्घ काल लक्षांत घेतां दहाबारा प्रसूत्या झालेल्या स्त्रीपासून स्त्रीसुख तिच्या पतीला खरोखर किती दिवस मिळालें असेल याचा हिशोब सहज कळेल.

### संततिनियमन

तात्पर्य, अशा अपत्यचक्रांत सांपडलेल्या पुरुषाला स्त्रीसौख्यहि मिळत नाहीं व अपत्यसौख्यहि मिळत नाहीं. मुलेंमुली पुष्कळ असल्या म्हणजे त्या बापाला अपत्यसौख्य लाभलें, असें म्हणणें ही मनाची केवळ दिशाभूल आहे. कारण मुलें लागोपाठ पुष्कळ झालीं म्हणजे तीं बहुधा निरोगी व गुटगुटीत असत नाहीत; त्यामुळें स्वत:चीं तीं अस्थिपंजर मुलें सांजसकाळ अवलोकन करण्यांत साधें दृष्टिसौख्यहि बिचाऱ्या बापाला लाभत नाहीं! आणि मध्यम व गरीब स्थितींतल्या बापाला आपल्या डझन पाऊणडझन मुलांना रोज पोटभर अन्न व अंगभर वस्त्र पुरविणें अशक्य होऊन त्याला आर्थिक दु:स्थितीमुळें निमूटपणें मानसिक यातना सतत सोसाव्या लागतात! अशा स्थितींत पुष्कळ मुलें असणाऱ्या दांपत्याला अपत्यसौख्य लाभलें, असें म्हणणें

ही केवळ आत्मवंचना होय. याचा प्रत्येक विवाहित स्त्री-पुरुषानें विचार करावा. उलट पक्षीं घरची सुखवस्तु वा श्रीमंत स्थिति असल्यास दुसरीच घटना ऊर्फ आपत्ति ओढवते. तिला पूर्वपरंपरेंत मात्र आपत्ति समजत नसत कारण अंगवस्त्र ठेवण्याची प्रथा सुखवस्तु हिंदु कुटुंबांत गेल्या पिढीपर्यंत बरीच रूढ होती, इतकेंच नव्हे तर, ती प्रथा समाजमान्य होती, म्हणजे उपस्त्री ठेवणारा गृहस्थ समाजांत हीन दर्जाचा अप्रतिष्ठित ठरत नसे ! पण नवनीतिवाद्यांतील अनिर्बंध स्त्रीपुरुषांचे पुरस्कर्ते समाजस्वास्थ्यदृष्टचा जितके गर्हणीय तितकेंच उपस्त्रीरूढीवादी जुन्या जमान्यांतील गृहस्थहि तिरस्करणीय होत. पाश्चात्य शास्त्रीय शोधांनीं व लैंगिक वाङमय लेखकांनीं या बाबतींत अखिल मानवजातीला सन्मार्ग दाखविला आहे, यांत शंका नाहीं. वैवाहिक जीवनांतील वर वर्णिलेल्या अनेकविध आधिव्याधींवर उपाय संततिनियमन हा होय. खरें स्त्रीसुख व अपत्यसुख मिळण्याकरतां या मार्गाचा प्रत्येक दांपत्यानें अवश्य अवलंब करावा आणि वैवाहिक जीवनाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणें आखावा व प्रौढ सुशिक्षित पतिपत्नींनीं इतरांना उदाहरण घालून द्यावें.—

(१) विवाहानंतर संततिनियमनाचे साधनांचा उपयोग पहिलीं तीनचार वर्षें करावा. (२) पुढेंहि अपत्योत्पादनाला सुरुवात झाल्यावर प्रत्येक दोन अपत्यांमध्यें तीनचार वर्षांचें अंतर असावें. (३) स्त्रियांचा खरा प्रौढ विवाह झाल्यास वरील दोन नियमांप्रमाणें स्त्रीच्या तेवीसचोविसाव्या वर्षीं अपत्योत्पादनाला सुरुवात होऊन ऋतुनिवृत्ति कालापर्यंत म्हणजे पंचेचाळीस वर्षें वयापर्यंत चारपांचच मुलें होतील, व खरें सुख प्राप्त होईल.

## सुभाषितें

एषा हि प्रकृति. स्त्रीणामासृष्टे रघुनंदन।
समस्थमनुरज्यन्ते विषमस्थं त्यजन्ति च ॥
—आगस्त्यमुनि रामाला म्हणतात ३।१३।५

सर्वाश्रिमानुपादाय स्वाश्रमेण कलत्रवान्।
व्यसनार्णवमत्येति जलयानैर्यथार्णवं। भागवत ३।१४।१७

अरक्षिता गृहे रुद्धाः पुरुषैराप्तकारिभिः।
आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ताः सुरक्षिताः। मनु० ९।१२

नैता रूपं परीक्षन्ते नासां वयसि संस्थितिः।
सुरूपं वा विरूपं वा पुमानित्येव भुञ्जते। मनु० ९।१४

# प्रकरण आठवें

# सुशिक्षितांची जबाबदारी

"It must be remembered all through that I am speaking primarily of our educated class."

—*Dr. Marie. C. Stopes*

हिंदु समाजाचा ब्रिटिश अमदानीपर्यंतचा काल असा गेला कीं, अफाट हिंदु समाजाच्या मानानें उच्च शिक्षण घेणारा वर्ग अल्प असे. स्त्रीजातींत उच्च शिक्षण घेणारांची संख्या त्याहून अल्प होती. ऋषितर्पणांत येणाऱ्या मैत्रेयी, गार्गी, वडवाप्रातिथेयी, वगैरे स्त्रिया ब्रह्मजिज्ञासु विदुषी असून त्यांची परंपरा अल्प प्रमाणांत मंडनमिश्र-शंकराचार्य यांचा वादनिर्णय करणारी सरस्वती आणि ज्योतिष-गणितशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांची सुविद्य कन्या लीलावती यांच्यापर्यंत चालली. चौथ्या शतकांत झालेल्या वात्सायनकृत 'कामसूत्र' या ग्रंथांत गृहिणीला प्रपंचांतील कोणत्या गोष्टींचें ज्ञान आवश्यक आहे तें या खालील सूत्रांत विस्तारानें सांगितलें आहे :

भोजनावशिष्टाद्गोरसात् घृतकरणम् तथा तैलगुडयोः। कार्पासस्य च सूतकर्तनम् सूत्रस्य वातम्। शिक्यरज्जुपाशवल्कलसंग्रहणम्। कुट्टनकंडनावेक्षणम्। आचाममण्डतुषकणकुटचंगाराणामुपयोजनम्। भृत्यवेतनभरणज्ञानम्। कृषिपशुपालनचिन्तावाहनविधानयोगाः। मेषकुक्कुटलावकशुकसारिकापरभृतमयूरवानरमृगाणामवेक्षणम्। दैवसिकायव्ययपिण्डीकरणमिति च विद्यात् ॥ ३२ ॥

——वात्स्यायनकृत कामसूत्र 'भार्याधिकारिक'

**अर्थ :** खालील गोष्टींचें ज्ञान गृहिणीस असावें.——(१) सर्व मनुष्यांचीं भोजनें होऊन जो अवशिष्ट गोरस राहील त्यापासून लोणी काढून तूप करणें, (२) मोहरीचें तेल काढणें, (३) ऊंस गाळून गूळ तयार करणें, (४) कापसाचें सूत काढणें व त्यापासून वस्त्रें तयार करणें, (५) शिंकीं,

दोऱ्या, दावीं, वल्कलें यांचा संग्रह करणें, (६) धान्याला घाव घालणें व तांदूळ कांडणें, (७) कांजी, मंढ, कोंडा, कण्या, कूट व कोळसे यांचा उपयोग करणें, (८) चाकरांच्या वेतनासंबंधीं माहिती, (९) शेतकी, पशुपालन व वाहनें (मेणा-पालखी, वगैरे) यांचें ज्ञान, (१०) मेंढा, कोंबडा, लावा, पोपट, सारिका, कोकिळ, मोर, वानर, हरिण इत्यादिकांची परीक्षा. (११) दररोजचा जमाखर्च लिहिण्याची माहिती.

ही यादी विशिष्ट जातीला उद्देशून दिलेली नसून एकंदर हिंदु स्त्री-समाजाच्या ज्ञानाचें दिग्दर्शन करणारी आहे, असें दिसतें.

## वैदिक काळांतील विदुषी

फार दूरच्या म्हणजे चारपांच हजार वर्षे पूर्वीच्या काळांत भारतीय आर्यांनीं स्त्रीशिक्षणाची, स्त्रीस्वातंत्र्याची व स्वयंवर, गांधर्वविवाह व प्रीतिविवाह या प्रकारांची केलेली प्रगति पाहून सानंद कौतुक वाटतें. वैदिक काळांतील विदुषींची माहिती फार त्रुटित मिळते, पण ती विश्वसनीय आहे. 'प्राचीन चरित्रकोशा' वरून दिसून येतें कीं,

स्वयंवर करणाऱ्या स्त्रिया: कमद्यू, कुंती, केशिनी, द्रौपदी, मान्यवती, वैशालिनी, रेणुका, पद्मिनी, परिमला, जलंधरा, सीता, मित्रविंदा, लक्ष्मणा, व सत्या.

लढाऊ स्त्रिया: इंद्रसेना, कैकेयी, गंगा, विश्पला, व प्रमिला.

राज्याधिकारी स्त्री: चित्रांगदा.

राजकारणी स्त्री: ज्वाला.

सूक्तकार किंवा मंत्रकार स्त्रिया: आपाला, इंद्राणी, ममता, यमी, लोपामुद्रा, व वाच्.

मिश्रविवाह करणाऱ्या स्त्रिया: कृतेयु, उलुपी, उपदानवी, देवयानी, कैकसी, गायत्री, गुणकेशी, गिरिका, गिरिजा, ज्येष्ठा, तपती, तार्क्षी, त्वष्टा, नर्मदा, विरजा, विश्वाची व शूर्पणखा.

इतर प्रसिद्ध स्त्रिया: जटिला, माधवी, उलुपी, शकुंतला, तपती, अम्बा, पुलोमा, गायत्री, रुचि, लक्ष्मणा, वृद्धा, सत्या, सुवर्चला, मैत्रेयी, कात्यायनी, गार्गी ऊर्फ वाचक्नवी, सुलभामैत्रेयी, सुवर्चला, भानुमती, तारामती, चैत्रा ऊर्फ शैब्या, रेवती, रोचना, लोपामुद्रा, स्वाहा, अनसूया, मदालसा, तारा, मंदोदरी, प्रमोदिनी, सुशीला, सुस्वरा, सुतारा, चंद्रिका, सुनीथा, सुदेष्णा, अनुसूया, अपाला, अंबा, अरुंधती, सुप्रभा, सत्यवती (ऋचीक-वड, पिंपळ, उंबर), तिलोत्तमा, दीर्घिका, पद्मावती (बहुपतित्वनिषेध), पार्वती, कीर्तिमालिनी, पुष्करमालिनी, लीला, वृद्धकन्या, वृंदा, वेदवती, शांडिली, व सावित्री.

विधवाविवाह: (१) उलुपी-अर्जुन, (२) मदिरेक्षणा-तारक, (३) मायावती-प्रद्युम्न.

वेदवाङ्मयावरून घेतलेली ही स्त्रीनामावलि आहे. इतक्या प्राचीन काळची ही यादी स्त्रियांची प्राचीन उन्नति व दर्जा उत्तम सिद्ध करते. बौद्ध कालापासून हिंदु स्त्रीपुरुष समाजाला निराळें वळण लागलें व त्याचें प्रतिबिंब मनुस्मृतींत दिसतें. अफगाण मोगलांचे अमलांत म्हणजे अकराव्या शतकापासून अलीकडे बालविवाह मनुस्मृतीच्या अर्थापेक्षां निराळ्या अर्थानें रूढ झाला, इतकेंच नव्हे तर स्त्रियांना गोषा म्हणून सामाजिक दृष्ट्या तुरुंगवास प्राप्त झाला ! !

## ब्रिटिश अमदानींतील वैवाहिक सुधारणा

ब्रिटिश अमदानीचा अंमल प्रथम बंगाल प्रांतांत झाला व त्यामुळें स्वाभाविकच एक बंगाली विद्वानच पहिला सुधारक म्हणून पुढें आला. राजा राममोहन राय हेच ते होत. यांचा पहिला विवाह आठव्या वर्षी झाला, व ती स्त्री लवकरच दिवंगत झाल्यामुळें नऊदहा वर्षांच्या सुमारास वडिलांनीं त्याचीं आणखी दोन लग्नें केलीं. यामुळें मोठेपणीं जरी त्यांचें मत बहुपत्नित्वाविरुद्ध झालें, तरी आपल्या दोन्ही पत्नींस घरीं ठेवणें त्यांना प्राप्त झालें. त्यांनीं काशीस राहून वेद व इतर हिंदु धर्मग्रंथांचा अभ्यास केला. तिबेटांत दोनतीन वर्षें राहून बौद्धधर्माचा, नंतर पुन्हा बनारस येथें चारपांच वर्षें राहून संस्कृत धर्मग्रंथांचा आणखी अभ्यास केला; १७९६ मध्यें इंग्रजीचा

अभ्यास, आणि पुढें १८१० चे सुमारास फारशी व अरबी भाषांचा उत्तम अभ्यास केला. १८११ मध्यें त्यांचा वडील भाऊ वारला व त्याची पत्नी सती गेली. सती न जाण्याबद्दल तिला पुष्कळ सांगितलें, तरी तिनें ऐकलें नाहीं; पण नंतर अग्नीच्या ज्वाला न सोसून ती बाहेर येऊं लागली, तेव्हां कर्मठ आप्तांनीं व भटांनीं तिला बांबूंनीं चितेंत ढकललें, व किंकाळ्या ऐकूं येऊं नयेत म्हणून मोठमोठ्यानें ढोल वाजविले! याप्रमाणें भावजयीला तिच्या इच्छेविरुद्ध जिवंत जाळलेली पाहून राममोहनास सतीविषयीं चीड उत्पन्न झाली. त्यामुळें सतीची चाल कायद्यानें बंद व्हावी अशी चळवळ त्यांनीं केली. पुढें विधवांचे दुःखनिवारणार्थ संस्था काढणें, बहुपत्निकत्वाला कायद्यानें नियंत्रण घालणें, स्त्रियांना वारसाहक्क मिळवून देणें, वगैरे गोष्टींना त्यांनीं चालना दिली (१८२२). पण एक सतीबंदीचा कायदा होण्याकरितांच त्यांना अनेक वर्षें झटावें लागलें. कंपनी सरकारनें १८२९ सालीं कायदा केला, त्याविरुद्ध प्रीव्ही कौन्सिलकडे अपील जुन्या मताच्या शास्त्री पंडितांतर्फे करण्यांत आलें, त्या वेळीं राममोहन यांनीं इंग्लंडांत जाऊन आपलें मत प्रीव्ही कौन्सिलपुढें वकील या नात्यानें मांडलें व अखेर सतीबंदीचा कायदा १८३३ मध्यें कायम झाला.

ब्रिटिश अमदानींत १८६० पासून युनिव्हर्सिटया स्थापन होऊन बी. ए., एम्. ए., एल्एल्. बी. पर्यंतचें पाश्चात्य पद्धतीचें पण संस्कृतभाषा व वाङ्मययुक्त उच्च ज्ञान घेतलेला विद्वानांचा वर्ग निर्माण होऊं लागला व गेल्या साठसत्तर वर्षांत अशा विद्वानांची संख्या पुष्कळ वाढून डॉ. आंबेडकर यांचेप्रमाणें अगदीं अस्पृश्य मानलेल्या जातीसुद्धां सर्व जातींत विद्वान् निर्माण होऊन पौरस्त्य व पाश्चात्य संस्कृतिमिश्रित असा एक स्वतंत्रच विद्वद्वर्ग हिंदु समाजाचें नियमन करण्यास पुढें आला आहे.

## टिळकयुग

या आंग्लविद्याविभूषित विद्वानांना राष्ट्राची राजकीय, आर्थिक, धार्मिक व सामाजिक सुधारणा झाली पाहिजे हें पटून, त्यांनीं अनेकविध प्रयत्न सुरू केले. खास स्त्रियांकरितां समान हक्कप्राप्तीचें तत्त्व मान्य करून विधवा-

विवाह, मिश्रविवाह, घटस्फोट, वारसाहक्क या बाबींचा पुरस्कार केला व तदनुसार कायदे पास करून घेतले आहेत व घेत आहेत, आणि स्त्रीशिक्षणाचाहि पुरस्कार करीत आहेत. अशा नव्या विद्वानांच्या पिढींतील अगदीं आद्य पुढारी राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, 'लोकहितवादी' देशमूख, विष्णुशास्त्री पंडित, न्या० तेलंग व रानडे, प्रि० आगरकर, हे असून त्यांचेनंतर आण्णासाहेब कर्वे, डॉ० रवींद्रनाथ टागोर, ना० भूपेंद्रनाथ वसू, सरदार विठ्ठलभाई पटेल, डॉ. हरिसिंग गौर, महात्मा गांधी यांनीं हिंदु विवाहसंस्थेंत अनेक प्रकारच्या सुधारणा सुचविल्या व कायदे घडवून आणले. पण स्त्रीजातिविषयक सर्व सुधारणांचा पाया जो स्त्रीशिक्षण, त्या स्त्रीशिक्षणाचा केंद्रीभूत एकमेव प्रयत्न गुरुवर्य आण्णासाहेब कर्वे यांचेशिवाय अखिल हिंदुस्थानांतील या पहिल्या व दुसऱ्या पिढीतील विद्वानांपैकीं इतर कोणीं केलेला दिसत नाहीं. आणि गुरुवर्य कर्वे यांचाहि मूळ हेतु, निराश्रित विधवांना शिक्षण देऊन स्वावलंबी करणें हा होता.

या सर्व विद्वानांच्या प्रयत्नांत सुशिक्षित पिढीचें वैवाहिक जीवन सुखी करण्याकरितां सुशिक्षित स्त्रियांची पिढी निर्माण करणें, हा हेतु कोठें दिसत नाहीं. तसेंच व्यक्तिशः स्वतःची पत्नी अशिक्षित असल्यामुळें खरें वैवाहिक प्रेम व वैवाहिक साहचर्य लाभत नाहीं अशीहि तक्रार केल्याचें यांच्यापैकी कोणाच्या चरित्रांत दिसत नाहीं. खासगी वैवाहिक जीवनदृष्ट्या पत्नीचें कार्य 'चूल आणि मूल' येवढेंच आहे, असें ही विद्वानांची प्राथमिक पिढी मानीत होती काय? या विद्वानांनीं आपल्या दैनिक कार्यक्रमांत पत्नीचें साहचर्य व सहवास यांची कधींच अपेक्षा केल्याचें दिसत नाहीं. दिवसाचा सर्व वेळ स्वतःचें लेखनवाचन, नोकरीधंदा, सार्वजनिक कार्य करण्यांत दंग राहून स्वतःच्या पत्नीला स्वयंपाकगृहाचें स्थानिक स्वराज्य तोडून दिल्याचें यांच्या चरित्रांत आढळतें! या दृष्टीनें जुने हिंदु सनातनी आणि हे नवे आंग्लविद्याविभूषित विद्वान् यांच्यांत फरक आढळत नाहीं. चिरस्थायी वैवाहिक प्रेमाला शिक्षणसाम्य, शिक्षणजन्य संस्कृतिसाम्य व ध्येयसाम्य पाहिजे ही विचारसरणी या विद्वानांनाहि अपरिचित दिसते! सतीच्या चालीकडे,

बालविधवांच्या संन्यस्त वृत्तीकडे माणुसकीच्या दयार्द्र दृष्टीनें पाहणारे थोर महात्मे वैवाहिक जीवनांतील स्वसुखाबद्दल, किंवा स्वतःच्या अर्धांगीच्या शैक्षणिक लायकीबद्दल व उन्नतीबद्दल उदासीन आढळतात ! प्रि० आगरकरांनीं असल्या विद्वानांच्या गृहलक्ष्मीचें मार्मिक चित्र दर्शविलें आहे. ते म्हणतात,

......स्वयंपाकिणीचें किंवा मोलकरणीचें काम उत्तम करणें ही स्त्रीजातीच्या गुणांची या देशांत कमाल समजली जाते, व या त्यांच्या गुणांचा अलभ्य लाभ आपणास जितका लवकर होईल तितका करून घेण्याकरतां देशाचा देश दहापंधरा वर्षांच्या आंत विवाहादि सर्व कार्य आटोपून स्वस्थ होतो ! मग ह्या महान् गुणवती सहधर्मचारिणीकरितां आमचे तरुणवांड आपली सर्व बुद्धि व करामत खर्च करून द्रव्यार्जनास आरंभ करतात, व स्वयंपाकीण व मोलकरीणबाईस आपलें, कौशल्य पूर्णपणें खर्चितां येईल असें एकादें अमंगल घर घेऊन ठाम होतात. ही स्थिति आमरण सोसणें यास या देशांत कुटुंबसुख हें नांव आहे, व ते आम्ही सुधारक हिरावून नेऊं म्हणून केसरीकार व त्यांचे अनुयायी भयचकित होऊन गेले आहेत ! एका दृष्टीनें ही महामूढ कुटुंबिनी परिसाप्रमाणें गणिली पाहिजे; कारण एक वेळ घरांत खावयास अन्न नसलें तरी चालेल, मुलेंलेंकरें घरींदारीं उघडींवाघडीं हिंडलीं तरी चालतील, पतिरायांनीं राजापुरी पंचावर सर्व दिवस कंठला तरी चालेल, घरधनिणीचे हातींपायीं व गळ्यांत सोन्या-रुप्याचे व पाच-मौक्तिकाचे कृत्रिम अलंकार असले पाहिजेत व तसल्या विभूषित कर्णेंद्रियांनीं तिनें आपलीं झाडसारवणादि घर्षणप्रधान गृहकृत्यें आटपलीं पाहिजेत !"

वास्तविक प्रकार असा दिसतो कीं, या प्राथमिक पिढींतील बहुतेक प्रसिद्धअप्रसिद्ध हि विद्वान् पुरुष स्त्रियांच्या उच्च शिक्षणाबद्दल साशंक दिसतात. उच्च शिक्षणानें स्त्रिया उद्दाम होऊन पुरुषांचें वर्चस्व झुगारून देतील, स्वतःच्याच घरांत पतीच्या बरोबरीनें समान हक्क व दर्जा मागतील, गृहकार्यांत नालायक ठरतील, निदान तें कमीपणाचें मानून दुर्लक्ष करतील, वगैरे अनेक दुर्ग्रह या पिढींत आढळतात. म्हणून विवाह ठरवतांना सुशिक्षित पत्नी

मिळविण्याचा आग्रह न धरतां अशिक्षित पत्नीच संसाराला बरी, या तत्त्वानें वागणारे हे विद्वान् होते. सर्व देशी युनिव्हर्सिटींतील विद्वानांची हीच गत आढळते ! !

## शिक्षणसाम्याचे आद्य पुरस्कर्ते

या वैवाहिक जीवनाचे बाबतींत खरी क्रांति कांहीं बंडखोर (?) परदेशी पदवीधरांनीं घडवून आणली. ब्रिटिश सरकारनें आय्. सी. एस्., बॅरिस्टरी, वगैरे परीक्षा व पदव्या इंग्लंडांत मिळविल्या पाहिजेत असा निर्बंध ठेवल्यामुळें पहिल्या पिढींतलेच कांहीं धाडशी तरुण इंग्लंडांत गेले, आणि पीएच्. डी., वगैरे पदव्यांकरतां जर्मनी, अमेरिकेंत गेले. तेथें त्यांना अगदीं नवें विलक्षण जग दिसलें. स्त्रीशिक्षणाची विलक्षण प्रगति होऊन उच्च पदवीधर स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें समाजांत वावरतांना दिसल्या. सुशिक्षित स्त्रियांची निःसंकोच वागणी, आरोग्य, स्वच्छता, बोलकेपणा आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट हिंदी तरुणाबरोबरहि अनुनय करून विवाहबद्ध होऊन संसार करण्याची अनुकूलता, या गोष्टी हिंदी तरुणांस मोहक वाटल्यास नवल तें काय? या तरुणांची कामुकवृत्ति व सद्गुणप्रशंसा या दोन्ही प्रभावी ठरून अगदीं कट्टर सनातनी आईबापांचेहि हे तरुण पदवीधर धर्मबंधनें गौण समजून आंग्ल युवतींशीं विवाहबद्ध होण्याचें धाडस करूं लागले, आणि उच्च विद्याविभूषित पत्नीचें उच्च प्रेम व संपूर्ण सांसारिक साहचर्य यांच्या अतर्क्य लाभानें आनंदित झाले ! मात्र हें धाडस करून थोड्याच हिंदी तरुणांनीं आपली आंग्लपत्नी स्वदेशीं आणली, आणि 'हें चित्र पाहा, आणि हें चित्र पाहा' असा देखावा हिंदु समाजापुढें उभा केला. हा १९०१ ते १९२० पर्यंतचा काळ विचारांत घेतल्यास, या बंडखोर विद्वानांना विषयलोलुप, धर्मबुडवे, इत्यादि विशेषणें देणारी सर्वसाधारण जनता दिसते, इतकेंच नव्हे तर, देशी डबल ग्रॅज्युएट विद्वानांतहि स्वतःची पत्नी पदवीधर असलीच पाहिजे, असा मनःपूर्वक व गुणग्राहकतापूर्वक आग्रह धरणारे फार थोडे दिसतात. ह्या काळास हिंदी इतिहासांत टिळकयुग नांव आहे, व लोकमान्य टिळकांचें मत वैवाहिक बाबतींत आग्रही नसून उदासीन असलेमुळें आणि सुधारणा आधीं

राजकीय मग सामाजिक अशा विचारसरणीचा लोकमान्यांनीं अवलंब केल्या-मुळें त्या काळांतील विद्वान् पदवीधर सर्वसामान्यत: याच मतानें भारले गेलेले दिसतात.

## गांधीयुग

खासगी जीवनांत आणि राष्ट्रीय जीवनांत स्त्रियांना पुरुषांच्या बरो-बरीनें भागीदार करण्याचें गांधीयुग १९२० पासून सुरू झालें. महात्मा गांधींनीं राजकीय सत्याग्रहांत पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांना स्थान दिल्यामुळें पुरुषांचा व स्त्रियांचाहि दृष्टिकोण एकदम बदलला. महात्माजींच्या राष्ट्रीय लढ्यांत उतरलेल्या विद्वान् देशभक्तांना सुशिक्षित स्त्रियांचे सहकार्याची आकर्षकता, विलोभनीयता प्रत्यक्ष प्रत्ययास आली, आणि खासगी संसार सुशिक्षित स्त्रियांबरोबर थाटणें आवश्यक व उपयुक्त वाटूं लागलें. १९२१ ते १९३८ पर्यंत स्त्रीशिक्षणाकडे सामान्य जनतेचा ओढा इतका वळलेला दिसतो कीं, पुण्यामुंबईत मुलींचीं स्वतंत्र हायस्कुलें भराभर निघत असून शिवाय मुलांच्या हायस्कुलांत मुली बरोबरीनें शिकत आहेत; इतकेंच नव्हे तर, जिल्ह्यांचे व तालुक्यांचे गांवींहि मराठी व इंग्रजी शाळांत मुलींची संख्या झपाट्यानें वाढून हायस्कुलांत सुद्धां मॅट्रिकपर्यंत प्रत्येक वर्गांत मुली मुलांबरोबर सर्वत्र शिकत आहेत. आणि मुलींच्या लग्नाचे वेळीं तिला पाहावयास येणारी मंडळी 'मुलीला लिहितांवाचतां येतें का?' हा प्रश्न न विचारतां 'मुलगी किती इंग्रजी शिकली आहे,' असा प्रश्न विचारूं लागले आहेत. ही क्रांति अभिनंदनीय होय.

## पदवीधर पुरुषांची जबाबदारी

ही प्रगति अभिनंदनीय असली तरी खुद्द पदवीधर विद्वानांचा दृष्टिकोण अद्यापि पूर्ण बदललेला दिसत नाहीं. अद्यापहि पदवीधरांनीं पदवीधर स्त्रियांशींच लग्न करण्याचा आग्रह धरलेला दिसत नाहीं. पदवीधर स्त्रीची त्यांना भीति वाटते. या बाबतींत चिकित्सक विद्वानांमध्यें व लग्नसंस्थेचा जागतिक अभ्यास केलेल्या लेखकांमध्यें द्विधा मत आढळतें. पदवीधर प्रौढ

स्त्रिया गर्भधारणेला, शिशुसंगोपनाला नालायक असतात, असाहि मुद्दा कांहीं विद्वानांनीं उपस्थित केल्यामुळें सामान्य पदवीधर पुरुष पदवीधर स्त्रियांना पत्निपदारूढ करण्यास कचरतातसें वाटतें. पण हाहि भ्रमनिरास लवकर व्हावयास पाहिजे. दुसरी शंका पदवीधर स्त्रियांचा नोकरीपेशा किंवा सार्वजनिक कार्यलालसा यासंबंधीं वाटते. 'चूल व मूल' हें ध्येय झुगारून देऊन पदवीधर स्त्रिया पुरुषी व्यवसाय करूं लागतील व पुरुषी बनतील, ही भीतीहि दूर झाली पाहिजे. आणि खुद्द पदवीधर स्त्रियाच वैवाहिक जीवनांतील सर्व जबाबदाऱ्या योग्य प्रकारें पार पाडून या शंका प्रत्यक्ष अनुभवानें दूर करतील, असा भरंवसा वाटतो. या बाबतींत इंग्रज विद्वान् प्रसिद्ध राजकारणी लॉर्ड कर्झन,व लेडी कर्झन आणि विद्वान् ज्ञानकोशकार डॉ० केतकर व त्यांच्या पत्नी शीलवतीबाई केतकर यांचें चरित्र व चारित्र्य आदर्शभूत आहे, असें त्यांच्या खाजगी जीवनाची माहिती मिळविणारांना सहज दिसून येईल. पाश्चात्य समाजांत पदवीधर स्त्रीपुरुषांचें वैवाहिक जीवन अत्यंत सुखकर झाल्याचीं उदाहरणें सांपडतील, उलट पक्षीं कांहीं अपवादहि सांपडतील; पण अपवादांचाच बाऊ करून त्यांवरून नियम ठरविणारे कित्येक लेखक विनाकारण दिशाभूल करतात. म्हणून हिंदु पदवीधरांची जबाबदारी अशी आहे कीं, त्यांनीं स्वतः या विषयावरील समृद्ध वाङ्मय वाचावें, प्रत्यक्ष उदाहरणें पाहावीं आणि मग मतनिश्चिती करावी. हिंदु समाजांत उच्च स्त्रीशिक्षण व पदवीधर स्त्रिया ही समाजस्थिति नवीन असल्यामुळें कांहीं नवमतवादी पदवीधर स्त्रियांचे स्वैरालाप वाचून किंवा ऐकून सिद्धान्त कोणींहि ठरवूं नयेत. उलट पक्षीं अनेक पदवीधर स्त्रिया वैवाहिक जीवन किती सुखकर करीत आहेत, याचीं अप्रसिद्ध उदाहरणें निरीक्षण करावीं. खुद्द ज्ञानकोशकार केतकर दांपत्याबद्दल गेल्या दहा वर्षांत सुशिक्षित समाजांतहि किती अफवा व अनुदार अपेक्षा खासगी चर्चेत व्यक्त होत होत्या! पण सर्वांचा भ्रमनिरास श्री० शीलवतीबाई केतकर यांनीं प्रत्यक्ष स्वतःच्या कृतीनें केला आहे. या पाश्चात्य विदुषीच्या इतकीहि पतिनिष्ठा आमच्या पदवीधर आर्य महिलांत असणार नाहीं काय? आमची खात्री आहे कीं, हिंदु पदवीधर स्त्रिया यापेक्षांहि उज्ज्वल वैवाहिक जीवनाचा लाभ पुरुषवर्गाला देतील.

## सुशिक्षित स्त्रियांवरील जबाबदारी

"हल्लींच्या शिक्षणानें आम्ही (पुरुष) जसे संशयवादी (scepteis) झालों आहों तशाच स्त्रिया बनतील व आमच्या गृहसौख्याचा नाश होईल."

स्त्रीशिक्षणाचे विसाव्या शतकांतले प्रमुख पुरस्कर्ते व कार्यकर्ते गुरुवर्य आण्णासाहेब कर्वे यांनीं महिला विद्यापीठाची योजना १९१६ सालीं हातीं घेतली. त्या वेळीं लोकमताचा पाठिंबा मिळविण्याकरितां लोकमान्य टिळक यांचें मत विचारलें असतां लोकमान्यांनीं वरील अभिप्राय व्यक्त केला आहे. हल्लीं विदुषी स्त्रियांपुढें हा मोठाच 'डेंजर सिग्नल' उभा आहे. तथापि सुविचारामुळें भारतीय विद्वान् ज्याप्रमाणें हल्लींच्या (पाश्चात्य धर्तीच्या) शिक्षणानें सर्वच 'स्केप्टिक्' बनले नाहींत, उलट पक्षीं पाश्चात्य विद्या-विभूषित असूनहि कट्टर सनातन धर्माभिमानी पुष्कळ विद्वान् आहेत, त्याच-प्रमाणें पाश्चात्य पद्धतीनें शिक्षण घेतलेल्या पुष्कळ महिला पूर्ण धर्माभिमानी व पूर्ण गृहसौख्यदक्ष निर्माण होतील असा गुरुवर्य कर्वे यांचा दृढ विश्वास असून तसा अनुभव प्रत्यक्ष येत आहे. शिवाय हल्लींचा मुंबई युनिव्हर्सिटीचा शिक्षणक्रम यथातथ्य न पत्करतां महिला विद्यापीठानें आपल्या शिक्षणक्रमांत आमूलाग्र बदल केलेला आहे. यामुळें लोकमान्यांनीं प्रदर्शित केलेली भीति अनाठायीं झाली आहे. असो.

वास्तविक उच्च ज्ञानसंपादनाबद्दल या भारतवर्षांत अत्यंत प्राचीन काळीं अशी अनिष्ट अपेक्षा किंवा भीति दर्शविलेली दिसत नाहीं. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें उच्च शिक्षणाचीं सर्व दालनें खुलीं होतीं. उच्च शिक्षण आणि संसार व गृहसौख्य यांचा सुंदर मिलाफ झालेल्या सीता, सावित्री, द्रौपदी, रुक्मिणी, इत्यादि क्षत्रिय महिला राजघराण्यांत श्रीमंतीच्या उच्च शिखरावर दिसतात, त्याचप्रमाणें मैत्रेयीसारख्या ब्राह्मण विदुषी याज्ञवल्क्या-सारख्या दरिद्री नारायण मुनिवर्यांचें गृहसौख्य संपादतांनाहि दिसतात. वैदिक वाङ्मयाचें सामाजिक दृष्ट्या परीक्षण अद्याप पूर्णपणें झालेलें नाहीं; पण थोडेंथोडकें परीक्षण झालें आहे, त्यावरूनहि वैदिक काळांतसुद्धां उच्च स्त्रीशिक्षण, आस्तिक्य बुद्धि आणि गृहसौख्य यांतून विसंवादी सूर निघतील,

अशी भीति व्यक्त केलेली दिसत नाहीं. शिवाय पाश्चात्य शिक्षणक्रमांत सुधारणा करण्यास आपल्या युनिव्हर्सिटचा हळूहळू मुखत्यार होत असून महिला विद्यापीठांत आण्णासाहेब कर्वे यांनीं आमूलाग्र सुधारणा केलीच आहे; आणि पुष्कळ ग्रॅज्युएट स्त्रिया सुखाचा संसार करीत आहेत त्यांची यादी.—

महिला विद्यालयाच्या जी. ए. : (१) सौ. गंगुबाई पटवर्धन, (२) सौ. रेवतीबाई कर्वे, (३) सौ. आनंदीबाई जोशी, (४) सौ. सुमतीबाई देव, (५) सौ. वनमालाबाई तुळजापूरकर, (६) सौ. पद्मावतीबाई मंडलीक, (७) सौ. संजीवनी मराठे, (८) सौ. कृष्णाबाई मोटे, (९) सौ. वसुमती धारकर, (१०) सौ. अन्नपूर्णा देशपांडे.

मुंबई युनिव्हर्सिटीच्या पदवीधर : (१) सौ. शारदाबाई नरवणे, (२) सौ. सुधाबाई ढवळे, (३) सौ. सुशीलाबाई मोडक, (४) सौ. भानुमतीबाई मोहनी, (५) सौ. मालिनीबाई परांजपे, (६) सौ. विमलाबाई देशपांडे, (७) सौ. कमलाबाई बंबवाले, (८) सौ. शकुंतलाबाई गाडगीळ, (९) सौ. सखुबाई मायदेव, (१०) सौ. इंदिराबाई लेले, (११) सौ. इरावतीबाई कर्वे, (१२) सौ. शांताबाई नाशिककर, (१३) सौ. कमलाबाई जमखिंडी, (१४) सौ. सरलाबाई नाईक, (१५) सौ. कमलाबाई टिळक, (१६) सौ. सुंदराबाई पागनीस, (१७) सौ. चंद्रकलाबाई हाटे, (१८) सौ. दया पटवर्धन (परांजपे), (१९) सौ. शांताबाई कशाळकर, (२०) सौ. गंगूबाई कोकीळ, (२१) सौ. ताराबाई कुळकर्णी, (२२) सौ. अनुसूयाबाई कामत, (२३) सौ. स्नेहलताबाई जोशी.

## प्राचीन आदर्श दांपत्य : याज्ञवल्क्य-मैत्रेयी

वरील यादींत उत्तरोत्तर पुष्कळ भर पडत जाईल, हें उघड आहे. प्राचीन काळांतील एका नमुनेदार वैवाहिक जीवनाचें उदाहरण याज्ञवल्क्य आणि कात्यायनी व मैत्रेयी यांचें होय. प्राचीन हिंदुस्थानांत विदेह देशांतील जनकपूर ही राजर्षि जनक राजा याची राजधानी होती. जनक राजा प्राचीन विद्यांचा मोठा पुरस्कर्ता होता. जनकपुराजवळ एक भव्य व विस्तृत अरण्य होतें. एके दिवशीं या

अरण्यांतून तिघे प्रवासी जनकपूर शहराकडे येत होते. त्यांपैकीं दोन क्षत्रीय आणि एक ब्राह्मण मुनि होते. हे 'मित्र' नांवाचे ब्राह्मण मुनि बरोबरच्या क्षत्रीयांस म्हणाले, "वत्सा यज्ञदत्ता, काय सांगूं! ती सभा कसली! ती सभा झाल्यापासून माझें मनःस्वास्थ्य गेलें. वत्सा, माझ्या चिंतेचें कारण माझी कन्या ही स्वतःच झाली. तिला हल्लीं अठरावें वर्ष आहे. तिचें लग्न जुळवून आणण्यांत मला अजून यश आलें नाहीं."

विष्णु:––महाराज, आपल्या मुलीसारखी सुंदर व सर्वगुणसंपन्न मुलगी सांपडणें दुर्मिळ आहे. शिवाय तुम्हीं तिला उत्तम शिक्षण दिलें आहे. जनकपुरींत विद्वान् माणसांचा दुष्काळ का आहे? मग आपल्याला तिच्या लग्नाविषयीं इतकी चिंता कां उपजावी?

मित्र:––वत्सा, विष्णुमित्रा, तिचें शिक्षण हेंच तिच्या लग्नास विघ्न म्हणून उभें राहिलें आहे. ती सभा झाल्या दिवसापासून म्हणते, "तुम्हांला जर जुळवून आणतां येणें शक्य असेल तर माझें लग्न याज्ञवल्क्याशीं जुळवून आणावें, नाहीं तर मी आपल्या गार्गी मावशीप्रमाणें अविवाहित राहीन."

यज्ञ:––तर मग तिच्या विवाहांत विघ्न कोठें आहे, हें अजून माझ्या लक्षांत आलें नाहीं.

मित्र:––वत्सा, याज्ञवल्क्याचें लग्न झालें आहे व तें माझा प्रियमित्र जो कात्य त्याच्या कन्येशीं कात्यायनीशीं झालें आहे. ती अत्यंत सुस्वरूप, गृहकृत्यांत दक्ष, स्वभावानें सौम्य व गोड आहे. अशा आपल्या गुणसंपन्न स्त्रीकडे याज्ञवल्क्याचा ओढा फार आहे. जरी कदाचित् त्याचें मन मैत्रेयीशीं लग्न लावण्याकडे वळलें तरी मला त्यांच्या संसारांत या द्वितीय विवाहाच्या योगानें माती कालवावीशी वाटत नाहीं व पुढेंहि वाटणार नाहीं. तशांत माझी मुलगी तरुण व अनुभवहीन आहे. म्हणून ती लग्न झाल्यास त्यांच्याशीं विवेकानेंच वागेल, असें मला सांगतां येत नाहीं.

वाचकहो, वरील संभाषणावरून याज्ञवल्क्य व मैत्रेयी यांच्या विवाहासंबंधी साधारण कल्पना तुम्हांस येईल. आतां पुढील हकीकत थोडक्यांत

येणेंप्रमाणें.—कात्यायनी ही मैत्रेयीपेक्षां दोनतीन वर्षांनींच काय ती मोठी होती. ती इतर सर्वगुणसंपन्न होती; तथापि फारशी शिकलेली नव्हती. तिचा नवरा इतका विद्वान् पण त्याच्याशीं पारमार्थिक विषयावर बोलावयास तिला नको होतें. तथापि ती आपल्या संसारकर्तव्यांत विलक्षण जागृत होती. तिची पतीचे ठायीं भक्ति वाखाणण्यासारखी होती. तसेंच आपलीं भूषणें म्हणून असलेलीं जीं मुलें त्यांच्या ठायीं तिचें वात्सल्य विलक्षण होतें. कात्यायनी व मैत्रेयी यांची आपसांत मैत्री होती व त्यांच्या वारंवार भेटी होत असत. एके दिवशीं त्यांचे भेटींत संभाषण झालें तें पुढीलप्रमाणें :

कात्यायनी :—गडे मैत्रेयी, तुझें लग्न झालें म्हणजे मग तूं येथें थोडीच राहणार ? तुझा वियोग मला कसा सहन करतां येईल, याची मला फार काळजी लागली आहे.

मैत्रेयी :—सखे कात्यायनी, माझ्या वियोगदु:खाचें तुला इतकें कांहीं वाटावयास नको. कारण आपण एकमेकींपासून कधींहि विभक्त होणार नाहीं; मग तर झालं ना ?

कात्यायनी :—विभक्त होणार नाहीं, या तुझ्या म्हणण्यांचा अर्थ तरी काय ? तुला सासर येथेंच जवळपास मिळेल हें कशावरून ? कीं तूं अविवाहितच राहणार ? स्त्रियांनीं अविवाहित राहणें ही कल्पनाच मला चमत्कारिक वाटते. तशांत तुझें पाणिग्रहण करण्यास कोण समर्थ होणार नाहीं ? अग अशा मुली का घरोघर सांपडणार ?

मैत्रेयी :—माझ्याशीं लग्न लावण्यास पुष्कळ लोक तयार होतील ! पण त्यांपैकीं मला कोणीच पसंत नसलें तर ?

कात्यायनी :—मग तूं का आजन्म अविवाहित राहण्याची इच्छा करतेस ? मला नाहीं बाई ही रीत आवडत. संसार हेंच खरें बायकांचें कर्तव्य आहे, असें मला वाटतें.

मैत्रेयी :—संसार हा जितका स्त्रियांचा आहे तितकाच तो पुरुषांचाहि पण आहे. संसाराशिवाय स्त्रियांना दुसरें कांहीं कर्तव्य नाहीं, असें का तुला वाटतें ? आत्मज्ञान करून घेणें, हें स्त्रियांचें महत्त्वाचें कर्तव्य आहे. आत्मा

फक्त पुरुषांतच असतो कीं काय ? तो स्त्रियांतहि आहे. आत्मज्ञानाशिवाय आपली सुटका नाहीं. मुक्ति मिळणार नाहीं, हें याज्ञवल्क्यांच्या पत्नीस मीं सांगावयास पाहिजे काय ?

कात्यायनी :—स्त्रियांनीं व पुरुषांनीं मुक्ति मिळविणें हें महत्त्वाचें कर्तव्य आहे यांत मुळींच संशय नाहीं.

मैत्रेयी :—ज्याप्रमाणें द्रव्य मिळवणें व घराबाहेरचीं संसारविषयक इतर कृत्यें करणें हें पुरुषाचें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें घरांतील कामकाजाकडे लक्ष पुरविणें, अपत्यसंगोपन करणें हें बायकांचें कर्तव्य आहे. पण संसारा-संबंधीं सर्व कृत्यें उरकूनहि मुक्ति मिळविणें ही आयुष्यांतील इतिकर्तव्यता आहे, याची पुरुषास विस्मृति पडत नाहीं. पण तेंच बायकांचें पाहाना ! घरां-तील कामकाज झालें कीं, आपली इतिकर्तव्यता संपली असें स्त्रियांस वाटत असतें ! हा दोहोंत फारच मोठा फरक आहे.

कात्यायनी :—प्रिय सखे, तूं जें म्हणतेस तें अक्षरशः खरें आहे. तुझ्या शब्दांनीं माझ्या डोळ्यांत चांगलेंच अंजन पडलें.

हें संभाषण झालें त्या सुमारास मैत्रेयी याज्ञवल्क्यांची सहधर्मचारिणी होऊं इच्छिते, अशी गुणगुण तिनें ऐकिली होती; आणि तसें झालें तर किती सुंदर योग जुळून येईल, कारण मुक्ति मिळविण्यास्तव मैत्रेयीची फार मदत होईल, असें कात्यायनीला वाटूं लागलें. तथापि या विचारामुळें तिचें चित्त कित्येक दिवसपर्यंत अस्थिर झालें. पण सरतेशेवटीं विवेकपूर्वक कात्यायनीनें आपल्या मनास पूर्णपणें जिंकलें. मैत्रेयीच्या लग्नास रुकार देणेची तिच्या मनाची तयारी झाली व तिनें एके दिवशीं आपल्या पतीला स्वतःच हा प्रश्न विचारला.

याज्ञवल्क्य :—मग या विवाहाला तुझी कांहीं एक अडचण नाहीं तर ? हा प्रकार अपूर्वच म्हणावयाचा. मीं जर मैत्रेयीशीं लग्न लावलें तर तूं तिचा मत्सर तर करणार नाहींस ना ?

कात्यायनी :—महाराज, माझ्याकडून मत्सर होणें तर लांबच

राहिलें पण हा योग जुळल्यास मला अत्यंत आनंद होईल. मजवर आपलें अलोट प्रेम आहे हें मी पूर्णपणें जाणतें; म्हणून मला तिचा मत्सर वाटणार नाहीं.

या लग्नाविषयीं कायमचा विचार ठरण्यापूर्वी या दांपत्यांत अशा प्रकारचीं रोज पुष्कळ भाषणें झालीं. या संवादांत हेंच दिसून आलें कीं, याज्ञवल्क्यापेक्षां कात्यायनीच सदरहू लग्नाविषयीं अधिक उत्सुक होती. वाचकहो, यानंतर सुमारें दोन वर्षांनीं याज्ञवल्क्याचें मैत्रेयीशीं लग्न झालें.

या लग्नानंतर याज्ञवल्क्य कात्यायनी व मैत्रेयीसह सायंकाळचा होम झाल्यानंतर आपल्या आश्रमांतील तपोगृहांत आत्मोन्नतीसंबंधीं चर्चा करीत बराच वेळ बसत असत. याप्रमाणें त्यांचीं अनेक वर्षें आनंदांत गेलीं, आणि याज्ञवल्क्याच्या सहवासांत दोघींची आत्मोन्नति झाली. मैत्रेयीला कांहीं मूलबाळ नव्हतेंच. कात्यायनीचीं मुलें तिला परकीं नव्हतीं. ती त्यांना शिक्षण देऊं लागली आणि दोघींची विशेषतः मैत्रेयीची आध्यात्मिक विषयांत इतकी विलक्षण प्रगति झाली कीं, सर्व प्रकारचे विद्वान् लोक तिला मान देऊं लागले.

## सद्यःकालीन आदर्श दांपत्य

याज्ञवल्क्य-मैत्रेयी हें प्राचीन भारतांतल्या विद्वान् दांपत्याचें आदर्शभूत उदाहरण होय. गरीबी, विद्यार्जन, विद्यादान, परोपकार, वगैरे हेतूंनीं प्रेरित होऊन चालविलेलें त्यांचें वैवाहिक जीवन कष्टतर असलें तरी त्या दांपत्याला आनंदमय वाटत होतें. चालू काळांतलें आदर्श दांपत्य कोणतें? १८५० ते १९५० हा काळ अखिल जगांत अनियंत्रित राजशाही व साम्राज्यशाही नष्ट करून लोकशाहीचा व स्वातंत्र्यसंपादनाचा आहे. धार्मिक क्षेत्रांत भिक्षुक वर्गाचें वर्चस्व व जुलूम नष्ट करणें, सामाजिक क्षेत्रांत वरिष्ठ जातींचें वर्चस्व कमी करून सर्व जातींना, व पुरुषांचें वर्चस्व कमी करून स्त्रियांना, समसमान हक्क देणें, आर्थिक क्षेत्रांत जमीनदारांचें व भांडवलशाहीनें प्राबल्य नष्ट करून शेतकरी व कामकरी यांची सांपत्तिक स्थिति सुधारणें, हीं सार्वजनिक कार्यें अनेक देशांत चालू आहेत; व हिंदुस्थानांतहि चालू आहेत. साम्राज्यसत्तेशीं झगडून स्वातंत्र्य संपादणें व अनियंत्रित राजसत्तेशीं झगडून लोकशाही स्थापणें, या लढ्यांत लष्करी सामर्थ्यसंपन्न अशा राजकीय सत्ता-

धाऱ्यांशीं झगडणें लोकपुढाऱ्यांना भाग असल्यामुळें राजद्रोहाचा खटला आणि त्यांत तुरुंगवास, फांशी, वगैरे शिक्षा या आपत्ती सोसाव्या लागतात. धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांत काम करणाऱ्या पुढाऱ्यांना या आपत्तींची भीति नाहीं; फक्त जुन्या मतांच्या लोकांच्या टीका, निंदा व बहिष्कार इतकाच फार तर जाच होतो. इटलींतील स्वातंत्र्य युद्धांतले मॅझिनी, गॅरिबॉल्डीप्रभृति पुढारी, आयरिश स्वातंत्र्य चळवळींतील डी व्हॅलेराप्रभृति पुढारी, रशियांतील राज्यक्रांतींतले लेनिनप्रभृति पुढाऱ्यांचें वैवाहिक जीवन किती कष्टमय गेलें आहे, तें या राष्ट्रपुरुषांच्या चरित्रावरून दिसून येतें.

या कालांतलें आदर्श दांपत्य तें कीं, (१) पति-पत्नी सुशिक्षित पदवीधर, (२) विवाहापूर्वी राजकीय कार्यांत पडून ओळख व परिचय झाल्यावर उत्पन्न झालेलें प्रेम व प्रेमोत्तर विवाह, (३) विवाहपूर्व व विवाहोत्तर शुद्ध नैतिक वर्तन, (४) देशाच्या राजकीय चळवळींत भाग घेऊन उभयतांनीं भोगलेला तुरुंगवास व हालअपेष्टा, (५) स्वपक्ष अधिकारारूढ होऊन सरकारी सत्ता स्थापन झाली तरी राष्ट्रोन्नतीचें कार्य गरीबींत राहूनहि करण्याची तयारी, वगैरे पद्धतींचें वैवाहिक जीवन ज्यांचें आहे. १९२० पर्यंत हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षण फार मागासलेलें असल्यामुळें राममोहन राय, न्यायमूर्ति रानडे, वगैरे जुन्या पिढीच्या पुढाऱ्यांपासून लोकमान्य टिळक, खुद्द महात्मा, अरविंद घोस, लाला लजपतराय, पटेल, दास, नेहरू आदि पुढाऱ्यांत सुशिक्षित पत्नीनें राजकारणांत व हालआपेष्टांत सहकार्य केलें, अशा दांपत्याचें उदाहरण दिसत नाहीं. १९३० नंतर पदवीधर तरुणींनीं असहकारितेच्या चळवळींतल्या पुढाऱ्यांशीं विवाहबद्ध होऊन राष्ट्रीय कार्याला सर्वस्वीं वाहून घेणारीं महाराष्ट्रीय दांपत्यें दिसूं लागलीं आहेत. राष्ट्रीय चळवळींत भाग घेणाऱ्या पदवीधर दांपत्यांना मार्गदर्शक म्हणून रशियाच्या राष्ट्रोद्धारक लेनिन दांपत्याचें वैवाहिक जीवनचरित्र येथें थोडक्यांत देतों.

## रशियांतील लेनिनदांपत्य

रशियाचा प्रमुख क्रांतिवादी पुढारी आणि रशियांतील सोव्हिएट सरकारचा पहिला अध्यक्ष व्हालाडिमार इलिच् ऊर्फ लेनिन याचा जन्म ता. २२ एप्रिल, १८७० रोजीं रशियांतील व्होल्गा नदीच्या कांठीं सिबिर्स्क

गांवीं झाला. त्याचा बाप इलिया सिंबिर्स्क भागांतील सर्व प्रायमरी शाळांचा डायरेक्टर या हुद्यावर सरकारी नोकर होता. व त्याची आई मरिया जर्मन. असून तिचें निरनिराळ्या भाषांचें व नृत्यगायनांचें शिक्षण झाल्यावर प्राथमिक अध्यापनाचा शिक्षणक्रमहि पुरा झाला होता. नंतर इलिया व मरिया यांचा परिचयोत्तर प्रेमविवाह झाला होता. लेनिन सतरा वर्षांचा असतां त्याचा बाप एकाएकीं वारला. लेनिनचा हायस्कूल व कॉलेजांतील अभ्यासक्रम चालू असतांनाच अर्थशास्त्र व राजकारण या विषयांचीं पुस्तकें त्यानें वाचून मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा विशेष अभ्यास केला. १८९१ मध्यें सेंट पिट्सबर्ग युनिव्हर्सिटीच्या कायद्याच्या परीक्षेंत पहिल्या वर्गाचा डिप्लोमा मिळवून लेनिन समारा येथें वकिलीचा धंदा करूं लागला; तेव्हां तो बावीस वर्षांचा होता. लौकरच जाहीर सभांत भाषणें करून व स्वतंत्र लेख व निबंध लिहून लेनिननें प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेण्यास सुरुवात केली. तो मार्क्सचा एकनिष्ठ शिष्य होता. पिट्सबर्गमध्यें शाळाकॉलेजांतील विद्यार्थ्यांना मार्क्सवादाचीं तत्त्वें समजावून देण्याकरितां शहराच्या अनेक भागांत अभ्यास-केंद्रें काढून तेथें कांहीं प्रौढ विद्यार्थी व शिक्षक मतप्रचाराचें काम करीत असत. ही मंडळी लेनिनला आपला पुढारी मानीत असत. लेनिनची भावी पत्नी क्रुप्सकाया ही या मंडळींतच काम करीत असे. तसेंच क्रुप्सकाया व इतर कांहीं तरुण स्त्रिया कामगार स्त्रियांत मिसळून त्यांच्यांत मतप्रचाराचें काम करीत असत. लेनिननें स्वित्झर्लंड, फरान्स व जर्मनींत जाऊन व अर्थशास्त्र व राजकारणाचा अधिक अभ्यास करून १८९५ मध्यें रशियांत परत आल्यावर आपल्या 'सोशल डेमोक्रॅटिक' पक्षाची संघटना करण्याकरितां प्रसिद्ध शहरांतून दौरा काढला; व कामगारांना उद्देशून तो पत्रकें व वृत्तपत्रांत लेख प्रसिद्ध करूं लागला. या बाबतींत क्रुप्सकायाची त्याला फार मदत झाली.

## क्रुप्सकायाशीं परिचय, प्रेम व विवाह

लेनिनवर वरील कारणांमुळें सरकारी अधिकाऱ्यांचा रोष होऊन त्यांनीं त्याला ता. ९।१२।१८९५ स पकडून तुरुंगांत टाकलें. पण तुरुंगांतूनहि गुप्त रीतीनें सांकेतिक भाषेंत क्रुप्सकायाला व मित्रमंडळींना पत्रें लिहून तो आपल्या पक्षाच्या कार्याला मदत करीत असे. याप्रमाणें क्रुप्सकायाशीं

परिचय वाढत जाऊन त्याचेंच पुढें प्रेमांत रूपांतर झालें. क्रुप्सकाया पिट्सबर्ग येथें कामगार जागृतीचें व संघटनेचें काम करीत होती. पुढें लेनिनला पूर्व सैबेरियांतील पोलिसांच्या नजरेखालील भागांत तीन वर्षेपर्यंत हद्दपार करण्यांत आलें (ता. २६ जून १८९८). त्याच सुमारास क्रुप्सकायाला पकडून हद्दपारीची शिक्षा देण्यांत आली, तेव्हां "पूर्व सैबेरियांत आपणांस पाठवावें व लेनिनपाशीं राहण्यास परवानगी द्यावी," असा तिनें पोलीस अधिकाऱ्यांकडे अर्ज केला. तिला लेनिनबरोबर लग्न केलें पाहिजे या अटीवर परवानगी देण्यांत आली. नंतर क्रुप्सकाया आपल्या आईसह सैबेरियांतील शुशेन्स्कोई गांवीं लेनिन राहात होता तेथें गेली, आणि त्यांचें जवळच्याच एका चर्चमध्यें लग्न लागल्यावर एका स्वतंत्र घरांत लेनिनदांपत्य राहूं लागलें. येथें त्यांचा दिनक्रम असा असे: सकाळीं लौकर उठून सकाळचें सर्व काम आटोपल्यावर तीं दोघें मिळून सिडने वेबच्या 'औद्योगिक लोकशाही' (इन्डस्ट्रियल डेमॉक्रसी) या पुस्तकाचें भाषांतर करीत. दुपारच्या जेवणाची वेळ होईपर्यंत हें काम चाले. नंतर दुपारचें जेवण आटोपल्यावर लेनिन आपलें 'रशियांतील भांडवलशाहीची प्रगति' हें पुस्तक लिहिण्यास बसे. त्याकरितां लेनिननें जमविलेली सामग्री क्रमवार लावणें, लेनिननें केलेलीं टांचणें वाचून कोणत्या टांचणाचा कोठें उपयोग करावयाचा हें सुचविणें, पुस्तकांतील निरनिराळ्या प्रकरणांसंबंधीं लेनिनबरोबर चर्चा करून उपयुक्त सूचना करणें, वगैरे अनेक कामें क्रुप्सकाया करी. संध्याकाळीं ती दोघेंहि फिरावयास जात.

१९०० च्या फेब्रुवारींत हद्दपारीची मुदत संपून तो सेंट पिट्सबर्गला आला व प्रचारकार्य करूं लागला. गुप्त हेरांनीं त्याला पुन्हा पकडलें व दहा दिवसांनीं सोडलें. हा त्रास टाळण्याकरितां लेनिन जर्मनीमध्यें म्युनिच येथें सहकुटुंब राहूं लागला. तेथेंहि गुप्त पोलिसांचा त्रास होऊं लागल्यामुळें हें दांपत्य लंडनला राहण्यास गेलें. तेथें अत्यंत गरीबींत दिवस काढावे लागले. १९०५ मध्यें रशियांत सोव्हिएट पक्षानें सार्वत्रिक संपाचा पुकारा केला; त्यालाच सशस्त्र बंडाचें स्वरूप प्राप्त झालें. ही धामधूम १९०५ ते १९०७ चालली; त्या काळांत लेनिन पिट्सबर्ग व इतर शहरांतून व फिनलंडमधील खेड्यांतून

गुप्तपणें राहात होता. तेथें पुन्हा गुप्त पोलिसांचा धोका आल्यामुळें हें दांपत्य पॅरिस, लंडन, क्रॅको येथें १९१४ पर्यंत राहून महायुद्धाच्या काळांत बर्न व झूरिच् येथें १९१७ पर्यंत राहिलें. या सालीं फेब्रुवारींत राज्यक्रांति होऊन झारची सत्ता नष्ट झाली, रशियन लष्कराचा मुख्य सेनापति कॉर्निलेव्ह याचें, आणि नंतर केरेन्सीच्या पक्षाचें हंगामी सरकार होतें; त्या काळांतहि बोल्शेव्हिक पक्षाचा पुढारी लेनिन याला धोका असल्यामुळें या दांपत्याला गुप्तपणें अनेक ठिकाणीं राहावें लागलें. अखेर ऑक्टोबर १९१७ मध्यें पुन्हा क्रांति होऊन सोव्हिएट सरकार स्थापन झालें व त्याचा अध्यक्ष लेनिनला निवडलें. ता. २१ जानेवारी, १९२४ रोजीं लेनिन मरण पावला. या सर्व चांगल्यावाईट परिस्थितींत क्रुप्सकायाचें त्याला पूर्ण सहकार्य लाभलें; इतकेंच नव्हे तर, त्याच्या मृत्यूनंतर दफनविधीच्या आदल्या दिवशीं भरलेला 'रशियन फेडरल सोव्हिएट कॉंग्रेस'मध्यें तिनें भाषण केलें व सर्वांच्या नेत्रांतून अश्रूंचे पूर वाहविले; व अखेरपर्यंत आपलें सहचारिणीपद तिनें सार्थ केलें.

(भुस्कुटेकृत लेनिन चरित्रावरून)

## हिंदी लोकपुढाऱ्यांचीं आदर्श दांपत्यें

वरील आदर्श दांपत्याचें अनुकरण करणारीं हिंदी दांपत्यें १९२० सालानंतर महात्मा गांधींच्या राजकीय चळवळींत दिसूं लागलीं आहेत. त्यांत पंडित जवाहरलाल व कमला नेहरू हें दांपत्य बरेंच वरच्या दर्जाचें आहे. कारण या दांपत्यानें राष्ट्रीय चळवळीत भाग घेतल्यामुळें १९२० पासून १९३४ पर्यंत बहुतेक काल त्यांना तुरुंगवासांत व परदेशनिवासांत काढावा लागला. पंडित मोतीलाल यांनीं आपल्या प्रतिसंस्थानी श्रीमंतींत वाढविलेल्या या दांपत्यानें दाखविलेली देशभक्ति व स्वार्थत्याग स्पृहणीय होय. १९३० पासून अलीकडे अशीं सुशिक्षित पदवीधर दांपत्यें अधिकाधिक दिसूं लागलीं आहेत, हें राष्ट्रोन्नतीच्या दृष्टीनें मोठें सुचिन्ह होय.

## आदर्श संस्थानिक दांपत्यें

हिंदुस्थानांत सुमारें सहाशें संस्थानें असून श्रीरामचंद्र-सीता या दांपत्याप्रमाणें

स्नेहं दयां च सौख्यं यदि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकांना मुञ्चते नास्ति मे व्यथा ॥

या उदात्त भावनेनें वागणारें संस्थानिक दांपत्य आदर्शवत् होय. त्याची सांप्रतची व्यावहारिक कसोटी अशी.-- (१) स्वतः पूर्ण सुशिक्षित व निर्व्यसनी असणें, (२) संस्थानच्या वार्षिक उत्पन्नाचा फक्त एकदशांश किंवा त्याहून कमी रक्कम खासगी खर्चाला घेणें, (३) प्रजेला सुशिक्षित करणें, (४) उद्योगधंदे वाढवून संस्थानी प्रजा सुस्थित करणें, (५) प्रजेला स्वखुषीनें जबाबदार राज्यपद्धतीचे हक्क देणें.

## आदर्श जमीनदार व कारखानदार दांपत्यें

जमीनदार व गिरण्यादि कारखानदारांचाहि मोठा वर्ग हिंदुस्थानांत आहे. त्यांनींहि स्वतः सुशिक्षित होऊन शेतकरी व कामकरी यांच्या सुखसोयीकडे स्वार्थत्यागपूर्वक लक्ष दिलें पाहिजे. नफेबाजीला आळा घालून मजुरांची पगारवाढ, साक्षरता, स्त्रीमजुरांचें आरोग्य व त्यांच्या अपत्यांचें संगोपन, शिक्षण, इत्यादि सुधारणा करण्यास झटलें पाहिजे.

भरतखंड आणि हिंदु धर्म व संस्कृति यांमध्यें उच्च शिक्षणामुळें स्त्रीपुरुषांच्या संसारविषयक मतांत पाश्चात्य नवमताचें वारें शिरून भलतीच अनिष्ट क्रांति होईल कीं काय, ह्या शंकेचें निरसन होण्यास मागे यादी दिलेल्या विदुषींचें संसारी सुखी जीवन पुरेसें आहे इतकेंच नव्हे तर हिंदु विदुषींचें संसारी जीवन पाश्चात्य विद्वानांना व विदुषींना नवमतवादापासून परावृत्त करण्यास समर्थ होईल. पण अद्याप हिंदु सुशिक्षित संसारी महिलांची आणखी एक पिढी तरी जगापुढें वावरली पाहिजे, आणि डॉ. मेरी स्टोप्स या आंग्ल विदुषीप्रमाणें त्यांनींहि आपले वैवाहिक जीवनविषयक अनुभव ग्रथित केलेलें वाङमय निर्माण केलें पाहिजे.

## सुभाषितें व वचनें

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ॥

पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ।
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥

तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ।
भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषु च ॥

अकिंचिदपि कुर्वाणः सौख्यैर्दुःखान्यपोहति ।
तत्तस्य किमपि द्रव्यं यो हि यस्य प्रियो जनः ॥

अद्वैतं सुखदुःखयोरनुगतं सर्वास्ववस्थासु यत् ।
विश्रामो हृदयस्य यत्र जरसा यस्मिन्नहार्यो रसः ॥

तव स्पर्शे स्पर्शे मम हि परिमूढेंद्रियगणः ।
विकारश्चैतन्यं भ्रमयति च संमीलयति च ॥

अनङ्गेनाबलासङ्गाज्जिता येन जगत्रयी ।
स चित्रचरितः कामः सर्वकामप्रदोऽस्तु वः ॥

न हयैर्न च मातङ्गैर्न रथैर्न च पत्तिभिः ।
स्त्रीणामपाङ्गदृष्टयैव जीयते जगतां त्रयं ॥

हरिणप्रेक्षणा यत्र गृहिणी न विलोक्यते ।
सेवितं सर्वसंपद्भिरपि तद् भवनं वनं ॥

ज्योत्स्नेव नयनानंदः सुरेव मदकारणं ।
प्रभुतेव समाकृष्टसर्वलोका नितंबिनी ॥

सन्तु विलोकनभाषणविलासपरिहासकेलिपरिरंभाः ।
स्मरणमपि कामिनीनामलमिह मनसो विकाराय ॥

## प्रकरण नववें

# वैवाहिक सुखाचीं साधनें

कार्येषु मंत्री करणेषु दासी भोज्येषु माता शयनेषु रंभा ।
धर्मानुकूला क्षमया धरित्री भार्या च षाड्गुण्यवती ह दुर्लभा ॥

पतिपत्नींनीं एकमेकांची योग्य निवड मागील प्रकरणांत सांगितल्या-प्रमाणें स्वभावसाम्यादि गोष्टी पाहून केली, तरी पतिपत्निनात्यानें संसार चालू केल्यावर रोजच्या व्यवहारांत अनेक बाबींत पति व पत्नी दोघांनीं योग्य धोरण ठेवून परस्परांना एकमेकांपासून शक्य तितका कमी त्रास आणि अधिकांत अधिक सुख होईल अशी वर्तणूक ठेवली पाहिजे. रोजच्या व्यवहारांत आरोग्य व प्रपंचाचा खर्च या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्या नीट साधण्याकरितां प्रथमचेंच पुस्तकी ज्ञान—आरोग्यशास्त्र व देशी जमाखर्चपद्धति ह्या विषयाचें ज्ञान—पतीला व पत्नीलाहि अवश्य आहे, म्हणून निदान व्ह. फा. ऊर्फ मराठी सातवीपर्यंत शिक्षण तरी पति व पत्नीला असलेंच पाहिजे.

**आरोग्य :** आरोग्य चांगलें राखण्यास शरीररचना व शारीरिक पचनादि क्रिया यांचें शास्त्रीय ज्ञान असलें म्हणजे स्वतःची थंड किंवा उष्ण प्रकृति किंवा वात, पित्त, कफादि दोषांचें आधिक्य या गोष्टी समजून घेऊन, तसेंच थंडी, उन्हाळा, पावसाळा हें ऋतुमान लक्षांत घेऊन, तसेंच शहरची हवा व खेडेगांवीं हवा हे फरक जाणून रोजच्या खाण्यापिण्याचें धोरण आखतां येतें. आपला दक्षिण भाग सामान्यतः उष्ण प्रदेश आहे व उन्हाळ्यांत येथील उष्णता फारच वाढते. त्याचे सामान्य परिणाम घामोळे, घामगळवे येणें, कान फुटणें, डोळे येणें, वगैरे होतात. उष्ण पदार्थांचें तारतम्यहीन सेवन केल्यामुळें मलावरोध, घसा धरणें, कपाळदुखी, पित्तओकारी, मूळव्याध, मधुमेह, क्षयरोग, इत्यादि कष्टसाध्य, असाध्य असे रोग जडतात. ऋतुमाना-प्रमाणें योग्य आहार ठेवून आरोग्यरक्षणाची काळजी घेणें, आणि मुख्यतः

शारीरिक श्रमाचें घरकाम करणें, मोकळ्या हवेंत फिरावयास जाणें, नमस्कार किंवा इतर व्यायाम नित्य करणें, याची उपेक्षा पतिपत्नींनीं करतां कामा नये. या रीतीनें आरोग्य राखून होतां होईतों आजारी न पडण्याची दक्षता पतिपत्नींनीं घेणें, हें सुखाचें आणि डॉक्टरचीं बिलें भरावीं न लागतां कौटुंबिक काटकसर करण्याचें मोठें साधन आहे.

**प्राप्ति व खर्च :** शारीरिक आरोग्याप्रमाणें सांपत्तिक आरोग्य राखणें, म्हणजे प्राप्तीपेक्षां जास्त खर्च न करणें, वार्षिक जमाखर्चांत होतां होईतों कर्ज काढण्याचा प्रसंग येऊं न देणें, हें कौटुंबिक सुखाचें महत्त्वाचें साधन आहे. सामान्यत: अशिक्षित पत्नीला हें तारतम्य राहात नाहीं, कारण गृहराज्यांत खर्चाचें एकांगी सचीवपणच तिच्याकडे असतें, व खर्चाला वेळोवेळीं लागणारा पैसा तयार ठेवणें हें ती पतीचें कर्तव्य समजते. साधारणपणें खेड्यांत ५० ते ७५ रुपये आणि पुणे-मुंबईसारख्या शहरांत १०० ते १२५ रुपये दरमहा पगाराची नोकरी करणारे किंवा इतकेंच शहरांत घरभाड्याचें व खेडेगांवांत शेतीचें उत्पन्न असल्यास कौटुंबिक खर्चाची तोंडमिळवणी करतां येते, आणि पतिपत्नींत या बाबतींत असंतोष उत्पन्न होत नाहीं. पण हल्लीं शहरांत बेकारीमुळें आणि खेड्यांत धान्याचे भाव कमालीचे उतरल्यामुळें ज्यांना नोकरी नाहीं व स्थावर इष्टेट नाहीं, अशा कुटुंबांची स्थिति इतकी हलाखीची झाली आहे कीं, बेकार पण विचारी तरुण विवाहबंधनांत पडूं इच्छित नाहीं, आणि वैवाहिक बाजारांत अशा निर्धन बेकार तरुणांना कोणी मागणी घालीत नाहीं. पण कोणत्याहि समजांत मुलामुलींची संख्या साधारणत: समसमान असलेमुळें तरुण अविवाहित राहूं लागले कीं तरुणींवर अविवाहित राहण्याचा प्रसंग गणितशास्त्रानुसारच येणार ! कारण श्रीमंतांचें बहुपत्निकत्व व राजेरजवाड्यांचे मोठमोठाले जनाने पत्करणेची विसाव्या शतकांतील तरुणींची प्रवृत्ति कमी होत असून शिक्षणप्रसाराबरोबर अखेर सर्व स्त्रीपुरुषांत एकपत्निकत्वाचीच प्रवृत्ति ठाम होईल, हें निश्चित आहे. त्यामुळें सांपत्तिकदृष्ट्या कनिष्ठ कुटुंबांतील मुलांमुलींनीं अविवाहित राहण्यापेक्षां द्रव्यार्जनाचे कामांत सहकारिता करून विवाहबद्ध होणेंच व्यक्तिदृष्ट्या व समाजदृष्ट्या श्रेयस्कर आहे. म्हणून मुलांप्रमाणें मुलींनाहि द्रव्या-

र्जनाकरितां शक्य व जरूरीपुरतें तरी शिक्षण देणें आईबापांचें कर्तव्य आहे. आपल्या देशांत सक्तीचे प्राथमिक शिक्षणाचा तसेंच दुय्यम व धंदेशिक्षणाचाहि प्रसार अद्याप पुष्कळ होणें असलेमुळें शिक्षकशिक्षकिणींचे धंद्यास पुष्कळ वाव आहे. तसेंच आरोग्य व सुलभप्रसूतीकरितां वैद्यकीय मदत घेण्याची प्रवृत्ति सर्वत्र वाढत असल्यामुळें नर्स-डॉक्टरणीचे धंद्यांतहि स्त्रियांना क्षेत्र पुष्कळ आहे. शिवाय घरबसल्या शिवणकाम, भरतकाम, गायनवादन, हीं स्त्री-शिक्षणाचीं अंगें अनुपेक्षणीय होत चालल्यामुळें हे धंदेहि द्रव्योत्पादनार्थ पत्करणें शक्य आहे. तात्पर्य, कनिष्ठ सांपत्तिक स्थितींत पतीप्रमाणें पत्नीनेंहि द्रव्यार्जनाचे कामीं सहकार्य करून वैवाहिक आयुष्य सुखी करण्याचें ध्येय धरलें पाहिजे.

या बाबतींत आपल्या सुशिक्षित समाजांत लोकमत फार मागासलेलें आहे. सुशिक्षित स्त्रिया फक्त श्रीमंत पतींनाच वरूं इच्छितात, कारण स्वत: पतीच्या बरोबरीनें द्रव्यार्जनार्थ कष्ट करण्याची त्यांची प्रवृत्ति नाहीं. त्यांना कपडेलत्ते, दागदागिने, मोटारवाहनें, वगैरे सर्व सुखें आयतीं पाहिजेत ! उलट पक्षीं सुशिक्षित पण श्रमजीवी तरुण सुशिक्षित स्त्रीशीं विवाह करण्यास कचरतात, त्याचें कारण सुशिक्षित स्त्रियांची ऐषआरामी वृत्ति व महत्त्वाकांक्षा हेंच होय. प्रोफेसर घुर्ये यांनीं मिळविलेल्या माहितीवरून असें दिसून आलें कीं,

Only 8 wives, out of 304 were gainfully employed otherwise than in their household duties. 5 of them are primary school teachers, 2 secondary school teachers and 1 does sewing business.

३०४ दांपत्यांत फक्त आठच स्त्रिया स्वत: द्रव्यार्जनाकरितां नोकरीधंदा करणाऱ्या आढळल्या ! यावरून आपला सुशिक्षित समाज अद्याप या बाबतींत फार मागासलेला आहे. द्रव्यार्जन करतां येण्याइतकें शिक्षण मिळालेल्या स्त्रियाच आपल्या समाजांत फार थोड्या आहेत. फक्त विधवा स्त्रिया द्रव्यार्जनाच्या हेतूनें शिक्षण घेतात. पण त्या पुनर्विवाहबद्ध न होतां स्वतंत्रच राहतात ! याप्रमाणें हिंदु समाजांत विवाहसौख्याच्या दृष्टीनें पुष्कळच विस्कळितपणा आहे. तो घालविण्याकरितां स्त्रीशिक्षणाचा प्रसार

फार झाला पाहिजे. आणि सुशिक्षित स्त्रियांनीं व पुरुषांनीं आपापल्या अडचणी व मतें निर्भीडपणें समाजापुढें मांडलीं पाहिजेत, म्हणजे वैवाहिक जीवन समतोलपणा प्राप्त होण्याच्या मार्गास लागेल.

सुखाचीं आणखी साधनें कामकला, पाककला, गायनकला, साहित्य-कला हीं असून पतिपत्निसंबंधांत अत्यंत महत्त्वाची बाब ही कीं, प्रत्येक स्त्रीनें आपला पति पत्निनिष्ठ म्हणजे एकपत्निव्रतानें राहण्याकरितां प्रि० अत्रे यांच्या नाटकांतील पुढील उताऱ्यांत दिग्दर्शित केल्याप्रमाणें स्वत: आटोकाट प्रयत्न केला पाहिजे.

कांचन :—लग्नाच्या बेडींत अडकलेला आमच्यासारखा पुरुष एक-निष्ठ राहावा, याबद्दल काय उपाय ?

रश्मि :—त्या बाबतींत पुष्कळशी जबाबदारी स्त्रीवरच आहे. लग्ना-च्या बेडीचा कठोर जाच पुरुषांना भासूं नये म्हणून तिच्याभोंवतीं प्रफुल्लित प्रेमाच्या पुष्पमालांचं मोहक वेष्टण सदोदित घालावयाला पाहिजे. म्हणूनच माझें या विवाहित स्त्रियांना सांगणें आहे कीं, बायांनो, आपला शृंगार शाबूत ठेवा आणि आपले नवरे सांभाळा !

—प्रि० अत्रेकृत ' लग्नाची बेडी '

**व्यभिचार, स्वैराचार व स्वच्छता :** एकपत्निव्रत आणि पातिव्रत्य या दोन गुणांना सर्व धर्मांत फार उच्च स्थान प्राचीन काळापासून देण्यांत आलें आहे. फक्त आतां नवनीतिवादांत मात्र स्वैराचारांत खरें प्रेम दिग्दर्शित होतें, अशी तात्त्विक व गंभीर प्राचीन भूमिका नवमतवादी विद्वान् घेतात, त्याचा विचार इतरत्र केला आहेच. पण प्रेमाचा किंवा, नैतिक दृष्टीचा विचार बाजूस ठेवला तरी केवळ स्वच्छतेच्या, निर्मळपणाच्या, उष्टेपणाच्या दृष्टीनें तर याचा विचार प्रत्येक स्त्री-पुरुषाला—नवमतवादी मंडळींनाहि—करावयास पाहिजे. सुशिक्षित व सुसंस्कृत मनाची स्वाभाविक प्रवृत्ति कशी असते, याचा विचार इतर आहारविहारांत अनेक बाबींवरून करतां येईल. कपडयालत्त्याचीच गोष्ट घ्या. एका पुरुषानें किंवा स्त्रीनें वापरलेला कपडा दुसरा पुरुष किंवा स्त्री यांना वापरावयास अमंगळ वाटतो.

प्रत्येकाला आपापले कपडे स्वतंत्र असावे, दुसऱ्यानें वापरलेला कपडा घाणेरडा, मलीन, उष्टा समजून अग्राह्य मानावा, अशी समंजस माणसाची साहजिक प्रवृत्ति असते. एका कुटुंबांत चार पुरुष व चार स्त्रिया असल्यास एकमेकांचे कपडे किंवा धोतरें किंवा लुगडीं आलटून पालटून वापरावीं, अशी प्रवृत्ति पुरुषांत किंवा स्त्रियांत आढळत नाहीं. बापलेक किंवा मायलेकसुद्धां अशी कपड्यांची थारेपालट करण्यास सहजीं प्रवृत्त होत नाहींत. प्रत्येक स्त्री-पुरुषाला आपापले कपडे आपण स्वतःच एकट्यानें वापरावे, दुसऱ्या कोणीं वापरूं नये, असें वाटतें; दुसऱ्याच्या कपड्यांची साहजिक किळस येते. स्वच्छता, निर्मळपणा यांची आवड समंजस माणसांत फार असते. खाण्यापिण्याच्या पदार्थाबद्दल असेंच दिसतें. एकानें अर्धवट खाल्लेला पदार्थ, किंवा प्यालेलें पेय दुसरा इसम घेण्यास मनापासून खुषी नसतो. एकाच वेळीं एकाच पात्रांत अनेकांनीं जेवणें किंवा उष्ट्या पात्रांत जेवणें कोणाला मनापासून आवडतें काय? साधारण समजूं लागलेलीं मुलेंसुद्धां एकमेकांच्या उष्ट्या पानांत जेवीत नाहींत, आणि उष्टा केलेला पदार्थ खाण्याचें नाकारतात. ही प्रवृत्ति कां? स्वच्छता, निर्मळपणा यांना आरोग्यशास्त्राप्रमाणें तर महत्त्व आहेच, पण सुसंस्कृत किंवा समंजस मनाच्या माणसाची ही सहजप्रवृत्तिच आहे. तसेंच एकानें वास घेतलेलें फूल दुसऱ्याला चालत नाहीं, प्रत्येकाला स्वतंत्र व स्वच्छ फूल मिळावें असें वाटतें. मग स्त्रीपुरुषसंबंधांतील चुंबनालिंगनसंभोग या गोष्टींत तर स्वच्छास्वच्छतेचा, निर्मळपणाचा, उष्टेपणाचा किती नाजुक प्रश्न येतो, याचा विचार प्रत्येक पतिपत्नीनें अवश्य करावा. आमरण एका स्त्रीनें व एका पुरुषानें आपल्या एकाच विवाहित जोडीदाराशीं शरीरसंबंध ठेवावा, अशी मनाची प्रवृत्ति असणें अगदीं साहजिक आहे. पातिव्रत्याला किंवा एकपत्निव्रताला हें स्वच्छतेचें व निर्मळपणाचें कारण कोणासहि सहज पटण्यासारखें आहे. मग विवाहित स्त्रीनें व्यभिचार करावा, किंवा पतीनें वेश्यागमन किंवा परस्त्रीसंबंध करावा, ही गोष्ट समंजस शहाण्या माणसांना कशी रुचेल? वेश्यागमन म्हणजे तर गटारांतल्या घाणींत लोळण्यासारखें आहे! मोठ्या रस्त्याच्या बाजूच्या गटारांत त्या रस्त्यावरील घरांत राहणाऱ्या शेंकडो स्त्री-पुरुषांच्या वापरण्यांतलें घाण पाणी वाहात असतें; तेथून जातांना तिकडे मनुष्य

बघतसुद्धां नाहीं व नाकाशीं रुमाल धरतो. मग वेश्या किंवा गांवोगांव हिंडणाऱ्या तमाशांत गाणारणी स्त्रिया यांच्याशीं चांगले समंजस पांढरपेशे व शिकलेसवरलेले इसमहि शरीरसंबंध ठेवण्यांत आनंद मानतात, हें कशाचें द्योतक समजावें ? त्यांना अनेकांनीं उष्टाळलेल्या देहाची किळस कशी वाटत नाहीं किंवा विषयवासना पुरुषांना इतकी पशूहूनहि अधिक पशु बनविते काय ? जो मनुष्य स्वतःच्या मुलांनीं उष्टा केलेला पदार्थसुद्धां खाणार नाहीं तोच मनुष्य अनेकांनीं उपभोगलेल्या बाजारबसव्यांच्या देहाला बिलगतो तरी कसा ? मानसशास्त्रांतलें हें कोडें या लेखकास तरी उलगडत नाहीं. स्वैराचाराचे पुरस्कर्ते प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ याचा खुलाचा कसा काय करतील कोण जाणे ? पण ज्या घरांतील गृहिणी अत्यंत स्वच्छतेनें राहणारी आहे, स्वतःचें घर स्वयंपाकपाणी, कपडेलत्ते स्वतः अंगमेहनतीनें कष्ट करून स्वच्छ राखते, तीच स्त्री स्वतःचा पति वेश्यागमनी असला, व्यभिचारी असला तरी त्याचा तिरस्कार करीत नसेल, त्याच्या विषयवासनेला आदरानें व प्रेमानें वश होत असेल, तर ती पूर्ण मूर्ख व नादान नव्हे काय ? ज्या हिंदु धर्मांत सोवळ्याओवळ्याचे, खरकट्याउर्ष्ट्याचे, उपोषणजेवण, फराळ, इत्यादिकांतील खाद्यपेय पदार्थांचे स्वच्छतेच्या दृष्टीनें कडक निर्बंध आहेत, आणि जे निर्बंध अशा सुगृहिणीच हल्लींच्या सुधारकी विसाव्या शतकांतहि मोठ्या समंजसपणानें व नेकीनें पाळीत आहेत, त्यांना स्वतःच्या अत्यंत निर्मळ राखलेल्या देहाशीं वेश्यागमनी नवऱ्यानें अंगस्पर्श करावा, हें खपतें व रुचतें तरी कसें ? एवंच खरें वैवाहिक सुख इच्छिणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं अशा प्रकारच्या विवाहबाह्य संबंधापासून अत्यंत अलिप्त राहून त्याबाबतचा आपल्याबद्दलचा संशयहि आपल्या वैवाहिक जोडीदाराला न येईल अशी खबरदारी घेतली पाहिजे.

**भिक्षुक, शास्त्री, पुराणिक, कीर्तनकार आणि अनाचार :** हिंदु समाजव्यवस्थेंतील धार्मिक दृष्ट्या श्रेष्ठ स्थान वैदिक ब्राह्मण, शास्त्री, पुराणिक व कीर्तनकार यांना आहे. भूदेव, वेदोनारायण, वर्णानां ब्राह्मणो गुरुः, इत्यादि अत्युच्च उपपदांनीं या वर्गाला गौरविलें जातें. मनुस्मृत्यादि ग्रंथांत ब्राह्मणवर्णाचा आचारधर्म इतर वर्णांहून अधिक कडक

सांगितला आहे. शासनव्यवस्थाहि सर्वांहून अधिक सौम्य व सवलतीची या वर्गाला नियोजिली आहे ती इतकी कीं, इतर वर्णांतील विद्वज्जनांनीं या पक्षपाताबद्दल खुद्द मनुस्मृति ग्रंथाला भडाग्नि देऊन तो ग्रंथ नामशेष करण्याचे प्रयत्न केले आहेत. खुद्द ब्राह्मण पंडितांत परिवर्तनवादी व सनातनी असे पक्ष निर्माण झाले असून नव्या कालमानानुसार नवी स्मृति रचण्याचे उपक्रम परिवर्तनवादी पंडितांनीं केले आहेत. सनातनी शास्त्रीपंडितहि या आपत्तीचा विचार खडबडून जागे होऊन करूं लागले आहेत. वेदांच्या छापील पोथ्या-पुस्तकें झाल्यामुळें वेदपरायणी वेदमूर्तींचे आणि धार्मिक बुद्धि कमी होत असल्यामुळें पूजा, अभिषेक, लग्नमुंज, श्राद्धपक्ष, या कर्मकांडाचें महात्म्य व आचार लुप्त होत आहेत. पण दुसऱ्या वर्गांना व वर्णांना दोष देण्यापूर्वी, आत्मनिरीक्षण करून या वैदिक, भिक्षुक, शास्त्रीपंडित, हरि-भक्तिपरायणादि ब्रह्मवृंदाची आचारसंपन्नता कितीशी श्रुतिस्मृतिपुराणोक्त परंपरेप्रमाणें अबाधित राहिली आहे, याचाहि विचार दूरदृष्टी, निःपक्षपाती विद्वान् करूं लागले आहेत. वैवाहिक नीति, हा याच सदाचरणाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. अशी वस्तुस्थिति असतां भिक्षुक शास्त्रीपंडित वर्गानें व्यभिचार, वेश्यागमनादि भ्रष्टाचारापासून सर्वस्वीं अलिप्त राहिलें पाहिजे, इतकेंच नव्हे तर, हॉटेलांत खाणें, नाटकांत कामें करणें, वगैरे अनेक बाबतींत अत्यंत विवेक पाळला पाहिजे. श्राद्धपक्षादिकांत क्षण घेणारे भिक्षुक यांना देवगण पितृगण मानून किंवा पुराणकथा करणारे शास्त्रीपंडित यांना पूज्य मानून त्यांना नमस्कार दंडवत घालतांना, हे भिक्षुक व हरिदास-पुराणिक, आचारभ्रष्ट असल्यास विचारी माणसाच्या मनाला किती असह्य वेदना होत असतील, आणि असल्या आचारभ्रष्ट भिक्षुकांबद्दल व कथेकरी पुराणिकां-बद्दल किती उद्वेग, संताप व तिरस्कार वाटत असेल, याचा त्यांनीं नीट विचार करावा. गृहस्थाश्रमी ब्राह्मण वर्गाची व इतर वर्गांची धर्मश्रद्धा शिथिल वा नष्ट होण्यास असले दुराचारी भिक्षुक व शास्त्री व कथेकरीच विशेषतः कारण आहेत. शीलसंपन्नतेला, सतिशीले गुणा भान्ति ।। शीलं परं भूषणं ।। किं कुलेन विशालेन शीलमेवात्र कारणं ।। वृत्ततस्तु हतो हतः ।। शीलं रक्षतु मेधावी ।। शीलं सर्वत्र वैधनं ।। वगैरे सुभाषितें अत्यंत महत्त्व देतात. म्हणून वैदिक-

भिक्षुकादि वर्गांनीं शीलसंपन्न असलेंच पाहिजे. धर्मभावना व धार्मिक नित्यनैमित्तिक कृत्यें ब्राह्मणगृहस्थवर्गानें व इतर वर्णांनीं करावीं व भिक्षुकादि वर्गांचा चरितार्थ चांगला चालावा म्हणूनच या वर्गांनीं अत्यंत सदाचारी राहिलें पाहिजे. आणि या बाबतींत स्त्रियांनींहि जागरूकता दाखविली पाहिजे.

## पातिव्रत्य ऊर्फ पत्नीची अव्यभिचारी पतिनिष्ठा

पत्नीचें पातिव्रत्य म्हणजे पतीला देवासमान मानन स्वतः त्याच्या गुलामाप्रमाणें वागणें असा अर्थ नव्हे ! हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें पत्नी ही पतीची अर्धांगी असून 'धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि' अशी शपथ विवाहसमयीं पति घेतो; त्याची पूर्ण अंमलबजावणी पतीकडून करवून घेणारी देवता स्वतः पत्नीनें बनले पाहिजे. अर्थात् अशा देवतेचा पहिला गुण पातिव्रत्य म्हणजे शरीरानें, वाणीनें किंवा मनानेंहि तिनें परपुरुषसमागमजन्य अनाचार करतां कामा नये. 'सीझर्स वाईफ मस्ट बी अबव्ह सस्पिशन' या म्हणीप्रमाणें पत्नीविषयीं पतीची पूर्ण खात्री आजन्म टिकेल, असें पत्नीचें चोख वर्तन पाहिजे. अशा पतिनिष्ठ स्त्रिया हिंदु समाजांत अद्यापहि शेंकडा ९०।९५ आहेत. अशा एकपतिनिष्ठ स्त्रियांनीं या बाबतींत समान हक्क बजावण्याचें म्हणजे स्वतःच्या पतीला एकपत्निनिष्ठ राहण्यास भाग पाडण्याचें धाडस व न्यायीपणा दाखविणें जरूर आहे; आणि स्त्रीशिक्षणानेंच हें धाडस उत्पन्न होणार असल्यामुळें आपल्या अत्यंत नीतिमान हिंदुस्त्रीसमाजालाहि शिक्षणयुक्त केलें पाहिजे. अशा सुशिक्षित पतिनिष्ठ स्त्रियाच स्वतःच्या पतीला पूर्ण अंकित व धाकांत ठेवूं शकतील. पतीनें परस्त्रीगमन केल्यास त्याच्या पत्नीनें रोजच्या व्यवहारांत महात्मा गांधींनीं शिकविलेला असहकारितेचा मार्ग अवलंबिला तर तें योग्यच ठरेल. शिवाय कायद्यानें याला आळा घालावा (प्रकरण ११ वें पाहा).

पुरुषांच्या गैरवर्तनाबद्दल इतकें लिहिल्यावर विवाहित स्त्रियांनीं आपलें पातिव्रत्य संभाळण्याची किती आवश्यकता आहे, हें पुढील उताऱ्यांत उत्तम दिसून येईल.

"Bad as is the conjugal infidelity in the husband, it is much worse in the wife : a proposition that it is necessary to maintain by the force of reason, because the woman, as a sisterhood, are prone to deny the truth of it. They say that ADULTERY is adultery, in men as well as in them, and that therefore, the offence is as great in one case as in the other. As a crime abstractedly considered, it certainly is; but as to the consequences, there is a wide difference. In both cases there is the breach of a solemn vow; but there is this great distinction, that the husband by his breach of that vow, only bringeth shame upon his wife and family; whereas the wife, by a breach of her vow may bring the husband a spurious offspring to maintain, and may bring that spurious offspring to rob of their fortunes, and in some cases of their bread, her legitimate children. So that here is a great and evident wrong done to numerous parties, besides the deeper disgrace." प्रसिद्ध इंग्रज लेखक कॉबेट यानें 'अॅडव्हाइस टु यंग मेन' या आपल्या पुस्तकांत वरीलप्रमाणें इषारा दिला आहे. तो सर्व स्त्रीपुरुष वाचकांना सहज पटण्यासारखा आहे. कॉबेटनें मांडलेला परपुरुषसंततीचा मुद्दा अत्यंत चिंत्य आहे; पण ह्या विसाव्या शतकांत व पुढील भविष्य काळांत संततिनियमनाच्या साधनांच्या सुलभतेमुळें व प्रसारामुळें हा व्यावहारिक मुद्दा व आक्षेप बहुधा उरणारच नाहीं. तथापि व्यभिचाराची गुन्हेगारी पति व पत्नी दोघांचेहि बाबतींत सारखीच गर्हणीय ठरते व त्यामुळें स्त्रियांवर एतद्विषयक जबाबदारी अधिकच पडते, कारण निसर्गानें ठेवलेलें दडपण मनुष्यनिर्मित साधनांनीं नष्ट केल्यामुळें पुरुषाप्रमाणेंच स्त्रिया स्वातंत्र्य मागूं लागल्यास त्यांना सांप्रतच्या समाजरचनेंत हें स्वातंत्र्य उपभोगण्यास संधि पुष्कळच मिळणारी आहे; कारण पुरुषवर्ग नोकरीधंद्यानिमित्त दिवसा बहुतेक घराबाहेर राहणार, व घरांत साम्राज्य स्त्रियांचें असणार ! मग केवळ परस्पर विश्वासाशिवाय दुसरा कोणताच निर्बंध स्त्रियांवर उरत नाहीं. अर्थात् अशा गोष्टी

शेजाऱ्यापाजाऱ्यापासून गुप्त फारशा राहणें शक्य नसतें, व एकंदर कुटुंबाला व घराण्याला कलंक लागून लहानमोठ्या सर्वांच्याकडून बदलौकिक व बेअब्रू सर्वत्र पसरते; पण ही लाजलज्जा कांचेच्या भांड्यासारखी एकदां प्रथम फुटण्यापूर्वीच जपण्यांतली आहे. एकदां ती फुटली म्हणजे कायमची; व त्यामुळेंच एकदां वांकडें पाऊल पडल्यानंतर सहजच मनुष्य—स्त्री काय किंवा पुरुष काय—निर्लज्ज, कोडगा, बेपर्वाई बनतो. म्हणून या बाबतींत पति-पत्नींनीं एकमेकांशीं एकनिष्ठ राहण्याची अत्यंत खबरदारी घेतली पाहिजे. खरें वैवाहिक प्रेम असेल तर ही एकनिष्ठा सहजसाध्य आहे, असें मत डॉ. मेरी स्टोप्स यांचें आहे.

> " All the deepest and highest forces within us impel us to evolve an ever nobler and tenderer form of lifelong **MONOGAMY** as our social ideal. "
>
> —*M. Stopes*, 'Married Love.'

भारतीय संस्कृतींत पातिव्रत्याचा महिमा इतका गायिला आहे कीं, तो आधुनिक चिकित्सक युगांत हास्यास्पद झाला आहे. 'पतीला देव मानून जन्मोजन्मीं हा पति मिळावा' अशी भावना धरण्याचा उपदेश खुद्द आजचा हिंदु स्त्रीसमाजहि मान्य करण्यास तयार नाहीं. मग पाश्चात्य संस्कृतींतील लेखकांनीं या भावनेची टवाळी केल्यास नवल तें काय? आजच्या नवमत-वादी युगांत, पतीला हितकर्ता मित्र मानावा, व ती भावना कोणत्याहि कार-णानें नष्ट झाल्यास घटस्फोट करावा; हा आदर्श पुरस्कृत केला जात आहे. यांतूनच उपसिद्धांत असा निघतो कीं, पति व पत्नी उभयतांना एकमेकांबद्दल 'हितकर्ता मित्र' ही भावना कायम टिकवितां आल्यास घटस्फोट करूं नये. पण हा उपसिद्धांत नवमतवादी मंडळी निरपवाद मान्य करतीलसें वाटत नाहीं; कारण नवमतवादांत, शारीरिक आकर्षणाला प्राधान्य विवाहसंस्थेंत आहे असें मत मोठमोठ्या अधिकारी लेखकांनीं—उदाहरणार्थ, डॉ. मेरी स्टोप्स वगैरे—प्रतिपादिलें आहे. शारीरिक आकर्षणाला प्राधान्य द्यावें, कीं मानसिक आकर्षणाला द्यावें, हाच अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असून प्राचीन भारतीय संस्कृति आणि विसाव्या शतकांतील नवमतवाद या दोघांमध्यें याच मुद्यावर मतभेद आहे. पण मानसिक आकर्षण म्हणजे स्वभावसाम्य हेंच प्रेमाचें

प्रधान अंग असून शारीरिक आकर्षण दुय्यम आहे, हें पूर्ण अनुभवान्तीं पटतें; असो. दोन्ही प्रकारचें आकर्षण टिकविण्याच्या साधनांचा आणखी विचार करूं.

१. कामकला :—कामकला याचा अर्थ स्पर्शसुख. याचा लाभ पतिपत्नींनीं उभयतांना घडूं देणें. याचा अर्थ स्पष्टच असल्यामुळें या लाभाच्या मार्गांतील अडचणींचा विचार करूं. हल्लींच्या प्रचलित विवाहपद्धतीला या बाबतींत बालविवाहच म्हटलें पाहिजे. कारण पत्नीचें वय पंधरासोळा किंवा त्याहून कमी (मागासलेल्या जातींत) व पतीचें वय बावीस ते पंचवीस असतें. नूतन विवाहित वर फारसा शिकलेला नसल्यास तो एकत्र कुटुंबांतून बाहेर पडून विवाहोत्तर स्वतंत्र बिऱ्हाड तत्काळ करण्यास पत्नीच्या अप्रौढ वयामुळें व वडीलधाऱ्यांच्या कदरीमुळें बिचकतो. त्यामुळें विवाहोत्तर गर्भाधानविधि लवकर उरकला तरी या नूतन दांपत्याची गांठ रात्रीच्या वेळीं अंधार कोठडींत गुपचुप पडणार आणि निद्रेच्या तंद्रींत पुरुषाची शारीरिक गरज भागवून पतिपत्नी अलग होणार, ती दुसऱ्या रात्रीपर्यंत! पत्नीच्या बालवयामुळें ती अधिकच भिडस्त! तात्पर्य, असल्या कामपूर्तीला जड पाशवीवृत्ति हेंच सार्थ नाम होय! कामकला म्हणजे कामपूर्तीचें सोपपत्तिक ज्ञान ही एक कला आहे, ती अवगत केली पाहिजे. पण हें ज्ञानच अशा अप्रौढ पतिपत्नीना नसतें. म्हणून विवाह प्रौढपणीं म्हणजे तरुणाचा पंचविसाव्या व तरुणीचा अठराव्या वर्षानंतर झाला पाहिजे. एवढें साधल्यावर पुढील अडचण व तीच मोठी सार्वत्रिक अडचण अपत्यापत्तीची! हल्लीं पुढारलेल्या जातींत वधूचें वय सोळाअठरापर्यंत वाढल्यामुळें ही आपत्ति लवकरच उद्‌भवते. विवाह, गर्भाधान व अपत्यप्राप्ति हे तिन्ही कार्यक्रम हल्लीं बहुधा लग्नानंतर वर्षादीड वर्षांत लगोलग उरकतात. स्त्रीपुरुष वाचकहो, थोडें सिंहावलोकन केलें तर प्रत्येक विवाहिताचा स्वानुभव असेंच सांगेल कीं, खरोखर स्पर्शसुखाचा खरा आनंद कसा घ्यावा, याची तोंडओळख झाली नाहीं तोंच नूतन पत्नीला गर्भारपण आल्यामुळें नूतन पतीला चिरवियोग गर्भारपणचे तीनचार महिने व बाळंतपणाचे तीनचार महिने इतका संन्यासयोग नशिबीं आलाच. कोणताहि कामकलाभिज्ञ रसिक पति असल्या तात्कालिक अपत्यप्राप्तीचें सानंद अभिनंदनपूर्वक सुस्वागत कसें करील! खरोखर पंचवीस वर्षेपर्यंत ब्रह्मचर्य

पाळल्यानंतर उत्फुल्ल तारुण्यसुलभ सुख विवाहोत्तर अधूनमधून बहुधा वडिल माणसांच्या नजरबंदीत थोडेंसें लाभेल त्यानें तरुणाचें कसें समाधान होणार! प्रौढ तरुण पत्नीबद्दलहि तेंच म्हणतां येईल. म्हणून ही अपत्य-प्राप्ति तनये तनयोत्पत्तिः सुरेंद्रभवनेषु किमाधिक्यं ॥ या सुभाषितानुसार तरुण पतिपत्नीच्या आईबापांना स्वर्गसुखसमान वाटली, तरी तरुण पति-पत्नीला ती खास आपत्तीच वाटणार! मग याला उपाय काय? अर्थात् 'बर्थ-कंट्रोल.' आणि संततिनियमनाची जरूरी खरोखर पुरुषांपेक्षां तरुण पत्नीलाच अत्यन्त आहे. कारण शीघ्र अपत्यप्राप्तीमुळें तिचें तिहेरी नुकसान होतें तें (१) स्पर्शसुखहानि, (२) शारीरिक दौर्बल्य व अपत्यप्राप्तीमुळें अपत्यसंगोपनाची अकालीं जबाबदारी, आणि (३) पतीच्या स्वैराचाराची भीति. लौकर लौकर आलेल्या बाळंतपणामुळें तरुण पत्नी क्षीण, दुर्बल व बहुधा क्षयरोगी बनते. आणि पति स्वस्त्रीप्रेमी असला तरी दुर्निवार्य शारीरिक गरजेमुळें स्वैराचारी व्यसनी बनून घाणेरड्या शारीरिक रोगांनीं पछाडला जाऊन सर्व कुटुंबाचा आरोग्यनाश व बहुधा स्वतःचा प्राणनाश ओढवून घेण्याचा संभव असतो. याला जबाबदार कोण? अर्थात् तरुण. पण अज्ञानी संततिनियमनसाधनाऽज्ञानी पत्नीच जबाबदार आहे. म्हणून पती-पेक्षां या संततिप्रतिबंधक साधनांचा प्रत्यक्ष उपयोग पत्नीनेंच तत्परतेनें केला पाहिजे. अपत्यप्राप्तीचे बाबतींत हल्लींच्या सुशिक्षित समाजांत काय स्थिति आहे, ती प्रो. घुर्ये यांना मिळालेल्या माहितीवरून व पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

## Marriage and Family

There is only one case where 14 children were born, while 70 families have no children born at all. A little over 17 p. c. of the wives were married at ages 13 and bellow, while barely 6. p. c. of the husbands were married before they were eighteen years of age. Nearly 55 p. c. of the males were married during the age period 23–27, where as nearly 70 p. c. of the females were married at the age period 14–19 comprising 6 years.

मुलें

| कुटुंबांतील अपत्यांची संख्या | कुटुंबें |
|---|---|
| ० | ७० |
| १ | ६३ |
| २ | ६२ |
| ३ | ४१ |
| ४ | २५ |
| ५ | १६ |
| ६ | १३ |
| ७ | २ |
| ८ | ३ |
| ९ | २ |
| १० | २ |
| ११* | १ |
| १४ | १ |
| एकूण | ३०१ |
| एका दांपत्यापोटीं जन्मलेल्या मुलांमुलींचें सरासरी प्रमाण २·२ | एका दांपत्यापोटीं चौकशीच्या वेळीं हयात असलेल्या मुलांमुलींचें प्रमाण १·९ |

* दहा प्रसूती, पैकीं एक जुळी.

२. पाककला म्हणजे खाद्यपदार्थ बनविण्याचें ज्ञान. घरकामापैकीं स्वच्छतेनें रुचकर पदार्थ शिजविणें हें काम फार अवघड आहे. दिवसारात्रीं सुग्रास भोजन मिळाल्यास पतीची मर्जी आठ आणे खात्रीनें सांभाळतां येईल. म्हणून प्रत्येक गरीब श्रीमंत स्त्रीनें पाककलेचें ज्ञान उत्तम संपादन केलें पाहिजे. आणि श्रीमंतीच्या मानानें झाडसारव, भांडींकुंडीं, कपडे धुणें, वगैरे कामें मोलमजुरीनें करवून घेतलीं तरी स्वयंपाकाचें काम खुद्द मालकिणीनें करावें. याप्रमाणें पाककला व कामकला यांत निपुण असलेल्या स्त्रीच्या पतीचें एकपत्निव्रत सहसा कधींहि ढळणार नाहीं.

३. गानकला :—वरील दोन कलांमध्यें आणखी दोन कलांची भर पडल्यास त्या दांपत्याचें सुख दुधांत साखर पडल्याप्रमाणें फारच बहारीचें

५६२८



होईल. गायनाची कला ही निसर्गतःच स्त्रियांचा प्रांत आहे; कारण कंठ-माधुर्य पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें उपजतच अधिक असतें. म्हणून सामान्य शिक्षणांतच गायन विषयाचा अन्तर्भाव झाला पाहिजे, म्हणजे प्रत्येक शिक्षित स्त्री बहुधा गानकुशल होईल व आपलें वैवाहिक जीवन आनंदमय करील.

४. साहित्यकला :—साहित्यकला म्हणजे लेखनवाचनाचें चांगलें ज्ञान. हल्लीं शिक्षित कुटुंबांत वृत्तपत्रवाचन हा एक रोजचा व्यवसाय झाला आहे. पण मोठे पुरुष वर्तमानपत्रें वाचतात, स्त्रिया तितक्या शिकलेल्या घरोघर नसल्यामुळें वाचनाचा आनंद उभयतां स्त्रीपुरुषांना घेतां येत नाहीं. ही विषमता नष्ट होण्यास प्रत्येक स्त्रीस जगाचा भूगोल, हिंदुस्थानचा व ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास इतकें म्हणजे मॅट्रिकपर्यंतचें ज्ञान आवश्यक आहे. म्हणजे वृत्तपत्रांतील ताज्या बातम्या समंजसपणें वाचण्याचें ज्ञान प्रत्येक स्त्रीला होऊन पूर्वपरंपरेनें हरिविजय-रामविजयादि पुराणग्रंथ रात्रीं स्त्रीपुरुषांनीं एकत्र जमून वाचण्याचा प्रघात आहे त्याप्रमाणें वृत्तपत्रवाचन घरोघर होऊं लागलें पाहिजे. तसेंच निबंधलेखनांतलें पत्रलेखन म्हणून जें अंग आहे, त्यांतहि प्रत्येक स्त्री निपुण झाली पाहिजे. कारण पतिपत्नीच्या वियोगाच्या दिवसांत म्हणजे एकमेकांपासून परगांवीं वास्तव्य असतांना पत्रव्यवहार हाच परस्पर मनविनोदनाचा एकमेव मार्ग होय. उत्तम पत्र लिहिणें हें उत्तम लेख लिहिण्याइतकेंच अवघड आहे, व अशा पत्रव्यवहाराचे आदर्श नमुने म्हणून कांहीं सुशिक्षित पतिपत्नींमधील पत्रें पुस्तकरूपानें प्रसिद्ध होणेंहि आवश्यक आहे. मराठी वाङ्मयांत हें एक दालन उघडणें अवश्य असून भावी तरुणतरुणींचें आयुष्य सुखमय करण्याचें तें एक खात्रीचें साधन आहे. अशा पत्रव्यवहाराचे एकदोन नमुने येथें देतों. सदरहू पत्रें त्यांतील विशेष खासगी स्वरूपाचा भाग गाळून छापणेस संमति दिल्याबद्दल मी या आमच्या मित्रवर्याचा फार आभारी आहें.

श्री

पाही सदा मी, परी केवि पत्नि* भासे मला।
... ... ... नवोनव ॥

मु. .. .... ता. १९।२।१९....

प्रिय पत्नी सौभाग्यवती हिजला,

प्रेमी पतीचे अनेक आशीर्वाद विशेष. तारीख मजकूरपावेतों इकडील कुशल असे. तुझें पत्र बरेच दिवसांत आलें नाहीं, म्हणून काळजी लागली आहे. तरी हें पत्र पावतांच उत्तर पाठवावें. आज ता. १९।२।१९.... रोजीं आपल्या लग्नास दोन वर्षें पुरीं झालीं. त्या आनंदाच्या दिवसाची आठवण होऊन हें पत्र लिहीत आहें. मला तुझ्यासारखें गुणसंपन्न स्त्रीरत्न लाभलें यामुळें मी आपणास मोठा भाग्यवान् समजतों. गेल्या दोन वर्षांत अगदीं लग्नदिवसापासून तुझ्या दृढ परिचयानें तुझे जे एकेक गुण माझ्या निदर्शनास आले आहेत, त्यामुळें तुझ्यावरील माझे प्रेमास सारखी भरतीच चालू आहे. आज विवाहदिवसाच्या आठवणीनिमित्त तुझ्या गुणांचें सविस्तर वर्णन करण्याचें मीं योजिलें आहे. मनुष्य स्वभावतःच स्तुतिप्रिय असतो. त्यामुळें हें गुणवर्णन वाचून तुला व तुझ्या माहेरच्या सर्व माणसांना आनंद वाटेल.

मी लग्नापूर्वीं तुला पाहणेस आलों, त्या वेळीं तुझी कपडयालत्त्यांची ऐट, सुंदर केशरचना, तीव्र व चलाख दृष्टि यांनीं माझें मन आकर्षण केलें. लग्नसमारंभांत तुझा व तुझ्याकडील सर्व मंडळीचा थाटमाट पाहून त्यांत अधिकच भर पडली. तथापि केवळ बाह्य देखाव्यावर खूष होणारा मी माणूस नाहीं. गुणाः पूजास्थानं गुणिषु । नच रूपं नच धनं ॥ याप्रमाणें बुद्धीची हुषारी व संसारांतले गुण पाहून प्रेम करणारा मी आहें, त्यामुळें तुझे स्वभावांतले गुण प्रत्यक्ष अनुभवानें कळेपर्यंत मी फार साशंक होतों. पण विवाहसमारंभ आटोपून ....शहराहून आपण घरी आलों, त्याच दिवसापासून तुझे एकेक गुण निदर्शनास येऊं लागले; ते—

*मुळांत किंचित् बदल करून.

१. घरकामाचें वळण :—पहिल्याच दिवशीं जेवणाचे वेळीं झटपट पाटभांडीं मांडून व जेवणारांचे पानाकडे नीट लक्ष देऊन जेवणारांना कांहीं मागावें न लागतां सर्व पदार्थ तूं पटापट वाढलेस, हें तुझें घरकामांतलें वळण पाहून मला संतोष वाटला. पुढें लवकरच घरकामाचा सर्व भार तुझे एकटीवर पडला, तरी रोज सांजसकाळ जेवण, व मध्यंतरीं खाणेंपिणें, वगैरे अगदीं वेळच्या वेळीं मिळूं लागल्यामुळें व विशेषतः पाहुणे आले असतांना, आणि तुझे वडीलहि येथें येऊन दोन महिने राहिले असतांना, त्या वेळीं सर्व घरकाम निरलसपणें काळजीपूर्वक करतांना तुला पाहून तुझ्यावरील प्रेमास खरी सुरुवात झाली.

२. स्वयंपाकांतलें नैपुण्य :—पण घरकामापेक्षांहि सर्व प्रकारचे पदार्थ चांगले करतां येणें हा अधिक महत्त्वाचा गुण आहे. मला लग्नापूर्वी मुंबईंत अनेक मराठी, गुजराथी, मद्रासी खाणावळींत जेवण्याचा योग आल्यामुळें मला विशेष चवीचें जेवण लागतें, आणि उत्तम स्वयंपाक करणें निदान प्रथम तरुणपणांत थोड्या स्त्रियांना साधतें. कित्येक चांगल्या पोक्त अनुभवी बायकांपेक्षांहि तुला चांगला स्वयंपाक करतां येतो अशी पाकशास्त्रकुशल पत्नी मिळाल्यामुळें मला निरंतर आहारसुखाचा लाभ झाला आहे, त्यामुळें तुझ्यावरील प्रेम अधिक दृढ झालें आहे.

३. पतिपत्निभाषण विनोद :—माझा स्वभाव फारसा बोलका नाहीं, व साधारणपणें लग्नानंतर ४।५ वर्षें झालीं तरीसुद्धां स्त्रिया नवऱ्याबरोबर भरपूर मोकळेपणानें बोलत नाहींत. पण, तुझ्या बोलक्या स्वभावामुळें तूं अगदीं पहिल्या दिवसापासून मजबरोबर मोकळेपणानें बोलूं लागलीस, इतकेंच नव्हे तर थट्टाविनोदहि करूं लागलीस, यामुळें मला गोड संभाषणाचा आनंद भरपूर मिळत आहे; व या तुझ्या बोलक्या स्वभावामुळें व मार्मिक टीकाविनोदामुळें माझे तुझ्यावरील प्रेमांत भर पडली आहे.

४. आजारीपणांतील शुश्रूषा :—लग्नानंतर पुढें जून महिन्यांत मला बराच ताप येऊं लागला, त्या वेळीं तुझ्या गुणाची परीक्षा झाली. त्या आजारीपणांत औषधपाणी, खाणेंपिणें, वगैरे सर्व बाबतींत तूं अत्यंत काळजीपूर्वक माझी शुश्रूषा केलीस, त्यामुळें मला माझ्या प्रेमळ वडील व मातोश्रींची आठवण

होई; व 'भोज्येषु माता' हें वचन तूं सार्थ केलेलें पाहून माझें मन तुझ्याबद्दल प्रेमादरानें अधिक भरलें आहे.

५. पत्ते, नाटकसिनेमाची आवड :—हुषार माणसाची सर्व कामांत प्रगति असते. मला स्वतःला पत्ते, गंजिफा, बुद्धिबळें, सोंगट्या, वगैरे सर्व प्रकारचे खेळ येतात. नाटक, सिनेमा, गायन यांची तर मला फार आवड आहे व पत्नीलाहि या सर्वांची आवड असावी, अशी माझी पूर्वीपासूनची इच्छा तुझ्यामुळें पूर्ण झाली आहे. कारण तुला व तुझे माहेरच्या सर्वच माणसांना नाटक, सिनेमा, गायन, पत्ते, वगैरे सर्व गोष्टी आवडतात; आणि बालगंधर्व, पेंढारकर, वगैरेंची अनेक नाटकें तूं लग्नापूर्वीं पाहिलीं असून अद्यापहि तो क्रम चालू असल्यामुळें त्याबद्दलची चर्चा तुझेबरोबर मला नेहमीं करतां येते. त्यामुळें समानशीले व्यसनेषु सख्यं ॥ या न्यायानें तुझें माझें प्रेम वाढावें हें साहजिकच आहे.

६. कदर व दरारा :—लग्न होऊन सासरीं गेल्यावर घरांतील नात्याचीं लहानथोर माणसें, तसेंच घरांतलीं चाकरमाणसें शेजारीपाजारी यांनीं आपल्याबरोबर नीट वागावें, फाजीलपणा किंवा चेष्टा करूं नये, अशी वागणूक ठेवणें नूतन वधूला फार अवघड असतें. विशेषतः तुझें लग्नापर्यंत सर्व आयुष्य मुंबई शहरांत गेल्यामुळें शहरी वळणाच्या तुझ्यासारख्या स्त्रीला खेडेगांवी वळणाचीं माणसें नांवें ठेवण्यास टपलेलींच असणार; त्यामुळें मला फार काळजी वाटे. पण "ए हीरो इज ए हीरो अॅट ऑल पॉइंट्स" या म्हणीप्रमाणें तुझी वेळप्रसंगीं करडी नजर व कठोर भाषा व वागणूक असल्यामुळें सर्वांना तुझा धाक वाटतो. मला मिळमिळीतपणा मुळीं आवडत नाहीं म्हणून दुसऱ्याचे दोष निर्भीडपणें सांगण्याचें तुझें धाडस पाहून मला कौतुक वाटतें; आणि दर्शन गुणवंताचें नाचवी प्रेम लहरी ॥ अशी माझी मनःस्थिति झाली आहे.

७. शृंगार :—या बाबतींत अनेक नाटकें सिनेमा पाहून बनलेलें सर्व प्रकारचें यथायोग्य आचरण तुझेकडून लाभल्यामुळें या विषयांतला आनंद मला आतांपर्यंत सतत लाभला आहे. खेडेगांवांत व शहरांतहि पुरुष बाहेरख्याली कां बनतात, याचें कारण आतां माझ्या बरोबर लक्षांत येऊं लागलें आहे.

८. अपत्यप्राप्ति व अपत्यसंगोपन :––आपल्या या वाढल्या प्रेमलतेवर पहिली कलिका नुकतीच उमलली असून तिचें संगोपन तूं उत्तम प्रकारें करीत असल्याचें मला नुकतेंच तुझे माहेरीं पाहावयास मिळालें. वास्तविक पहिले बाळंतपणांत बालकाच्या शुश्रूषेचें बहुतेक काम घरांतील वडीलधाऱ्या बायकांवर पडतें. पण आपल्या प्रथम कन्यकेचें तूं प्रेमळपणानें संगोपनकार्य करतेस, हें पाहून मला समाधान वाटतें.

९. महत्त्वाकांक्षा :––वरील सर्व गुणांत आणखी भर म्हणजे मी या तालुक्याचे ठिकाणीं शाळेंत मास्तरकी करीत न बसतां वकिलीची परीक्षा देऊन शहरांत धंदा करून नांव व पैसा मिळवावा, असा तुझा आग्रह चालू आहे. तोहि विचार मला पटून मी त्या उद्योगास लागणार आहें. असो. पत्र फारच लांबलें, म्हणून आपले विवाहाचे वाढदिवसानिमित्त तुझ्या गुण-वर्णनपर बनविलेला हा पत्ररूपी नवरत्नहार पाठवीत आहें तो तुला पसंत पडो, अशी इच्छा करून हें पत्र संपवितों. वडील मंडळीस नमस्कार. कळावें, हे आशीर्वाद.

––तुझा प्रेमी पति.

*　　　*　　　*

श्री

मानस कां बधिरावें हें । बघतसे खिन्न जगतां ।। गृह-शृंखला या ।
दृढबद्ध पाया । बल ना भेद तया होता ।।

मुक्काम ....ता. १०।१०।१९....

प्रिय पत्नी सौभाग्यवती मु.... हिजला

प्रेमी पतीचे अनेक ...विशेष. तारीख मजकूरपावेतों आम्ही खुशाल आहों. तुझें खुशालीचें काल पत्र आलें तें पावलें. तूं दुसऱ्या बाळंतपणाकरितां माहेरी गेलीस, नव्हे तुला जावें लागलें, कारण येथें आपल्या घरांत पोक्त अनुभवी ममतेनें बाळंतपण करणारें बायकोमाणूस नसलेमुळें आणि विशेषतः येथें मॅटर्निटी होमची अद्याप सोय नसलेमुळें तुला माहेरीं पाठविणें मला भाग पडलें. तुला नूतन होणाऱ्या अपत्याबद्दलची सुखकर आशा म्हणजे पुत्र-प्राप्तीची आशा, तसेंच गर्भारपणीं होणारा त्रास व खाण्यापिण्याच्या वासना याबद्दल तूं येथें असेपर्यंत तुझेंमाझें निःसंकोचपणें बोलणें होत असे. तुला

उत्तरोत्तर होणारा त्रास हलका वाटावा, म्हणून पांचव्या महिन्यांतच माहेरच्या प्रेमळ माणसांत मीं तुला पाठविलें, व तेव्हांपासून, तूं प्रसूत होऊन मुलगा झाल्याची आनंदकारक बातमी कळावी म्हणून अधीर झालों होतों. पुत्र-प्राप्तीची तुला तर फारच उत्कंठा होती. पण अखेर तुला मुलगीच झाल्याचें तुझ्या वडिलांचें पत्र आलें तेव्हां माझी निराशा झाली. तुझें मन तर फारच उद्विग्न झालें असेल. सर्वच गोष्टी माणसाच्या इच्छेप्रमाणें देव करीत नाहीं. तथापि देव सर्व गोष्टी आपल्या बऱ्यासाठींच करतो ही दृढश्रद्धा ठेव व खट्टू होऊं नकोस. आणि मुलगा व मुलगी! मातेला कसा फरक वाटणार! मुलगी झाली तरी तुझ्या प्रेमळ हृदयाला तुझें नूतन कन्यारत्न पुत्राप्रमाणेंच आवडत आहे, असें तुझें पत्र वाचून मला आश्चर्य व समाधान वाटलें. पुढें मोठेपणीं मुलापेक्षां मुलीचा उपयोग व आधार मातेला अधिक वाटतो. मातृवत्सल मुलगे जगांत पुष्कळ असतात, पण मुली मात्र सर्वच मातृवत्सल असतात. तुझें जीवित सुखी करण्यास मुलापेक्षां मुलीच अधिक झटतील. जगांतला असा अनुभव आहे खरा! शिवाय आतां मुलींना मुलांपेक्षां कमी लेखण्याचा पूर्वीचा काळ राहिला नाहीं. मुलामुलींना बरोबरीनें शिक्षण देण्याची प्रवृत्ति वाढत आहे. माझीहि इच्छा तीच आहे. हें खरें असलें तरी मुलगा व्हावा, ही आपली इच्छा कायम राहणारच! असो. तूं माहेरीं गेल्यापासून तुझी आठवण सारखी होत असते. लौकरच आपल्या लग्नाला पांच वर्षें पुरीं होतील. पाश्चात्य प्रीतिविवाहांत पतिपत्निप्रेम फार वर्षें टिकत नाहीं, घटस्फोट फार होतात, अशी ओरड ऐकूं येते. नवराबायको-मधलें प्रेम एकदोन मुलें होतांच खलास होत असेल, तर तें प्रेमच नव्हे, पशु-वृत्तीच ती! स्त्रीला गर्भारपण, बाळंतपण येऊन नवऱ्याच्या सुखांत व्यत्यय येऊं लागला कीं, झालें त्याचें प्रेम खलास! आणि लागला तो इकडे तिकडे पहायला! असें होत असेल तर ती खरोखर मानवी सुधारणेची विटंबना होय. बायको बाळंतपणाकरितां माहेरी गेली कीं, पायांतली लग्नाची बेडी दूर झाल्याप्रमाणें नाना प्रकारच्या स्वैराचाराला उद्युक्त होणारे प्रेमवीर आपल्या समाजांतहि क्वचित् आढळतात. त्यांच्या पत्निप्रेमाला नमस्कार असो!!

तुला आतां लवकरच तीन महिने पुरे होऊन तूं इकडे येणार, हें तुझें पत्र वाचलें. मीहि एकटा राहून फार कंटाळलों असल्यामुळें तुझ्या वाटेकडे डोळे लागले आहेत. तूं आलीच आहेस, असा मनाला कांहीं वेळां भास होतो. तुला आयुरारोग्य उत्तम लाभावें हा आशीर्वाद देऊन पत्र संपवितों.

—तुझा निरंतर प्रेमी.

*  *  *

वरील नमुन्यांवरून साहित्यकलेनें दांपत्यसुखांत केवढी भर पडूं शकते, याची कल्पना करतां येऊन अनेकांना हें सुखाचें साधन हस्तगत करण्याचा मार्ग दिसूं लागेल. असो, याप्रमाणें वर सांगितलेल्या चारहि कला पति-पत्नींचें जीवन सुखकर करण्यास आवश्यक आहेत; व त्यांपैकीं पाककला, गानकला, व साहित्यकला या विषयांचा स्त्रीशिक्षणाच्या शालेय अभ्यास-क्रमांत समावेश झाला पाहिजे.

## सुभाषितें व वचनें

गृहं तु गृहिणीहीनं । अरण्यसदृशं मतं ॥
भार्या श्रेष्ठतमः सखा ॥

यस्य भार्या गृहे नास्ति साध्वी च प्रियवादिनी ।
अरण्यं तेन गंतव्यं यथारण्यं तथा गृहं ॥

जीस गमे पद अन्यगृहीं जणुं ठेवियले कीं, सर्प-शिरीं
वाक्य जिचें अति दुर्लभ ज्यापरि दुर्मिळ जें धन लोभि-करीं ।
कांतसमागम हेंचि गमे सुख वित्त नसे गृहिं लेश जरी
शांत मनें निजकांतमतें करि कृत्य जगीं सति तीच खरी ॥

यद्यपि भ्रातरः क्रुद्धा भार्या वा कारणान्तरे ।
स्वभावतस्ते प्रीयन्ते नेतरः प्रीयते जनः ॥ महा० १२।१३८।१५४

श्रियः एता स्त्रियो नाम सत्कार्या भूतिमिच्छता ॥ महा० १३।४६।१५

आत्मा हि दाराः श्रिय एताः सर्वेषां दारसंग्रहवर्तिनाम् । रामायण

विश्वामित्रपराशरप्रभृतयो वाताम्बुपर्णाशना:
तेऽपि स्त्रीमुखपङ्कजं सुललितं दृष्ट्वैव मोहं गता: ।।
शाल्यन्नं सघृतं पयोदधियुतं ये भुञ्जते मानवा- ।
स्तेषांमिद्रियनिग्रहो यदि भवेत् विंध्यस्तरेत्सागरम् ।।
एषा हि प्रकृति: स्त्रीणामा सृष्टे रघुनंदन ।
समस्थमनुरज्यन्ते विषमस्थं त्यजंति च ।।
शोचंति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलं ।
न शोचंति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा ।।

संन्यस्तभूषापि नवैव नित्यं विनापि हारं हसतीव कान्त्या ।
मदंविनापि स्खलतीव भावैर्वाचं विना व्याहरतीव दृष्टया ।।

अमृतस्येव कुंडानि रत्नानामिव राशय: ।
रतेरिव निधानानि निर्मिता: केन योषित: ।।

अकृत्रिमप्रेमरसा विलासालसगामिनी ।
असारे दग्धसंसारे सारं सारङ्गलोचना ।।

स्मितेन भावेन च लज्जया भिया पराङ्मुखैरर्धकटाक्षवीक्षणै: ।
वचोभिरीर्ष्याकलहेन लीलया समस्तभावै: खलुबंधनं स्त्रिय: ।।

श्रुतं दृष्टं पुष्टं स्मृतमपि नृणामाल्हादजननं
न रत्नं स्त्रीभ्योऽन्यत्क्वचिदपि कृतं लोकपतिना ।
तदर्थं धर्मार्थौ विभववरसौख्यानि च ततो ।
गृहे लक्ष्म्यो मान्या: सततमबला मानविभवै: ।।

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवं ।। मनु० ३–६०
विधाय वृत्ति भार्याया: प्रवसेत्कार्यवान्नर: ।
अवृत्तिकर्षिता हि स्त्री प्रदुष्येत्स्थितिमत्यपि ।। ९–७४
विधाय प्रोषिते वृत्ति जीवेन्नियममास्थिता ।
प्रोषिते त्वविधायैव जीवेत्शिल्पैरगर्हितै: ।। ९–७५

अयुक्तं बहु भाषन्ते यत्रकुत्रापिशेरते ।
नग्ना विक्षिप्य गात्राणि गर्दभा इव मद्यपाः ॥

न स्वादु नौषधमिदं न च वै सुगंधि
नाक्षिप्रियं किमपि शुष्कतमा खुचूर्णम् ।
किं चाक्षिरोगजनकंच तदस्य भोगे
बीजं नृणां नहि नहि व्यसनं विनान्यत् ॥

सानंदं सदनं सुताश्च सुधियः कान्ता न दुर्भाषिणी
सन्मित्रं सुधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः ।
आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे
साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥

यत्र नास्ति दधिमंथनघोषो यत्र नो लघुलघूनि शिशूनि ।
यत्र नास्ति गुरुगौरवपूजा तानि किं बत गृहाणिवनानिः ॥

नित्यं स्नाता सुगंधा च नित्यं च प्रियवादिनी ।
अल्पभुङमितवक्त्री च देवता सा न मानुषी ॥

रूपसंपन्नमग्राम्यं प्रेमप्रायं प्रियवंदं ।
कुलीनमनुकूलं च कलत्रं कुत्र लभ्यते ॥

## प्रकरण दहावें

# वैवाहिक जीवनांत क्रान्ति

### को-एज्युकेशन, बर्थकंट्रोल, सेकंड हनीमून

स्त्री-पुरुष वाचकहो, या प्रकरणाचें नांव मुद्दाम इंग्रजीमध्यें दिलें आहे. कारण ज्या तीन गोष्टींमुळें वैवाहिक जीवनांत यापुढें क्रान्ति होणें अपरिहार्य आहे, त्या तिन्ही गोष्टी पाश्चात्य समाजांत आतां रूढ होत असून पाश्चात्यांच्या वाङ्मयांतूनच प्रथम भारतीय हिंदु समाजांत येत आहेत. या तिन्ही गोष्टी हिंदु परंपरेला अपरिचित आहेत, इतकेंच नव्हे तर ख्रिस्ती, मुसलमानी, वगैरे समाजांतहि त्या पूर्वी नव्हत्या. त्यामुळें प्रथम ख्रिस्ती समाजांतहि त्यांच्या प्रसाराला पुष्कळ विरोध झाला, आणि को-एज्युकेशन म्हणजे मुला-मुलींचें सहशिक्षण--एकत्र एकाच प्रकारचें शिक्षण--या बाबतींत पाश्चात्य शिक्षणतज्ज्ञांमध्यें अद्यापहि मतभेद आहेत. बर्थ-कंट्रोल म्हणजे संतति-नियमन, पाश्चात्य ख्रिस्ती राष्ट्रांत गेल्या सुमारें ५० वर्षांचे प्रचारानंतर संमत झालें आहे. सेकंड हनीमून ही कल्पना एका पाश्चात्य विदुषीनें नुक-तीच पुढें मांडली असून रोमन कॅथॉलिक ख्रिस्ती धर्मपंथाचा या गोष्टीला मोठा विरोध आहे. करितां या कल्पनेचा सर्वत्र प्रचार लेखनद्वारां होऊन तिचें प्रत्यक्ष आचरण सर्वत्र होण्यास पाश्चात्य समाजांतहि अद्याप पांच-पंचवीस वर्षें लागतील. आपल्या मराठी लेखकांनीं कोणींच अद्याप ही कल्पना प्रसृत करण्याचा प्रयत्न केला नसल्यामुळें सेकंड हनीमून याला मराठी प्रतिशब्दहि अद्याप अस्तित्वांत आला नाहीं. तथापि वरील तिन्ही गोष्टी हिंदुस्थानांतहि सर्वत्र येत्या एकदोन पिढयांत रूढ होऊन आपल्या वैवाहिक जीवनांत क्रान्ति घडवून आणतील, अशी खात्री वाटत असल्यामुळें या तिन्ही क्रांतिकारक गोष्टींचा ऊहापोह या स्वतंत्र प्रकरणांत करण्याचें योजिलें आहे.

### को-एज्युकेशन म्हणजे मुलामुलींचें सहशिक्षण

याचे, मुलामुलींचें एकत्र एकाच शाळा-कॉलेजांत शिक्षण, आणि समान

अभ्यासक्रमाचें शिक्षण असे दोन अर्थ आहेत. मुलींना शिकून काय करावयाचें आहे, नौकऱ्या थोड्याच करावयाच्या आहेत, हा जुन्या पिढींतला युक्तिवाद मागें पडून, हल्लीं वधूपरीक्षेच्या वेळीं 'वधूचें शिक्षण किती झालें आहे' असा प्रश्न हटकून विचारला जाऊं लागल्यामुळें मुलींच्या शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यांतहि इतका झपाट्यानें होत आहे कीं, सुधारकाग्रणी कै० प्रि० आगरकर याच्या स्त्रीशिक्षणासाठीं तळमळणाऱ्या आत्म्यास धन्यता वाटून पूर्ण शांति लाभेल, आणि खेड्यापाड्यांतलें स्त्रीशिक्षण म्हणजे स्वतंत्र शिक्षण नसून सहशिक्षण, एकत्र शिक्षण, आहे हें पाहून तर कै० आगरकरांना दुहेरी धन्यता वाटेल. कारण गुरुवर्य कर्वे यांनीं स्त्रीशिक्षणाचें काम हातीं घेऊन व मतभेदाच्या बाबतींत तत्कालीन सनातनी पिढीशीं विनयानें व आदरानें वागून स्त्रीशिक्षणाचे प्रसारास कल्पनातीत यश मिळवून दिलें. या बाबतींतल्या कार्यपद्धतीला गु० कर्वे यांना कै० आगरकरांपेक्षां लोकमान्य टिळकच अधिक योग्य मार्गदर्शक झाले असावे. कारण लोकमान्यांनीं समाज-सुधारणेबाबत पुढील तीन सूत्रें प्रतिपादिलीं होतीं—

(१) ज्यांना सुधारणेची खरी कळकळ आहे, त्यांनीं सुधारणा अमलांत आणण्याबद्दल स्वतःस बांधून घ्यावें.

(२) माझें मतहि सुधारणेस अनुकूलच आहे; परंतु ज्यांचे विचार सुधारले नाहींत, त्यांच्या गळ्यांत सुधारणा कायद्यानें बांधणें मला अगदीं प्रशस्त वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर तें अन्यायाचें व जुलुमाचें कृत्य आहे.

(३) तरुण विधवा व स्त्रिया यांनीं अशा शाळांतून (पंडिता रमाबाईचें शारदा सदन) स्वतंत्रपणें राहावें ही कल्पना हिंदु समाजाला मानवण्याला अद्यापि थोडा अवकाश आहे. मग उगीच उतावीळपणा दाखवून आपल्या व लोकांच्या जीवाचा संताप कां करून घ्यावा? यावरून भविष्यकाळ ओळ-खण्यांत लो. टिळकांचीच खरी मुत्सद्देगिरी स्पष्ट दिसते.

सन १८९० चे सुमारास लोकमान्यांनीं वरील मत दिलें, त्यापेक्षां फार अधिक पटीनें स्त्रीशिक्षणाचे बाबतींत सनातनी हिंदु समाजाचा दृष्टि-कोन आज बदललेला दिसत आहे. कारण वरील सूत्राप्रमाणें काम करणारे आण्णासाहेब कर्वे यांनीं स्त्रीशिक्षण कार्याला प्रत्यक्ष आरंभ करून आजीव

वाहून घेतलें व वर्तमानपत्रीं वादविवाद न वाढवितां प्रत्यक्ष कार्य केलें. लोकमान्य टिळकांच्या मात्र १८९० मधील आणि १९१६ मधील वृत्तींत तफावत दिसते. कारण गुरुवर्य कर्वे यांनीं महिला विद्यापीठ स्थापनेचे वेळीं लोकमान्यांची मदत मागितली, त्या वेळीं लोकमान्यांनीं गुरुवर्य कर्वे यांना पुढील उत्तर दिलें :

> " हल्लींच्या शिक्षणानें आम्ही (पुरुष) जसे संशयवादी (sceptics) झालों आहों, तशाच स्त्रिया बनतील व आमच्या गृहसौख्याचा नाश होईल. "

याप्रमाणें लोकमान्यांनीं महिला विद्यापीठ स्थापनेस प्रतिकूलता दाखविली, अर्थात् द्रव्यसाहाय्य दिलें नाहीं आणि 'केसरी' पत्रद्वारां या कार्याचा पुरस्कारहि केला नाहीं. वास्तविक गुरुवर्य कर्वे यांनीं लोकमान्यांच्या मूळ उपदेशाप्रमाणें तंतोतंत वागून म्हणजे स्त्रीशिक्षण कार्याची सुधारणा करणेंचे कार्यास स्वत:स बांधून घेऊन व जनतेशीं सौजन्यानें वागून लोकमत अनुकूल इतकें करून घेतलें कीं, महिला विद्यापीठाची कल्पना अनेकांनीं उचलून धरली, प्रत्यक्ष द्रव्यसाहाय्य दिलें आणि कर्वे महिला युनिव्हर्सिटी स्थापनहि झाली. इतकेंच नव्हे तर लोकमान्यांचे उजवे हात दे. भ. तात्यासाहेब केळकर यांनीं या विद्यापीठास सर्व प्रकारचें साहाय्य—द्रव्यसाहाय्य, 'केसरी' पत्रद्वारां प्रचारसाहाय्य आणि स्वत:ची विदुषी कन्या श्रीमती कमलाबाई देशपांडे यांचें आजीव सेवकरूपी साहाय्य दिलें; महिला कॉलेज व कन्याशाळा यांचा शिक्षणक्रम महिलावर्गाच्या भावी आयुष्यक्रमास उपयुक्त असा आंखण्यांत प्रत्यक्ष मदत केली. असो. याप्रमाणें १९२० नंतर टिळक व गांधी या दोघांहि थोर राष्ट्रपुरुषांच्या सांप्रदायिकांची मदत मिळून आतांपर्यंत स्त्रीशिक्षण कार्याची कल्पनातीत प्रगति झाली आहे.

## बर्थकंट्रोल म्हणजे संततिनियमन

" Scientific contraception promises what may develope into the most revolutionary change in human affairs. It would be sufficient to overstate the economic, eugenic

the broad-scale significance of a discovery which is today changing marriage in some of its fundamental aspects. To protest against this colossal phenomenon is like trying to stop the tide by scolding it. I suggest that if we rationalize this new thing and use it intelligently, we may be able to derive from it a degree of social and spiritual power capable of creating for our descendants a better world than we have been able to fashion for our own use and happiness."

—*Judge Lindsey*

Pregnancy, delivery, lactation, the bringing up of children and all the pains and anxieties that accompany these things soon destroy youth and dull the point of pleasure.

If economic conditions are hard, as they often are in civilised life, it may be better to marry and defer the children rather than not to marry.

One pair married while they were young students in the University, and fourteen years later they had their first child, a splendidly healthy boy.

One duty at any rate is quite clear. No woman should run any chance of conception unless she is certain of her own health and the health of her partner. If her health or her husband's health is unsound, and she cannot avoid intercourse, she can certainly take precaution against conception.

बर्थ-कंट्रोल ऊर्फ संततिनियमन ही गोष्ट पूर्ण पाश्चात्य समाजांतील असून यूरोपांतहि या विषयाचा उदय तिकडे नुकताच ५० वर्षांपूर्वी माल्थस नामक अर्थशास्त्रज्ञानें केला. जगांतील लोकसंख्येची वाढ व त्यांना लागणारा अन्नाचा पुरवठा या दोन गोष्टींचा मेळ अर्थशास्त्रदृष्टया बसूं शकत नाहीं, कारण लोकसंख्येची वाढ जितक्या प्रमाणांत होत जाते, तितक्या प्रमा-

णांत शेतांतील पिकाची वाढ होत जाणें अशक्य आहे व म्हणून लोकसंख्येच्या वाढीला कृत्रिम मर्यादा घातली पाहिजे. अशा स्वरूपांत हा विषय प्रथम पुढें आला. पण जगांत सतत शांतता न नांदतां युद्धें व महायुद्धेंहि चालू असतात व पुढेंहि असणार! शिवाय रोगांच्या सांथी व अपघातादि आपत्तींमुळें होणारी मनुष्यहानि चालू असलेमुळें हें आर्थिक कारण गौण ठरून संततिनियमनाला खासगी व्यावहारिक कारणेंच बलवत्तर ठरत जाऊन संततिनियमन ही बाब पाश्चात्य शिक्षित समाजांत आतां चालू पिढींत घरोघर प्रचारांत आली आहे.

संततिनियमनाच्या आवश्यकतेचीं खासगी कारणें तीन असून तीं स्त्रियांच्या गर्भारपण-बाळंतपण या नैसर्गिक प्रक्रियेंतून उद्भवणारीं आहेत. तीं अशीं कीं, विवाहित स्त्रीस वर्षादोन वर्षांच्या अंतरानें सामान्यत: मुलें होतात. त्यामुळें तीन अडचणी उद्भवतात; त्या (१) संभोगसुखांत वरचेवर व्यत्यय; (२) स्त्रीचे आरोग्याचा नाश होऊन अशक्तता, क्षयरोगादि आपत्ति व तदर्थ औषधी खर्च; (३) अपत्यांच्या वाढत्या संख्येमुळें त्यांचा अन्नपाणीकपडा-लत्ता इत्यादिकांचा वाढणारा खर्च. या तिन्ही कारणांची जाहीर सभांत व पुस्तकद्वारां चर्चा प्रथम प्रो० रघुनाथराव कर्वे यांनीं मोठ्या युक्तीनें व धाडसानें सुरू केल्यावर नंतर प्रो० फडके, डॉ० मराठे वगैरे बरेच लेखकांनीं या विषयांवर बोलून व लिहून सुशिक्षित समाजांत सर्वत्र हा विषय खासगी व सार्वजनिक चर्चेचा बनविला आहे. संततिनियमनाची आवश्यकता प्रत्येकाला पटते, यांत शंकाच नाहीं. मतभेद फक्त संततिनियमनाच्या साधनाबाबतचा आहे; त्यांत (१) महात्मा गांधींचें ब्रह्मचर्यव्रतसाधन, व (२) संततिनियमनाचीं कृत्रिम साधनें ह्या दोन मार्गासंबंधीं मोठासा वाद-विवाद वाढण्याचें कारणच नाहीं. थोडक्यांत निर्णय इतकाच कीं, ज्याला जें साधन पत्करेल, झेपेल व परवडेल तें त्यानें वापरावें. मात्र बर्थ-कंट्रोलनें आपल्या भावी वैवाहिक जीवनांत अशी क्रांति होईल कीं, (१) प्रत्येक कुटुंब सुटसुटीत म्हणजे फारतर ३।४ मुलांचें बनेल; (२) स्त्रियांची प्रकृति निरोगी व निकोप राहून गर्भारपण, बाळतपण, अपत्यसंगोपन या त्रिविध तापांतून त्यांची बरीचशी सुटका होईल; (३) स्त्रीपुरुषांना संभोगसुख बरेंच निवध मिळूं लागून त्या मानानें वेश्यागमन व्यभिचारादि अनाचार कमी होतील;

आणि (४) सुशिक्षित स्त्रियांना सार्वजनिक कार्यें करण्यास पुष्कळ फुरसत मिळेल. चूल व मूल या संकुचित ध्येयांचा सुशिक्षित स्त्रियांना जो तिटकारा वाटतो, सामाजिक व सार्वजनिक कार्ये करण्याकडे त्यांचा जो ओढा असतो, त्याला संततिनियमनाच्या साधनामुळें चांगली दिशा लागेल व एकंदरीनें कौटुंबिक सुख अनेक पटींनीं वाढेल; ही सामाजिक क्रांति स्पृहणीय नाहीं असें कोण म्हणेल ?

## सेकंड हनीमून

स्त्रियांचे जीवनांत ४५।५० वर्षे वयाचे सुमारास मासिक ऋतुनिवृत्ति होऊन एक प्रकारची क्रांति होते. अपत्योत्पादनाचा क्रम पूर्ण बंद होतो, आणि 'प्रजायै गृहमेधिनां' या न्यायानें तदुत्तर पतिपत्नीसंबंध बंद व्हावयास पाहिजे, असाहि कित्येक स्त्रीपुरुषांचा समज असतो. ख्रिस्ती धर्मांतर्गत रोमन कॅथॉलिक (सनातनी) पंथांतील स्त्री-पुरुषांची हीच समजूत फार प्रचलित आहे, अशी तक्रार डॉ. मेरी स्टोप्स यांनीं आपल्या 'Enduring Passion' या पुस्तकांत केली असून त्याबद्दल विस्तृत ऊहापोह करून ती गैरसमजूत दूर करण्याचा जोराचा प्रयत्न केला आहे. डॉ. मेरी स्टोप्स लिहितात :

"One of the cruellest and most senseless rumours, which has done an incredible amount of harm in creating unhappiness and upsetting physical side of marriage is the monstrous idea that, after the meno-pause, a woman must necessarily cease from sex union with her husband."

नॅशनल बर्थ-रेट कमिशन (इंग्लंड) पुढें साक्ष देतांना साऊथवर्कचे बिशप यांनीं सांगितलें :

"If you relax the idea that intercourse has any other purpose except the procreation of children, you lower the whole idea of intercourse itself. (A logical corollary of this is that when union cannot lead to child-bearing, all further unions must be prohibited.)"

याबद्दल डॉ. मेरी स्टोप्स म्हणतात:

"It is a silly lie. This cruel and false idea has generated much immorality. (कारण या समजुतीमुळें पुरुष व्यभिचार, वेश्यागमनादि अनीतिमार्गाला व व्यसनाला बळी पडतात.) The joy and refreshment of mutual union need not cease after meno-pause. As a matter of fact a very large number of women begin, after the meno-pause, really to enjoy sex-union, which has been disturbed by defloration, pregnancy, child-bearing, monthly menstrual tides etc... Then for true wedded lovers there should be a second wooing, a second 'Honey-moon'."

याप्रमाणें ही सेकंड हनीमूनची कल्पना डॉ. मेरी स्टोप्स यांनीं प्रसृत केली आहे, ती आपल्या समाजांतहि नवीन वाटेल म्हणून मुद्दाम उद्धृत केली आहे. या कल्पनाक्रांतीमुळें आपल्या सामाजिक व सार्वजनिक जीवनांत कशी क्रांति होईल, त्याचा विचार पुढें केला आहे (प्रकरण १४ वें 'वैवाहिक जीवनाचा उत्तरार्ध').

## सुभाषितें व वचनें

पुरुषाला या जगांत दोन प्रकारचे आनंद हवे असतात. एक पराक्रमाचा आनंद, अन् दुसरा प्रणयाचा आनंद. हे दोन्ही आनंद मिळविण्याची धडपड प्रत्येक पुरुष करीत असतो, आणि जे भाग्यवान् असतात त्यांना ते दोन्ही मिळतातहि. —प्रो. फडकेकृत 'उद्धार कादंबरी'

डॉ. मेरी स्टोप्सचा सिद्धान्त. विवाहाचा हेतु = सुखोत्पत्ति अर्थात संभोगसुख.

If the sex-act is not properly performed, all the harmony and suitability in other things, will be of no avail.

There are somewhere between two and five hundred million sperves in a single average ejaculation. Each single one of these is capable of fertilising a woman's egg-cell and giving rise to a new human being.

So in our bodies both sexes produce a far larger number of germs awaiting fertilisation than can be actually fractified and imbued with individual life.

अन्योन्यस्याव्यभिचारी भवेदामरणान्तिकः ।
एष धर्मः समासेन ज्ञेयः स्त्रीपुंसयोः परः ॥ —मनुस्मृति ९।१०१

All the deepest and highest forces within us impel us to evolve an ever nobler and tenderer form of life-long monogamy as our social ideal.

In the last few years there has been such an awakening to the realisation of the corrosive horror of all aspects of prostitution that no marriage can be happy where the husband has, in buying another body, sold his own health with his honour and is tainted with disease. Such disease may wreck not only the man and infect his wife with horrors unimaginable, but it may destroy the health and even the very existence of his unborn children.

What is chastity? Surely chastity is happy healthy sexual intercourse between those who love one another; and unchastity is sexual intercourse between those who do not love one another." —*Mrs. Hornibrook*

# प्रकरण अकरावें

# घटस्फोट (डायव्होर्स)

"Many think that merely by loosening the bonds, and making it possible to start afresh with someone else, their lives would be made harmonious and happy. But often such reformers forget that he or she, who knows nothing of the way to make marriage great and beautiful with one partner, is not likely to succeed with another."

The Science of New Life —*John Cown, M.D.*

"ज्या स्त्रियांनीं घटस्फोट केला आहे, अशा स्त्रियांशीं अगर त्यांच्या मुलींशी विवाहबद्ध होणें अधिकांत अधिक टाळावें. कारण उघड आहे."

नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ।
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ।। —नारदस्मृति

विवाहविच्छेद ऊर्फ घटस्फोट (डायव्होर्स) ही आणखी एक बाब पाश्चात्य व भारतीय संस्कृतींतील तफावत दर्शविणारी आहे. अमोक्षो धर्मविवाहानाम् ।। म्हणजे हिंदुधर्मशास्त्रांतील आठ विवाहपद्धतींपैकीं ब्राह्म, प्राजापत्य, आर्ष व दैव या चार विवाहपद्धतींपैकीं कोणत्याहि पद्धतीनें विवाह झाल्यास त्या पतिपत्नीला घटस्फोट करण्याची धर्मशास्त्रानें परवानगी दिलेली नाहीं. पण गांधर्वविवाह क्षत्रियांत रूढ असूनहि क्षत्रियांना तसेंच वैश्यांनाहि घटस्फोटाची परवानगी नाहीं. उलट पक्षीं घटस्फोटाला आणि घटस्फोट केलेल्या स्त्रीला दुसरा पति करण्याला परवानगी देणारा आधार नारदस्मृतींत सांपडतो, तें वचन वर दिलें आहे.

तथापि हा प्रश्न केवळ हिंदुधर्मीयांचा नसून अखिल मानवजातीचा व सर्व धर्मांना विचार करण्यास लावणारा आहे. अलीकडे सुशिक्षित समाजांत तो विशेष गंभीर स्वरूप धारण करूं लागल्यामुळें अनेक शास्त्रज्ञांनीं या प्रश्नाबद्दल आंकडेवार माहिती मिळवून कांहीं निष्कर्ष काढले आहेत.

प्रो० टर्मन आणि बटनवायझर या दोघां पाश्चात्य विद्वानांनीं १९३५ मध्यें वैवाहिक सौहार्द उत्पन्न होण्यास कोणत्या गुणांची जरूर असते यासंबंधीं अभ्यास करून निष्कर्ष प्रसिद्ध केले. बर्न रॉयटरची व्यक्तिगुणमापनपद्धति व स्ट्रांगची धंद्यासंबंधीं अभिरुचीचें मापन करणारी पद्धति या दोन्ही पद्धती ३४६ वैवाहिक दांपत्यें आणि ११६ घटस्फोटित दांपत्यें यांना लावून त्यांनीं कांहीं निष्कर्ष काढले. ही पद्धति लावून आलेल्या उत्तरानुसार १०० सुखी दांपत्यें, १०० दुःखी दांपत्यें आणि १०० घटस्फोटित दांपत्यें असे गट पाडून त्यांचा विचार लेखकांनीं पुढें मांडला आहे. हे तीनहि गट वय, धर्म, धंदा, शिक्षण, सामाजिक दर्जा, इत्यादि बाबतींत समान असे पाहून घेतले होते.

### घटस्फोटित पुरुष

"या लोकांमध्यें स्वयंस्फूर्तीला मोठेपणा देण्याची प्रवृत्ति, फाजील अहंमन्यता, शिस्तीचा अभाव, धाडशी प्रवृत्ति आणि अविवेक ( less caution ) ही प्रवृत्ति प्रामुख्यानें दिसते. हेकट, स्वार्थी आणि आपलें काम होत असल्यास दुसऱ्यांच्या भावनांची पर्वा न बाळगणारे, जुगार खेळणारे, पैजा मारणारे, सारखीं कामें बदलणारे असे हे पुरुष असतात.

"सर्व साधारणतः हे पुरुष परमतासहिष्णु, सहानुभूतिशून्य, 'हम करे सो कायदा' या वृत्तीचे आणि बेशिस्त असतात.

### घटस्फोटित स्त्री

"स्वयंस्फूर्त कार्याकडे प्रवृत्ति, स्वतःचीं मतें दणदणीतपणें मांडणें, नावीन्यपूर्ण कल्पनांकडे प्रवृत्ति, स्वावलंबन, महत्त्वाकांक्षा आणि ध्येयाबद्दल चिकाटी इत्यादि गुण या गटांत प्राधान्यानें आढळतात. चालीरीतींची त्यांना दरकार वाटत नाहीं. (१) त्यांच्यामध्यें विनयशीलपणा क्वचित्च आढळतो. (२) आपलें उद्दिष्ट साधतांना दुसऱ्यांच्या भावनांची त्या मुळींच पर्वा करीत नाहींत. (३) त्या वादविवादाला सहज प्रवृत्त होतात. (४) त्या निश्चय त्वरित करतात. (५) अडचणींत गोंधळत नाहींत. (६) दुसऱ्याला उपदेश करण्यांत हातखंडा असतात. (७) त्यांच्यामध्यें मनमिळाऊपणा क्वचित्च आढळतो. कोणाचाहि हुकूम मानण्यास सहसा तयार नसतात. हा परिणाम त्यांच्या पिंडांतील कांहीं गुणांमुळें प्रादुर्भूत होतो.

" त्यांना सर्व तऱ्हेच्या चमत्कारिक, चक्रम् आणि असामान्य व्यक्तीं-बद्दल आपलेपणाची भावना वाटते. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बाबतींत त्या क्रांतिकारक असतात. त्यांच्यामध्यें सहानुभूति फारच कमी असते. स्वतःचा हेतु साध्य करण्याबद्दल मात्र वाटेल ती धडपड त्या करतील. परोपकार या सद्गुणाबद्दल तिटकारा असतो."

आज आपल्या हिंदुसमाजांत विशेषतः सुशिक्षित स्त्रीपुरुषांमध्यें घटस्फोटाच्या कायद्याची आवश्यकता वाटूं लागली असून हिंदू लॉमध्यें तशी सुधारणा करण्याबद्दल कित्येक सामाजिक स्त्री परिषदांत स्त्रियांनीं ठराव-हि पास केले आहेत. तसा कायदा नसल्यामुळें कित्येक हिंदु प्रसिद्ध पुरुषांनीं द्वितीय विवाह पहिल्या पत्नीच्या हयातींत केल्यामुळें त्याबद्दल जाहीर निषेधहि होत आहेत. सुशिक्षित पुरुषांना सांप्रतच्या हिंदुसमाजस्थितींत असे प्रसंग कां येतात त्याचा विचार होणें जरूर आहे.

## विवाह आणि व्यक्तिविकास

" आमचे कार्यांत मुख्य मदत म्हणजे सहधर्मचारिणीचीं कर्तव्यें पूर्णपणें लक्षांत घेऊन आमचे कार्यांतील कामाचा अर्धाअधिक वांटा पत-करणाऱ्या आमच्या पतिनिष्ठ पत्नी सौ. लक्ष्मीबाई मुजुमदार यांची होय. फोटो घेणें, ते छापणें, लेखांच्या नकला करणें, फोटोंची आकर्षक मांडणी विषयवार करणें, वगैरे पडतील त्या सर्व प्रकारच्या कामीं आम्हांस मदत करण्याची तर त्यांची नेहमींच तयारी आहे. पण सध्यां नवीन पतकरलेल्या व्यायाम ज्ञानकोशाच्या खंडांची विक्री करण्याचें कामींहि, भिक्षा मागण्याचें काम हीन दर्जाचें समजलें जात असलें तरी, आमचेबरोबर केवळ व्यायाम ज्ञानकोशास जनतेजवळ आश्रय मागण्यासाठीं गांवोगांवीं व घरोघरीं फिरण्यास त्या मोठ्या आनंदानें सर्वदा तयार असतात. अशा साहाय्याचे अभावीं आम्ही अंगिकारिलेलें काम इतक्या सुलभ रीतीनें आम्हांस करतांच आलें नसतें, हें काय सांगावयास पाहिजे ? "

—दत्तात्रय चिंतामण मुजुमदार, एल्.एल्. बी.,
संपादक व प्रकाशक व्यायाम ज्ञानकोश, खंड २ रा.

वैवाहिक प्रेमाचा पाया 'समानशीले व्यसनेषु सख्यं' या न्यायानें समान गुण, समान स्वभाव व समान आवडीनिवडी यांवर आधारलेली मैत्री हा होय. अशा मैत्रीचा एक आदर्श नमुना वरील अवतरणांत दिसून येतो. पण असें वैवाहिक जीवन अद्यापहि आपल्या हिंदु समाजांत फार क्वचित् दृष्टीस पडतें. कारण विवाहाचे वेळीं प्रौढ विवाहांतहि वधूचें वय १८।२० व वराचें २५।२६ असतें. पदवीधर वर असला व त्यानें शिकलेली वधू निवडली तरी ती बहुधा मॅट्रिकपर्यंत शिकलेली असते; आणि विवाहानंतर विद्यार्जनाचे बाबतींत वधू व वर यांची स्थिति एकदम बदलते, म्हणजे वधू ऊर्फ नूतन पत्नी संसारांत पूर्ण गुंतून चूल आणि मूल या दोन व्यवसायांत दैनंदिन कालक्रमणा करूं लागते. तिचें पुढील विद्यार्जन सर्वस्वीं बंद पडतें. उलट पक्षीं वर म्हणजे सदरहू विवाहित तरुण महत्त्वाकांक्षी बनून डबल ग्रॅज्युएट, एम्. ए., एलएल. बी., वगैरे पारंगततेच्या पदव्या मिळवून हेडमास्तर, प्रोफेसर, वकील, बॅरिस्टर, डॉक्टर, वृत्तपत्रसंपादक किंवा सरकारी अधिकारी बनण्याचा प्रयत्न करून त्याप्रमाणें बहुधा यश मिळवतो. त्याची पत्नी मात्र मॅट्रिक किंवा नॉनमॅट्रिक असेल तशीच राहते. यामुळें विद्याव्यासंगाचे दृष्टीनें दोघांमध्यें महदंतर हळूहळू निर्माण होतें, आणि डॉक्टरी, वकिली, वगैरे स्पेशल धंदेवाले इसमांचे धंद्यांतला श्रीगणेशाहि मॅट्रिक वधूस माहीत नसल्यामुळें पतीच्या या व्यवसायांत ती रमणें व सहकारी होणें शक्य नसतें. शिवाय डॉक्टर, वकील, प्रोफेसर, वृत्तपत्रसंपादक, वगैरे इसम ओघानेंच सार्वजनिक कार्यकर्ते बनून अनेक संस्थांचे सभासद, चिटणीस, अध्यक्ष, वगैरे व्यवसायांत गुंतून जनतेचे पुढारी व व्याख्याते, लेखक बनतात; उलट पक्षीं त्यांची पत्नी मात्र ५।१० वर्षांत ४।५ मुलांच्या लटांबरांत सांपडून त्यांच्या पालनपोषणांत इतकी गुंतून जाते कीं, पतीच्या दैनंदिन व्यवसायांची साधी चौकशी करण्यासहि तिला फुरसद मिळत नाहीं, आणि पतीच्या व्यवसायांतलें स्वारस्य जाणण्याची पात्रताहि तिच्यांत नसते. मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या वधूंतहि याप्रमाणें बौद्धिक क्षेत्रांतला वैयक्तिक विकास विवाहोत्तर कालांत मुळींच होत नसल्यामुळें विवाहानंतर कामविकाराचा पहिला बहर ओसरल्यावर व एकदोन अपत्यें होतांच प्रथम अगदीं प्रेमबद्ध दिसणारी पतिपत्नीहि २।४ वर्षांनंतर मैत्रीच्या

दृष्टीनें बौद्धिक दृष्ट्या असमान भूमिकेवर उतरल्यामुळें हळूहळू खऱ्या मैत्रीला म्हणजेच वैवाहिक प्रेमाला पारखीं होऊं लागतात. मग वधू अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असल्यास पतिपत्नीच्या वैयक्तिक विकासांत महदंतर पडून वैवाहिक प्रेमाचा झरा हळूहळू कमी होऊन शेवटीं तो साफ बंद झाल्यास नवल काय ?

## विवाहविच्छेद कीं बहुभार्यत्व ?

बहुतेक विवाहांत वर वर्णिल्याप्रमाणें स्थिति व बौद्धिक विकासदृष्ट्या महदंतर विवाहोत्तर ५।१० वर्षांत निर्माण होतें; व त्याबरोबरच दुसरी एक घटना पुरुषाच्या आयुष्यांत घडून येणें हल्लींच्या काळांत फार शक्य झालें आहे. .हल्लीं उत्तरोत्तर स्त्रीशिक्षणाचा झपाट्यानें प्रसार उच्च वर्गांत होत असून शिक्षकिणी, डॉक्टरणी, निदान नर्सेस व मिडवाईफ्स्, तसेंच लेखिका व महात्मा गांधींच्याच चळवळीपासून स्वयंसेविका व सार्वजनिक कार्यकर्त्या विदुषी स्त्रिया यांची संख्या समाजांत वाढत आहे. संगीतकला व चित्रकला, सिनेमानाट्यकला, यांतहि स्त्रियांची प्रगति विशेष होत आहे. याप्रमाणें समानशील व व्यवसाय असलेले पुरुष व स्त्रिया एकाच व्यवसायक्षेत्रांत वावरण्याचा योग हल्लीं जमूं लागला असून तो उत्तरोत्तर वाढत जाणार, हें स्पष्ट दिसत आहे. आपल्या सुशिक्षित समाजांत ही घटना गेल्या १०।५ वर्षांत विशेष प्रत्ययास येऊं लागली; आणि ही घटना विवाह विघटनेस कारणभूत होत आहे. वर लिहिल्याप्रमाणें विवाहित पतिपत्नीमधील वैवाहिक प्रेमाला उतरती कळा लागते, त्याच वेळीं एकाच व्यवसायांत गुंतलेले स्त्रीपुरुष एकत्र येण्याचा योग आला कीं, त्यांच्यामध्यें मैत्री व नंतर प्रेम व कामविकार उद्‌भवून तो हळूहळू वळावणें अगदीं क्रमप्राप्त आहे. बिचारी प्रथमपत्नी ही घटना व स्वतःच्या वैवाहिक बंधनांतली विघटना उघड्या डोळ्यानें पाहात असतांनाहि मत्सर, असूया, द्वेष, तिरस्कार व दुःख यांशिवाय तिला या विघटनेविरुद्ध प्रत्यक्ष उपाय कांहींच करणें शक्य नसतें. पतिपत्नी या टोंकावर आल्यावर पुढील कायदेशीर इलाज इतर धर्मांत डायव्होर्स हाच मोकळा ठेवला असून हिंदुधर्मशास्त्रांत व 'हिंदु लॉ' मध्यें मात्र डायव्होर्सचा

मार्ग अद्याप कायद्यानें खुला केला नाहीं; पण बहुभार्यत्व हिंदु लॉला मान्य असल्यामुळें नूतन प्रेमसंबंधाला विवाहसंबंधाची कायदेशीर जोड देणें, हा एकच मार्ग विहित उरतो, व तो अवलंबणें भाग पडतें. पहिली पत्नी हयात असतांना व तिला चार दोन मुलें झालेलीं असतांना चांगल्या सुशिक्षित इसमानें दुसरा विवाह करावा; आणि विशेषत: असा विवाह मोठा प्रसिद्ध शिक्षक, प्रोफेसर, कवि, किंवा डॉक्टर, वकील, वृत्तपत्रसंपादक आणि सार्वजनिक कार्यकर्ता पुढारी अशा इसमानें करावा, ही गोष्ट नैतिकदृष्ट्या मोठी कटुकठोर वाटून या द्वितीय विवाहाविरुद्ध वृत्तपत्रांतूनसुद्धां टीकास्त्र सुरू होऊन अशा विद्वान् पुढाऱ्याला मोठा कमीपणा पत्करावा लागतो. एक पत्नी जिवंत असतां दुसरी पत्नी होणारी सुशिक्षित स्त्रीहि समाजाच्या अनादरास व निंदेस पात्र होते. पण खरोखर दोष कोणाचा ? याचा सूक्ष्म विचार केला पाहिजे. आमच्या मतें अशा विवाहांचे बाबतींत अनेकांकडे अनेक प्रकारें दोष येतो. तो असा :

(१) प्रथम विवाहाची घाई व अयोग्य निवड.
(२) विवाहोत्तर व्यक्ति-विकासाकडे झालेलें पतिपत्नीचें दुर्लक्ष.
(३) घटस्फोटाचे कायद्याचा हिंदु लॉमध्यें अभाव.

**विवाहाची घाई :** हल्लीं अलीकडे प्रौढविवाह होतात तरीसुद्धां पदवीधर तरुण पहिली बी. ए. ची किंवा तत्सम पदवी मिळवितांच म्हणजे आपल्या पुढील खऱ्या व्यवसायाची पदवी बी. टी. किंवा एल्एल्. बी. किंवा बी. ई. किंवा एम्. बी. बी. एस्. तसेंच परदेशी पदव्या पीएच्. डी. वा एफ्. आर. सी. एस्. किंवा बॅरिस्टरी, आय्. सी. एस्., वगैरे पदव्या मिळविण्यापूर्वीच वयाच्या २४।२५ वे वर्षीच विवाह करून १६।१८ वर्षे वयाच्या बहुधा नॉनमॅट्रिक तरुणीशीं विवाहबद्ध होतात आणि १।२ वर्षांत पितृपदालाहि पोंचतात. वैवाहिक जीवनांत पडण्यापूर्वी आपला निरंतरचा व्यवसाय आणि स्वत:चा बौद्धिक व सार्वजनिक दर्जा याबद्दल निश्चित अटकळ करणें व तो दर्जा ओळखणें हें महत्त्वाकांक्षी तरुणांस अत्यंत जरूर आहे; आणि मग समानशील व्यवसाय असलेल्या तरुणीशीं वा प्रौढ स्त्रीशीं (२०।२५ वर्षेपर्यंत वयाच्या विदुषीशीं ३० वर्षे वयाच्या विद्वानानें) विवाह करणें उचित होय.

उलट पक्षीं उपवर तरुणींनीं व विशेषत: त्यांच्या जबाबदार आईबापांनीं व पालकांनीं योग्य निवड करण्याची काळजी घेतली पाहिजे.

**नूतन पत्नीचें कर्तव्य:** विद्वान् व महत्त्वाकांक्षी तरुणांशीं विवाहबद्ध होणाऱ्या तरुणी स्वत:वर फार मोठी जबाबदारी घेत असतात. त्यांनीं विवाहोत्तर पतीशीं समानशील व्यवसायी बनण्याचा झटून प्रयत्न केला पाहिजे. स्वत:चें शिक्षण अपुरें असेल तर त्यांत भर घातली पाहिजे. व पतीच्या मुख्य उद्योगधंद्याचीहि जरूर तितकी पुस्तकी व व्यावहारिक माहिती घेतली पाहिजे. जेथें वैवाहिक प्रेम अधिकाधिक सुखदायी होऊन उभयतांना परस्परांबद्दल आदर व कृतज्ञता नितान्त वाटते, असें एक ठळक उदाहरण मुजुमदार पतिपत्नीचें वर दिलेंच आहे. तसेंच बौद्धिक समानतेप्रमाणें स्वत:चें आरोग्य व शारीरिक सौंदर्य अत्यंत प्रयत्नपूर्वक सतत कायम टिकविलें पाहिजे; व त्याकरितां संततिनियमनाच्या आधुनिक साधनांचा जरूर तितका अवलंबहि केला पाहिजे. याप्रमाणें पतीच्या व्यवसायांत सहकारिता व स्वत:चे शारीरिक आकर्षणांत कायमपणा ठेवल्यास वैवाहिक प्रेमाला ओहोटी लागणें बहुधा शक्य नाहीं असा ज्ञानकोशकार केतकर यांचा अनुभव आहे. असें आदर्शवत् वैवाहिक जीवन लाभलें असतांहि यदाकदाचित् एकादा विद्वान् पति मतिभ्रष्ट नादान बनून परस्त्रीलंपट दिसूं लागला तर त्याला सर्व प्रकारच्या कठोर उपायांनीं स्थानबद्ध करण्याची धमकहि पत्नीनें दाखविली पाहिजे.

## विवाहविच्छेद, एकपत्निकत्व व बहुपत्निकत्व

वरील उपायांचा अवलंब केल्यानें वैवाहिक प्रेमाला चिरकाल स्थैर्य लाभेल इतकेंच नव्हे तर त्या प्रेमाचा उत्कर्ष होत जाईल. पण वरील उपाय सुचविणें सोपें आहे, त्यांचा व्यवहारांत अवलंब करणें फारच कठिण आहे, यांत शंका नाहीं. म्हणून सामान्यत: विवाहोत्तर कालांत विजोडपणा उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. मग विवेकबुद्धीनें प्राप्त परिस्थितींत समाधान मानणें किंवा डायव्होर्स करून पुर्नविवाहित होणें यांपैकीं एक मार्ग पत्करणें भाग पडतें; आणि स्वभावभेदाप्रमाणें पुरुष पहिल्या किंवा दुसऱ्या मार्गाचा अवलंब करतो. रसिक पण तामसी स्वभावाचा माणूस तामसी मार्गाचा अवलंब

करून डायव्होर्स मागतो, पुर्नविवाह करतो. सात्विक स्वभावाचा इसम स्त्रीसौख्य गौण मानून आपल्या आवडीच्या व्यवसायांत तल्लीन होतो. तामसी प्रकृतीच्या माणसाकरितां डायव्होर्सचा कायदा हिंदु लॉमध्यें असणें जरूर आहे. तसा कायदा नसल्यामुळें आणि बहुपत्निकत्वाची परवानगी असल्यामुळें चांगल्या विद्वान् व प्रसिद्ध इसमावर चमत्कारिक प्रसंग ओढवतो. पहिली पत्नी जिवंत असूनहि अननुरूप झाल्यामुळें तो विद्वान् दुसऱ्या अनुरूप व आकर्षक स्त्रीच्या प्रेमांत सांपडतो व अनन्यगतिक होऊन तिच्याशीं विवाह-बद्ध होतो ! असे २।४ प्रसिद्ध विवाह वृत्तपत्रांत टीकाविषय होऊन गेले आहेत. त्याची उलट बाजू अद्याप प्रसिद्ध झाली नाहीं. तत्राप अशा विवाहाचें कारण असें असेल कीं,

(१) पहिली पत्नी पुरेशी सुविद्य व पतीचे व्यवसायांत सहकारिता करण्याइतक्या पात्रतेची नसावी; किंवा,

(२) पहिल्या पत्नीचें मूळचें शारीरिक आरोग्य व आकर्षण नाहीसें होऊन ती नालायक झाली असावी; किंवा,

(३) पहिली पत्नी दुराचारी असावी.

अशा प्रकारचे कांहीं विशेष असल्यामुळें कोणी पति शेष आयुष्य रुक्ष घालविण्यापेक्षां द्वितीय विवाह करील, तर तो विवाह क्षम्य मानणें योग्य नव्हे काय ? उलट पक्षीं असें कांहींच कारण नसतां द्वितीय विवाह कोणी करील तर तें कृत्य कमालीचा नीचपणा समजून त्याबद्दल सामाजिक उपहास व निंदा जाहीरपणें होणें, हेंच उचित शासन होय.

असो. वर दर्शविल्याप्रमाणें योग्य कारणास्तव प्रथम पत्नीचे हयातींतच दुसरा विवाह करणें भाग झाल्यास डायव्होर्सचा मार्ग ख्रिस्ती, मुसलमानी व पारशी कायद्यांनीं उभयतांना मोकळा ठेवला आहे; पण हिंदु लॉमध्यें डायव्होर्स नाहीं. पुरुषांना बहुभार्यत्वाची कायदेशीर परवानगी असल्यामुळें पुरुष द्वितीय विवाह करतो, पण त्याची पहिली पत्नी हिंदु कायद्याच्या आड-काठीमुळें अत्यंत अडचणींत पडते. तिला दुसरा पति करतां येत नाहीं, इतकेंच नव्हे तर पति व नूतन सवत हालजाच (cruelty) करीत नसतील

तर स्वतंत्र राहून पोटगी मागण्याचा हक्कहि हिंदु लॉनें अशा प्रथम पत्नीला दिलेला नाहीं ! हा मोठाच अन्याय असून डायव्होर्सचा व रीमॅरेजचा मार्ग हिंदु स्त्रियांना कायद्यानें मोकळा केला पाहिजे, हें न्याय्य होय.

## डायव्होर्स कीं अनैतिक संबंध

हिंदु लॉमध्यें डायव्होर्सचा मार्ग नसल्यामुळें पति व पत्नी दोघांची कुचंबणा होते; कारण पुरुषाला बहुभार्यत्वाची सवलत असली तरी घरांत जिवंत सवत असतांना अशा पुरुषाला दुसरी स्त्री माळ घालण्यास सहसा तयार होत नाहीं. आणि त्यामुळें पहिल्या स्त्रीचे अगदीं वास्तविक नालायकी-स्तवहि दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमपाशांत पुरुष गुंतला तरी असा पुरुष व स्त्री विवाह न करतां विवाहबाह्य संबंध चालू ठेवतात; आणि आधुनिक संततिनियमनाच्या साधनांमुळें असा अनैतिक संबंध वर्षानुवर्ष चालू राहूं शकतो ! पण नैतिक व सामाजिक दृष्टया असे विवाहबाह्य स्त्रीपुरुषसंबंध अत्यंत निंद्य होत. असे संबंध समाजानें उपेक्षणीय मानल्यास स्त्री व पुरुष स्वैर बनून नवेनवे प्रेमसंबंध किती जमवावे, याला कांहीं मर्यादा राहणार नाहीं. प्रत्यक्ष विवाह ही स्त्री व पुरुष दोघांच्या पायांत मोठी जड शृंखला असून विवाहसंबंधाचा जाहीरपणा ही एकच गोष्ट पुरुष व स्त्री या दोघांच्या स्वैर वर्तनाला उत्तम आळा घालूं शकते. ज्यांचा विवाह झालेला नाहीं अशा स्त्रीपुरुषाचा संबंध असल्यास त्याकडे समाज अत्यंत तीव्र व तीक्ष्ण नजरेनें पाहतो व त्यांची प्रत्यक्ष।प्रत्यक्ष निंदा-हेटाळणी फार करतो; व प्रत्येक समाजानें विवाहबाह्य संबंध अत्यंत हीन समजून अशा स्त्रीपुरुषांचा सामाजिक दर्जा अधमाधम मानणें जरूर आहे. असें स्वैरवर्तन क्षम्य मानल्यास कोणत्याहि स्त्रीस आपल्या नवऱ्याबद्दल आणि कोणाहि पुरुषास स्वतःच्या बायकोबद्दल भरंवसा न पटून जो संशयकल्लोळ माजेल, त्यांत कौटुंबिक सुख व स्वास्थ्य यांची संपूर्ण होळी होईल ! ! आणि बिचारीं समंजस मुलें ! ! ज्या समाजांत कोणीहि स्त्री वा पुरुष मन मानेल तितके विवाहबाह्य शरीर-संबंध ठेवूं शकतात, त्या समाजांत विवाहसंबंध, औरस संतति, कायदेशीर वारसा, वगैरे सर्व गोष्टी निरर्थक ठरून अपत्यप्रेम, मातृप्रेम, पितृप्रेम, भ्रातृ-प्रेम, भगिनीप्रेम या सर्व कोमल भावना नष्ट होतील ! !

तात्पर्य, अनैतिक संबंध किंवा विवाहबाह्य संबंध समाजस्वास्थ्याला अत्यंत घातक असल्यामुळें घटस्फोटाचा कायदा हिंदु लॉमध्यें झाला पाहिजे, हें मान्य करणें भाग आहे. पण कोणत्या कारणास्तव व कोणत्या कोर्टा-मार्फत कोणत्या पद्धतीनें घटस्फोट मिळावा हाहि अवघड प्रश्न आहे.

## घटस्फोटाचा कायदा

असा कायदा व्हावा म्हणून मुंबईचे सुप्रसिद्ध डॉ. देशमुख यांनीं एक बिल वरिष्ठ कायदेकौन्सिलांत मांडलें आहे. त्यांत एकतर्फी फक्त स्त्रियांच्याच अडचणी लक्षांत घेऊन मसुदा केला आहे. या बिलाच्या अपुरेपणाबद्दल वरेच टीकालेखहि प्रसिद्ध झाले आहेत. इतकेंच नव्हे तर, पुण्यांतील कांहीं प्रमुख विद्वानांनीं जाहीर पत्रक प्रसिद्ध केलें असून त्यांत घटस्फोटाचा कायदा अजीबात नसावा, असें मत दिलें आहे; आणि स्त्रियांचे बाबतींत उत्पन्न होणाऱ्या अडचणींचें निराकरण करण्यास निराळ्या प्रकारचे कायदे सुचविले आहेत, ते—

(१) [अ] पहिली पत्नी योग्य प्रकारें नांदत असतां तिच्या स्व-खुषीच्या संमतीशिवाय पतीनें दुसऱ्या स्त्रीशीं विवाह केल्यास तो विवाह रद्दबातल समजण्यांत यावा. [आ] अशा प्रकारचा विवाह करणारे स्त्रीपुरुष हे फौजदारी गुन्ह्याचे दोषी समजून त्यांस शिक्षा व्हावी.

(२) वैवाहिक शपथ मोडून जो पुरुष व्यभिचार अगर क्रूरपणा किंवा यासारखा स्त्रीचा दोष शाबीत न करतां, तिला पृथग्निवास (judicial separation) न देतां व खर्च बचावण्यासाठीं आणि दुष्ट हेतुपुरःसर टाकून देण्यासाठीं स्त्रीचा छळ अगर त्याग करील, अगर स्त्रीच्या धार्मिक भावना लक्षांत न घेतां हिंदुधर्मविरोधी धर्मांतर करील त्याचें गृहस्वामित्व नष्ट होऊन तें पूर्णपणें स्त्रीकडे यावें व शिवाय त्याच्या भावी मासिक मिळकतीचा अर्धा हिस्सा स्त्रीला व मुलाबाळांना त्यांच्या उपजीविका वगैरेकरितां मिळण्याची तजवीज व्हावी. स्त्रीला न्याय्य पृथग्निवास सध्यांपेक्षां सहज व परिणामकारक मिळावा. शिवाय विवाहोत्तर ऋणत्रय अपाकरण न करतां केवळ वैय्यक्तिक स्वरूपाचें आध्यात्मिक ध्येय गांठण्याचा प्रयत्न करणें हें धर्माज्ञे-

विरुद्ध असल्यानें स्वस्त्रीचें वय ४५ वर्षांचे होण्यापूर्वी तिचा त्याग करणारास (Restitution of conjugal rights च्या) प्रचलित पुरुषानुकूल तत्त्वाप्रमाणें न वागल्यास शिक्षा होण्याचा कायदा व्हावा.

(३) स्त्रीपुरुषांपैकीं कोणाहि एकास दुसऱ्याच्या किंवा अपत्यांच्या प्रकृतीस घातुक असलेला आणि लैंगिक अनीतीमुळें जडलेला सांसर्गिक रोग असेल तर घटस्फोट मिळावा.

या पत्रकावर सह्या करणारे विद्वान् व त्यांचें मत याबद्दल कोणालाहि आदरच वाटेल, कारण हिंदुधर्मशास्त्रानें घटस्फोट त्रैवर्णिकांना निषिद्ध मानला असून हजारों वर्षें रूढिहि तशीच आहे. नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ॥ या शास्त्रवचनांत घटस्फोटास परवानगी दिलेली आहे, तरी-सुद्धां रूढीनें घटस्फोट मान्य केला नाहीं, ही गोष्ट त्रैवर्णिक हिंदूंच्या उच्च विचारसरणीची साक्ष पटविते. घटस्फोटाची मोकळिक देणें म्हणजे कांहीं अंशीं माकडाच्या हातांत कोलीत देण्यासारखें आहे, म्हणजे कांहीं उच्छृंखल स्त्रीपुरुष त्या योगानें कौटुंबिक स्वास्थ्याची स्वहस्तें होळी करण्यास प्रवृत्त होतील, यांत शंका नाहीं. हें खरें असलें तरी, या कायद्याची आवश्यकता आहे.

## पारशी कायद्यांतील घटस्फोटाचीं कारणें

(१) लग्नाच्या वेळेपासून दोघांपैकीं एक जण कोणी वेडें असल्यास. (२) क्लीबत्व असल्यास. (३) दोघांपैकीं कोणी सात वर्षे नापत्ता झाल्यास. (४) दोघांपैकीं कोणीहि लग्न झालेल्या स्त्रीपुरुषांशीं बेकायदेशीर व्यवहार करीत असल्यास. (५) पुरुष कुमारिकेशीं संबंध ठेवीत असल्यास. (६) स्त्रीशीं दांडगाई मारहाण केल्यास. (७) दुसरें लग्न केल्यास, दोघांनाहि घटस्फोटाची मुभा आहे.

## ख्रिश्चन समाजांतील घटस्फोट

ह्या ॲक्टान्वयें—(१) नवऱ्यास, बायको इतर पुरुषाशीं संबंध ठेवीत असल्यास घटस्फोट घेतां येतो, (२) स्त्रीस, पुरुष परधर्मांत गेल्यास, (३) नवऱ्यानें दुसऱ्या बाईशीं लग्न केल्यास, (४) परस्त्रीशीं बेकायदेशीर

संबंध ठेवल्यास, (५) बळजबरीचा संभोग, किंवा सृष्टिविरुद्ध कर्म केल्यास, (६) स्त्रीला मारहाण केल्यास, आणि (७) दोन वर्षे स्त्रीत्याग केल्यास.

वरील कारणांसाठीं दोघांनाही घटस्फोटाची परवानगी आहे.

## मुसलमानांतील घटस्फोट

मुसलमानांत विवाहविच्छेदाचे तीन प्रकार आहेत ते असे: (१) तल्लक (२) खुलना किंवा मुबारत (३) न्यायकोर्टांतून घटस्फोट. पहिल्या प्रकारांत नवऱ्यानें बायकोला लेखी अगर तोंडी असें कळवावें लागतें कीं मला तुझ्याशीं यापुढें विवाहसंबंध ठेवावयाचा नाहीं. हा बेत मागाहून बदलतांहि येतो. परंतु संबंध तोडला असें कळविल्यापासून सतत तीन महिने जर नवऱ्यानें स्त्रीशीं कसलाहि संबंध ठेवला नाहीं तर हा विवाहविच्छेद कायम होतो, त्यानंतर तो बेत बदलतां येत नाहीं.

खुलना म्हणून जो दुसरा प्रकार आहे त्यांत नवरा आपल्या बायकोला लग्नांत मिळालेला हुंडा अगर पैसाअडका परत देऊन संबंध तोडतो. हाच संबंध पैसे न देतां तोडला तर त्यालाच मुबारत म्हणतात.

तिसरा प्रकार न्यायकोर्टांकडून काडीमोड करून घेण्याचा. हा हक्क पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाहि आहे. अज्ञात असलेलें नवऱ्याचें नपुंसकत्व, नवऱ्याकडून छिनालपणाचा दोषारोप केला जाणें, जिवाला धोका येईल अशी गांजणूक, इत्यादि कारणांकरितां स्त्रीला अशा प्रकारची काडीमोड मागतां येते.

घटस्फोटाचे कायद्याची तात्त्विक भूमिका अशी कीं, घटस्फोट हा 'मँडेटरी व रेकमेंडेटरी' अशा मिश्र स्वरूपाचा कायदा पाहिजे. वैवाहिक जीवनांत एकाच्याच म्हणजे पतीच्या किंवा पत्नीच्या अपराधामुळें घटस्फोट मागण्याचा प्रसंग दुसऱ्याला स्वतः पूर्णपणें निरपराधी असतांहि येतो. तर कांहीं बाबतींत दोघांच्याहि चुकीमुळें घटस्फोट करणें आवश्यक ठरतें. घटस्फोट करणें म्हणजे मोठें शतकृत्य करणें आहे, असें मानणें चूक आहे. घटस्फोट ही अपराधी जोडीदाराला एक प्रकारची शिक्षा आहे, आणि निरपराधी व्यक्तीला रीलीफ म्हणजे दुःखापमानादिकांतून सोडवणूक आहे. विवाह-

बंधन सुखासमाधानानें चालविणें अशक्य झाल्यामुळें घटस्फोट हें त्या दोषावरचें कडू औषध आहे. कारण घटस्फुटित स्त्री व पुरुष दोघांकडेहि समाज दोषार्थक दृष्टीनेंच पाहणार. अर्थात् हा दोष किंवा अपराध क्षुल्लक स्वरूपाचा असेल तर त्याला घटस्फोट मिळतांच कामा नये. घटस्फोटाचा पाश्चात्य देशांतला कित्येक ठिकाणचा कायदा फार व्यापक म्हणजे किरकोळ कारणाकरितां घटस्फोट देणारा आहे; व कांहीं बाबतींत अपुरा व घटस्फोटांना उत्तेजन देणारा आहे; म्हणून घटस्फोटांची संख्या कांहीं पाश्चात्य देशांत फार वाढली आहे; पण ही संख्यावाढ हें दुश्चिन्ह आहे असें मानून त्यावर उपायहि विद्वान् समाजशास्त्रज्ञ सुचवीत आहेत, व राजकारणी पुरुष कायदा सुधारून ते उपाय अमलांत आणीत आहेत. ते सर्व विचारांत घेऊन हिंदुस्थानांत योग्य असा कायदा झाला पाहिजे.

## सुभाषितें व वचनें

विधिवत्प्रतिगृह्यापि त्यजेत्कन्यां विगर्हिताम् ।
व्याधितां विप्रदुष्टां वा छद्मना चोपपादिताम् ॥ मनु० ९।७२

यस्तु दोषवतीं कन्यामनाख्यायोपपादयेत् ।
तस्य तद्वितथं कुर्यात्कन्यादातुर्दुरात्मनः ॥ मनु० ९।७३

अतिक्रामेत्प्रमत्तं या मत्तं रोगार्तमेव वा ।
सा त्रीन्मासान्परित्याज्या विभूषणपरिच्छदा ॥ ९।७८

उन्मत्तं पतितं क्लीबमबीजं पापरोगिणम् ।
न त्यागोऽस्ति द्विषन्त्याश्च न च दायापवर्तनम् ॥ ९।७९

मद्यपा साधुवृत्ता च प्रतिकूला च या भवेत् ।
व्याधिता वाधिवेत्तव्या हिंस्त्रार्थघ्नी च सर्वदा ॥ ९।८०

वंध्याष्टमेऽधिवेद्याब्दे दशमे तु मृतप्रजा ।
एकादशे स्त्रीजननी सद्यस्त्वप्रियवादिनी ॥ ९।८१

या रोगिणीस्यात्तु हिता संपन्ना चैव शीलतः ।
सानुज्ञाप्याधिवेत्तव्या नावमान्या च कर्हिचित् ॥ ९।८२

## प्रकरण बारावें

# पुनर्विवाह—विधवाविवाह

"विधवांशीं पुनर्विवाहित होऊं नये, हा उत्कृष्ट नियम होय. विशेषतः ज्या विधवांचे एक किंवा अनेक पती आकस्मिक अपमृत्यूनें किंवा अपरिहार्य रोगानें न मरतां अन्य कारणांनीं मेले असतील अशा विधवांशीं पुनर्विवाह शक्यतों टाळावा. कारण अशा स्त्रियांचे ठिकाणच्या कांहीं स्वभावविशेषामुळें त्यांच्या पतींच्या ठिकाणचा वीर्याचा साठा संपुष्टांत येतो. त्यांचीं शरीरें क्षीण होतात, व अकालीं त्यांना यमपुरीचा मार्ग धरावा लागतो."

### अनुकूल वचनें

'को वां शयत्रा विधवेव देवरम्' —ऋ. १०, ४०, २

या पूर्वं पतिं वित्त्वाऽथान्यं विन्दतेऽपरम्।
पन्चौदनं च तावजं ददातो न वियोषतः —अथर्व ९,५,२७

समानलोकोभवति पुनर्भवाऽपरः पतिः।
योजं पञ्चौदनं दक्षिणा ज्योतिषं ददाति —अथर्ववेद ९,५,२६

(पुनर्भूर्दिधिषूरूढा द्विस्तस्यां दिधिषूः पतिः) दिधिषूपति
—तैत्तिरीय ब्राह्मण ३,४४,१

'पाणिग्राहे मृते बाला केवलं मंत्रसंस्कृता।
सा चेदक्षतयोनिःस्यात्पुनः संस्कारमर्हति। —वसिष्ठ धर्मसूत्र १७,७४

यदि सा बालविधवा बाला त्यक्ताऽथवा क्वचित्।
तदा भूयस्तु संस्कार्या गृहीता येनकेनचित् —बौधायन ४,१,१८

अक्षताचक्षताचैव पूनर्भूः संस्कृता पुनः। —याज्ञवल्क्य १,६७

अष्टवर्षाण्युदीक्षेत ब्राह्मणी त्पोषितं पतिं।
अप्रसूता तु चत्वारि परतोऽन्यंसमाक्षयेत।—नारद, स्त्री-पुरुष योग ९८

दीर्घप्रवासिनः प्रव्रजितस्य प्रेतस्य वा भार्या सप्ततीर्थान्याकांक्षेत।
संवत्सरं प्रजाता ततः पतिसोदर्यं गच्छेत्।
बहुषुत्पत्यासन्नं धार्मिकं धर्मसमर्थं वा कनिष्ठमभार्यं वा।
तदभावेप्यथ सोदर्यं सपिंडं तुल्यं वा। —कौटिलीय अर्थशास्त्र

## विधवाविवाह प्रतिकूल वचनें

न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः। —मनुस्मृति ९।६५
न द्वितीयश्च साध्वीनां क्वचित् भर्तोपदिश्यते। —मनुस्मृति
पूर्ववत्यामसंस्कृतायां वर्णान्तरे च मैथुने दोषः।
तत्रापि दोषवान् पुत्र एव। —आपस्तंब धर्मसूत्र २, ६, १३, ३-४

पुनर्विवाह म्हणजे स्त्रीचें किंवा पुरुषाचें पुन्हा लग्न या व्यापक अर्थानें या मथळ्याखालीं, वैवाहिक जोडीदार मयत झाल्यामुळें विधवा स्त्रीनें किंवा विधुर पुरुषानें केलेला विवाह, त्याचप्रमाणें घटस्फोट झाल्यामुळें घटस्फोटित स्त्रीनें किंवा पुरुषानें पुन्हा केलेला विवाह यांचा समावेश होतो; इतकेंच नव्हे तर अनेक पती किंवा अनेक पत्नी करण्याच्या चालीप्रमाणें द्रौपदीचे धर्मानंतर भीमार्जुनादिकांबरोबर झालेले विवाह, तसेंच अर्जुनानें सुभद्रादि अन्य स्त्रियांबरोबर केलेले विवाह, या सर्वांचा अन्तर्भाव पुनर्विवाह या शब्दांत होतो; व सर्व प्रकारच्या अशा अर्थांनीं अद्याप पुनर्विवाह कांहीं ठिकाणीं कांहीं जातींत चालू आहेत. पति किंवा पत्नी मयत झाल्यास पुनर्विवाह करावा, ही गोष्ट जगांत सर्व धर्मांत व सर्व जातींत मान्य असून फक्त हिंदुधर्मांतील त्रैवर्णिकांत म्हणजे ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्यांत हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें व रूढीप्रमाणें सर्वसंमत होऊन रूढ झाला नाहीं. ख्रिस्ती ऊर्फ पाश्चात्य संस्कृति, इस्लामी, पारशी, बौद्ध, वगैरे अनेक संस्कृती व भारतीय हिंदु संस्कृति यांच्यामध्ये वैवाहिक बाबतीत हा एक मोठाच फरक आहे.

## विवाह व रसिकता

प्रथम विवाह किंवा पुनर्विवाह शारीरिक पाशवी गरजेकरतां करणें, हें प्रतिपादन खालच्या दर्जाचें असून पंचज्ञानेंद्रियांपैकीं स्पर्शेंद्रियविषयक

सुखाकरितां विवाह करणें, ही रसिकता होय. गायनाची व सुवासिक फुलांची आवड नसणारे ज्याप्रमाणें अरसिक, त्याचप्रमाणें अविवाहित स्थितींत राहणारे स्त्रीपुरुष खरोखर अरसिक म्हटले पाहिजेत.

विधवा पुर्नविवाहाची आतांपर्यंतच्या पुरस्कर्त्यांची मूळ भूमिकाच सदोष किंवा अपुरी आहे. केवळ संभोगेच्छा ज्या विधवांना मारणें शक्य नाहीं, त्यांनीं पुर्नविवाह करावा; ज्यांना वांकडें पाऊल पडणार नाहीं अशी खात्री असेल त्या विधवांनीं व विधुरांनींहि पुन्हा विवाहाच्या भानगडींत पडूं नये, हा मतप्रचार अरसिकपणाचा आहे. विधवांच्या व विधुरांच्या किंबहुना सर्वच स्त्री-पुरुषांच्या विवाहाची तात्त्विक भूमिका स्पर्शेंद्रियसुखा-बद्दलची रसिकता ही असली पाहिजे. या दृष्टीनें विधवाविवाहाच्या प्रश्नाकडे पाहिलें म्हणजे विधवाविवाहाबद्दलचें सांप्रतचें सर्व समर्थन अपुऱ्या पायावर उभारलें आहे, हें सहज लक्षांत येईल.

## मैत्रीसुख

विधवाविवाहाचा कायदा पास झाल्याला साठ वर्षें अधिक झालीं, पण प्रत्यक्ष सर्व पुर्नविवाहांची आतांपर्यंतची संख्या ७५।१०० हि महाराष्ट्रांत झाली नाहीं, याचें कारण वर दर्शविलेली अरसिकता हें एक आहे, व तें स्त्री-शिक्षण प्रसारानेंच दूर होणारें आहे. त्याशिवाय दुसरीं दोन बलवत्तर कारणें आहेत. वरील ज्ञानेंद्रियांद्वारें मिळणाऱ्या सुखाप्रमाणेंच मिळणारीं जीं बुद्धिभावनाजन्य सुखें आहेत त्यांपैकीं एक प्रमुख स्नेहमैत्रीभावनेचें सुख हें आहे. "मित्रं प्रीतिरसायनं...." इत्यादि वर्णन करून भवभूतीनें उत्तर-रामचरितं नाटकांत प्रभु रामचंद्राच्या मुखानें मैत्रीसुखाचें अत्यन्त भावना-युक्त व हृदयस्पर्शी वर्णन केलें आहे; व तो अनुभव ज्या स्त्रीपुरुषांना आपल्या आयुष्यांत एखादा तरी जिवश्चकंठश्च स्नेही लाभला असेल त्यांना सहज पटेल. विवाहांतहि पतिपत्नीची भूमिका पूर्ण मैत्रीची असली पाहिजे. सामा-न्यत: कोणाहि स्त्रीला किंवा पुरुषाला एक तरी जिवाभावाचा मित्र असावा, अशी नैसर्गिक इच्छा असते; कारण मनुष्य समाजप्रिय प्राणि आहे; आणि विरुद्ध लिंगी सहचरी मित्र पति किंवा पत्नी नात्यानें प्राप्त करून घ्यावा,

हीहि एक उच्च भूमिका विवाहासंबंधांत असली पाहिजे, म्हणजे प्रत्येक स्त्रीनें व पुरुषानें प्रौढपणापासून विवाहसंबंधाचा मित्र जोडणें किती आवश्यक आहे, हें सहज पटेल. गाढ मैत्रीसुख अनुभवण्याची आवश्यकता व पात्रता अंगीं मुरण्यासहि उच्च शिक्षणाचीच जरूरी आहे, कारण तोहि एक उच्च प्रकारच्या रसिकतेचाच प्रकार आहे. म्हणून पुरुष व विशेषतः स्त्रिया यांमध्यें शिक्षणप्रसार अधिकाधिक होण्यावरच विधवाविवाहाची प्रगति अवलंबून राहील, हें उघड आहे.

## सामाजिक बहिष्कार व हीन दर्जा

विधवाविवाहाचे मार्गांतील अत्यंत बलिष्ठ प्रतिबंधक कारण, हिंदु समाजामध्यें प्राचीन काळापासून विधवाविवाहाला दिलेला हीन दर्जा, त्रैवर्णिकांना केलेली विधवाविवाहाची धर्मशास्त्रप्रणीत बंदी व तदनुसार ओढवणारा समाज व जाति-बहिष्कार वगैरे अडचणी, हें होय. विधवाविवाह इंग्रजी राज्यांत कायद्यानें मान्य केला; तथापि हिंदुधर्मशास्त्रानें व रूढीनें तो निषिद्धच मानला आहे. घटस्फुटितांचे पुनर्विवाह काय किंवा विधवांचे विवाह काय दोनहि प्रकार उच्च वैवाहिक दृष्ट्या सर्वच धर्मांत व समाजांत गौण मानतात; नुकताच ख्रिस्ती समाजानें इंग्लंडांत एडवर्ड-सिम्पसन विवाह गौण मानला, हें ताजें उदाहरण आहे. महत्त्वाचा प्रश्न एवढाच आहे कीं, या विवाहांना हें गौणत्व किती मर्यादेचें असावें. हिंदुधर्मरूढीनें सांप्रत ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिन्ही जातींत घटस्फोट व पुनर्विवाह निषिद्ध मानला आहे. पण कोणत्याहि समाजांत वैधव्याचे प्रसंग ओढवणार हें निश्चित असल्यामुळें पुनर्विवाहाची पूर्ण बंदी, प्रत्यक्ष दारूबंदीपेक्षांहि अवघड आहे, असें थोड्या विचाराअंतीं कोणासहि पटेल; कारण मद्यपानलालसेपेक्षांहि कामलालसा प्रत्येक स्त्रीपुरुषांत उपजत, नैसर्गिक, व बलवत्तर आहे. किंबहुना मद्यपानलालसा नैसर्गिक नसून कृत्रिम आहे, हिंदु स्त्रीसमाजांत ती मुळींच नाही; पाश्चात्य स्त्रीसमाजांतहि ती तुरळक आहे. उलट पक्षीं कामलालसा पृथ्वीच्या पाठीवर सर्वच प्राणिमात्रांना आहे; व मानवांना तर विशेषच आहे. मग विधवा किंवा विधुर ब्राह्मण किंवा क्षत्रिय किंवा वैश्य जातीय म्हणून त्यांच्यांत

कामलालसा नाहीं, असा पक्षपात निसर्ग करीत नाहीं! तात्पर्य, निसर्गतः प्राप्त होणारी कामलालसा तृप्त करण्याचा मार्ग ब्राह्मणापासून अस्पृश्यापर्यंत सर्व जातींना धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, समाजशास्त्र या सर्वांनींच मोकळा ठेवला पाहिजे. विधवा व विधुर यांच्या विवाहाचा दर्जा नैतिक व सामाजिक दृष्ट्या प्रथम विवाहाप्रमाणेंच मानला पाहिजे. धर्मशास्त्रदृष्ट्या तो गौण मानला तरी गौण म्हणजे सर्वस्वीं त्याज्य व बहिष्कारार्ह मात्र नव्हे!

## पूर्वापत्यांचा प्रश्न

घटस्फुटित व विधवा विवाहांत आणखी जबरदस्त व्यावहारिक अडचण पूर्वसंबंधाच्या मुलांची होय. तीसचाळीस वर्षांचे विधुर किंवा विधवा यांना सामान्यतः दोनचार मुलें असणारच, आणि अशा मुलांची विधुराच्या व विशेषतः विधवांच्या पुनर्विवाहाच्या मार्गांत मोठीच धोंड आड येते. चारपांच मुलें असलेला विशेषतः त्या मुलांत एखादा तरी मुलगा असलेला विधुरहि या व्यावहारिक अडचणीस्तव द्वितीय विवाहास कचरतो व त्यापासून परावृत्त होतो, मग चारदोन मुलें असलेल्या घटस्फुटितेचा वा विधवेचा विवाह अशक्य मानला जातो, त्यांत नवल काय? पण स्त्रीशिक्षण व विशेषतः संततिनियमनाचीं साधनें यांचे प्रसाराबरोबर या अडचणी दूर होणाऱ्या आहेत. सुशिक्षित स्त्रीपुरुषांत मुलांबाबतचा सावत्रपणाचा भाव तितकासा तीव्र स्वरूप घेणार नाहीं. शिवाय पूर्वसंतति भरपूर असल्यास पुनर्विवाहितांना संपूर्ण संततिनियमन करणें नव्यानव्या शास्त्रीय शोधांमुळें पूर्ण शक्य होणार आहे. म्हणून पूर्वसंतति असलेल्या विधुरांनीं व विधवांनींहि पुनर्विवाहास बिचकण्याचें कारण उत्तरोत्तर राहणार नाहीं.

## वयोमर्यादेबाबत कायदा

विधवाविवाहाचा प्रसार मोठ्या प्रमाणांत व्हावा म्हणून हल्लीचे विधवाविवाहाचे पुरस्कर्ते एक उपाय सुचवितात, त्याचाहि विचार करूं. विधुरानें विधवेशींच विवाह केला पाहिजे, असा कायदा सरकारनें करावा असें सुचविण्यांत येतें. पण हा उपाय अपुरा व व्यक्तिस्वातंत्र्यावर मोठा

घाला घालणारा आहे. अशा निर्बंधामुळें प्रौढ २०।२५ वर्षांवरील कुमारिकांचा विवाह फार बिकट होऊन बसेल. शिवाय या निर्बंधामुळें जरठ विधुर व अल्पवयी विधवा यांच्या विवाहाला प्रतिबंध होत नाहींच. सबब शारीर-शास्त्र, मानसशास्त्र व व्यवहारशास्त्र दृष्ट्या वरील निर्बंध बराचसा अयुक्तिक दिसतो. त्यापेक्षां कोणत्याहि विवाहांत वर व वधू यांच्या वयांमधील अंतर १० वर्षांपेक्षां अधिक असतां कामा नये, असा कायदा करावा. अशा कायद्यानें सर्व गोष्टी साधतील व मुख्यतः विधवाविवाहाला उत्तेजन मिळेलच. कारण ३५ वर्षांपुढील विधुरांना २५ वर्षांवरील कुमारिका मिळणें दुर्मिळ असल्यामुळें त्यांना विधवाविवाहाशिवाय गत्यंतरच उरणार नाहीं आणि सर्वांत महत्त्वाचा सामाजिक व शारीरिक दृष्ट्या फायदा असा होईल कीं, विषम विवाह—वयदृष्ट्या विषम विवाह—मुळींच होणार नाहींत. जरठ-कुमारी विवाहामुळें हमखास ओढवणारें वैधव्य अजिबात टळेल. सबब वयोमर्यादेबद्दल असा कायदा असणें सर्वस्वीं इष्ट आहे; व त्यानेंच विधवा-विवाहाच्या प्रसाराला आपोआप मोठी चालना मिळेल, हें उघड आहे.

## Octogenerian to Wed Seventh Wife

NEVER HAD A CROSS-WORD WITH FIRST SIX, HE SAYS EXPATIATING ON SECRET OF HAPPY MARRIAGE

### पुर्नविवाहाबाबत एका पाश्चात्याचा स्वानुभव येणेंप्रमाणें

Arthur Smith, oldest inhabitant of tiny. peaceful Walsgrave-on-Stowe, near Coventry, startled his neighbours last month by announcing that he had decided to take unto himself a seventh wife.

" And why shouldn't marry again " broad-shouldered, bearded and side-whiskered Arthur asked me when I saw him at his bungalow, writes the special correspondent of " The people. "

"True, I'll be eighty in a few months, but the doctor says I'll live to be 105, and I feel twenty years younger.

"To cap that I've got engaged to an angel and she's every bit as sweet as the six other fine women I've wed in my time."

"Yes," continued Mr. Smith, as he pointed one by one to the pictures of his wives that hung on the wall of his bungalow. "Yes, they've all been lovely women, every one of 'em.

"But it's no good you asking of me the name of my next bride, 'cause I shan't tell you.

"She lives in Leicester. The banns are up and we're getting" married soon, but that's all I'm telling about her. They've all been trying to find out who she is, how old she is, what she's like, but when I says I'm not going to tell I means it."

I did everything possible to persuade him to reveal his fiancee's identity, but his lips were sealed on this point.

But he did tell me what it is like to have six different wives—with another to look forward to.

"All of my wives have been God-fearing women" he said.

"I reckon that's the secret of happy marriage, because I've never had a cross word in all my married lives.

"I started married life when I was twenty-one. We lived on a pound a week, for that was all the wages I got.

"That will show you that it was a love match. In fact, I have always married for love.

"And I don't think I have ever been married for money, either, for the simple reason that I've never had much.

HONEYMOON DRIVES

" That's a lesson for all the young people who go gadding about, apleasuring all the time.

" When I bring my bride to this little home we, in 1936, mind you, shall live on little more than a pound a week.

" I don't believe in honeymoons and going to the pictures. Come outside, young man. "

Mr. Smith took me to the back of his bungalow and showed me his pony cart.

" That, " he said, " has provided me with four honey-moons. Instead of spending a lot of money on going away I take my brides for trips round the country in that cart.

" The last three or four times I've been married I've driven around—and they've enjoyed it; "

Mr. Smith told me that his first wife was fatally burned while she was cooking his dinner. She died barely a year after their marriage. "

" I decided to try and settle down in America, but my money soon ran out, " Mr. Smith added. ' I was down to my last cent.

" Then I met the best friend I have ever had. He helped me to start up in business as a baker. I had learned the trade before.

" In a year or two I was doing well. Everybody seemed to help me by buying my cakes and biscuits—even though they bought their bread regularly from other bakers.

" Then I met a charming American girl. We fell in love and married.

" It's very easy to wed in America, I don't know about the present, but in those days all you had to do was to walk into an attorney's and he married you for nothing. "

Mr. smith smiled at the thought.

But tragedy, in the shape of illness, overtook his wife. she died. Then, shortly afterwards, doctors told Mr. Smith that unless he left the country, he, too, would die. The climate did not agree with him.

Back in England—at Walsgraveon-stowe—Mr. Smith did well out of market gardening. He bought a disused sports pavilion from his brother and converted it into the eight-roomed bungalow where he now lives.

Marriage attracted him again : in five years he was a widower once again—with five little children on his hands.

### Hates to be Alone

" And do you know, " Mr. smith told me proudly, " for five years I got up at sunrise, prepared breakfast, washed and dressed those youngsters and got them to school and to a friend's home before seven o'clock when I had to be at work.

" It was nearly fourteen years after the death of that wife that I married again. A fine woman she was. Never a cross word between us, just like all my previous marriages; but she, too, passed away.

" My next wife lived just down the street. We were happy together for twenty-years—and then she was taken.

" I'm a man who hates to be alone, " Mr. Smith added. " I thought that I had been very, lucky in my marriages.

" I went and visited my fourth wife's son. He lived in Wales. He was my stepson.

" And would you believe it, I fell in love with his sister-in-law.

" You can tell what a fine woman she was, for they all pleaded with me not to take her away from them.

" By all means marry her, " they said, but come and live here so that we don't lose her. '

" But I did take her away, and it broke my heart when she died after three years of married happiness. "

But Mr. Smith's sixth wife was taken from him five months after he married her.

He met her as he met his present fiancee and three of his other wives, while he was preaching at local religious meetings. —*Bombay Chronicle*, 16–8–36

## सुभाषितें व वचनें

नष्टे मृते प्रवृत्तिते क्लीबे च पतिते पतौ ।
पंचसुआपत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ।।

नीचत्वं वा परदेशं वा प्रस्थितो राजकिल्बिषी ।
प्राणाभिहन्ता पतितस्त्याज्यः ।। कौटिलीय अर्थशास्त्र ३।२

अमोक्ष्या भर्तुरकामस्य द्विषती भार्या ।
भार्यायाश्चभर्ता । परस्परं द्वेषान्मोक्षः ।। कौटिलीय अर्थशास्त्र

अमोक्षो धर्मविवाहाना मिति (धर्मविवाह–ब्राह्म, प्राजापत्य, दैव व आर्ष )
कौटिलीय अर्थशास्त्र ३।३

# प्रकरण तेरावें

# मिश्रविवाह

भिन्नधर्मीय किंवा भिन्नजातीय म्हणजे निरनिराळ्या धर्मांच्या किंवा निरनिराळ्या जातींच्या व पोटजातींच्या स्त्रीपुरुषांचे विवाहास मिश्रविवाह म्हणतात. पण दुसऱ्या निराळ्या अर्थानेंहि मिश्रविवाहाचा विचार केला पाहिजे. दरिद्री, मध्यम व श्रीमंत स्थितीपैकीं भिन्न भिन्न स्थितींतल्या म्हणजे दरिद्री किंवा मध्यम स्थितींतल्या स्त्रीचा किंवा पुरुषाचा श्रीमंतींतल्या पुरुषाशीं किंवा स्त्रीशीं विवाह हाहि एका अर्थी मिश्रविवाह असून तोहि अवघड प्रश्न आहे. तसेंच शिक्षणाच्या दृष्टीनें अशिक्षित, अल्पशिक्षित व विद्वान् अशा स्त्रीपुरुषांमध्येंहि मिश्रविवाह म्हणजे अशिक्षित वा अल्पशिक्षितांचा विद्वानाशीं विवाह हाहि तशाच अर्थानें मिश्रविवाह होय. हे मिश्रविवाहाचे सर्वच प्रकार चिंतनीय आहेत, कारण

ययोरेव समं वित्तं ययोरेव समं श्रुतं । तयोर्विवाहः ॥

असें सुभाषित या बाबतींत मान्य होण्याजोगें आहे. तथापि, कायद्याच्या दृष्टीनें भिन्नधर्मीय व भिन्नजातीय विवाहच महत्त्वाचे आहेत; कारण सामान्य रूढ कायद्याप्रमाणें अशा मिश्रविवाहापासून झालेली संतति कायदेशीर मानली जात नसलेमुळें विशेष नवे कायदे करून अशा संततीचा अनौरसपणा दूर करावा लागला आहे; व त्यामुळें अशा मिश्रविवाहांनीं तज्जातीय व धर्मीय समाजांत खळबळ उडते.

## ऐतिहासिक मिश्रविवाह

ऐतिहासिक काळांत हिंदुस्थानांतील भिन्नधर्मीय मिश्रविवाहांचें उदाहरण म्हणजे सुप्रसिद्ध अकबर, जहांगीर, शहाजहानादि मोंगल बादशहा व रजपूत राजकन्या यांचें होय. परंतु ते विवाह विशिष्ट परिस्थितींत झाले. सर्व साधारण हिंदु व मुसलमान समाजालाहि ते पटले नाहींत; कारण त्या काळांत

त्यांचें अनुकरण महाराष्ट्र, मद्रास, बंगाल, वगैरे प्रांतांत झालें नाहीं, आणि औरंगजेबाचे कारकीर्दीपासून पुढें रजपूत-मुसलमानांतहि असले मिश्र-विवाह चालू राहिले नाहींत. शिवाय ते विवाह म्हणजे रजपूत कन्यांचेच झाले. मुलांचे झाले नाहींत. त्यामुळें ज्या कन्या दिल्या त्या व त्यांची संतति स्वकीयांपासून कायमची अलिप्त झाली इतकेंच. त्यामुळें हिंदु धर्मांत संकर संभवला नाहीं. असो. हे विवाह कांहीं जुलमानें व कांहीं अधिकारलालसेनें झाले, त्यांत तत्त्वदृष्टि नव्हती.

## सद्यःकालीन मिश्रविवाह

ब्रिटिश अंमलापासून पाश्चात्य शिक्षणाच्या वाढीमुळें व विशेषतः परदेशगमन-वास्तव्यामुळें हिंदी तरुणांचा इंग्लिश, फ्रेंच, जर्मनादि पाश्चात्य ख्रिस्तधर्मीय युवतींशीं परिचय होऊन मिश्रविवाहाचा प्रश्न हिंदु-मुसलमान समाजांपुढें व विशेषतः सनातनी हिंदु समाजापुढें पुन्हा उपस्थित झाला आहे. तो अकबरादि मोगल बादशाही अंमलामुळें एकमोडी अगर अल्पकालीन टिकणारा नसून यापुढें कायमचाच राहणार आहे. आगगाड्या, आगबोटी विमानादि साधनांमुळें जागतिक प्रवास व वास्तव्य सुलभ झाल्यामुळें आणि पौरस्त्य व पाश्चात्य देशांचे राजकीय संबंध फारच निगडित झाल्यामुळें भिन्नभिन्न धर्मीय स्त्रीपुरुषांचा परिचय होऊन त्यांतूनच मिश्रविवाहाचे प्रसंग उद्‌भवतात. अशा प्रकारें बरेच मिश्रविवाह गेल्या ५० वर्षांत झालेहि आहेत. पतिपत्नीच्या वैवाहिक स्वास्थ्याच्या व सुखाच्या दृष्टीनें मिश्रविवाह ही मोठी अवघड बाब आहे; विशेषतः उच्चशिक्षणसंपन्न पांढरपेशा वर्गांतील तरुणांना पाश्चात्य युवतींशीं विवाह करण्याचे प्रसंग आल्यामुळें आहार-पोषाखादि नित्य आचारांत असलेल्या भिन्नतेचा समन्वय करण्याचें काम फारच अवघड झालें. याचें पुणें-मुंबईकरांच्या अलीकडील परिचयांतलें सुप्रसिद्ध उदाहरण ज्ञानकोशकार डॉ. केतकर व श्री. शीलवतीबाई केतकर यांचें होय. केतकर मूळचे शाकाहारी ब्राह्मण आणि मिस् कोहन (शीलवतीबाई) मूळच्या मांसाहारी आंग्ल ख्रिस्ती. विवाहोत्तरहि डॉ. केतकरांचा बंदाचा आंगरखा, धोतर व पगडी असा वेष पुष्कळांच्या पाहण्यांत असून नेटिव्ह ख्रिस्ती

स्त्रीप्रमाणें साडी नेसणाऱ्या शीलवतीबाई असा जोडा पुण्याच्या रस्त्यांतून बरोबर जातांना पाहून आबालवृद्धांची पुष्कळ करमणूक झाली असून डॉ. केतकरांचा विक्षिप्तपणा प्रथम या पोषाखपद्धतीनेंच पुण्या-मुंबईंत रूढ झाला. असो.

## शीलवतीबाई केतकर यांचें मत

या मिश्रविवाहित दांपत्याचा या प्रश्नावर मत देण्याचा अधिकार निर्विवाद असून श्री. शीलवतीबाई केतकर यांचें मत पुढीलप्रमाणें आहे :

> "आम्ही मिश्रविवाह करूं का? असा जर कोणीं मला प्रश्न विचारला तर मी त्याला 'नको' असें ताबडतोब उत्तर देतें... मिश्र-विवाह म्हटला म्हणजे माझ्या डोळ्यासमोर त्यापासून होणारी संतति उभी राहते. मिश्रविवाहांत मुलांचा प्रश्न हा फार बिकट आहे. पुढच्या पिढीनें आईबापांना दोष देऊं नये असें वाटत असेल तर ह्या भानगडींत पडूं नये, असें मी म्हणतें. मुलांचा प्रश्न वगळला तरी मिश्रविवाहाचे बाबतींत आणखी एक अडचण म्हणजे आचारविचा-रांचा सामाजिक फरक आढळून येतो, आणि हिंदुस्थानांत आल्यावर आंग्ल मुलीला आपली फसगत झाली असें वाटूं लागतें."
>
> —'प्रभा' ता. ८ डिसेंबर, १९३६.

एका सुशिक्षित पाश्चात्य विदुषीचा १८।२० वर्षें वैवाहिक जीवन हिंदुस्थानांत घालविल्यानंतरचा हा अभिप्राय रेड सिग्नलप्रमाणें मिश्र-विवाहापासून युवयुवतींना परावृत्त करील, इतका स्पष्ट आहे!!

वरील विचारसरणी प्रत्यक्षानुभवनिष्ठ असल्यामुळें तिच्याबद्दल योग्य प्रमाणांत अनुमति दर्शवूनहि असें म्हणतां येईल कीं, वरील अभिप्राय वाचून सर्वांनीं एकदम बिचकून जाण्याचें कारण नाहीं. मिश्रविवाहाचें जीवन अवघड असतें, वैवाहिक सुखाचा तो कांहीं राजमार्ग नव्हे; हें खरें असलें तरी कोणींहि मिश्रविवाह करूं नये, असें म्हणतां येणार नाहीं. उलट पक्षीं, धोक्याचा मार्ग म्हणूनच साहसी युवयवती 'The danger self is lure

alone' ह्या न्यायानें मिश्रविवाह करतील; आणि कांहीं कारणास्तव मिश्रविवाह आवश्यकहि आहे.

मिश्रविवाहाची आवश्यकता अनेक कारणांनीं उद्भवते. त्यांपैकीं अत्यंत महत्त्वाचें कारण महाराष्ट्रीयांच्या बृहन्महाराष्ट्रांत व परदेशांत वसाहती हें होय. महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें गुजर, मारवाडी, मद्रासी, बंगाली, पंजाबी, शीख, वगैरे लोकांनीं येऊन कायम वस्ती केली आहे, तशी वसाहत महाराष्ट्रीयांनीं मराठेशाही व पेशवाईच्या ऐतिहासिक काळांत केली असून शिंदे, होळकर, गायकवाड हीं ठळक उदाहरणें आहेत. त्या काळीं मराठी साम्राज्याच्या विस्तारामुळें राजकारणासाठीं वसाहती झाल्या. तीच प्रथा आतां चालू असून सर्व हिंदुस्थानी प्रांतांत महाराष्ट्रीय वसाहती होत आहेत, व त्या वसाहती वाढण्यास उत्तेजन देणें अवश्य आहे.

## आफ्रिकेंत वसाहत

वरील प्रदेशांत वसाहत करण्यास तर फारच वाव असून महाराष्ट्रीय कुटुंबांनीं तिकडे स्थायिक राहून उत्तम उपक्रम केला आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, येथें बंगाली कुटुंबीयाप्रमाणें, महाराष्ट्रीय कुटुंबें वसाहती करीत आहेत; अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया अशा दूर देशांतहि महाराष्ट्रीय वसाहतींना क्षेत्र आहे. अशा दूरदूर ठिकाणीं प्रथम एकएकटे राहून उद्योगधंदा चांगला लागल्यावर किंवा लागण्याकरितां मिश्रविवाहाची म्हणजे तद्देशीय स्थानिक परधर्मीय कुटुंबाशीं वैवाहिक संबंध जोडणें आवश्यक व इष्ट असतें. नौकरी, व्यापार किंवा राजकारण वगैरे गोष्टी स्वदेशाच्या म्हणजे हिंदुस्थानच्या दृष्टीनें हितावह होण्याकरितां मिश्रविवाह आवश्यक असेल तर जरूर करावा. स्वतःच्या वैवाहिक सुखाच्या दृष्टीनें असे विवाह अवघड असतात खरे, पण स्वदेशहित साधण्याकरितां स्वार्थत्याग करूनहि असे मिश्रविवाह करावे, व महाराष्ट्रीय वसाहती परदेशांत कायम करण्यास झटावें. असे विवाह अपवादात्मकच होत आणि स्वदेशहितास्तव ते केल्यास हिंदु जनता अशा मिश्रविवाहाबद्दल सहिष्णुता दाखवील. मात्र केवळ वैषयिक प्रेम व सुख या स्वार्थी दृष्टीनें हे विवाह क्षम्य ठरणार नाहींत. कारण

स्वार्थत्यागपूर्वक साधलेल्या देशहिताची हिंदु जनता चहाती आहे, स्वार्थी विषयलंपट माणसांची चहाती नाहीं.

## हिंदी साम्राज्याचें राजकारण

हें साधण्याकरितांहि यापुढें मिश्रविवाहांची आवश्यकता उत्तरोत्तर अधिक भासेल. येत्या ५।५० वर्षांत हिंदुस्थान देश पूर्ण स्वतंत्र निदान डोमिनियन स्टेटसचे संपूर्ण अधिकार मिळविणार; व चारहि खंडांतील देशांत हिंदी परराष्ट्रीय वकील म्हणून कामें करण्याची संधि येणार. अशा वेळीं अनेक भाषाभिज्ञ असे लायक हिंदु तरुण या कामाला पुढें आले पाहिजेत. परदेशीय भाषा, रीतरिवाज वगैरे चांगले अवगत होण्यास मिश्रविवाह म्हणजे तद्देशीय स्त्रीशीं विवाह, हें उत्तम साधन आहे. म्हणून महाराष्ट्रीय तरुणांनीं या बाबतींत संकुचित धर्मभावनांच्या आहारीं न जातां धाडशी वृत्तीनें मिश्रविवाहाला तयार व्हावें व हिंदुस्थानच्या राजकीय हिताची कामगिरी उत्तम पार पाडण्यास समर्थ व्हावें. अशा देशकार्याकरितां मिश्रविवाह क्षम्य आहे.

## पाश्चात्य स्त्रीसमाज

या बाबतींत पूर्ण लायक आहे असें म्हणावें लागतें. जगांतील कोणत्याहि सुधारलेल्या देशांतील अन्यधर्मीय विद्वानांशीं विवाहबद्ध होण्याची पाश्चात्य विदुषी उत्सुकता दर्शवितात, व अन्य देशांत राहून वैवाहिक जीवन व्यतीत करण्याचें धाडस दाखवितात. आय्. सी. एस्. हिंदी तरुणाशीं विवाह करणाऱ्या आंग्ल युवतींचीं उदाहरणें आपण पाहतों, त्यापेक्षां पुष्कळच अधिक उदाहरणें होण्यास खुद्द हिंदु आय्. सी. एस्. तरुणांचा किंवा त्यांच्या निकट कुटुंबीयांचा विरोधच विशेष आड येतो. आय्. सी. एस्. अशा विद्वान् व भावी श्रीमंतींत वाढणाऱ्या तरुणांशीं विवाहबद्ध होणें तितकेसें कौतुकास्पद नाहीं; पण निष्कांचन विद्वान् हिंदु तरुणाशीं विवाहबद्ध होऊन भारतभूची सेवा यथाशक्ति करणाऱ्या व स्वतःच्या हिंदुधर्मीय पतीस साहाय्य करणाऱ्या पाश्चात्य युवती आहेत व त्यांचें कौतुक आपण भारतीयांनीं करावें तितकें थोडेंच होणार आहे. सुप्रसिद्ध राजकारणी लेखक व कार्यकर्ते सेंट निहालसिंग,

कॉ. मानवेंद्र रॉय, ज्ञानकोशकार डॉ. केतकर, 'सकाळ' पत्राचे संपादक डॉ. परुळेकर वगैरेसारख्या विद्वान् पण निर्धन इसमांशीं लग्न करून आजन्म, घटस्फोटाचा पाश्चात्य मार्ग खुला असतांहि, एकनिष्ठेनें वैवाहिक आयुष्यक्रम चालविणाऱ्या पाश्चात्य विदुषी खरोखरच धन्य होत.

भारतीय संस्कृति व आध्यात्मिक तत्त्वज्ञान यांचा आदर वाटून त्याचा अभ्यास करणाऱ्या व या पवित्र भारतभूची मनोभावें सेवा करणाऱ्या, तसेंच प्राचीन महर्षितुल्य जीवन व्यतीत करणारे कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनांत, महात्मा गांधींच्या आश्रमांत वरील विषयांचा अभ्यास करून तदनुसार आयुष्यक्रम आक्रमूं इच्छिणाऱ्या जिज्ञासू पाश्चात्य विदुषी हिंदुस्थानांत राहतात; त्यांना थोर साहित्यिक, तत्त्ववेत्ते, प्रोफेसर, अशा भारतीय विद्वानांशीं विवाहबद्ध होण्याचा योग आल्यास भारतीय संस्कृतिनुसार गृहस्थाश्रम चालविण्याची संधि लाभून त्या विदुषींची मनीषा अधिक आनंदप्रद रीतीनें पुरी होईल. अशा पाश्चात्य युवती विवाहास तयार असल्या तरी आमचे विद्वान् अशा विवाहसंबंधांस बिचकतात; हें योग्य नव्हे. मिश्रविवाहाची संधि अशा पाश्चात्य विदुषींस देणें आपल्या भारतीय विद्वानांचें कर्तव्य आहे; आणि तशी प्रवृत्ति पुढील काळीं वाढेल, अशीहि आशा आहे.

## श्रीमती शीलवतीबाई केतकर

वरीलप्रमाणें उच्च ध्येयानें प्रेरित होऊन विद्वान् व कार्यकर्त्या भारतीय पुरुषांशीं झालेले पाश्चात्य विदुषींचे मिश्रविवाह खात्रीनें आदर्शभूत होतील. कारण त्यांत वैषयिक मोहाला किंवा श्रीमंतींतल्या विलासी आयुष्यक्रमाचे स्वार्थाला किंवा इतर कोणत्याहि क्षुद्र वासनेला वाव नसते. असले मिश्रविवाह श्रीमती शीलवतीबाई केतकर यांनीं आपल्या लेखांत दर्शविलेल्या अडचणींतून योग्य मार्ग काढून यशस्वी होतील, या दृढ आशेला खुद्द या केतकर दांपत्याचेंच उदाहरण पुरेसें आहे. वैवाहिक निवडीचे वेळीं मिस् कोहन (शीलवतीबाई केतकर) तरुण, सुस्वरूप, बी. ए. व शिक्षणशास्त्राचा डिप्लोमा घेतलेल्या विदुषी होत्या व त्यांना त्यांच्या इंग्लंड, जर्मनी, वगैरे देशांत कोणीहि विद्वान्

सुखवस्तु पति लाभला असता. असें असूनहि त्यांनीं डॉ. केतकर यांचेबरोबर, पुढें श्रीमंतींतला विलासी आयुष्यक्रम उपभोगण्याचा यत्किंचितहि संभव नसतांना, विवाह केला; त्यांत उघडच सदरहु विदुषीचें डॉ. केतकर यांच्या विद्वत्तेबद्दल प्रेम व आदर आणि केतकरांच्या भावी सार्वजनिक आयुष्यक्रमांत सहकार्य करण्याची आवड हेच हेतू असले पाहिजेत. अशा उच्च हेतूंनीं प्रेरित होऊन विवाह केल्याबद्दलची माहिती ज्या थोड्या निकटवर्ती महाराष्ट्रीयांना होती, त्यांना प्रथमपासून शीलवतीबाईंबद्दल आदर वाटूं लागला. उलट पक्षीं इतरेजनांना डॉ. केतकरांचे वागणुकींतला विक्षिप्तपणा दिसूं लागल्यावर हा विवाह घटस्फोटानें लवकरच रद्द होईल, असें वाटूं लागलें. याप्रमाणें जनतेची मनःस्थिति असतांना या केतकर दांपत्याचीं पूर्ण सहकारितेच्या सुखी जीवनांत वर्षामागून वर्षें जाऊं लागलीं. पुढें ज्ञानकोशग्रंथकार्याचे समाप्तीचे वेळीं व तदनंतर तर डॉ. केतकर दांपत्याला आर्थिक हलाखी फार जाणवूं लागली. त्या वेळींहि शीलवतीबाईंची पतिनिष्ठा पाहून डॉ. केतकरांच्या स्नेह्यांना व चाहत्यांना या दांपत्याबद्दल अधिकच आदर व सहानुभूति उत्पन्न झाली. डॉ. केतकरांच्या निधनापर्यंत एकनिष्ठेनें प्रापंचिक हालअपेष्टा सोसणाऱ्या या विदुषीबद्दल आतां आदरोद्गार ऐकूं येतात. डॉ. केतकरांच्या निधनोत्तर शीलवतीबाई यांनीं आपल्या मृत पतीबद्दलचें कर्तव्य पूज्यभावनेनें पुरें करण्याचा म्हणजे डॉ. केतकरांचे अप्रकाशित ग्रंथ व लेख प्रसिद्ध करण्याचा स्वतःचा मनोदय वृत्तपत्रांत जाहीर केला आहे. अशा विदुषीचें उदाहरण पाश्चात्य व पौरस्त्य व भारतीय भावी विदुषींना अनुकरणीय खास आहे. शीलवतीबाईंना जर्मन भाषा उत्तम अवगत असल्यामुळें त्यांनीं ज्ञानकोशाला उपयुक्त अशी माहिती—जर्मन ग्रंथांतून ज्या ग्रंथांचें इंग्रजींतहि भाषांतर झालें नव्हतें—डॉ. केतकरांना उपलब्ध करून दिली, व ज्ञानकोशास व इतर पुस्तकांस गिऱ्हाईक मिळवून ग्रंथ खपविण्याचे कामांतहि मदत केली. डॉ. केतकरांचें खासगी आयुष्य सांपत्तिक अडचणींना तोंड देऊन शीलवतीबाईंनीं इतकें सुखमय केलें, म्हणूनच ज्ञानकोशाचें प्रचंड कार्य निश्चित कालावधींत डॉ. केतकरांना पुरें करतां आलें. इतकी लायकी असलेली विदुषी महाराष्ट्रीय स्त्रीसमाजांत डॉ. केतकरांना लाभणें शक्य नव्हतें, म्हणून डॉ. केतकरांचा

मिश्रविवाह व अशाच योग्य कारणास्तव केलेला कोणताहि मिश्रविवाह क्षम्यच नव्हे तर आवश्यक ठरेल.

याप्रमाणें व्यापक सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें मिश्रविवाह करावे लागले, तरी श्रीमती शीलवतीबाई केतकर यांनीं दर्शविलेला भावी अपत्यांचा प्रश्न शिल्लक राहणारच ! म्हणून एकंदरीनें असले मिश्रविवाह आंतर-धर्मीय वा आंतरजातीय न करण्याबद्दल केतकरबाईंनीं दिलेला इषारा योग्य आहे. मिश्रविवाहांत संस्कृतिसाम्य असणें शक्य नसल्यामुळें आहार, पोषाक व इतर चालीरीती यांची मोठी अडचण वगैरे गैरसोय पतिपत्नींना परस्परांपासून सोसावी लागते. म्हणून मागें पांचव्या प्रकरणांत सांगितलेलें संस्कृतिसाम्य साधण्याकरितां व वैवाहिक प्रेम व सुखी वैवाहिक जीवन चिरकाल लाभण्याकरितां सामान्यतः मिश्रविवाह न करणेंच बरें !

# प्रकरण चौदावें

# वैवाहिक जीवनाचा उत्तरार्ध

"Every true lover desires that love shall endure."

डॉ. मेरी स्टोप्सकृत 'Enduring Passion'

विवाहकालापासून पुढें सुमारें ४५।५० वे वयापर्यंत वैवाहिक जीवनांत उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांबद्दल १ ते १३ प्रकरणांत विवेचन केलें. ४५ ते ५० वर्षें वयानंतर आयुष्याचा उत्तरार्ध सुरू होतो. त्या काळांतहि कांहीं अवघड प्रश्न उत्पन्न होतात; त्यांचा विचार या प्रकरणांत करावयाचा आहे. अशा प्रश्नांपैकीं एक महत्त्वाचा प्रश्न असा कीं, ४० ते ५० वर्षें वयाच्या सुमारास वैधव्य किंवा विधुरावस्था आल्यास पुढील आयुष्य कसें घालवावें, पुन्हा अशा उतार वयांत लग्न करावें कीं नाहीं ? हा प्रश्न सांप्रतच्या हिंदु समाजस्थितींत दुहेरी बिकट झाला आहे. एकतर विधवाविवाह कायद्यानें मान्य केला असला तरी सामाजिक रूढीनें व हिंदुधर्मशास्त्रानें तो निषिद्धच मानला आहे. (कांहीं स्मृतिग्रंथांनीं तो मान्य केला आहे) त्यामुळें पुनर्विवाहाचा कायदा पास होऊन ६० वर्षें झालीं तरी पुनर्विवाह मात्र फारसे झाले नाहींत व अद्यापहि होत नाहींत. विधुरांचे विवाहाला अलीकडील स्त्री-शिक्षण प्रसारामुळें दुसरी अडचण उत्पन्न झाली आहे. साधारण शिकलेल्या मुली १५।२० वर्षें वयाच्या प्रौढपणीं स्वतःच विधुराशीं, विशेषतः दोनचार मुलें असलेल्या विधुरांशीं विवाह करण्यास स्पष्ट नकार देऊं लागल्या आहेत. त्यामुळें विधुरांचें ४० वर्षें वयाचे पुढें पुनर्लग्न होणें अशक्य होत चाललें आहे. अशा प्रकारें विधवा व विधुर दोघेहि पस्तीसचाळीस वर्षें वयापुढें साधारणपणें नाइलाजास्तवच अविवाहित म्हणजे पुनर्लग्नावाचून राहणार, अशी वस्तुस्थिति निर्माण होत आहे. अशा उत्तर वयांत ऊर्फ उतार वयांत पुन्हा लग्न कशाला पाहिजे ? अशा विधुरांनीं व विधवांनीं सार्वजनिक कार्यांत, देशकार्यांत उरलेलें आयुष्य घालवावें, प्रथम विवाहाचे मुलांमुलींचें संगोपन

व शिक्षण करून त्यांचे संसार थाटावे, हेंच योग्य ; असें शिष्टसंमत लोकमत आहे.

परंतु लैंगिक वाङ्मयाचे प्रसारानें सुशिक्षित समाजांत जो लैंगिक ज्ञानप्रसार होत आहे, त्यामुळें या शिष्टसंमत मतांत क्रांति होईल असें दिसत आहे. या क्रांतीचें मुख्य कारण डॉ. मेरी स्टोप्स यांनीं आपल्या Enduring Passion या पुस्तकांत कामविकार व उतार वय ह्यांसंबंधीं दिलेली माहिती आहे. या माहितीचा प्रसार सुशिक्षित स्त्रीपुरुषांत जसजसा अधिक होईल त्या मानानें त्यांच्या मतांत क्रांति होईलसें वाटतें (प्रकरण १० वें ' वैवाहिक जीवनांत क्रान्ति ' पाहा). डॉ. मेरी स्टोप्स यांनीं भरपूर माहितीच्या आधारावर त्या पुस्तकांत पुढील सिद्धांत ग्रथित केले आहेत.

(१) उतार वयांत म्हणजे पंचेचाळीस पंन्नासचे पुढें कामविकार नष्ट होत नाहीं, इतकेंच नव्हे तर, शरीरप्रकृति सुदृढ असेल त्या मानानें तो विकार स्त्रियांत व पुरुषांत पुढें दीर्घकाल कायम टिकतो.

(२) मासिक ऋतुनिवृत्तीनंतर स्त्रीपुरुषसमागम वर्ज्य मानणें ही चूक आहे, " प्रजायै गृहमेधिनां " म्हणजे फक्त अपत्यप्राप्तीपुरता स्त्रीसमागम ही समजूत योग्य नाहीं.

(३) उत्तरार्धांत ऋतुनिवृत्ति झाल्यावर गर्भधारणा व अपत्यसंगोपन बंद झाल्यामुळें वैवाहिक सुखाला हा काल अधिक योग्य होय.

(४) अपत्योत्पादन व अपत्यसंगोपन या सार्वजनिक कामांत येणाऱ्या अडचणी वैवाहिक जीवनांतील उत्तरार्धांत बंद झाल्यामुळें हा कालच स्त्रियांना सार्वजनिक कार्यास सोयीस्कर होय.

डॉ. मेरी स्टोप्स आपल्या Enduring Passion या पुस्तकांत लिहितात :

" Many women at sixty confess that their capacity and desire to enjoy sex-union increased rather than diminished. A woman at eighty, was asked, when she ceased to enjoy union, replied,' ask someone older than I, I do

not yet know.' A woman of sevety-nine in America said that both desire and gratification were as great or greater than before the meno-pause. Many a widow in England even after sixty wonder to have often acute sexual feelings and consult whether it should be encouraged or repressed."

उत्तरार्धांतील पतिपत्निसंबंधाबद्दल डॉ. मेरी स्टोप्स लिहितात :

"Now a deeper joy and freedom in union is experienced than before, because the coitus is unimpeded and much more satisfying, as there is a sensation of relief that nothing could happen by way of pregnancy, child-bearing and adding an undesirable number of children."

डॉ. मेरी स्टोप्स यांनीं स्त्री-पुरुषसंबंधाविषयीं ज्या अनभवाच्या गोष्टी नमूद केल्या आहेत, त्या ज्ञात झाल्यानें आपल्या सामाजिक जीवनांत क्रांति होण्यासारखी आहे. यामुळें दांपत्यांनीं—विशेषतः सुशिक्षित दांपत्यांनीं—आयुष्याचे दोन विभाग करून पहिल्या विभागांत म्हणजे वयाच्या पंचेचाळीस ते पन्नास वर्षेपर्यंत पतीनें केवळ द्रव्यार्जन करणें आणि पत्नीनें अपत्यसंवर्धन करणें, या कार्यांत घालवून कौटुंबिक द्रव्यबल व मनष्यबल जमवावें; आणि मग उत्तरार्धांत सर्वस्वीं सार्वजनिक कार्याला वाहून घ्यावें. अलीकडे सुशिक्षित स्त्रियांची सार्वजनिक कार्य करण्याची प्रवृत्ति वाढत आहे, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. पण विवाह ही अशा स्त्रियांना सार्वजनिक कार्यांच्या मार्गांतील मोठी अडचण वाटते, कारण विवाह म्हटला कीं 'चूल आणि मूल' या खासगी कामाचा व्याप वाढणारच. या भीतीमुळें कांहीं सुशिक्षित स्त्रिया अविवाहित राहून देशकार्य करूं इच्छितात. पण वास्तविक त्यांनीं अशी घाई करण्याचें कारण नाहीं. आपल्या आयुष्याचे निश्चित दोन विभाग निसर्गनिर्मित आहेत, ही गोष्ट स्त्रियांनीं विशेष ध्यानांत घेण्यासारखी आहे. निसर्गानेंच स्त्रियांना अपत्योत्पादन कार्यांतून ४०।४५ व्या वर्षीं निवृत्त करण्याची शारीरिक तरतूद केली आहे; व पुढें साठ-सत्तर वर्षापर्यंत जगण्याची ईर्षा स्त्री-पुरुषांनीं बाळगल्यास त्यांना पन्नास ते सत्तर वर्षें वयापर्यंत म्हणजे वीस वर्षें सार्वजनिक कार्यास निवध देतां येतील; आणि याच काळांत

कौटुंबिक सुखहि अधिक निर्वेधपणें व सरसतेनें अनुभवतां येईल. डॉ. मेरी स्टोप्स म्हणतात :

" During the second honey-moon and thereafter they should enjoy each other with deeper understanding, because by this time their family is grown up, the children have reached a school or college age and in the home there is no more the hourly responsibility of young children for the wife. If they begin a second new life in this way, the deeply loving couple are to each other eternally young to carry on some good work in the world. "

म्हणून वयाच्या उत्तरार्धांतहि विवाहित स्थितींत राहून खासगी जीवन सुखी करावें व प्रत्येकानें यथाशक्ति सार्वजनिक कार्य करावें.

" The happiness of a perfect marriage, which exchanges the vitality of private life, renders one a fitter and more perfect instrument for one's own particular work, the results of which are shared by society as a whole. "

या उताऱ्यांत म्हटल्याप्रमाणें सुखी वैवाहिक जीवन स्त्री व पुरुष यांची वैयक्तिक लायकी व काम करण्याची शक्ति वाढवून त्यांना आपापलें कर्तव्य करण्यास अधिकाधिक योग्य बनवितें आणि व्यक्तिश: प्रत्येक दांपत्य सुखी व कर्तृत्ववान् झाल्यानें एकंदर समाजाला त्याचा फायदा मिळतो.

## मराठी व इंग्रजी वचनें

" The purpose of human marriage as distinguished from the sexual union of the brute creation is conscious happiness. " —*Mrs. Hornibrook*

" Unhappy and unsuitable marriages necessarily foster immorality and social disorder. "

" The institution of marriage is more for recreation and less for procreation. "

" A genius wants a comfortable wife, not a clever wife. "

" Oh ! for that Being. One to whom I might have recourse in all my Humours and Dispositions; in all my Distempers of Mind, visionary causes of Mortification, and Fairy Dreams of Pleasure. " —*Herrick*

" Let us live together. It is everything to live together. It is love ? I can't say, but I know we must live together. "

" एकमेकांचे स्वभाव पटणें न पटणें याला महत्त्व आहे, त्यापेक्षांहि शारीरिक स्वच्छास्वच्छता, वासनांमध्यें कमीअधिकपणा यालाहि पुष्कळ महत्त्व आहे. " —'स्त्री' मासिक सप्टेंबर १९३५.

" विवाहाचें स्वारस्य वरपांगी दिसणाऱ्या कोणत्याहि कारणापेक्षां वासनापूर्तीच्या समाधानावर किंवा असमाधानावरच बहुतांशीं अवलंबून आहे. "

# प्रकरण पंधरावें

# समारोप

वैवाहिक जीवन सुखी कसें होईल, हा मुद्दा डोळ्यांपुढें ठेवून आतां-पर्यंत १४ प्रकरणांत या विषयाच्या अनेक अंगोपांगांचें वर्णन केलें आहे. तें विवाहेच्छु तरुण व तरुणींना, तसेंच नूतन विवाहितांना आणि पंचेचाळीस पन्नास वर्षें वयाच्या प्रौढ स्त्री-पुरुषांनाहि मार्गदर्शक व बोधप्रद वाटेल, असा भरंवसा वाटतो. आजच्या रूढ समजुतींना सर्वस्वीं धक्का देणारीं अशीं कांहीं प्रमेयें वरील विवेचनांत मांडलीं गेलीं आहेत, त्याबद्दल मतभेद होऊन या पुस्तकांतील लिखाणावर टीकाहि होईल. तथापि या पुस्तकांत

(१) विवाहबाह्य स्त्रीपुरुषसंबंध निंद्य व समाजस्वास्थ्याला घातक मानून सर्व विवेचन केलें आहे.

(२) अविवाहित स्थितींत ब्रह्मचर्य पाळणें अशक्यप्राय आहे, असें गृहित धरलें आहे.

(३) म्हणून विधवा व विधुर यांसुद्धां सर्व स्त्रीपुरुषांनीं विवाहित स्थितींतच राहावें, असें मत पुरस्कारलें आहे.

ज्यांना विषयवासना मारणें हें कोणत्याहि वयांत अशक्य आहे, अशी अनुभवान्तीं खात्री पटली असेल त्यांना वरील तिन्ही प्रमेयें मान्य होतील अशी आशा आहे.

याशिवाय दोन प्रकारचे लोक उरतात. ते प्रकार असे कीं,

(१) विवाहबाह्य स्त्री-पुरुषसंबंध ज्यांना गर्हणीय वाटत नाहीं, असे इसम.

(२) अविवाहित राहून ब्रह्मचर्य पाळणें शक्य आहे, असें वाटणारे इसम.

पहिल्या प्रकारांत कित्येक मोठाले समाजशास्त्रज्ञ विद्वान् लेखक

आहेत. त्यांचीं मतें रूढ करण्याचा त्यांचा प्रयत्न त्यांनीं आपल्या वाङ्मयद्वारां चालविला आहे. त्यांच्या पंथांत जनता कितपत सामील होते, हा प्रश्न भविष्यकाळांत सुटणारा असल्यामुळें तूर्त या मुद्यावर शाब्दिक वाद वाढविणें व्यर्थ आहे. दोन्ही बाजू वाचकांपुढें आहेत. सुशिक्षित स्त्री-पुरुष जनता या मुद्याचा निर्णय येत्या पांच-पन्नास वर्षांत प्रत्यक्ष आचरणानें देईल.

दुसरा प्रकार ब्रह्मचर्यवाद्यांचा. जे संयमी स्त्री-पुरुष प्रामाणिकपणानें ब्रह्मचर्य पाळूं शकतात, ते केव्हांहि श्रेष्ठ व वंद्यच होत. ब्रह्मचर्य पाळून सार्वजनिक कार्यास सर्वस्वीं वाहून घेणें, किंवा आपल्या पूर्वपरंपरेप्रमाणें आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गांत आयुष्य घालविणें, दोन्ही आयुष्यक्रम स्पृहणीय होत. पण ते मार्ग अशक्यप्राय आहेत, धोक्याचे आहेत, त्यांत दंभ, ढोंग, वंचना या दुर्गुणांना मनुष्य बळी पडणें शक्य आहे, असा इषारा देणें जरूर आहे. म्हणून दांभिक ब्रह्मचर्य नको, उघड विवाह बरा, असें प्रतिपादन या पुस्तकांत केलें आहे.

## सुख कीं कर्तव्य ?

याप्रमाणें वैवाहिक जीवन हाच राजमार्ग असल्याचें पटलें तर हें जीवन सुखी कसें होईल, हा तितक्याच महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचें उत्तर यथामति मागील अनेक प्रकरणांत देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावर 'सुख' हेंच वैवाहिक जीवनाचें ध्येय गृहित धरलें आहे, असा आक्षेप येईल. पण पुरुषानें विवाह केला म्हणजे स्वतःच्या पत्नीला व अपत्यांना सुखी करणें हें त्याचें कर्तव्य ठरतें; आणि स्वतःची स्त्री व मुलें यांच्या आनंदांत भागीदार होऊन स्वतः पुरुषहि सुखी होतो. म्हणजे सुख आणि कर्तव्य ह्या वैवाहिक जीवनाच्या दोन बाजू आहेत; एका दिशेनें पाहणारास फक्त कर्तव्य दिसेल आणि दुसऱ्या दिशेनें पाहणारास फक्त सुख दिसेल. स्वस्त्रीचें आरोग्य नीट राखून तिला सदोदित आकर्षक ठेवणें, तिची बौद्धिक व मानसिक उन्नति करून तिचा दर्जा स्वसमान राखणें, तसेंच आपल्या मुलामुलींना शारीरिक, बौद्धिक व मानसिक शिक्षण देऊन त्यांना उत्तमोत्तम नागरिक बनविणें, हें कर्तव्य सतत बजावणें म्हणजे स्वतःचें कुटुंब सुखी करणें होय व स्वतःहि सुखी होणें होय. कर्तव्य व सुख यांचा हा सुंदर मिलाफ आहे.

## पालकांस विनंति

आईबापांना व पालकांना असें सांगणें आहे कीं, आपल्या मुलामुलींच्या भावी सुखाकरितांच त्यांच्या विवाहाची घाई करूं नका. त्यांना शिक्षण-क्रमांत गुंतवा, व त्यांच्यावर योग्य नजर ठेवा व वैवाहिक जीवनांतील जबाब-दारीची जाणीव करून देणारें वाङ्मय त्यांना त्यांच्या प्रौढ वयांत अवश्य वाचावयास द्या म्हणजे मुलगेमुली अकालीं शृंगारप्रवण होणार नाहींत. मुलींना अठराव्या वर्षापर्यंत आणि मुलांना पंचविसाव्या वर्षापर्यंत शाळेंत शिक्षण देणें, हें तुमचें कर्तव्य आहे. फी, पुस्तकें, वगैरे खर्चाची ओरड करूं नका. विडीसिगारेटादि धूम्रपान, हॉटेलखाद्य, नाटक सिनेमा, जॉली क्लब, रेशमी जरीचे कपडेलत्ते, मित्रमंडळीसह जॉली ट्रिप्स, प्रवास, वगैरे बाबतींत सढळ हातानें खर्च चालू ठेवून मुलामुलींचे शिक्षणाला मात्र खर्चाचे अडचणीची सबब सांगूं नका. आईबापांचें आद्यकर्तव्य पुढील पिढीला भरपूर शिक्षण देऊन उत्तम नागरिक बनविणें हें आहे. विवाहसंबंध जुळवण्याचे बाबतींत वधूवरांचें आत्यंतिक कल्याण ही एकच दृष्टि ठेवा; हुंडा, मानपान, स्नेही मित्रांची आप्तइष्टांची भीडमुर्वत, वगैरे बाबींना महत्त्व देऊन विजोड जोडपीं जोडण्याचें पातक करूं नका. विशेषत: बौद्धिकदृष्टचा व शिक्षणदृष्टचा आणि स्वभावदृष्टचा समसमान असेच जोडीदार आपल्या मुलामुलींकरितां निवडा. या बाबतींत प्रौढ मुलामुलींना जरूर तितकें निर्णयस्वातंत्र्य द्या, पण तरुणतरुणींना जगाचा अनुभव अपुरा अगदीं कोता असतो, हें ध्यानीं घेऊन त्यांना योग्य जोडीदाराची निवड करण्याचे बाबतींत अगदीं मनमोकळे-पणानें मार्गदर्शक व्हा.

## गरीब पदवीधरांना सूचना

गरीब पदवीधरांना सूचना अशी कीं, पदवीधर तरुण आतांपर्यंत मध्यम स्थितींतल्या व गरीबींतल्या कुटुंबांतच श्रीमंतापेक्षां अधिक झालेले आहेत, कारण विद्येच्या सामर्थ्यानें दारिद्र्यांतून सुटून सुखवस्तु व श्रीमंत होण्याची महत्त्वाकांक्षा ते धरतात. विद्यामंदिरांतील गरीबांच्या खडतर तपश्चर्येला व पुढील कर्तृत्वाला मोहून व भावी श्रीमंतीच्या आशेनें कित्येक

श्रीमंत पण शिकलेल्या व रसिक तरुणी पदवीधरांशीं विवाहबद्ध होण्यास सिद्ध होतात. पण हे प्रयोग बाधक झालेले आढळतात. कारण आतां पदवी-धरांची संख्या पुष्कळ वाढल्यानें सरकारी नोकऱ्यांची आशा नाहीं. निम सरकारी व खासगी संस्थांचे नोकरींत पगाराचें मान बेताचें असल्यामुळें अशा श्रीमंती राहणींतल्या पण गरीबांना वरलेल्या पत्नींची फार निराशा होते व त्यांना गरीबीचें जीवन असह्य वाटून पतीलाहि त्या वैवाहिक जीवन असह्य करून सोडतात, आणि त्याच्या विद्वत्तेचा उपहास करून "पैसा मिळवतां येत नाहीं तर कशाला माझ्यासारख्या श्रीमंत मुलीशीं लग्न लावलंत" अशा उद्वेगानें बोलतात व वागतात. म्हणून गरीब पदवीधरांनीं श्रीमंत तरुणींचें पाणिग्रहण करतांना त्यांना आपल्या भावी खडतर जीवनाची प्रथम पुरी जाणीव करून द्यावी. उलट पक्षीं अशा विद्वान् पण गरीब स्वार्थत्यागी व देश-सेवक तरुणांनाच पसंत करून व त्यांना श्रीमंत आईबापांनीं आपल्या श्रीमंतींत व इस्टेटींतहि भागीदार करून आपल्या सुशिक्षित मुलीचे त्यांचेशीं विवाह करावे. निपुत्रिक श्रीमंतांनीं अशी निवड करणें योग्य नव्हे काय ?

## तरुणतरुणींना सूचना

तरुणांना व तरुणींना असें सांगणें आहे कीं, तारुण्यसुलभ विषय-वासनेला अविचारानें बळी न पडण्याची अत्यंत खबरदारी घ्या. शरीर-सामर्थ्य व शिक्षण उत्तम संपादन करा. विषयसुखसेवनाला भावी आयुष्य भरपूर आहे. पंचवीस तिसाव्या वर्षापासून पन्नासाव्या वर्षापर्यंत आणि दुसऱ्या हनीमूनची थिअरी लक्षांत घेऊन पन्नासाव्या वर्षापासून पुढें सत्तर-पंचाहत्तराव्या वर्षापर्यंत हा विषयसुखसेवनाचा लाभ तुम्हांस अनिर्बंध लाभावा म्हणूनच प्रथम वयांत विवाहाची किंवा विषयसुखसेवनाची घाई करूं नका. मुलांनीं पंचविसाव्या वर्षानंतर आणि मुलींनीं अठराव्या वर्षानंतर आपला वैवाहिक जोडीदार निवडण्याच्या प्रयत्नास लागावें, योग्य निवड झाली असें वाटल्यानंतरहि वर्षसहा महिने प्रत्यक्ष विवाहविधि पुढें ढकलावा, आणि दरम्यान कोणतीहि अनिष्ट गोष्ट नजरेस आल्यास तो विवाहसंकेत अगदीं निर्भीडपणें रद्द करावा. आईबापांच्या, पालकांच्या किंवा आप्तइष्टांच्या भीडेला किंवा केवळ लौकिकाच्या भावनेला बळी पडून विजोड जोडीदाराला

वरूं नये. सामान्य अर्थाचे शारीरिक आकर्षणरूपी प्रेमविवाह, सहवासोत्तर विवाह, लव्ह् अॅट फर्स्ट साईट, वगैरे सिद्धान्तांच्या पुस्तकी वाचनानें फारसे भारून जाऊं नका. शारीरिक आकर्षणाला 'प्रेम' मानण्याची चूक होण्याचा फार संभव असतो, हें नीट ध्यानीं घ्यावें. प्रेम—खरें व टिकाऊ प्रेम—संस्कृति-साम्य, स्वभावसाम्य, शिक्षणसाम्य व ध्येयसाम्य या चतुष्टयीवर आधार-लेलें असतें, या सिद्धांताचें नीट मनन करावें. नवमतवादांतील सर्वच सिद्धांत अद्याप सुप्रतिष्ठित झालेले नाहींत, प्रयोगावस्थेंत असलेलीं तीं अपरिपक्व प्रमेयें आहेत; सहवासोत्तर विवाह, कॉंट्रॅक्ट मॅरेज, वगैरेचे प्रयोग पाश्चात्य देशांत चालू आहेत, म्हणून त्या मार्गाचा आजच घाईनें अवलंब करणें धोक्याचें आहे. 'तुमचा प्रयोग होतो पण आमचा जीव जातो', असा अनुभव या प्रयोगामध्यें तरुणींना भोगण्याचे प्रसंग त्यांच्यावर तरुणांनीं आणूं नयेत, आणि विशेषत: अशा बेफाट तरुणांच्या नादीं तरुणींनीं लागू नये, कारण स्त्रियांची अब्रू अगदीं कांचेसारखी अद्यापहि आपला हिंदु समाज मानतो. माटुंगा (मुंबई) श्रद्धानंद अनाथ महिलाश्रमाच्या रिपोर्टांत असें लिहिलें आहे कीं, १९३७ सालीं २९ कुमारिका होत्या, त्यांत पतित कुमारिकांची संख्या १८ होती. दारिद्र्य, पालकांचा निष्काळजीपणा, लग्नाची वाढलेली वयोमर्यादा व प्रौढ मुलामुलींचा एकत्र सहवास, या कारणां-मुळें ही संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. अशा भ्रष्ट झालेल्या तरुणींना वैवाहिक जीवन असाध्य होतें, ही गोष्ट तरुणींनीं अत्यंत ध्यानांत धरून वागावें, आणि केवळ शारीरिक आकर्षणाला ऊर्फ प्रेमाभासाला, किंवा लबाडांच्या भुलथापांना, किंवा नव्या नव्या प्रयोगांना स्वत: बळी पडण्याचा आत्म-घातकीपणा हिंदुसमाजांतील तरुणींनीं करूं नये. पाश्चात्य समाजांत नीति-अनीतीच्या कल्पना बदलल्या आहेत, त्यांनाच हे प्रयोग एकदोन पिढ्या करूं द्या, म्हणजे जागतिक मताचा 'सुवर्णमध्य' कोठें आहे, तें ठाम ठरेल.

## नूतन विवाहितांना सूचना

नूतन विवाहितांना असें सांगणें कीं, संसार असार, दु:खमय आहे असा नैराश्यवाद (पेसिमिझम) हृदयांत बिलकूल बाळगूं नका. संसार सुखी करणें, ही गोष्ट सर्वस्वीं पति व पत्नी यांच्या हातची आहे, हें ठाम

समजून प्रयत्नवादी बना. वैवाहिक सुखाला पतिपत्निप्रेम हा पाया आहे, संस्कृतिसाम्य असलें म्हणजे शिक्षणसाम्य व ध्येयसाम्य बहुधा साधतें, आणि त्याला स्वभावसाम्याची जोड मिळाली कीं वैवाहिक सुख खात्रीनेंच मिळेल. आपल्या हिंदु समाजांत जातींतल्या जातींतच विवाहसंबंध करण्याची रूढि असल्यामुळें संस्कृतिसाम्य, शिक्षणसाम्य व ध्येयसाम्य बहुधा असतेंच. स्वभाव ही मात्र फार गहन गोष्ट आहे, पण स्वभावाला थोडीबहुत मुरड घालून पतिपत्नींनीं एकमेकांशीं मिळतें घेतलें पाहिजे. रोजच्या व्यवहारांत कांहीं कांहीं मतभेद उत्पन्न होणारच, व ते विचारविनिमयानें दूर करून वैवाहिक जीवन सुखी करण्यास झटलें पाहिजे. पतीनें प्रयत्नपूर्वक द्रव्यार्जन करून निर्व्यसनीपणा राखला, आणि पत्नीनें काटकसरीनें खर्च चालवून अपत्यसंगोपन उत्तम केलें तर संसार सुखी होण्याची खात्री बाळगण्यास फारशी हरकत नाहीं.

## डॉक्टरवर्गास विनंति

डॉक्टर वर्गाला विनंति कीं, मानवजातीचें आयुरारोग्य राखण्याची कामगिरी तुम्हीं पत्करिली आहे. पुरुषांचें व विशेषतः मातांचें व बालकांचें आरोग्य उत्तम राहावें म्हणून दोन बाळंतपणांमध्यें निदान तीनचार वर्षांचें अंतर असावयास पाहिजे, व त्याला उपाय संततिनियमन हा होय. म्हणून या उपायाचें ज्ञान स्त्रीसमाजामध्यें पसरविणें डॉक्टरांचें कर्तव्य आहे. उत्तरोत्तर प्रसूतीकरितां मॅटर्निटी होममध्यें जाण्याची प्रवृत्ति स्त्रियांत वाढत आहे. तेथें माता व बालकाच्या आरोग्याकरितां या उपायांची माहिती स्त्रीडॉक्टर व नर्सेस यांनीं मातांना अवश्य द्यावी. प्रांतिक सरकारांनीं तालुकानिहाय मॅटर्निटी होम्स ठेवावीं, असा प्रयत्न मुंबई विधिमंडळांतील स्त्रीसभासदांनीं अवश्य केला पाहिजे, व अशा प्रसूतिगृहामार्फत संततिनियमनाच्या ज्ञानाचा व साधनांचाहि प्रसार झाला पाहिजे.

## प्रौढ स्त्रीपुरुषांस विनंति

प्रौढ स्त्रियांस व पुरुषांस सूचना अशी कीं, गृहराज्यांत श्रेष्ठत्वाचें

नातें तुमचेकडे असून "यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरोजनः" या न्यायानें तुमचे मुलगे, मुली व आप्तइष्ट तुमच्या वागणुकीकडे बारकाईनें पाहात असतात, म्हणून त्यांना सर्वस्वीं अनुकरणीय व हितपरिणामीं होईल अशीच वागणूक तुम्हीं ठेविली पाहिजे. अतिरिक्त चहापान, धूम्रपान, हॉटेलखाद्य, जॉली क्लब, जिमखाने आणि पत्ते या षोकांना आळा घाला. आपल्या होतकरू मुलामुलींच्या रोज नजरेसमोर या गोष्टी करणें घातक आहे. शालेय शिक्षणाखेरीज गृहशिक्षण व निदान मुलामुलींच्या शालेय शिक्षणावर देखरेख हा आईबापांना फुरसुतीचे वेळचा व्यवसाय होय. शिवाय चित्रकला, संगीत-कला यांची आवड मुलामुलींमध्यें उत्पन्न करून त्या कलानंदांत सहभागी व्हा. घराभोंवतीं उत्तम बागबगीचा करा व त्याची गोडी मुलामुलींना स्वतः तुम्ही हें काम करून लावा. आणि सर्वांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सुरापान, व्यभिचार आणि जुगार या व्यसनांबाबत स्वतःच्या मुला-मुलींना आईबापाबद्दल नुसता संशयसुद्धां येऊं देऊं नका. भावी पिढी सामर्थ्यवान्, नीतिमान व राष्ट्राभिमानी होईल, अशीच स्वतःची वागणूक रात्रंदिवस ठेवा.

प्रांतिक व संस्थानी सरकारांना आणि जिल्हा लोकल बोर्डांना अशी विनंति आहे कीं, राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्याचें आद्य साधन, देशांतील प्रत्येक कुटुंबाचें वैवाहिक जीवन सुखी करणें, हें आहे. त्याकरितां प्रत्येक पिढी सुशिक्षित व प्रौढविवाहवादी बनली पाहिजे. शिक्षणाचे शालेय व वाचनालयीन असे दोन भाग मनुष्याच्या वयमानानुसार पडतात. म्हणून आपल्या देशांत अगदीं खेडोपाडीं प्रत्येक मैल दोन मैलांच्या टापूंत एक तरी प्राथमिक शिक्षणाची शाळा असली पाहिजे व त्या शिक्षणक्रमांत वर्धा शिक्षण योजनेइतकें पुस्तकी शिक्षण व औद्योगिक शिक्षण सर्व मुलामुलींना मिळण्याची सोय झाली पाहिजे. तसेंच प्रत्येक तालुक्याचे ठिकाणीं आणि इतर पांच हजार वस्तीच्या गांवीं दुय्यम शिक्षणाची म्हणजे कॉलेज प्रवेशापर्यंत शिक्षणाची सोय आणि प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं कॉलेज शिक्षणाची, आणि ज्यांना उच्च शिक्षण घेण्याची बौद्धिक वा सांपत्तिक पात्रता नसेल त्यांना धंदेशिक्षणाची सोय झाली पाहिजे. शिवाय प्राथमिक शिक्षणासुद्धां सर्व

प्रकारच्या शाळांना जोडून किंवा स्वतंत्रपणें प्रौढ स्त्रीपुरुषांकरितां सार्वजनिक वाचनालयें चालविण्यास स्थानिक रहिवाशांना उत्तेजन दिलें पाहिजे. कारण वैवाहिक जीवनासंबंधींच्या सर्व बाबींचें ज्ञान शालेय शिक्षणानंतर वैवाहिक जीवनांत पदार्पण करण्याच्या वयापासून पुढेंच मिळवावयाचें असतें, म्हणून या विषयावरचा भरपूर पुस्तकसंग्रह असलेलीं वाचनालयें सर्वत्र पाहिजेत. या साधनानें प्रत्येक स्त्रीपुरुषाला पुस्तकी ज्ञान मिळवून व त्याप्रमाणें वागून संसार सुखी करतां येईल, व त्यामुळें एकंदर राष्ट्राचें सामर्थ्य वाढेल.

## या पुस्तकाचा संदेश

" At the present time it is of vital importance to the state that its marriages should be fruitful—in happiness, efficiency and children (and all three are closely connected). " —*Ernest H. Starling*.

आस्तिकांच्या मताप्रमाणें जगच्चालक परमेश्वराचा आणि नास्तिकांच्या मताप्रमाणें निसर्गाचा मानवी जातीला वैवाहिक जीवनाचे बाबतींत मुख्य संदेश काय आहे, यासंबंधीं या पुस्तकाच्या लेखकाचें मत पुस्तकाच्या अखेर स्पष्ट मांडणें जरूर आहे. या पुस्तकांतील 'प्रेम आणि मैत्री', 'नूतन विवाहितांस सूचना', 'वैवाहिक सुखाचीं साधनें', 'बर्थ-कंट्रोल', 'सेकंड हनीमून', वगैरे हेडिंगांखालील विवेचन वाचून, वैवाहिक जीवनांतलें सुख जास्तींत जास्त कसें मिळवावें, हें सांगण्याचा या लेखकाचा हेतु आहे असें वाचकांस वाटेल व तें खरेंहि आहे. पण वैवाहिक सुख हें मानवी जीवनाचें ध्येय नव्हे, हेंहि तितकेंच खरें आहे व तें मत या लेखकाला मान्य आहे. वैवाहिक सुख हें साधन असून त्याचें साध्य किंवा ध्येय, मानवजात उत्तरोत्तर शारीरिक, बौद्धिक व मानसिक दृष्ट्या अधिक अधिक उन्नत अशी निर्माण करणें, हें आहे. कुटुंबाचा व राष्ट्राचा उत्कर्ष कसा साधेल, हाच विचार प्रत्येक विवाहित स्त्रीपुरुषाच्या दृष्टीपुढें असला पाहिजे. कौटुंबिक दृष्ट्या मराठेशाहींत शिवाजी महाराजांपुढें आणि पेशवाईंत थोरले माधवराव पेशवे यांचे अंतकालीं जो एक प्रश्न मनाला संत्रस्त करीत होता, तो हा कीं, स्वतः-

इतकी लायक संतति राज्याची धुरा वाहण्यास त्यांची नव्हती. संभाजी महाराज व पेशवा नारायणराव या नालायकांच्या हातीं राज्यकारभार द्यावा लागत असलेला पाहून त्या थोर व कर्तृत्ववान् राज्यकर्त्यांच्या मनाला अत्यंत चिंता वाटली. लोकहिताच्या व्यापक तत्त्वाप्रमाणें पाहिलें तरी या दोन श्रेष्ठ पुरुषांसारखे वीर पुरुष उभ्या महाराष्ट्रांत त्या त्या काळीं कां लाभले नाहींत, हा राष्ट्रीय दृष्टचा चिंतनीय प्रश्न आहे. चालू पिढींतहि एकेक थोर राष्ट्रपुढारी दिवंगत होण्याचे वेळीं हीच चिंता विचारी मनुष्याच्या मनाला वाटते. पौराणिक काळांतील रघुवंशनामक काव्यांत ज्याप्रमाणें रघुवंशाचे राजे एकामागून एक ' बापसे बेटा सवाई ' अशा रीतीनें थोर व पराक्रमी निघाल्याचें वर्णन वाचून मनाला समाधान वाटतें, तसें समाधान महाराष्ट्रांतील मराठेशाहीचा व पेशवाईचा किंवा हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि प्रांताचा अर्वाचीन इतिहास वाचतांना लाभत नाहीं. चालू काळांतहि लोकमान्य टिळकांना ' सवाई टिळक ' वा महात्मा गांधींना ' सवाई गांधी ' असे थोर पुरुषवंशज कां लाभूं नयेत ? हा कौटुंबिक दृष्टचा चिंतनीय प्रश्न आहे. चिपळूणकरांना सवाई चिपळूणकर (कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री) आणि नेहरूंना सवाई नेहरू (मोतीलाल व जवाहरलाल) लाभले, पण हीं उदाहरणें हाताच्या बोटावर मोजण्याइतकीं क्वचित् दिसतात; हाच कौटुंबिक दृष्टचा मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. इंग्लंडचा इतिहास मात्र अशा थोर थोर इसमांच्या परंपरेनें भरलेला आहे, म्हणूनच इंग्लंडनें जगविख्यात ब्रिटिश साम्राज्य स्थापलें व तें अद्याप टिकविलें आहे. तात्पर्य, कौटुंबिक जीवनाचें ध्येय उत्तरोत्तर कर्तृत्ववान् अशी संतति निर्माण करणें हें असून त्याचें साधन म्हणून कौटुंबिक जीवन सुखी कसें होईल, या विषयाची चर्चा या पुस्तकांत केली आहे. डॉ. मेरी स्टोप्स म्हणतात,

" If the state should raise the standard of married happiness, it will be a greater national bulwork than many battleships. "

सुखी वैवाहिक जीवन असेल तर तेजस्वी संतति निर्माण होईल आणि अशा संततीचें वीसपंचवीस वर्षें वयापर्यंत उत्तम संगोपन करणें म्हणजे मुला-

मुलींना योग्य तें शारीरिक, बौद्धिक व मानसिक शिक्षण देणें, हें कार्यहि होईल. जर्मनीचे राष्ट्रसूत्रधार हेर हिटलर यांची जर्मनींत दोन हजार 'प्रति हिटलर' निर्माण करण्याचे कार्याची योजना नुकतीच जाहीर झाली आहे. ती वाचून आणि हेर हिटलर यांची सांप्रतची जर्मन साम्राज्याची तृष्णा पाहून जगांतील अनेक थोर थोर मुत्सद्यांच्या हृदयाला कंप सुटला असेल, कारण शस्त्रास्त्रांची अपरिमित वाढ व त्यांच्या जोरावर इतर राष्ट्रांना नमविण्याचा हेर हिटलर याचा उपक्रम पाहून इंग्लंडचे मुख्य प्रधान चेंबर्लेन, अमेरिकेचे प्रेसिडेंट रूझवेल्ट, वगैरे जागतिक शांततावादी मुत्सद्दी चिंतामग्न झाले आहेत. हिंदुस्थानांतहि प्रतिबुद्ध किंवा प्रतिख्राइस्ट असे महात्मा गांधी यांची 'शस्त्रसंन्यास व निःशस्त्र प्रतिकार' ही योजना वाचून तर त्यांना वेड्यांत जमा करण्यांत येत आहे. राष्ट्रसंरक्षणाचे मार्ग कांहीं ठरोत, पण महाराष्ट्रांत व हिंदुस्थानांत थोर व सामर्थ्यवान् पुढारी अधिकाधिक कसे निपजतील हा प्रश्न प्रत्येक सुशिक्षित दांपत्यानें विचार करण्यासारखा आहे, व त्याचेंच साधन यथामति या पुस्तकांत सुचविण्याचा प्रयत्न केला आहे, तो वाचकांना रुचेल अशी आशा आहे.

REFBK-0005697

५६९७

# अभिप्राय

(१) लेखक दोन (पतिपत्नी ?) स्त्रीपुरुष असावेत. भाषा शुद्ध, सोपी व गोड आहे. व्याप्ति बरीच पुरेशी आहे. मात्र लैंगिक शिक्षणाबद्दलचें एक प्रकरण हवें होतें. संस्कृत व इंग्लिश उताऱ्यांचीं भाषांतरें हवीं होतीं. तरुण-तरुणींना वाचावयास पुस्तक चांगलें रसाळ आहे. —**भारद्वाज** ता. ६।८।१९३८.

(२) सर्वसाधारण मानव जातीचा विकास होण्याशीं वैवाहिक जीवनाचा अत्यंत निकट संबंध असोन याबद्दल अलीकडे बरेंच वाङ्मय प्रसिद्ध झालें आहे. त्यांत आमचे मित्र श्रीयुत लक्ष्मण केशव भावे, बी.ए., एल्‌एल्.बी., यांच्या या ग्रंथानें चांगली भर पडली यांत शंका नाहीं. शिक्षणप्रसार, प्रौढविवाह, वैवाहिक निवड व याबद्दल वधू, वर व पालक यांचेवरील जबाबदारी यांचें मार्मिक विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विवाह, पुत्रजन्मोत्सव, नूतन वर्षारंभ, अशा मंगल समयीं देणगी (अहेर) देण्याची पद्धत आहे, अशा वेळीं हें पुस्तक देण्यास योग्य असें आहे. ता. १।११।१९३८.

**चिमणाजी माधव कुलकर्णी,** वकील, कोर्ट पाली, (सं. भोर).

**गोविंद रामचंद्र ऊर्फ बापूसाहेब लिमये,** पाली (सं. भोर).

(३) गृहस्थाश्रमांतील मुख्य भाग म्हणजे अनुरूप पतिपत्नीचा परस्परांना पूरक होऊन परस्परांची सुखवृद्धि करणारा वैवाहिक जीवनाचा काल होय. खरोखर हा विषय ग्रंथरूपानें अद्यापि लोकांच्या पुढें कां मांडला गेला नाहीं, याचें आश्चर्य वाटतें. या पुस्तकानें मराठी भाषेंतील ती उणीव चांगल्या रीतीनें भरून निघेल. पुनर्विवाह, मिश्रविवाह किंवा घटस्फोट हे वैवाहिक जीवनांतील सध्यां विशेष प्रामुख्य पावलेले विषय आहेत. हे प्रकार कांहीं समाजांत पूर्वपरंपरेला सोडून आहेत. वंशशुद्धि अवश्य राखली जावी, पण ज्यांना अशा प्रकारांची आवश्यकता असेल त्यांना कायद्यानें रस्ता मोकळा असणेंहि समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट आहे. हीच युक्तियुक्त प्रतिपादनशैली या ग्रंथांत स्वीकारली आहे. संततिनियमन आणि त्याचीं साधनें, गर्भधारणा, गर्भजोपासना, प्रसूति, शिशुसंगोपन, वगैरे विषयांची माहिती व महत्त्व अशा ग्रंथांत थोडक्यांत असणें अत्यंत जरूर आहे. —**विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव**

पुणें, ता. २६।११।१९३८